# झुंज

## संघर्ष जीवनाचा

लेखक - गोविंद् गढरी



झुंज संघर्ष जीवनाचा

*तीर्थस्वरूप प्रेमळ आई - पार्वती हीस*
*अर्पण....*

हे पुस्तक विनामूल्य वितरणासाठी ई साहित्य प्रतिष्ठानला दिल्याबद्दल

# श्री रविंद्र गढरी आणि श्री गोविंदराव गढरी

## यांचे ई साहित्य प्रतिष्ठान आभारी आहे


या पुस्तकावरील आपल्या प्रतिक्रिया या पत्त्यांवर कळवा

Phone no 1 - 7387864278 Ravindra Gadhari

Phone no 2 - 8830911923 Govindrao Gadhari - Author

Email ID - rggadhari@yahoo.com

Address - 17/4, Parvati Sadan, Mahindale Shiwar, Sakri Road, b/h Navin Jakat Naka

Dhule 424 001

(0256 - 277412)



Digital Publication by

esahity@gmail.com

www.esahity.com

# झुंज
## संघर्ष जीवनाचा

लेखक - गोविंद गढरी

प्रथम आवृत्ती - २०१९

© सर्व हक्क प्रकाशकाधीन

संपादक व प्रकाशक
**गोविंद गढरी**

छायाचित्र -
**ऋतुजा गढरी**

अक्षरजुळणी -
**रविंद्र गढरी**
**अस्मिता गढरी**

मुखपृष्ठ संकल्पना -
**राजेश खडके**

मुद्रण व्यवस्था -
**सार्थ ऑफसेट,** बारामती

किंमतः २१०/-

सदर पुस्तकातील मतांशी (मजकूराशी) मुद्रक, छायाचित्रकार, मुखपृष्ठकार,
अक्षर जुळणीकार सहमत असतीलच असे नाही.

# प्रस्तावना

लेखकाच्या स्वत:च्या जीवनातील सत्य घटीत घटनांवरील हे लिखाण आहे. दुर्गम भागात रानोमाळ भटकंती करणाऱ्या असंघटित समाजातील एका दुर्बल आणि दुबळ्या कुटुंबात जन्मलेल्या एका व्यक्तीच्या जीवनात बालपणापासून ज्या संकटमय घटना घडल्या त्या त्याने अनुभवल्या व त्यांना ते कस-कसे सामोरे गेले आणि त्यात त्यांनी अनुभवलेली, झेललेली संकटे व त्यावर कशी मात केली त्याचे त्यांनी गावरान मराठी भाषेत कथन केले आहे. प्रदीर्घ काळापर्यंतची त्यांची सत्य घटनांवर आधारीत अशी ही झुंज आहे.

त्यात वास्तवता आहे, कल्पनाविलास किंवा अतिशयोक्ती नाही. काही ठिकाणांची आणि व्यक्तींच्या नावात साम्य असेल तर तो निव्वळ योगायोग असू शकतो. परंतु, भौगोलिक आणि वास्तविक भागाचा आणि काळात अजिबात बदल नाही. संसारिक किंवा व्यावहारिक जुळवणीसाठीची ही त्यांची झुंज नाही. अस्तित्व टिकवण्यासाठी जी जिद्द, हिंमत, समय सूचकता यांचा आधार त्यांनी घेतला, ती झुंज कल्पनेवर आधारीत अतिरंजित खुमारदार घटनांवर हे साहित्य नसल्याने कदाचित वाचकाला जास्त आकर्षण वाटणार नाही. पण, प्रत्येक घटनेच्यावेळी लेखकाच्या वयोमामानाचा विचार करता मनाची उदात्तता व खंबीरपणानेच निरीक्षणात्मक दृष्टीने या झुंजीकडे पाहिले गेले तर निश्चितच वाचक वर्ग त्याचा स्वीकार करतील. कारण, त्यात मनोरंजन बरोबरच एक आत्मिक बल त्यांना मिळेल.

# मनोगत...

मन हे निसर्गतः चंचल आहे. वयाच्या कोणत्याही अवस्थेत ते कधीच स्थिर नसते. विचार हे त्याचे वाहन आहे. भावना ह्या त्याला दिशा दाखवतात. आयुष्यातील घटना ह्या भावनांना प्रेरीत करतात. त्यानुसार भावनांच्या हिंदोळ्यावर मन सतत झुलत असते. अशाप्रकारे मन सतत व्यस्त राहून जीवनाचे संचालन चालू असते. त्यात अनेक निरनिराळ्या अनुभवांचे बंध धावत्या आयुष्यात त्यांना बांधून आठवणींच्या कप्प्यात साचवत जातात. वेळी-अवेळी मन त्याच्या सवडीनुसार त्याला हवा तो कप्पा उघडून चाळत असते. तेव्हा एखाद्या चलचित्रासारखे त्या घटना कधी त्याला व्यथीत करतात, कधी चिंतीत करतात, कधी पुलकीत करतात तर कधी मुग्ध करतात. मन चिरतरुण आहे ते कधी थकत नाही. अशाप्रकारे ही संचीत शिदोरी मानवाला ज्यावेळी त्याची गात्रे थकलेली असतात, जवळपास कोणी साथी नसतो किंवा साथी असेल तर गत अनुभवांची त्यात देवाण-घेवाण होते. अशा वेळी हे कप्पे एक-एक उघडले जातात आणि त्यात विरंगुळा शोधतात.

माझ्या मनातली अवस्था सध्या एकाकीपणातील आहे. आयुष्य उतरणीला लागले आहे. संसाराच्या बंधनीतच सर्वकाळ गेला आहे. बालपण ते तरुणपण आणि तरुण्य ते म्हातारपणाच्या दरम्यान अनेक अनुभव आहेत. त्यातील आनंदाचे क्षणी संगी-साथी भागीदार नव्हते. विशेषतः वैयक्तीक जीवनात अशी संकटे बरीच आली. त्या संकटांना बालपणापासून आतापर्यंत मी कोणाला वाटण्याचा प्रयत्न केला नाही. कारण जे जवळचे होते त्यांना सांगून चिंता किंवा क्लेश द्यावे असे कधी वाटलेच नाही. आता असे वाटायला लागले आहे की आपण ती एक पोकळी निर्माण केली आहे. आता ती भरून काढायला हरकत नाही. ज्या घटना आणि अनुभव मी कथन केल्या आहेत त्यातून वाचकाने काही घेतलं तर लाभच होणार आहे. याच उदात्त भावनेने मला हे लिखाण करायला प्रवृत्त केले आहे. वाचन करताना वाचक वर्गाला याचे पूर्ण वाचन केल्याविना पुस्तक हातावेगळे करावे असे कधी वाटणार नाही. याची मला खात्री आहे. तरी वाचून आनंद आणि अनुभवाची दोन शब्दातील अभिप्रायाची अपेक्षा प्रार्थनीय आहे.

**– गोविंद गढरी**

# निवेदन

प्रस्तुत साहित्य हे साठ-पासष्ट वर्षापूर्वी ग्रामीण भागात राहणाऱ्या आणि ज्याची बोली भाषा ना अहिराणी, ना मराठी, ना मुसलमानी, ना मारवाडी, ना गुजराती बोलणाऱ्या लेखकाची आहे. त्याच्या मायबोलीत काही उत्तर प्रदेश आणि मध्य प्रदेशची मिश्रित भाषा आहे पण वास्तव्य खानदेश आणि मराठवाड्याच्या सरहद्दीवर आहे. त्यामुळे या सर्व भाषांचा त्यात समावेश आहे. म्हणून वाचकास ती वाचताना थोडा विरंगुळा तर होईलच बरेच शब्द दुहेरी अर्थी येत असतील तेव्हा त्यांचा अर्थ जुळवताना आनंद लाभेल.

# अनुक्रमणिका


| | |
|---|---|
| सुरुवातीचे दिवस - परिचय | ९ |
| माझे बालपण | १४ |
| घरातील साप | १७ |
| मोसंब्यांची चोरी | २० |
| दुष्काळ - मेजघाटातील दिवस | २५ |
| आईची दुखापत | ३४ |
| अजगराची शिकार | ५१ |
| शाळेत प्रवेश | ८० |
| कैरीची देन | ९३ |
| पूराशी सामना | १०३ |
| आप्पाचा शोध | १०८ |
| आग्यावेताळ | ११८ |
| गाव सोडले | १४० |
| पुन्हा शिक्षणाला सुरूवात | १४९ |
| शिक्षण ते नोकरी | १६० |
| पोष्टात पदार्पण | १८१ |
| अपघात | २०४ |
| पदोन्नती | २०८ |
| माझी पहिली केस | २१६ |
| नोकरीतील मार्गक्रमण | २३१ |
| षडयंत्रातून सुटका | २४१ |



# सुरुवातीचे दिवस – परिचय

आयुष्याच्या पहिल्या दहा वर्षांचा काळ १९४५ ते १९५५ चा. जन्म ब्रिटीश काळातला. ते एक छोटे खानी गाव. त्यावेळी तिथली वस्ती एक ते दीड हजारांची. पण त्यात सर्वजातींचा समावेश. तिथे चार जीवांचे एक छोटे कुटुंब. कुटुंबाची प्रमुख आई. बापाची छत्र-छाया परमेश्वराने हिरावून घेतलेली. राहण्यासाठी ५' बाय १०' या मापाचे घर. खूप जुन्या जमान्याचे, तरी सऱ्या शाबूत, पण त्यांच्यावरच्या आडव्या दांड्या बऱ्याचशा तुटलेल्या. काही अर्धवट लटकलेल्या तर काही खाली वाकड्या तिकड्या लोंबकळणाऱ्या, दांड्याचा आधार गेल्याने सडलेले कीलचनचे बारीक बारीक तुकडे सर्व घरात झिरपायचे. त्या बरोबरच वरच्या मातीच्या पेंड मधून मातीही खाली गळायची. उन्हाळ्यात आणि हिवाळ्यात घरात मोकळा आसरा मिळायचा, पण पावसाळ्यात कान्या-कोपऱ्यात आसरा शोधावा लागायचा. ज्याच्या हातात जे येईल ते घेऊन घरात गळालेले पाणी रात्री बे रात्री उपसत बसायचे. कारण पावसाचे पाणी धाब्यावरून वाहून न जाता सरळ घरात गळायचे. घर जमिनीच्या सपाटी पासून बरेच खोल होते. खूप पाऊस झाला तर गटारीतुन जेवढे पाणी मावेल तेवढे वाहून जायचे, बाकीचे घरात यायचे. पूर्ण घरात पाण्याचे डबके साचायचे. त्या डबक्याच्या पाण्यात खाटेवर बसून दिवस किंवा रात्रही काढायचो. तेवढ्याशा घरात एक दळण दळण्याचे जाते, घराच्या कोपऱ्यावर एक पाणी भरण्यासाठी माठ, एक बादली, स्वयंपाकासाठी पीठ मळण्यासाठी मातीची एक कुंड, भाजी

शिजवण्यासाठी मातीची एक हंडी, भाकरी भाजण्यासाठी एक मातीची एकोटी, पाणी पिण्यासाठी एक मातीचे लोटे आणि जेवण्यासाठी मातीच्या बाडग्या, रात्री उजेडासाठी मातीच्या पणत्या. झोपण्यासाठी आणि पांघरण्यासाठी तागाच्या गोणपाटाचाच उपयोग व्हायचा. असे हे कुटुंब आपले जीवन चालवीत होते. अगदी आनंदात कुणाशी तुलना नाही, कुणाचा हेवा नाही, मिळाला आनंद, नाही मिळाला तरी आनंद अशी त्या कुटुंबातील व्यक्तींची मानसिक घडण पक्की झाली होती. स्वत:ची शेती नव्हती. अपना हाथ जगन्नाथ असा त्या कुटुंबातील मंडळीचा थाट होता.

आई पंचविशीच्या घरातली. रंग पिवळसर गोरा, चेहऱ्यावर ओसंडून वाहणारे तेज, शरीरात मराठवाडी दरारेबाज करारीपणा. तसे वडीलही कर्तबगार आणि कलाकार होते. वडलांच्या कामाचा आटोपाही जबरदस्त होता. कामात खूप नीटनेटके पण होते. एक हजार केळीच्या खोडांच्या टाचणीचे काम ते एकटे एका दिवसात करायचे. कापलेल्या बाजरीच्या पेंढ्यांची गरी म्हणजे ढीग एका दिवसात पाच-पाच रचून मोकळे व्हायचे. गरीचा आकार अगदी उलट्या भोवऱ्या सारखाच घाटदार आणि सुबक असायचा. जरी दिवस-दिवस पावसाची झडी लागली तरी पाण्याचा एक थेंबही गरितल्या पेंढीत शिरायचा नाही. त्या मुळे बाजरीचे दाणे जशेच्या तशे सुरक्षित राहायचे. गावात पूर्वी लळीत म्हणजे नाटक पार्टी असायची कारण त्यावेळी सिनेमा हा प्रकार खेडेगावात माहीत नव्हता. नाटकातली कोणतीही मुख्य भूमिका ही वडलांसाठीच असायची. आजूबाजूच्या बारा खेड्यावर सिताहरण नाटकातील मारुतीच्या भूमिकेसाठी वडलांची खूप ख्याती होती. असे म्हणतात, वडलांनंतर त्या पात्रासाठी योग्य असा उमेदवार मिळालाच नाही, त्यामुळे नंतर त्या खेळाला गावातून पाहिजे तसा प्रतिसाद मिळाला नाही. मारुतीच्या साजेच जे साहित्य होते ते कित्येक वर्षे आमच्या घरातच पडून होते. नंतर ज्यावेळी गावातील आमच्या भाग्याचा दाणा-पाणी संपला, ते साहित्य तेथेच भगवान भरोसे सोडून गाव सोडले. वडलांचा मृत्यू अकस्मात झाला होता, शेताच्या बांधावर पिंप्रीचे झाड होते. ते गावाच्या शिवेवर होते. त्या झाडावर वेताळ राहतो अशी दंतकथा होती. एके दिवशी त्या शिवारात वडील शेतामधील पळखाटी म्हणजे कापसाचे झाड

उपटण्यासाठी गेले. ते काम ठोकीने घेतले होते. ते उन्हाळ्याचे दिवस होते. एके दिवशी पळखाटी उपटून थकल्याने दुपारच्यावेळी ते त्या झाडाखाली विश्रांतीसाठी झोपले होते. त्यांना वेताळबाधा झाली. वेताळाने वडिलांचा कंठच पकडला. त्यामुळे त्यांना कोरड्या खोकल्यासारखी घरघर लागली. त्यातून त्यांना खूप रक्तस्त्राव सुरू झाले. अति रक्तस्त्रावाने शेवटी त्यांचा अंत झाला. आजोबा एका असंघटित जमातीचे व्यक्तिमत्व, त्यातूनच अति श्रीमंती दाराशी हजर. गूळ तेथे माश्या या उक्तीनुसार आजोबा भोवती दिवसभर अशा लोकांचा घोळका जमलेलाच असायचा. कारण आजोबा मोठी आसामी होती, दिवसभर त्यांच्याकडे या ना त्या कारणाने अनेक असाम्या सरकारी कामातील मदतीसाठी विनंत्या करायला येत असत. त्यामुळे अशा अडलेल्या गिऱ्हाईकांकडुन पैशांची व्यवस्था आपोआप व्हायची. भरीला भर कधी कामानिमित्त तर कधी मुद्दाम मौज करण्यासाठी पोलिसांचा फौज फाटा, इतर सरकारी अधिकारी किंवा लहान-मोठ्या कर्मचाऱ्यांचा शिरस्ता सारखा चालूच राहायचा. परिणामी त्यांच्या खातिरदारीत खाणे पिणे हे ओघाने आलेच. सुरवातीला परक्यांच्या पैशांवर भागून गेले, पण जस-जसे ते या व्यसनाच्या आहारी गेले तस-तसे त्यांना बाहेरचा पैसा अपुरा पडू लागला आणि त्यांच्या श्रीमंतीला ओहोटी लागली. आधी घरातली रोकड चोर पावलांनी बाहेर गेली नंतर दागदागिन्यांना हात लागला. शेतीबाडी, नंतर गुरेढोरे गेली. आजोबा मेले तेव्हा आता आहे ते घर आणि पाच बिघे शेतीच शिल्लक राहिली होती. शेती काकांना मिळाली आणि आम्हाला घर मिळाले. नगरदेवळ्याचे जहागीरदार सोडले तर वीस मैलाच्या पंचक्रोशीत तेच तेवढे श्रीमंत होते. एकट्याने उडवा म्हटले असते तरी कदाचित त्यांच्याकडुन ती संपत्ती संपली नसती. पण बगल बच्च्यांना बगलेत घेऊन दोन्ही हातांनी त्यांनी ती उधळली. आई म्हणायची, दारू पितांना दही संपले तर एका लोट्यासाठी चार-चार बिघ्याचे शेताचे तुकडे त्यांनी दिलेले आहेत. दारूच्या एका बाटलीसाठी दहा-दहा बिघ्याचे शेतच देऊन टाकलेले आहेत. एकेकाळचा लखोपती मरतांना कफल्लक होऊन मेला आणि पुढच्या पिढीला भिकेला लावून गेला. आजही त्या शेतांच्या जवळून कोणी जातो तेव्हा म्हणतो हे दामुवाल्याचा शेत आहे. सख्खे काका एक, ते ही विदुर,

त्यांना दोन मुली, एक मुलगा. काका मायबोलीत कधीच बोलत नव्हते. नेहमी हिंदीत बोलत. तिही शुद्ध नाही. मुसलमान बंधूंची घरबोली हिंदी. त्यांना फक्त एकच नाद होता, त्यांच्याकडे एक घोडी होती जिला ते नाचवायचे. कुठेही लग्नप्रसंगी किंवा यात्रेत सार्वजनिक ठिकाणी ते घोडी नाचवत फिरायचे. अर्थात घोडीला नाचणे त्यांनीच शिकविले होते. त्यांच्या इशाऱ्यानुसार घोडी अगदी सुंदर ताल धरून नाचायची. यामुळे त्यांचा मुक्काम घरी क्वचितच असायचा.

आई म्हणाली होती, मी दोन महिन्यांचा असतानाच वडील वारले. त्यावेळी मोठे भाऊ ९ ते १० वर्षांचे व मधले भाऊ ७ ते ८ वर्षांचे होते. अज्ञान आणि बालपण होते तो पर्यंत आईच्या अवती भोवती फिरत राहायचो. आईचे लक्ष माझ्याकडे असायचेच असे नाही. काही तरी वेडे-वाकड करीत राहायचो. जगाची ओळख होत गेली. बरे वाईट यातले अंतर थोडे-थोडे कळायला लागले. आपले, परक्यांची ओळख होऊ लागली. घरच्या परिस्थितीची, आई आणि भाऊ करीत असलेल्या काबाड कष्टाची. त्यांची रोजची दशा पाहून काळजाला कळ बसू लागली, पण वय, शक्ती आणि हात पाय लहान होते. गरिबाचे लहान पोर कुणा जवळही गेले तर झिडकार सोसावा लागत होता. खाणारे तोंड वयाने वाढू लागली तशी आईची कामाची जिद्य वाढू लागली. गरिबीचा तोडका-मोडका का असेना पण भरलेलां संसार पाहून आई बरीच खूष दिसू लागली. तिची काम करायची उमेद आणि जिद्द वाढू लागली. माझीही समज थोडी-थोडी वाढू लागली होती. आई कपाशी वेचत असल्यास मी तिच्या पुढे-पुढे जाऊन तिच्या पांभरीतील कापूस वेचू लागायचो. कपाशीचे एकेक बोंड काढून मुठीत भरून भरून आईच्या खोळीत आणून टाकायचो. आई भुईमूग उपटायचे काम करीत असतांना तिच्या पांभरीतुन ताकतीनुसार जी झाड उपटली जायची ती उपटून त्यांचे लहान लहान ढीग करायचो. त्यामुळे तिचे बरेच काम हलके होऊन जायचे. त्यामुळे ती खूप खूष व्हायची. उडीद मुगाच्या शेंगा तोडायचे काम असल्यास ज्वारीच्या पिकातून इकडून तिकड घुसत शेंगा तोडून आईच्या खोळीत आणून टाकायचो. त्या काळी उडीद मुगाच्या शेंगा तिनास एक किंवा चारास एक या प्रमाणातल्या हिस्सेवाट्यावर तोडल्या जायच्या. आमच्या दोघांच्या मिळून भरपूर शेंगा व्हायच्या त्यामुळे

खूप शेंगा यायच्या आणि भरपूर उडीद मुगाची कमाई व्हायची आणि वर्षभराच्या भाजीची काळजी मिटायची. उडीद मूग हे ज्वारीच्या पिकात घ्यावयाचे दुय्यम पीक. ज्वारीच्या धांड्यांना पांढऱ्या रंगाची काजळी येते. मी दिगंबर अवस्थेतच राहात असल्याने माझे सर्व अंग पांढरे फट होऊन जायचे. दिवसभराचे काम संपल्यावर आई तिच्या फाटक्या पदराने माझे अंग रगडून पुसून साफ करायचा प्रयत्न करायची. बऱ्याच वेळा फाटक्या पदराने अंग पूर्ण साफ व्हायचे नाही मग आई पळसाच्या झाडाची मोठमोठी पाने घेऊन खरडून अंग पुसून साफ करायची.



# माझे बालपण

दोन्ही भाऊ महिनदारीने काम करायचे. बागायती शिवाराचे गाव असल्याने मुख्य पीक केळीचे. भावांचे मुख्य काम गुराढोरांचे शेण पुंजा काढणे. घर अंगणाची झाडझूड करणे. केळीच्या पिकाचे बारे पकडणे. पाण्याची मोट हाकलणे ही जवळ जवळ नेहमीची कामे होती. त्यांना माहवार पाच रुपये मजुरी मिळायची. आईला एक आणा रोज मजुरी असायची. तीन आण्याला एक चवथेभर म्हणजे आत्ताचे सात किलो बाजरी मिळायची. भाजीत तेल तर पाचवीला पुजल्या सारखेच म्हणजे नाहीच मिळायचे. लहान-लहान मुलांचा पसारा असल्याने दळण दळणे, स्वयंपाक करणे, रोज रोज शक्य नसल्याने अधुन-मधून कपडे धुणे, पाणी भरणे, जेवणाचे आणि स्वयंपाकाची भांडी घासून ती धुणे यात खूप वेळ निघून जायचा. त्यामुळे तिला मेळ मधे कुणीच कामाला घेत नसे. म्हणून तिला रोज मजुरी शोधावी लागे. पण रोजच्या मजुरीचे पैसे खूप कमी मिळत असत. मेळ म्हणजे १० ते १५ मजुरांची एक टोंळी. त्या टोळीचा एक म्होरक्या असायचा. तो मोठ-मोठ्या शेतातली कामे ठोक सवद्याने घ्यायचा. बाजरी ज्वारी कापणे, भुईमूग उपटून त्याची झाड ठोकुन त्याच्या शेंगा काढणे, कापसाची पळखाटी उपटणे, अशी कामे तो घ्यायचा, ही ठेक्याची कामे मजूर त्यांच्या सोयीनुसार सर्व दिवस रात्रही करू शकत होती. त्यामुळे काम लवकर संपायचे. त्यामुळे मजूर लोकांना भरपूर मजुरी मिळायची. बऱ्याच वेळा आईला मजुरी मिळत नसे त्यामुळे पैशांचे

नुकसान व्हायचे. अशावेळी आई राजपूत समाजात जाऊन दळण कांडणाचे काम करून मजुरी कमवायची. एक आई सोडली तर भाऊ नेहमीच राजपूत समाजातच काम करत असत. जेव्हा आई दळणाचे काम करी तेव्हा मी आईच्या मांडीवरच डोके ठेवून झोपत असे. अगदीच बिकट वेळ आली आणि घरात खायला नसले म्हणजे मी राजपूत समाजातच जाऊन भाकरी मागून आणायचो आणि मग आम्ही सर्व जण जेवायचो. वय वाढत गेलं. जाण आणि ज्ञान वाढत गेले. अंगावर कमरेला आखूड चड्डी आणी अंगात आखूड बाह्यांचा शर्ट आले. आता आईच्या अवती-भवती फिरत राहायचा काळ मागे पडला. माझ्याकडे कामाचा सवतासुभा देण्यात आला. गाव शिवारातून शेण गोळा करून उकिरडा वाढविणे, जात्यावर बसून दळण दळणे, सकाळी भांडे घासून पाणी भरणे, आई भावांचे कपडे धुणे, स्वयंपाकासाठी जंगलातून लाकडे गोळा करून आणणे, सायंकाळचा स्वयंपाक करणे, दिवसभर जंगलात जाऊन गाई चारणे इ. आईचे बरेचसे काम माझ्याकडे आल्याने आईला रिकामा वेळ मिळू लागल्याने आई मेळमधे कामाला जाऊ लागली.

मी भांडे घासून धुऊन ठेवायचो. नंतर भाकरीवर मीठ घेतले की गावमारूतीच्या पारा समोर असलेल्या शाळेच्या ओट्यावर बसून समोरच्या पटांगणात गाई गोळा व्हायची वाट पहात बसायचो. गाईंचे मालक आपापल्या गाई आणून सोडायचे. नंतर मी त्यांना चरायला घेऊन जायचो. सर्व गाई जमा होई पर्यंत मी ओट्यावर बसून शाळेत आत गुरूजी मुलांना काय शिकवत आहेत तिकडे काळजी पूर्वक लक्ष द्यायचो. हा रोजचाच कार्यक्रम होता. शाळेला समोरून पक्की भिंत नव्हती. बांबूच्या कामठया ठोकून भिंत तयार करण्यात आलेली होती. त्यामुळे समोरच्या भित्ती फळ्यावर कोणते अक्षर कसे लिहिले आहे ते स्पष्ट दिसायचे. इतक्या लांबूनही मी स्पष्ट वाचू शकायचो कारण भित्ती नसल्याने शाळेत लख्ख उजेड असायचा. गावकऱ्यांच्या दबावामुळे लगबगीने सुरू करण्यात आलेली ती शाळा होती. शाळेची जागा गावकऱ्यांनी शाळेसाठी फुकट दिलेली होती. शाळेत फक्त एक खुर्ची आणि भिंती फळा होता. १ ते १००, बे ते १० पर्यंतचे पाढे, अबकड ही मुळाक्षरे, जोडाअक्षरे, बाराखडी हे शिकविले जायचे. पाटी नव्हती, पुस्तक नव्हते, लेखणी नव्हती.

मग जमिनीची पाटी, जाडसर काडीची लेखणी करून जमिनीवरच १ ते १००, बे ते १० पर्यंतचे पाढे, अ ब क ड ही मुळाक्षर, बाराखडी, जोडाक्षरे गिरवत बसायचो. मुले प्रार्थना म्हणायचे, कविता म्हणायचे ते ऐकून-ऐकूनच माझे ते तोंडी पाठ झाले होते. शाळा सुटायची वेळ झाली की माझी गाईंना चारण्यासाठी रानात न्यायची वेळ व्हायची. खेडगावात मजूर लवकर कामाला जायचे, तसेच आई भाऊही लवकरच कामाला निघून जायचे. त्यामुळे माझे आठ वाजेच्या आत कपडे धुणे आणि भांडे घासण्याचे काम लवकर संपायचे. म्हणूनच मी आठ वाजेपासूनच शाळेच्या ओट्यावर येऊन बसायचो. गाई रानात नेल्यावर माझे जंगलातले दुसरे काम सुरू व्हायचे. सकाळी ८ ते ११ या वेळेत शाळेच्या पटांगणात गाईंनी टाकलेले सर्व शेण गोळा करून ते उकिरड्यावर नेऊन टाकावे लागे. नंतर गाई घेऊन जंगलात चारायला न्यायचो. बरोबर शेणाची रिकामी टोपली असायचीच. जातांना आजु बाजूच्या परिसरात पडलेले सर्व शेण गोळा करायचो. ते गोळा केलेले शेण रस्त्याच्या काठी अडगळीच्या ठिकाणी त्याचे ढीग करायचो. ते ढीग नंतर १० किंवा १५ दिवसानंतर ते गावातल्या उकिरड्यावर आणून टाकायचो. महिन्याकाठी आई तो उकिरडा विकून टाकायची. त्याचे ३ ते ४ रुपये यायचे. संध्याकाळी गाई घेऊन मी परत गावाकडे यायचो. गाईंना आपापल्या गोठ्याचे ठिकाण माहीत असल्याने त्या आपआपल्या ठिकाणी चालल्या जायच्या. त्या काळी गावो गावी खूप जंगल असायचे. स्वतंत्र गायरान ही असायचे. त्यामुळे गाईंच्या मागे खूप फिरावे लागत नसे. स्वयंपाकासाठी जाळायला रोज लाकडे लागायची ती गोळा करणे, मग मी आंबा, निंब, चिंच अशा बिना काट्याच्या झाडावर चढून लाकडे तोडून ती संध्याकाळी घरी परत येतांना घेऊन यायचो. आंब्यांच्या मौसम मधे माझे अजून एक काम असायचे. झाड मालकाने झाडावरील सर्व आंबे तोडून नेल्यावर पानांच्या अडगळीत चुकून राहिलेले आंबे शोधून-शोधून ते तोडून घरी आणायचो. त्या मोसमात खूप आंबे खायला मिळायचे. वर्ष भराचे लोणचे होऊन जायचे. घरात दोन तीन महिने आंबेच आंबे राहायचे. दिवसाआड दिवस असे कालचक्र वेगाने पुढे पुढे सरकत चालले होते. काळ कुणाची वाट पाहात नाही आणि कुणासाठी थांबत ही नाही.



# घरातला साप

अशीच एक रात्र. संध्याकाळचे सर्वजण कामावरून घरी आलेले. रात्रीची जवळपास आठ वाजेची वेळ. छोट्याखानी घरात सर्व जण घोळका करून जेवायला बसलेलो. जेवणाला नुकतीच सुरुवात केलेली तोच वरून भुरू भुरू माती पडू लागली. सडलेल्या धाब्याच्या किलचन मधून माती पडत असेल. पण माती पडतांना बारीक बारीक सरपटण्याचा आवाजही येत होता. काय असेल ते पाहण्यासाठी आईने उठून हातात पणती धरून वर धाब्याकडे पाहू लागली. लाकडावर उजेड पडताच तिला एक भला मोठा साप सडलेल्या लाकडातून हळू हळू सरपटत पुढे चाललेला दिसला. मग काय म्हणता, सर्वांचा थरकाप उडाला. साप खाली मोकळ्यात नव्हता. तो लाकूड आणि किलचन मधे होता. त्याचे पोट फक्त खालून दिसत होते. आई घाबरून ओरडली, अरे काही तरी आणा. मी पटकन उठून माझी गाई हाकण्याची मोठी जाड काठी घेऊन आलो. आई म्हणाली 'कोणी घाबरू नका. एक जण हातात पणती उंच धरून उभा राहा!' दोन्ही भाऊ लहान असल्याने पायांच्या पंज्यावर उभे राहूनही पणती पाहिजे तेवढी उंच होत नव्हती. आईने हातात काठी घेऊन सापाच्या पोटाला खालून जोर-जोराने ठोसे मारायला सुरुवात केली. मी अंगणात जाऊन 'आमच्या घरात साप निघाला, आमच्या घरात साप निघाला' असे ओरडत होतो, खूप जुने घर असल्याने आणि सडके, तुटके-ताटके लाकूड असल्याने सापाला त्यातून वाट काढणे कठीण जात

होते. जस-जशी आई त्याला खालून ठोसे मारत होती तसतसा तो साप पुढे पुढे सरकू लागला. हळू हळू तो भिंतीच्या पलीकड निघून गेला. सर्वांनी शांततेचा श्वास घेतला. सगळ्यांची मनस्थिती घाबरलेली असल्याने नंतर जेवणात कुणाचेच ध्यान लागले नाही आणि कुणाला झोपही लागली नाही. कारण सर्वांना एकच भीती होती तो साप परत तर येणार नाहीना, पण तो आला नाही. एके संध्याकाळी मी स्वयंपाक वगैरे आटोपून शेजारच्या घराच्या भिंतीला लागून ठेवलेल्या धुणे धुवायच्या दगडावर बसून आई आणि भावांची कामावरून परत यायची वाट पहात बसलो होतो. मांजरझापाची वेळ होती. बोळीच्या बाहेर शेजारचांच्या घरा समोर असलेल्या निंबाच्या झाडावर कावळे, चिमण्यांचा चिवचिवाटाचा कल्लोळ चालला होता. आमचे घर ५-६ घरांनी बनलेल्या घोड्याच्या पायांना ठोकायच्या नालीच्या आकाराच्या बोळीत होते. अकस्मात माझ्या खांद्यावर लांबट जड वस्तू पडली. मोटीच्या नाड्याचा तुकडा असावा असे मला वाटले म्हणून मी ते दोन्ही हातात घट्ट घरून लांब फेकण्याचा प्रयत्न करून पाहिला पण कल्पनेपेक्षा ते जास्त लांब होते. मांजरझापाच्या अर्धवट उजेडात मी ते जवळून पाहिले आणि माझी बोलतीच बंद झाली. माझ्या गळ्यातून आवाजच बाहेर पडत नव्हता. मी त्याला सर्व शक्तिनिशी जेवढे लांब फेकता येईल तेवढे फेकले. ओरडायचा खूप प्रयत्न करत होतो पण जीभच टाळूला चिटकली होती. समोरच्या घरातून सुकी काकूने ते पाहिले आणि एकदम घाबरून घाबरूनच ती जोराने ओरडली ‘अरे पळा रे पळा, पोराला कोणी तरी वाचवा, साप त्याच्या अंगावर पडला, तो पोरगा भीतीनेच मरून जाईल. साप त्याला चावला बिवला तर नाहीना, त्याला ताबडतोब साप उतरवणाऱ्याकडे घेऊन जा’. ती ओरडून सांगत होती पण तिच्याकडे कोनाचे ही लक्ष नव्हते. मी दगडा सारखा एकाच ठिकाणी खिळून बसलो होतो. माझी वाचा बंद होती. डोळे मात्र उघडे पण निस्तेज होते. पापण्यांचीं उघड झाप मात्र चालू होती. माझी अवस्था बघून मग मात्र शेजारचेही घाबरले आणि धावपळीला लागले. कोणी प्यायला पाणी आणत होते कोणी हिरवी मिरची खायला आणत होते. कोणी धावत जाऊन निंबाचा पाला आणत होते. कोणी निंबाच्या झाडाचे डगळे आणून माझा झाडा काढत होते. थोड्या

वेळाने आई आली. आईला बघून मात्र मी मोठ्याने हंबरडा फोडला. माझा कंठ मोकळा झाला. जिकडे साप फेकला होता तिकडे हाताने इशारा करून आईला सापा बाबत सांगत होतो.  मात्र तोंडातून शब्द बाहेर पडत नव्हते. मग मी जिकडे साप फेकला होता तिकडे हाताने इशारा केला आईने तिकडे पाहिले आणि छाती ठोकायला लागली. मी हंबरडा फोडल्याचे ऐकताच माझ्या भोवती जमलेली सर्व गर्दी वाचला-वाचला असे म्हणत निघून गेले. नंतर थोड्यावेळाने भाऊ आले. अप्पाने मांडीवर घेऊन थोपटत-थोपटत मला शांत केले. आईचे हुंदके देणे चालूच होते.



# मोसंब्यांची चोरी

असाच एक दिवस उजाडला. मी नदी थडीला गाई चारायला लावून दिल्या. पावसाळ्याचे दिवस असल्याने गाईंना चरायला चारा भरपूर होता. त्यामुळे गाई लांब पांगून जायची काळजी नव्हती. दूर थोड्या अंतरावर एक आंब्याचे झाड होते. झाडाच्या दाट आणि थंड छायेत थोडी विश्रांती घेतल्या नंतर झाडाखाली चौफेर फिरून वर झाडावर कुठे कोरडे लाकडे आहेत ते पाहू लागलो. तोच समोरून दोन जण आले. समवयस्कच होते. मी त्यांना तेवढेसे ओळखत नव्हतो. पण आखतवाड गावातलेच आणि बऱ्याच वेळा पाहण्यातले होते. पैकी एक ज्या शेताच्या बांधावरील झाडाखाली मी उभा होतो त्याच शेताच्या बांधाला लागून त्याचे शेत आहे हे मला माहीत होते. दुसरा मी ज्या न्हाव्याकडे हजामतीला जातो त्याचा मुलगा होता. शेतवाला मुलगा आनंदा मला म्हणाला ‘अरे आता चारा भरपूर आहे. थोड्याच वेळात त्या चरून-चरून तट्ट होऊन जातील आणि झाडाखाली वाघूळ म्हणजे रवंथ करायला बसून जातील. एकदा का त्या रवंथ करायला बसल्या की दोन घंटे त्यांच्याकडे बघायची गरजच पडणार नाही. तो पर्यंत इथ एकटा बसण्यापेक्षा चल आमच्या बरोबर माझ्या शेतात जाऊन येऊ’. त्याला दुसऱ्यानेही दुजोरा दिला. पण मी म्हणालो ‘नको रे बाबा मला लाकडे तोडायची आहेत’. ‘अरे आता असे गेलो का असे आलो. तुला झाडावर टंगळत फिरायचा इतका अनुभव आहे तेव्हा तुला या चार फांद्या फलांगायला काय वेळ लागणार आहे. चल मित्रांचे

थोडेतरी ऐकत जा मर्दा'. माझी थोडी बढाई मारल्यामुळे अंगात लगेच स्फुरण आले कारण पहिल्यांदाच मला स्वतःची बढाई ऐकायला मिळाली होती. 'चढायला झाड कितीही अवघड असले तरी तुला सर्वच झाडे चढायला ती सोपीच असतात. कोणत्याही झाडावर तू सहज चढून जातो. आम्ही तर अगदी नवीन आहे. लहान झाडावरही चढू शकत नाही. म्हणून तुझी मदत आम्हाला हवी आहे.' एरव्ही मी कधीच तयार झालो नसतो पण पहिल्यांदाच भरपूर स्तुती ऐकल्यामुळे मी गोरेमोरे तोंड करून तयार झालो. आणि पहिल्यांदाच कोणी माझ्याकडे अशी मदत मागितली होती. त्यामुळे अंगात थोडी फुशारकीही संचारल्या सारखे वाटले. मी त्यांना होकार दिला. त्याआधी गाईंवर थोडी नजर मारून येतो असे सांगून मी गाई पाहून आलो. गाई चरण्यात दंग होत्या. खात्री पटल्यावर मी त्यांच्या जवळ परत आलो आणि म्हणालो 'चला आता. पण मला आधी सांगा कोणते काम आहे ते' मी त्यांना विचारले.'तसे फार मोठे काम नाही, 'आमच्या शेताला लागून ते मोसंबीचे शेत आहे ना तेथून १० ते १५ मोसंब्या तोडायच्या आहेत. पुंजु काका बाबाला बघायला घरी आले होते, बाबा आजारी आहेत, तेच बाबाला म्हणाले आपल्या बागेतून मुलांच्या हातून काही मोसंब्या मागवून घे, त्याच्यासाठीच आम्ही आलो आहोत. असे आनंदा म्हणाला. असे बोलत बोलत आम्ही मोसंबीच्या बागेत आलो. झाडावर जिकडे पाहू तिकडे सोनेरी रंगाच्या मोसंब्या वाऱ्याच्या तालावर वरखाली झोके खात होते. झाडेही वाऱ्याच्या झोक्याबरोबर डोलत होते. झाडे तेवढे उंच नव्हते. मी पटकन झाडावर चढलो. पटापट मोसंब्या तोडू लागलो. तोडून खाली टाकलेल्या मोसंब्या ते दोघे पटापट डोक्यातून टोपी काढून तीत भरत होते. तेवढ्यात एक मोठी आरोळी आली,' कोन बदमाश आहेत रे तिकडे. थांबा जरा!' आणि खरोखरच तिकडून शेतमालकाचा सालदार दत्तासारखा येऊन उभा राहिला. तो जोरजोराने हातातला दंडा जमिनीवर आपटत होता. मी झाडावरच होतो. खालचे दोघे त्याची डरकाळी ऐकताच पळत सुटले ते लांब बांधावर जाऊन आणि तेथून माझी गंमत पहात होते. झाडाला दंडा ठोकत त्याने मला खाली उतरवले. मी खाली उतरल्यावर रडू लागलो. माझे कान पकडून त्याने जोराने उपटले. त्यावेळी माझ्या डोळ्या

पुढून चांदण्या चमकून गेल्या. सालदार मला दरडावनीच्या सुरात म्हणाला, ‘कायरे बापाचा माल समजलास का? बोल? गाई चारायच्या सोडून हे उद्योग करत फिरतोस का?’ ‘नाही बाबा, मी नाही आलो. त्या दोघांनी मला आणले’. मी डोळे पुसत बोललो. मला म्हणाले, आम्हाला चढता येत नाही. बाबा घरी आजारी आहेत त्यांच्यासाठी मोसंब्या न्यायच्या आहेत, म्हणून मी आलो. ‘तुला माहीत आहे का हे शेत त्याचे नाही’, ‘हो ते शेजारचे शेत त्याचे आहे हे त्यानेच मला सांगितले’.‘मग त्याचे ऐकून तू पटकन झाडावर चढून लगेच मोसंब्याही तोडायला लागलास, तुला ही मोगलाई लागली का?’त्याने दरडावून विचारले, ‘नाही बाबा, तो म्हणाला की पुंजु बाबा सकाळी त्याच्या घरी आले होते, त्याच्या आजारी बाबाला बघायला, त्यांनीच बाबाला सांगितले मुलाला शेतात पाठवून मोसंब्या मागवून घे.’ म्हणून,‘अस्स!’ तो बोलला.‘थांब जरा मी त्यांनाही पाहातो’ तो म्हणाला. त्याने माझे हात पाय जाड दोराने बांधून टाकले.ते दोघे तेथेच उभे राहून लांबून माझी गंमत पहात होते. त्यांनी हातातल्या मोसंब्या खाली फेकून रडत होते.‘या रे इकडे’ सालदार त्यांच्यावर जोराने ओरडला ‘तुम्ही इकडे येता की मी तिकडे येऊ? तो म्हणाला. ते दोघे खूप घाबरलेले होते. नाही ना बाबा, नाही ना बाबा असे म्हणत ते जवळ आले.ते जवळ येताच सालदाराने एक एक रपाटे दोघांना लगावले. ते ढसा ढसा रडत होते. रडताना बोलताही येत नव्हते. ‘काय रे! हा काय सांगतो आहे ते खरे आहे का?’ त्याने त्या दोघांना विचारले. ते सालदाराला पाहून बरेच लांब पळून गेले होते म्हणून सालदाराला मी काय सांगत होतो ते त्यांना नीट ऐकू गेले नव्हते. शिवाय ते खूप भेदरलेलेही होते. त्यामुळे त्याच्या प्रश्नाचे काय उत्तर द्यावे तेच त्यांना समजले नाही त्यामुळे ते गप्पच उभे राहिले, यामुळे सालदाराचा संशय मात्र वाढला आणि तो संतापला. ते मात्र मठ्ठासारखे एकमेकांचे तोंड पहात उभे होते. सालदार काय समजायचे ते समजला. नंतर त्याने मला बांधलेल्या दोरातून उरलेल्या दोराने त्या दोघांनाही बांधले आणि आम्हाला तसेच शेतात सोडून निघून गेला. आम्ही मात्र एकमेकाकडे बघत रडत राहिलो. मी रडता रडता त्या दोघांना आपल्या गावरानी भाषेत शिव्या देत होतो. आनंदा मात्र आईच्या शपथा घेऊन सांगत होता की बाबाने त्याला खरच तसे सांगितले

होते. थोड्या वेळाने सालदार तीन दोरखंड आणि जाड काठ्या घेऊन आला. आनंदा पुरता घाबरून गेला असल्याने त्याला नीट बोलता येत नव्हते. सालदाराने नंतर आम्हाला कोळदांडा देऊन बांधून तो परत निघून गेला. थोड्या वेळाने तो बैलगाडी जोतून घेऊन आला. आम्हाला कोलदांड्यासह बैल गाडीत टाकून सोबत आम्ही तोडलेल्या मोसंब्या गावात घेऊन आला. मंदिराच्या पारा समोरील शाळेच्या ओट्यावर बांधलेल्या अवस्थेतच आम्हाला तिथे टाकून मालकाच्या घराकडे तो निघून गेला. येणारे जाणारे आम्हाला बघून आमच्या भोवती जमा होऊन कोणी आम्हाला शिव्या देत होते, कोणी एवढ्या लहान लहान मुलांना अशाप्रकारे सतावल्याबद्दल सालदाराला दूषणे देत होते. आम्हाला आसू आवरले जात नव्हते. मी मात्र विनाकारण बळीचा बकरा झालो होतो. मी एकदम भामट्या प्रेमाने उघडया डोळयांनी हे सर्व पहात होतो. आईला काय वाटेल? इतक्या गर्दीमधे ती माझ्या समोर यायची तरी हिम्मत करेल कीं नाही? हे सर्व विचार मनात येताच काळीज करपत चालले होते. यात नेमका किती वेळ गेला माहीत नाही. अन्न-पाण्यावाचून आम्ही तीनही जण त्या ओट्यावर बघ्यांच्या घोळक्यात कोळदांडयाच्या बंधनात बाधलेल्या अवस्थेत पडलो होतो. थोड्या वेळाने गावचे पोलीस पाटील आले. आमच्याकडे बघून त्यांनी विचारले 'काय रे! पोरांनो तुम्ही मोसंबीच्या शेतात गुपचूप जाऊन मोसंब्या तोडल्या म्हणे हे खरे आहे का?'आनंदा आणि नारायण गप्प बसले होते. मी पुढे होऊन मला आनंदाने जे सांगितले होते ते त्यांना सांगितले. 'मग तू सालदाराला हे का सांगितले नाहीस'? पोलीस पाटलांनी मला दरडावून विचारले. 'हो बाबा मी हे त्यांना सांगितले होते', मी उत्तर दिले. 'काय रे! हा सांगतो ते खरे आहे का?' त्यांनी सालदाराला विचारले. तेवढ्यात शेत मालक पाटलांना नमस्कार करून त्यांच्या शेजारी येऊन बसत म्हणाले, 'हा पोरगा सांगतो आहे ते खरे आहे. काय रे! मोहन ह्या पोराने आता जे सांगितले ते त्याने तुला आधी सांगितले असतानाही तू चूक कशी केली? काकांनीच सालदाराला विचारले?','नाही मालक या पोराने मला ते सांगितले होते पण मी याचे खरे खोटे जाणण्यासाठी या पोरांना विचारले होते पण ते काहीच बोलले नव्हते मला याची शंका आली म्हणून

आणि मी त्यांना घेऊन आलो'. सालदाराने उत्तर दिले. 'कारे तू खरे काय ते सालदाराला का नाही सांगितले?' काकाने आनंदाला विचारले.'नाही बाबा सालदार काका जोराने ओरडून बोलले आणि म्हणाले  एकेकाला दंड्याने मारीन, त्यामुळे मी खूप घाबरलो. आम्ही शेताच्या बांधावर उभे होतो त्यामुळे यांचे बोलणे आम्हाला नीट ऐकू येत नव्हते आणि हा रडत रडत काय बोलतो आहे तेही आम्हाला नीट कळत नव्हते', आनंदा म्हणाला.'अरे ऐवढ्या ऐवढ्या कोवळ्या पोरांना कोळदांड्याने बांधून ठेवले त्यांच्या कोवळ्या आतड्या-बितड्या तुटल्या असत्या तर आता तुझ्यावर कोणती वेळ आली असती याची कल्पना तरी केली आहे का? केली ही असेल पोरांनी चूक, ती ही खाण्याची वस्तू, ते अट्टल चोर थोडेच होते? त्यांनी खूप काही मोठ्या ऐवजाची चोरी तर केली नव्हती ना?' चल लवकर सोड त्यांना'. काकांनी सालदाराला सुनावले आणि आम्हाला सोडून देण्यात आले. चोरी न करता चोर म्हणून चावडीवर मिरवत आणल्यामुळे ते दोन्ही मुले बदनामीने शरमिंदे झाले होते. तर मदत करून नेकी केल्यामुळे मला नाहक चावडी चढावी लागली होती. कोळदांडा सुटल्या नंतर मी गाईंकडे धाव घेतली. सर्व गाई एका कळपात उभ्या राहून रवंथ करत करत इकडे-तिकडे माना वळवून माझी चाहूलच घेत होत्या. लांबूनच मला येताना पाहून एक गाय हंबरली त्याबरोबर इतर गाई ही एकामागून एक हंबरत हंबरत माझ्याकडे हळू हळू सरकू लागल्या. मी त्यांना पाण्यावर नेल्या.एका गाईच्या गळ्यात बांधलेली भाकरीची पोटळी काढून, मी ही घासा मागून घास तोंडात घालत होतो आणि स्वतःशीच हसत होतो.



# दुष्काळ – मेजघाटातील दिवस

काळ बदलला. निसर्गही बदलत गेला. १९५२-५३ चे वर्ष. भयंकर दुष्काळ पडला होता. ज्यांच्या घरात अन्नाचा भरपूर साठा असायचा तेही व्याकूळ होऊ लागले. कारण जे आहे ते किती दिवस टिकेल? मग पुढे काय ही चिंता. दुष्काळ किती महिने राहील हे कोणीच सांगू शकत नव्हता. ती तर ईश्वराची अवकृपाच ना? फजिती होती ज्याच्या घरात काही नाही त्यांची. रोजच्या कमावलेल्या मजुरीने ज्यांची आजची रात्र व उद्याची सकाळ भागत होती. त्यांना बऱ्याच वेळा मजुरीही मिळत नव्हती. अक्षरश: ते कुटुंब भुकेच झोपत होते. बऱ्याच कुटबांचे कंबरडेच मोडले होते. सगळीकडे त्राही त्राही माजली होती. आमच्या कुटुंबाचीही तीच परिस्थिती झाली होती. रोजच्या कमाईपेक्षा कुटुंब भागवण्याचा खर्चच जास्त होत होता दुष्काळाला तोंड देण्यासाठी सरकारने थोडा आधार दिला होता. आजच्या काळात ज्याला रेशन म्हणतात त्याला त्या काळात कंटुर म्हणायचे. तेथे एक पैशाला एक अडगरची म्हणजे लाल ज्वारीची भाकर मिळायची. १० ते १५ गावासाठी एक दुकान होते. ते ही नगरदेवळ्याला, नगरदेवळा हे गाव आमच्या आखतवाड्या पासुन दीड कोस अंतरावर होते. तेथे इंग्रजकालीन सरदार राहत असत. तेथे सकाळी दहा ते दुपारी दोन वाजेपर्यंतच भाकरी मिळायच्या. एक आणा मजुरी मिळायची त्यातून एक पैशाला एक भाकर अशा रोज चार जणांना चार भाकरी आणाव्या लागत होत्या. चार भाकरीवर दोन पळी भाजी मिळायची. पण इलाज नव्हता.

बाहेर बाजारातही पैसे देऊन धान्य मिळत नव्हते. मी सकाळीच नगरदेवळ्याला निघून जाऊन नंबर लावून रांगेत उभा राहायचो. दोन अडीच तासात मी भाकरी घेऊन यायचो आणि सर्वांना त्यांच्या कामाच्या ठिकाणी जाऊन भाकरी पोहचवून द्यायचो. सव्वा-सव्वा भाकरी भावांना, आईला एक आणि मला अर्धी भाकर ठेवायचो. नंतर गाईंच्या मागे त्यांना चारायला घेऊन जायचो. अर्ध्या भाकरीत पोट भरायचे नाही. आता गाईंच्या मागे गेल्यावर माझ्या मागे अजून एक काम जास्तीचे लावले गेले होते. आंब्यांचा मौसम होता. आंबे खाऊन उरलेल्या त्यांच्या कोयट्या इकडे तिकडे फेकलेल्या असायच्या. दुष्काळामुळे सर्व प्राणिमात्रांना पुरेसे खायला मिळत नव्हते. मला तर अर्धीच भाकर मिळायची. म्हणुन फेकलेल्या त्या कोयट्या मी गोळा करून घरी आणायचो आणि त्या फोडून त्यातून निघालेले गीर मिठाच्या पाण्यात उकडून त्या सर्व जण वाटून खायचो. मी त्यात वाटेकरी व्हायचो नाही. मी जंगलात गाई चारतांना दुसरेच काम करायचो. जंगलात कुंदा नावाचे गवत असायचे त्याचे मुळखंड जमिनीतून उकरून काढून ते खायचो. ते मुळखंड चवीला गुळचट लागायचे पण ते मला फार आवडायचे. पुढे पुढे गावात मजुरी मिळणेच कठीण झाले. भावांची महिनदारी ही बंद झाली. त्यामुळे दिवस काढणे फार कठीण झाले.

तशातच एक खुशीची बातमी मिळाली. कोणी तरी भडगाव पाचोऱ्याकडचा पाहुणा गावात आला होता. त्याने बातमी दिली की कुठे तरी खूप लांब तालभोपाल नावाचे गाव आहे. तिकडे डोंगर फोडण्याचे काम चालू आहे. डोंगर फोडून तेथे आगगाडीचा लोखंडाचा रस्ता तयार करणार आहेत. त्या कामासाठी भरपूर मजूर लागणार आहेत. झाले गावात ही बातमी वाऱ्यासारखी पसरली. रात्रीतून काही लोकांची मनाची तयारी झाली. आईलाही या बातमीचा सुगावा लागलाच होता. त्या दिवशी मजुरी नसल्याने आई रिकामीच होती. ती सकाळपासूनच कोणा-कोणाची जायची तयारी आहे या तपासाला निघाली होती. रामसिंग काका, मांगु काका, राजाराम काका, तोंगलताई आणखी दुसरे कोणी तरी दोन तीन लोक तयार असल्याची बातमी घेऊन आई परत आली. एकूण गावातून जवळ-जवळ दहा लोक तयार असल्याची बातमी होती. जायचे म्हटल्यावर भरपूर भाडे लागणार होते. आईकडे भाड्याला पुरेसे पैसे

नव्हते. मांगुकाका म्हणाले,'मामी काळजी करू नकोस भाड्याला जेवढे पैसे लागतील ते मी देऊन टाकेल. कामाचे पैसे येत जातील त्यातून थोडथोडे पैसे परत करत जाशील.' माझी आई घाटावरच्या डोंगरगावची होती त्यामुळे तिला गावातील बरीच मंडळी मामीच म्हणायचे.'भाऊजी तुमचे मोठे उपकारच होतील' आई म्हणाली. सर्वांनी एकमताने तयारी करून दुपारी मारुती मंदिरावर जमा व्हायचे ठरले.

सर्व जण दुपारी मारुती मंदिराच्या ओटयावर गोळा झाले. सर्वांनी आपआपल्या सामानाच्या गाठोड्या डोक्यावर घेऊन भगवान मारुतीरायाचे पाया पडून वाटेला लागले.तीन कोस चालून नगरदेवळा स्टेशनला जायचे होते. संध्याकाळी आम्ही नगरदेवळा स्टेशनला पोहोचलो. लहान भाऊ मेहुण्याकडे महिनदारीने कामाला होता. स्टेशनवर दुसऱ्याच गावाचेही तीन चार लोक होते. सर्वांनी एकत्र बसून ठरवले की कोणी एकमेकांना सोडून जायचे नाही. सगळ्यांनी एक जुटीने राहायचे. आपण परक्या ठिकाणी चाललो आहोत. सगळ्यांनी एकमेकांच्या संमतीने वागायचे. मला आखतवाड्या शेजारच्या गावांची नावे माहीत होती.गाडी रात्री आली. त्यावेळी कोळशावर चालणाऱ्या आगगाड्या होत्या.पूर्वी आगगाडी मोटरगाडीतून प्रवास करायला खेड्यापाड्यावरचे लोक फार घाबरायचे. आगगाडी धावायला लागली की पोर म्हणायचे अरे बापरे बिन बैलांची गाडी आहे पळा. सर्व जण एकाच डब्यात बसले. आगगाडी धावायला लागली. आम्हाला फार आश्चर्य वाटले कारण मांगुकाका सोडता सर्व जन पहिल्यांदाच आगगाडीत बसले होते. कुठले तरी मोठे गाव आले. तेथून बरेच लोक आमच्या डब्यात चढले. गाडी चालू झाली. परत एक मोठ गाव आलं तेथे गाडी थांबली. तेथे कळाले गाडी त्या गावापर्यंच होती. तेथे सर्व गाडी रिकामी झाली.आम्हाला पुढे जायचे होते. मांगुकाका  थोडे जाणकार होते. ते आणि  रामसिंगकाका थोड पुढे जाऊन अंगात जाकीट घातलेल्या दोन तीन लोकांना भेटून तालभोपालला जाणाऱ्या गाडी विषयी चौकशी करायला गेले. तेव्हा जाकीट घातलेल्या लोकांनी सांगितले की तालभोपाल या नावाचे गावच नाही. ते ऐकून तर मांगुकाका थंडच पडले.'अहो साहेब तिकडे रेललाईनचे काम चालू आहे म्हणे. तेथे आम्ही काम करायला जाऊन राहिलो.'अरे मग ते

तालभोपाल नाही नुसते भोपाल आहे'. 'तर मग त्या गावाला कसे जायचे साहेब?' मांगुकाकाने त्यांना विचारले. त्याने मग कोणत्या फलाटावर जायचे ते सांगितले. गाडी किती वाजेला लागेल ते सांगितले. त्याने सांगितलेल्या फलाटावर आम्ही जाऊन पोहोचलो. तेथे गाडीची वाट पहात बसलो.गाडी येण्याआधी मांगुकाका परत त्या साहेबाला जाऊन भेटून सांगून आले की खेडेगावातून आलो आहोत. आम्हाला जास्त माहिती नाही रावसाहेब.कृपा करून आमची गाडी आली की आम्हाला इशारा करण्याची तकलीफ घ्या म्हणजे आम्ही बरोबर तिच्यातच चढू. साहेब फार चांगला माणूस होता. गाडी यायची सूचना येताच त्याने आम्हाला इशारा केला त्या नुसार आम्ही बरोबर गाडीत बसलो आणि आमचा पुढचा प्रवास सुखरूप सुरू झाला.त्यावेळी आत्ताच्या सारख्या वेगाने धावणाऱ्या गाड्या नव्हत्या.मांगुकाका सोडता आमच्यापैकी कोणीच आगगाडीचा प्रवास केलेला नव्हता. त्यामुळे आम्ही एका अनाहूत भीतीखाली दबलेलो होतो.आपण बरोबर पोहोचू की नाही, भोपाळ आला की नाही हे आपल्याला कसे कळेल? आमच्या पैकी कोणी जास्त शिकलेलाही नाही अशी भिती सारखी वाटायची.फक्त मांगुकाकाच थोडे जाणकार आणि न घाबरणारे होते.कारण ते संबळ वादक होते. त्यामुळे निरनिराळया गावांना ते जात राहायचे त्यामुळेच त्यांना व्यवहाराची जान आणि थोडी धिटाई आलेली होती.त्याकाळी असे बँड आणि डी जे. नव्हते. ढोल, लेझीम, ताशा, डफ आणि संबळ वाजवणेच जास्त प्रचलित होते.काही चौकशी वगैरे करायची झाली तर मांगुकाकाच करायचे.

जवळ-जवळ दीड दिवसांचा प्रवास झाल्या नंतर आम्ही भोपाळला पोहाचलो.नशीब आमचे चांगले होते. कारण भोपाळ स्थानकावर कोणी असे टोळक्याने उतरले की तेथे कामवाल्या कंपनीने त्या टोळक्याची चौकशी करण्याठी काही लोक ठेवले होते. कोणी रस्त्याच्या कामासाठी आल्याचे सांगितले की लगेच त्यांना बाजूला घ्यायचे स्टेशनवर उतरल्यावर आम्ही आपापले सामान डोक्यावर घेऊन उभेच होतो, तेवढयात ते आमच्या जवळ आले.आम्हाला काळजी करायची वेळच येऊ दिली नाही.एक जन आमच्या जवळ येऊन विचारू लागला 'क्या आप काम करणे को आये हो?'आम्हाला मुसलमानी

हिंदी चांगली येत होती. कारण आमच्या गावात ४0ते५0 मुस्लिम कुटंब राहत असल्याने आम्हाला ती बोली चांगली बोलता येत होती आणि समजतही होती.मांगुकाकाने त्यांना लगेच उत्तर दिले. ‘हाजी’, ‘बहुत खुब चलो मेरे पिछे पीछे’, तो म्हणाला आणि पुढे-पुढे चालू लागला. आम्ही त्याच्या मागे-मागे जाऊ लागलो. तो आम्हाला दुसऱ्या फलाटावर घेऊन गेला. त्याला लागून नेहमीच्या रुंदी पेक्षा कमी रुंदीचे आगगाडी धावण्याचे लोखंडी पट्टे टाकलेले होते. तो म्हणाला ‘कुछ खाना पिना हो तो खालो अभी, ट्राली आनेमे देर है’. दोन दिवसाच्या शिळ्या भाकरी कुणी खाल्ल्या कोणी दुसऱ्या दिवसासाठी राखून ठेवल्या. बऱ्याच वेळाने दोन ट्रॉल्या आल्या. आम्हाला त्यात बसायला सांगण्यात आले.आम्ही तीत जाऊन बसलो.एक ट्रॉली दोन मानसे ढकलत होते.एक ते दीड कोस अंतर गेल्यावर बुदनी नावाचे गाव आले. तेथे त्याने आम्हाला खाली उतरवले. ती व्यक्ती परत आमच्या जवळ आली आणि म्हणाली ‘अब यहासे आपको अपने कामके जगह ले जाएँगे। वहा आपको एक-एक झोपडी मिलेगी। अपनी-अपनी झोपडीमें आप ठहरोगे। कल सबेरे वहा चौकी बाबुसे मिलना होगा। उनको सबने अपने-अपने नाम, गावका नाम, तहसील और जिलेका नाम लिखा देना होगा। चौकी बाबुही आपको कामके बारेमे सब जानकारी देंगे. सबने एक साथ मिलकर रहना होगा. आपसमे या किसीसे झगडा बखेडा नही करनेका। पिस्तोल बाबू सबसे बडा साहब है। किसीने भी कोई गडबड बखेडा किया तो वे पिस्तोलकी गोली चला देते है। सब संभलकर रहो। आरामसे रहो। अच्छा फिर मिलेंगे’ असे बोलून तो निघून गेला. आम्ही आता पुढे काय याची वाट पहात बसलो. परत थोडया वेळाने २-३ ट्रॉल्या आल्या.‘चलो-चलो कामके जगह जानेवाले जल्दी अंदर बैठो’. ट्रॉली आणणारे लोक ओरडले. आम्ही सगळ्यांनीं आप आपले गाठोडे उचलुन ट्रॉलीत टाकले आणि तीत जाऊन बसलो. थोड्याच वेळात ट्रॉल्या जायला निघाल्या. जातांना टेकडया, दरी, जंगल लागू लागले. थोडेपुढे गेल्यावर एक लांबच लांब मोठी टेकडी लागली. ती टेकडी फोडून तिचे दोन भाग झालेले दिसू लागले. तिकडूनच सुरुंगांचा आवाज, लोकांचा गलबला ऐकू येऊ लागला. घमेल्यांची आदळा आपट ऐकू येऊ लागली. मांगुकाका म्हणाले कदाचित

आपल्या कामाचे ठिकाण आले आहे'. थोडे पुढे गेल्यावर ट्रॉल्या पुढे जायच्या थांबल्या. ट्रॉली वाल्याने आम्हाला खाली उतरायला सांगून एक रस्ता दाखवत म्हणाला 'ऊस रास्तेसे उपर चलेजाव'. तो रस्ता भल्या उंच टेकडीवर चढत गेला होता. आम्ही सर्व जण ती टेकडी चढू लागलो. बरेच वर गेल्यावर खाली पाहिले असता जवळ जवळ ४०० ते ५०० लोक काम करतांना दिसत होते. कोणी खडक फोडत होते. कोणी सुरुंग खोदत होते. कोणी डोक्यावर मोठ-मोठे दगड तर कोणी घमेल्यामधे दगड माती भरून डोक्यावर घेऊन टेकडी चढत होते. तर कोणी रिकाम्या घमेल्या घेऊन खाली उतरत होते. मांगुकाका म्हणाले 'बघून घ्या. आपल्यालाही हेच काम करावे लागणार आहे'. बरेच वर चढून गेल्यावर टेकडीवर खूप मोठी सपाटी होती. त्या सपाटीवर जिकडे-तिकडे झोपड्याच-झोपड्या दिसत होत्या. जणू एखादे छोटे खेडेच वसले होते. तेथे पोचल्यावर समोरून एक व्यक्ती आली तिने विचारले 'आप आज नये आये है क्या'? मांगुकाका म्हणाले. 'हाँ जी हाँ।''कहासे आये है?' त्याने विचारले. 'जी खानदेशसे' मांगुकाका म्हणाले, ' ये खानदेश कहा है?' त्याने विचारले. 'हमने तो पुरे हिंदुस्तानका नकाशा देखा है। हमे तो उसमें खानदेश कही दिखाई नही दिया?' त्याने विचारले. 'हमने तो ये नाम कभी सुनाभी नही और पढा भी नही है. उस देशमे सबसे बडा शहर कौनसा है पता है?' त्याने विचारले. हाँ जी 'जळगाव शहर सबसे बडा है, वो हमारा जिल्हा भी है' मांगुकाकाने खुलासा केला. 'अरे स्टेशनवाला गाव?' वो तो महाराष्ट्रमें है। बराबर!' त्याने विचारले?' हाँ जी हाँ वोही, वोही जलगाव' मांगुकाकाने खुलासा केला. 'तो आप महाराष्ट्रसे आये है? 'हाँ साहेब' मांगुकाकाने सांगितले.'चलो तुमको झोपडिया दिखाता हू उनमेसे तुम तुम्हारे लिए अपनी अपनी झोपडीया चुनलो. और हा सबेरे चौकीदार बाबुके पास जाकर वे तुमसे सवाल पुछेंगे उनके सवालोका सही-सही जबाब देना' एवढे बोलुन तो पुढे-पुढे चालु लागला, आम्ही त्याच्या मागे मागे जाऊ लागलो. त्याने प्रत्येकाला एक-एक झोपडी देऊन चालला गेला.

आम्ही आमच्या नवीन वास्तव्याच्या पडावावर स्थायी झालो. दोन तीन दिवसाच्या अज्ञात वासातला सफर इच्छित ठिकाणी पोहचल्याने सफल झाला.

मनातली भिती आणि काळजी मिटल्याने रात्री सर्व जन शांत झोपी गेले. सकाळी सर्वजण काळजी करून लवकर उठले. आजु-बाजू आपल्यापेक्षा आधी राहायला आलेले झोपडीवाले कोणत्या बाजूला शौचास जातात? पिण्याच्या पाण्याची काय सोय? आंघोळीची काय सोय? हे सर्व निरखून पाहून जो तो आप आपले काम आटोपू लागला. आंघोळ आणि पाण्याची सोय खाली दरीत असलेल्या मोठ्या नदीच्या पाण्याने करायची होती. लाकूड सरपणची सोय शेजारी सभोवताली पसरलेल्या घनदाट अरण्यातून करायची होती. तीन दगड मांडून चुली तयार झाल्या. तेथे दुधाची सोय नव्हती. वस्तीवरच एक छोटेखानी दुकान होते.तेल मीठ तिखट विडी वगैरे किरकोळ साहित्य तेथे मिळत होते. धान्य आणि भाजीपाला बुदनी शहराहून आणावा लागे. आठवड्यातून एक दिवस बाजारासाठी कामाला सुटी असायची. बुदनीला बाजाराला जाण्यासाठी वस्तीहून तेथ पर्यंत आणि परत येण्यासाठी ट्रॉल्यांची फुकट सोय केलेली होती. सर्वांनी आप-आपली सर्व कामे आटोपली आणि एकत्र जमून चौकी बाबूकडे गेलो. चौकीबाबुने सर्वांची नावे गावे विचारून प्रत्येकाला एक ठरावीक नंबर असलेला बिल्ला दिला. सगळ्यांना कडक भाषेत समजावून सांगितले की 'आपला बिल्ला कोनाला देऊ नका किंवा दाखवू नका. कामावर नंबर विचारल्यावर याच बिल्ल्याचा नंबर द्यायचा. चुकीचा नंबर दिला तर तुम्ही जो नंबर द्याल त्या नंबर वाल्याला तुमची मजुरी मिळेल. त्यावेळी तुमची कोणतेही सबब ऐकून घेतली जाणार नाही. तुमचा नंबर तुम्ही नकळत जरी दिला तरी त्यामुळेही तुमचे नुकसान होऊ शकते. त्यामुळे या बिल्ल्याची खूप काळजी घ्यावी' नंतर त्याने प्रत्येकाला कामाचा ठेका नंबर दिला. 'ज्याने त्याने त्याला दिलेल्या नंबरच्या ठेक्यावरच कामाला जायचे. दुसऱ्या ठेक्यावर कामाला गेले तर तो ठेकेवाला तुम्हाला कामावर घेणार नाही. चुकून त्याने कामावर घेतलेच तर तुम्हाला त्या कामाची मजुरी मिळणार नाही'. नंतर त्याने सांगितले की हा डोंगर फोडून जो माल निघेल तो डोक्यावर वाहून त्या डोंगरावर नेऊन टाकायचा आहे. प्रत्येकाने प्रत्येक खेपेस जास्तीत जास्त माल न्यायचा आहे. पुरेसा माल नेला तरच तुम्हाला त्याचा मोबदला म्हणून एक मोठी पत्र्याची गोल टिकली मिळेल. नाही तर लहान टिकली मिळेल. म्हणजे त्याचा अर्धाच मोबदला मिळेल. तेथे

तुम्हाला लहान मोठी अशी हुज्जत घालता येणार नाही. नंतर त्याने प्रत्येकाच्या ठेक्याचे ठिकाण आणि ठेकेदाराचे नाव सांगितले व लगेच कामावर जायला सांगितले प्रत्येक जन आप-आपले बिल्ले व्यवस्थित सांभाळत, आप आपल्या ठेक्याकडे वळले. खूप मोठ्या टेकडीचे फोडायचे काम चालले होते. मोठ्या भावाने सुरुंग खोदण्याचे काम घेतले होते. त्या काळी सुरूंगासाठी खड्डा खोदायच्या मशीनही नव्हत्या. ते खड्डे लोखंडी पहारीने करावे लागत होते. जिकडे पहावे तिकडे सुरुंग खोदाईचेच काम चालू होते. खड्डा करणारे मजूर सकाळी-सकाळी उजेड पडल्या बरोबर कामाला लागून जायचे. कारण त्यांचे सुरुंग खोदून झाले म्हणजे नंतर येणाऱ्या मजुरांना लगेच कामाची लाइन मिळून जायची. म्हणजे सुरुंग उडवणारे लगेच त्यात दारूगोळा म्हणजे जिलेटिन भरून सुरुंग उडवायचे, सुरुंग उडाल्या नंतर डोंगराचा काळा-कभिन्न खडक फुटून त्याचे खूप लहान मोठे तुकडे, भुगा आणि माती निघायची त्यामुळे माती वाहणाऱ्यांनाही लगेच काम मिळून जायचे. तो पर्यंत पुढचे सुरुंग कोठे खोदायचे ती जागा ठरवणाऱ्यांनाही जागा ठरवायला वेळ मिळून जायचा. प्रत्येक कामाला वेगवेगळे मजूर होते. प्रत्येक कामाची मजुरी वेगवेगळी होती. सुरुंग खोदायची मजुरी एक आणा, सुरुंग भरून उडवणाऱ्याची मजुरी अर्धा आणा, माल वहानाऱ्यांची मजुरी २० टिकल्यासाठी एक आणा, सुरुंगाची जागा ठरवणाऱ्याची मजुरी ५० जागेसाठी एक आणा असे मजुरीचे दर होते. प्रत्येक मजुराला एक हजेरी कार्ड मिळायचे. प्रत्येक दिवसाच्या शेवटी त्या कार्डावर मजुरीची नोंद केली जायची. त्यामुळे कोठेही कोनाची फसवणूक होत नव्हती. कारण त्या नोंदी अंकात आणि अक्षरातही होत असल्याने खाडाखोड किंवा गिरवागिरवही करता येत नव्हती. सुरुंग खोदायचे काम फार कठीण आणि जिकिरीचे होते. साधारण साडेचार ते पाच फूट लांब आणि १० ते १५ शेर वजनाच्या लोखंडी पहारीने खडकाला घाव घालून-घालून खड्डा कोरणे काही तोंडचे खेळ नव्हते २ ते ३ इंच व्यासाचे. त्यातल्या त्यात घाव घालायचा एकच अचूक बिंदू, सर्व अंगाला शहारे आणणारेच होते. चार ते पाच इंच खोल गेल्यावर ते थोड सोपे जायचे. सुरुवातीला त्या काळ्या-कभिन्न आणि कडक खडकावर दणका मारणे फार धोक्याचे असायचे. माल वाहून नेणाऱ्याला अर्धा मैलाचे अंतर

डोंगर चढून जावे लागायचे. एका खेपेचे आईला मोठी टिकली मिळायची तर मला एक लहान टिकली मिळायची. ती मी आई जवळ आणून द्यायचो. दिवसाकाठी आई जवळ ४० ते ४५ टिकल्या जमायच्या. तर दिवसाकाठी मी आईला १५ ते २० लहान टिकल्या द्यायचो. त्या टिकल्या जमा करायला एक माणूस यायचा तो प्रत्येकाच्या टिकल्या मोजून ताब्यात घ्यायचा आणि मजुरी कार्डावर लहान किती मोठ्या किती तो आकडा इंग्रजी अंकी आणि अक्षरी त्यांच्या लिपीत लिहून द्यायचा. त्या मुळे कुठेच गडबड व्हायची नाही. सहा दिवस काम करून सातव्या दिवशी सगळयांना त्यांच्या-त्यांच्या हिशेबा प्रमाणे पैसे मिळायचे. भाऊही दिवस भरात २ ते ३ सुरुंग खोदून टाकायचा. आठवडा भरची भाऊची मजुरी एक रुपया तर आईची सव्वा रुपया व्हायची. महिन्यातून नऊच रुपयांची कमाई यायची. धान्य, भाजीपाला, तिखट, मीठ यांचा खर्च जाऊन एक ते सव्वा रुपया शिल्लक राहायचा. गावाकडे एवढी कमाई कधीच होत नसे. मागूनही गावात काम मिळत नव्हते. इथे कामाला वेळ पुरत नव्हता. दिवस कसे सुरळीत आणि शांततेत चालले होते. दिवसभर काम करून थकल्याने रात्री आरामाची झोप लागत होती. कामाच्या ठिकाणी दिवसातून दोन वेळा आणि निश्चित ठरल्या वेळीच सुरुंग लावले जायचे. पहिला १२ वाजेला दुसरा दुपारी ४ वाजेला. त्यावेळी आधी भोंगा व्हायचा. तेव्हा सर्व मजूर सुरक्षित ठिकाणी लपून बसायचे. कारण सुरुंग फोडल्यावर खडकाचे निघालेले लहान मोठे तुकडे खूप उंच आणि लांब पर्यंत सर्व बाजूंना उडायचे. केव्हा कुठून कोणता दगड अंगावर येऊन पडेल याचा नेम नव्हता. त्यामुळे प्रत्येक जन आपले जीव वाचवून जास्तीत जास्त अडगळीच्या ठिकाणी लपून बसायचा.



# आईची दुखापत

असाच एक दिवस उगवला. दुपारचे ४ वाजले होते, आणि भोंगा झाला. सर्व मजूर आप आपले जीव घेऊन लपण्यासाठी जागा शोधू लागले. आम्हीही आमच्या नेहमीची जागा शोधून लपून बसलो. आमच्या कामाच्या ठिकाणी एक ट्रॉली नेहमी उभी असायची. त्या ट्रॉली मधे आम्ही जाऊन लपलो. सकाळच्या आठ वाजेपासुन कामाला लागल्यामुळे बहुतेक जन थकलेले असायचे. आम्हीही थकलेलेच होतो. आम्ही ज्या ट्रॉली खाली बसायचो ती रिकामी आणि उभी ठेवलेली असायची म्हणून  तिच्यात बसायला भरपूर जागा असायची. कारण त्या ट्रॉलीचा आकार आगगाडीच्या अर्ध्याडब्या एवढी आणि वरची बाजू पूर्ण उघडी असायची उघडया चौकोनी डब्या सारखी. ती उभी केली म्हणजे तिचा डोक्यावर येणारा भाग छपरासारखा यायचा त्यामुळे ती खूप सुरक्षित होती. म्हणून  वरून काहीही पडणे शक्य नव्हते. त्यामुळे त्या दिवशीही आम्ही निश्चिंतपने तेथे जाऊन बसलो होतो. सकाळीच आई आणि भावाने रोजच्या कामात नेहमी पेक्षा थोडी वाढ करायचे ठरवले असल्याने त्यानी आल्या-आल्या कामाचा सपाटा चालवला होता म्हणून  दोघेही जरा थकलेच होते.  त्यामुळे भावाला आईची कीव आली. तो म्हणाला 'आई जरा पाय लांब कर मी थोड दाबून देतो. आई म्हणाली' राहू देरे बेटा तूही तर थकलाच आहेस ना'?' असू दे ग लांबव थोड पाय मी दाबूनच देतो त्याच्याने थोडा आराम वाटेल तुला'. भाऊ जरा काकुळतीला येऊनच म्हणाला होता.लाडाने

आईने त्याचा पटकन मुका घेतला आणि ट्रॉली थोडी आखूड असल्याने थोडेसेच पाय लांबवले. भाऊ पाणी पिण्यासाठी थोडा बाजूला गेला. पण तेवढ्यातच‘ आईग मेली आता’ अशी आई जोराने किंचाळली. ती ऐकताच भाउने हातातला पाण्याचा भरलेला टंबलर तसाच फेकला आणि एकदम ओरडला ‘आई’. मला तर काहीच कळेनासे झाले. हे काय झाले? समोरचे चित्र बघून मी सुन्नच झालो. आईचा पाय रक्ताच्या थारोळ्यात भिजून गेला होता. भाऊ तिच्या भोवती इकडून तिकडे धावत होता. आई घामाने ओलीचिंब होऊन बेशुद्ध झाली होती. धारदार कपारी असलेला एक दगड तिरक्या दिशेने समोरून येऊन साडी फाडून आईच्या मांडीत आत रुतून बसला होता. सुरुंगाच्या जोरदार ताकदीने तो उडाला असल्याने तो जवळ जवळ आर्धी मांडी चिरून मधे घुसला होता. भाऊ बेंबीच्या देठा पासुन ओरडला ‘मांगुकाका धाव, मांगुकाका धाव’ त्याची आरोळी ऐकून काहीतरी भयानक घडले आहे. हे ओळखून मांगूकाका डोक्यात टोपी  न घालता तसेच धावत आले, अजून सर्व सुरुंग पूर्णपणे उडालेलेही नव्हते, त्याची पर्वा न करता मांगुकाका धावत आले होते. समोरचे चित्र बघून मांगुकाकाची जीभच जणू टाळूला चिटकली. त्यांच्या तोंडातून आवाजच येईना. प्रसंग फार गंभीर होता. मांगुकाका लगेच मागच्या पावली परतले आणि धावू लागले. ते धावतच ठेकेदाराकडे गेले. त्याला परिस्थितीची जाणीव करून दिली. थोड्या वेळाने ठेकेदार लाकडी शिडी दोन तीन लोकांच्या खांद्यावर टाकून घेऊन आला. सर्वांनी आईला त्या शिडीवर झोपवून शिडी टांगाटोली करून झोपडीवर घेऊन आले. कामाच्या ठिकाणी असलेला डॉक्टरही ताबडतोब आला. त्याने ताबडतोब जखम धुऊन साफ केली. जखमेत घुसलेली माती, खडकाची बारीक रेव काळजीपूर्वक साफ केले. पातळ औषधींनी परत स्वच्छ धुऊन स्वच्छ कापसाने साफ करून ती चांगली कोरडी केली. जखम इतकी खोल होती की हाताची तीन बोटे घुसून जात होती. मांडीच्या मासखंडाचा बराचसा भाग तुटून गेला होता. जखमेच्या खड्यात त्याने मूठभर पावडर टाकली. ती पावडर इकडेतिकडे पडू नये म्हणून आणि इकडे तिकडे पांगू नये म्हणून चिकट पट्टीने सर्व बाजूंनी पक्की चिटकवुन तिचे तोंड चांगले बंद केले. दोन-तीन सुया टोचल्या. आई तो पर्यंत शुद्धीवर

आली नव्हती. डॉक्टर म्हणाला ‘आईंना झोपेचे इंजेक्शन दिले आहे. दोन-तीन घंट्यानंतर शुद्धीवर येईल. तो पर्यंत मी आईसाठी बुदनीहुन चहा मागवण्याची सोय करतो. चहा आला की आई शुद्धीवर आल्यावर तो गरम करून त्यांना पाजा. आता काही गोळ्या त्यांना टाकून जातो. त्या रात्री त्यांना झोपायच्यावेळी द्या. त्यांना रात्री खूप ताप येईल घाबरून जाऊ नका. त्यांना मी दिलेल्या गोळ्यांनी आणि औषधींनी जरा आराम वाटेल. मी सकाळी परत येईन. काळजी करू नका. ही खबर मी मोठ्या साहेबांना कळवून देतो. त्यांचा काय हुकूम मिळतो ते पाहू. आईच्या जखमेतून खूप रक्त गेले आहे. त्यामुळे त्यांना दोन-तीन दिवसापर्यंत चक्कर येत राहतील. घाबरू नका आणि काळजीही करू नका. मी दिलेल्या गोळ्या औषधी मात्र वेळेवर काळजीपूर्वक द्या’. एवढे बोलून डॉक्टर जाऊ लागले. त्याच्या बरोबर मांगुकाका गेले. तेही हिंदीत बोलले ‘डॉक्टर साब वो बहोत गरीब बाई है। छोटे-छोटे बच्चे लेकर वो हमारे आसरेसे ये काम पे यहा आई है। तुम्हारे दवा पानीके कितने पैसे हुये? वैसे उसके पास जादा पैसे नही होंगे। यावर डॉक्टर म्हणाला‘ घबरानेकी कोई बात नही है। ये सब खर्चा कंपनी करेगी। बच्चो की हीम्मत बढाना तुम्हारा काम है। वैसे जख्म बहुत बडी है। सुधरनेमे बहुत वक्त लगेगा। बडे साहबसे मै सारी बात करूंगा। पुरा मामला उनको समझा दुंगा। वे जरूर यहा आकर आईको देख लेंगे। देखते है क्या होता है। अब तुम तुम्हारा काम देखो। मैं जख्मके हिसाबसे बिन बुलाए आता रहुंगा। तुम कोई फिकर मत करना। यहा आया हुआ हर मजदूर हमारे यानी कंपनीके जीम्मे होते है। उनकी हर खबर और फिकर कंपनीके जीम्मे होती है’। एवढे बोलून डॉक्टर निघून गेला. मांगुकाका परत झोपडीवर आमच्या जवळ आले. आम्हाला समजावण्याच्या सुरात म्हणाले, ‘पोरांनो घाबरू नका. मामीकडे लक्ष ठेवा. आजची रात्र कोणी झोपू नका. तुम्ही भाकरी टाकू नका. मी भाकरी घेऊन येईन’. एवढे बोलून ते जायला निघाले. तेवढयात आईच्या कन्हन्याचा आवाज आला. मांगुकाका जाता-जाता थांबून गेले. ‘मामी आता कसे वाटते? त्यांनी आईची चौकशी केली. आईचा आवाज कापरा झाला होता. तिला कुशी बदलायची होती पण बदलता आली नाही. ती अर्धवट शुद्धीत होती. मांडीला हात लावला आणि अति

वेदनेमुळे खोल आवाजात ती म्हणाली ‘आई ग!’. ‘घाबरू नका मामी तुमच्या मांडीला जखम झाली आहे. तिथे हात लावू नका’ मांगुकाका म्हणाले. ‘मी कुठे आहे?’ आईने खोल आणि कापऱ्या आवाजात विचारले. ‘तुम्ही तुमच्या झोपडीतच आहात’, मांगुकाका म्हाणाले.‘ मुले कुठे आहे?’ आईने परत विचारले. त्याबरोबर मांगुकाकांनी आमच्याकडे बघून, डोळे पुसा आणि रडू नका असा इशारा केला आणि आईला म्हणाले.‘ हे काय इथेच तुमच्या जवळच आहेत’.‘आता काय वेळ झाली आहे ’? आईने पुन्हा विचारले. आई जरा अधिक शुध्दीवर आल्यासारखी बोलू लागली. ‘आता संध्याकाळ झाली आहे मामी’, मांगुकाकांनी उत्तर दिले. ‘मुलांनो स्वयंपाक केला का तुम्ही?’ आईने विचारले. ‘हो, हो! मग केले ना. तुला जेवायचे का’? भाऊने आईला विचारले. ‘त्याचे असे आहे मामी इथे जरा गर्दी होती म्हणून त्याने माझ्या झोपडीवर जाऊन भाकरी टाकल्या आहेत तुम्हाला भूक लागली असेल तर तो माझ्या झोपडीवर जाऊन घेऊन येईल भाकरी’, मांगुकाका म्हणाले. तेवढ्यात परत आईला ग्लानी आली आणि आई बेशुद्ध पडली. आईला शुद्धीवर आल्याचा आमचा आनंद लगेच मावळला आणि आमच्या डोळ्यातून आसवे वाहू लागली. ‘पोरांनो घाबरू नका मामी तशा चांगल्या अवस्थेत आहेत काळजी करायची नाही. डॉक्टर म्हणालेच आहेत एक दोन दिवस त्यांना हा त्रास होणारच आहे’. आमची समजूत घालून मांगुकाका त्यांच्या खोलीवर गेले. माझे रडणे थांबत नव्हते भाऊने मला जवळ घेतले आणि म्हणाला ‘आपण बहादूर आईचे मुले आहोत. असे नेभळटासारखे रडून आणि घाबरून आपल्याला चालणार नाही. इथे परक्या ठिकाणी आपले आसू पुसणारा कोन आहे? आपल्याला रडताना आईने पाहिले तर आईला काय वाटेल याचा विचार कर समजले का’? ‘हो अप्पा, आता पुढे नाही रडणार आईला हसवायचा आणि गोड गोड बोलून तिला सुखी ठेवू’. तो पर्यंत मांगुकाका भाकरी घेऊन आले होते.‘ चला पोरांनो जेवण करून घ्या’ मांगुकाका म्हणाले. ‘नको काका आई शुद्धीवर आल्यावरच आम्ही आई बरोबर जेवू,कारण आई काल दुपारची जेवली आहे. या निमित्तानेच आई जेवली तर जेवली’. ‘मामीला तुमच्या बरोबर निश्चित जेवू घाला बर का!’, अशी सूचना देऊन काका निघून गेले. तासाभराने काका परत आले

त्यांच्या बरोबर रामसिंग काका, तोंगल ताई आणि राजाराम काकाही आले होते. तोंगल ताई मांगुकाकाची मुलगी होती. येतांना रामसिंगकाका व राजारामकाकांनीही दोन-दोन भाकरी आणल्या होत्या. त्या छोट्याशा झोपडीत आम्ही सर्व जन दाटीवाटी करून बसलो होतो. आम्ही दोघे भाऊ आईच्या पायाशी तर तोंगल ताई आईच्या उशासी बसली होती. तिन्ही काका झोपडीच्या दाराशी बसले हाते. जवळ-जवळ दोन अडीच तासानंतर आई परत शुद्धीवर आली. आई उठुन बसायचा प्रयत्न करू लागली. 'वहिनी अजिबात हालचाल करू नका, जखम जरा मोठी असुन अजून ओलीच आहे. परत रक्त वाहाने सुरू होऊन जाईल'. रामसिंग काकाने आईला खबरदार केले. रामसिंग काका आमचे कुळातले कूळ भाऊ होते. 'भाऊजी माझा उजवा पाय कमरेपासून नसल्यासारखाच वाटतो आहे. थेट कमरेपासून खूप दुखत असून पूर्ण पाय सुन्न झाल्या सारखा बहिरावुन गेला आहे'. आई रडक्या सुरात बोलत होती. 'वहिनी तुमच्या उजव्या पायालाच जखम झाली आहे'. रामसिंग काकाने आईला खुलासा केला.' नेमके काय झाले आहे?' 'वहिनी तुमच्या उजव्या मांडीवर सुरुंगाचा दगड पडून मोठी जखम झाली आहे. डॉक्टर येऊन मलम पट्टी करून गेले आहेत'. रामसिंग काका म्हणाले. 'जो पर्यंत तुमची जखम बरी होत नाही तो पर्यंत तूम्हाला हाल चाल करता येणार नाही'. रामसिंग काकांनी आईला समजावून सांगितले. मग तर मला अंथरुणावरच पडून राहावे लागेल', आईने शंका विचारली. 'अरे मांगु भाऊ तू हे काय घेऊन बसलास. आताच कुठे वहिनी शुध्दीवर आली आहे आणि हे काय भलतेच चालले आहे. त्या लवकर बऱ्या होवोत अशी आपण देवा जवळ प्रार्थना करू. 'हे काय वाढून ठेवल माझ्या पुढे? ही काही थोड्या दिवसांची थोडीच गोष्ट आहे?' आईने डोळ्याला पदर लावला आणि हुंदके देऊन-देऊन रडु लागली. 'भाभीजी! हे बघा तुम्ही का इथे एकट्या थोडीच आहात? आम्ही सर्व जण आहोत की तुमच्या पाठीशी. कशीही आणि कोणतीही वेळ येऊ द्या आम्ही सर्व संकटात तुमच्या मदतीला तयार आहोत आणि मामी गावाकडे अशा परिस्थितीत तुम्ही परत गेल्यावर लोक तुम्हाला एकट्याला बोलणार नाहीत आम्हांलाही जाब विचारतीलच की?' 'गावात भले आम्ही तुमच्याकडे लक्ष देत नाहीत इथे

मांगुभाऊ सोडले तर आम्हीच तुमच्या अधिक जवळचे आणि वरून भाऊबंदकीचे आहोत. आम्हाला लोक सोडतील का? भाऊबंदकी काही चीज आहे का नाही?' राजाराम काका तावातावाने म्हणाले.' खरंच आहे मामी, अजून मानसातली माणुसकी थोडी तरी जिवंत आहे. प्रसंगाला जात पात भाऊबंदकी वगैरे काही बघावे लागत नाही'. मांगुकाका आईची हिम्मत वाढवायचा प्रयत्न करत होते. 'हो भाऊजी हे खरे आहे, डोळे पुसत आई म्हणाली. 'तुमच्या ज्या भरवशावर गावातून पाय काढला तो भरवसा खरा ठरला', आई हुंदका सांभाळत म्हणाली. समोर दोन दीर आणि मांगुकाका असल्याने आईने साडीवरूनच मांडीच्या जखमेवर हळू हळू हलक्या हाताने जखम कुठून कुठपर्यंत आहे याचा अंदाज घेतला. 'काही लाजू नका मामी' मांगुकाका म्हणाले. 'डॉक्टरने सुया आणि दवापानी केले तेव्हा मी इथेच होतो त्यावेळी मी जखम पूर्ण पाहिली आहे. सुया, दवापानी करून पूर्ण जखम पट्टीने आवळली तेव्हा ती पट्टी भेंडोळ्यातून मीच मोकळी करून देत होतो.' 'तुम्हाला कसे कळाले मला जखम झाली आहे म्हणून' ? आईने त्यांना विचारले. 'तुमच्या मोठ्या चिरंजीवाने हाक मारून मला बोलावले. त्यावेळी सुरुंग लावणे चालू होते, म्हणून आम्ही आमच्या झाडांच्या त्या दाट जाळीत बसलो होतो. त्याची आरोळी ऐकल्याबरोबर मी भन्नाट पळत आलो. इथे येऊन पहातो, तर तुमचा पाय रक्ताच्या थारोळ्यात अर्ध्याच्यावर बुडाला होता. तुम्ही बिनसुध पडलेल्या होत्या. बाकीची पूस-तपास करायची ती वेळ नव्हती. दोन्ही मुले उभे उभेच थरथर कापत होते. त्यांना धड रडताही येत नव्हते आणि बोलताही येत नव्हते. मी लगेच उलट पावली खाली तुमच्या ठेकेदाराकडे आलो. त्याला ही पूर्ण माहिती दिली. त्यानेही बिचाऱ्याने वेळ वाया न दवडता दोन लोकांना साटा घेऊन इकडे पाठवले. तेही साटा घेऊन माझ्या मागे-मागे पळत आले. समोरचा पसारा पाहून मुकादमही घाबरला. त्याने लगेच तुम्हाला साट्यावर टाकले आणि झोपडीत आणून टाकले. लगेच तो तसाच पळत-पळत जाऊन डॉक्टरला सोबतच घेऊन आला'. मांगुकाका आईला खुलासेवार सांगत होते. बऱ्याच वेळे पासुन बुदनीहुन आलेला चहा तसाच थंड होत चालला होता. गप्पा थांबता-थांबत नव्हत्या. म्हणून तोंगल ताईच मधे बोलली 'तुमचे बोलणे

आता थांबणार असतील तर मी आजीचा चहा परत गरम करते' आणि त्या बरोबरच ती चहा गरम करायला लागली. गरम चहा मग एक थाळी आणि तीन बाडग्यात चौघांना देऊन जागेवर बसली. 'तुम्ही चहा घ्या तोपर्यंत मी जेवायला वाढते'.'हो आता बरीच रात्र झाली आहे सर्वांचे अजून जेवण बाकी आहे. रामसिंग काका म्हणाले. आईच्या अंगात ताप होता. जखमेतून खूप रक्त वाहून गेल्यामुळे तिला थकवाही खूप आला होता. खूप अशक्तपणा आला होता आणि हात पायही गळून गेले होते. आयुष्यात कधी गोळ्या, सुया घेतल्या नसल्याने तोंडाला कडवटपणाही खूप आला होता.' भाऊजी मला तर काहीच खायची इच्छा नाही. तोंडाचा जबडाही जड झाला आहे, मी तर काही खाऊ शकणार नाही तुम्ही पोरांनाच बोलून-चालून खाऊ घाला ते तुमचेच ऐकतील' आई मांगुकाकांना म्हणाली.' भाबीजी अस म्हणून अजिबात चालणार नाही. तुम्हीच जर असा धीर सोडून दिला तर या लहान-लहान पोरानी काय करावे? त्यांच्यासाठी तरी तुम्हाला सारे काही सहन करावेच लागेल. वेळ पडली तर तुम्हालाच त्यांच्या तोंडात घास घालावा लागेल. उगीच आम्ही आहोत म्हणून ते हिमतीने बसले आहेत. तुमची जखम खूप मोठी आहे हे जरी खरे असले तरी सर्वात मोठ्या जखमा आता त्यांना झाल्या आहेत. त्या तुम्हा-आम्हाला दिसणार नाहीत. खरेतर त्यांनी असे याच्या आधी कधी पाहिले नसल्याने ते त्याबाबत काही सांगू शकणार नाहीत. त्यांच्या मनाची जखम ते तुमच्या शिवाय कोनाला सांगू शकतील ते तुम्हीच सांगा. त्यांच्या साठीच तुम्हाला खावे लागेल ही गोष्ट जरा ध्यानात घ्या, तुमचे जरी दुखत असेल तरी. बाळांनो आता माझे दुखणे कमी झाले असे खोटे-खोटेच सांगून तुम्हाला तुमच्या बरोबरच त्यांचीही हिम्मत बांधावी लागत जाईल.' इतक्या वेळेपासून शांतपणे गंमत पाहणारे राजाराम काकाने आईला समजावले. राजाराम काका म्हणजे एकदम अबोल व्यक्ती. रामसिंगकाका आणि राजारामकाका सख्खे चुलत भाऊ. 'राजाराम भाऊ बरोबर सांगत आहेत कसेही कढुमढु करून तुम्हाला मुलांना बरोबर घेऊन आता लवकर जेवण आटोपावे लागेल वहिनी. तोंगल बेटा वहिनी सोबत मुलांनाही वाढ पाहू लवकर. वेळ नको करू' रामसिंगकाका म्हणाले. तोंगलताईने आमच्या तिघांच्या पुढे जरमलच्या तबकडीत

भाकरी ठेवल्या. 'तुमचे म्हणणे सोळा आणे खरे आहे. भाऊजी मुलांसाठी मला हे सर्व गिळावेच लागेल. निदान या बाळासाठी तरी मला हे करावेच लागेल'.आई हुंदका देत म्हणाली. तोंगलताईने जरमलच्या ताटलीत आईला आणि आम्हा दोघा भावाना एका बाडगीत चटणी भाकर वाढली. आईने कसा बसा तोंडात भाकरीचा तुकडा घातला. आम्ही जेवणाला सुरुवात केली. आम्ही कसे बसे तोंडात घास घालत होतो पण जेवणापेक्षा आमच्या डोळ्यातील आसवाचाच वेग जास्त होता. आईने कशी बशी अर्धी भाकर आणि दोघ भाऊ मिळून अर्धी भाकर खाल्ली. चार भाकरी उरल्या. त्या व्यवस्थित फडक्यात बांधून ठेवल्या. रात्र किती झाली कळाले नाही. बाहेर रातकिड्यांचा किरकीराट चालू होता. 'तोंगल बेटा तू रात्रभर यांच्या बरोबर इथे राहा आणि आजीकडे लक्ष देशील'. मांगुकाका म्हणाले. तोंगलताई आमच्या पेक्षा बरीच मोठी होती.' नको काका मी आहेना मी घेईन आईची काळजी' मोठे अप्पा म्हणाले. 'मी बी आहेना काका' अप्पाची हिम्मत वाढावी म्हणून मी बोललो. 'ठीक आहे मग आता आम्ही जातो. सकाळी कामावर जाण्याआधी आम्ही परत येऊन जाऊ'. जातांना सर्वांनी सांगितले. 'भाभीजी एक सांगायचे राहून गेले तू पैशांची काळजी करू नकोस आम्ही आहोत ना! हिशोब टीशोब बघायला. गावाला गेल्यावर सर्व बघून घेऊ', रामसिंगकाका म्हणाले 'फार-फार उपकार होतील भाऊजी, आता तर तुमच्या आणि भगवंताच्या भरवशावरच सर्व सोडले आहे. तो करील तेच खरे!' बोलत बोलतच आईला रडू आले.'बर मग आम्ही आता येतो' असे सांगून ते सर्व जन आपसात बोलत-बोलत निघून गेले. झोपडीत गर्दी होती म्हणून  दुख्खाची जास्त जाणीव आम्हाला त्यावेळी झाली नाही.ते सर्व जन निघून गेल्यावर मात्र झोपडी एकदम रिकामी झाली. आम्हाला एकटे-एकटे असल्याची जाणीव झाली.ते असतांना सर्वांमधे वाटले गेलेले दु:ख आता आमच्यावरच येऊन पडल्याने सर्व वातावरण एकदम थिजून गेल्यासारखे वाटू लागले. मनात एकदम धस्स झाल्यासारखे वाटले. आता पर्यंत आईची जखम जवळून कोणीच पाहिली नव्हती. अप्पा एकदम आईच्या मांडीजवळ जाऊन बसला. आई-आई म्हणत खोल आवाजात रडत, आईच्या जखमेवरून हलके-हलके हात फिरवू लागला. नंतर मात्र त्याला रडू आवरता

आले नाही. त्याचे बघून मलाही रडू आवरेना. मीही हुंदके देऊन रडू लागलो. आमची दशा बघून आईचे काळीज एकदम हेलावून गेले. ‘अरे बाळांनो काळाने ही कशी वेळ आणली’? ती एकदम कळवळून म्हणाली. तिला वाटले मुलांना कुरवाळावे पण तिला जागचे हालताही येईना. कारण रक्तस्त्रावाने ती अतिशय अशक्त झाली होती. ती तापानेही फणफणत होती. रडतानाही तिच्या तोंडातून गरम वाफा निघत होत्या. ‘आई तू रडू नकोना, नको रडू ग!’, तिचे तोंड दोन्ही हातात धरून मी मुसमुसून रडत होतो. एकमेकांची हालत आम्हा एकमेकांना बघवत नव्हती. बरीचवेळ तशीच गेली. नंतर आईला काहीतरी आठवल्या सारखे झाले आणि तिने अप्पाला हळूच विचारले ‘अप्पा, काय रे अप्पा, आपण तर नेहमी सारखेच ट्रॉली खालीच बसलो होतो ना? मग हे सर्व कसे झाले? त्या ट्रॉलीत दगड कसा आला? ट्रॉली फोडून आला का?’ ‘आई तसं नाही झालं ग. आपण ट्रॉलीतच बसलो होतो. पण डोक्यावर ओझे घेऊन सारखी चढ उतर करून तुझे पाय खूप दुखत होते म्हणून मी तुझे पाय दाबणार होतो. त्यासाठी मी तुला पाय लांबवायला सांगितले. तू पाय लांबवून डोळ्याची पापणी लावत नाही तोच तुझ्या लांबवलेल्या पायावरच तो सुरुंगाचा दगड पडला. तू पाय लांबवले तेव्हा मी पाणी प्यायला उठलोच होतो. तेवढ्या वेळातच देवाने हा सगळा डाव सांधला ना ग आई.’ एवढे बोलून अप्पा ढसा-ढसा रडू लागला. ‘तुझा पाय लांबवायचा घात आणि खाली फुटलेल्या सुरुंगाचा दगड सपकन त्याच्यावर पडायचा घात एकच झाला. पाय लांबवल्याने तुझा पाय ट्रॉलीच्या बाहेर गेला होता. त्या दगडाला कुऱ्हाडीसारखी धार होती, म्हणून तो खसकन मांडी चिरून आतच घुसला. पाणी पिण्याऐवजी मी पाय दाबायलाच बसलो असतो तर तो दगड सरळ माझ्या डोक्याचे दोन भाग करूनच बाहेर पडला असता.’ अप्पाने आईला ती पूर्ण हकिकत सांगितली. ‘नको रे बाळा असे भलते-सलते वाईट बोलु आई म्हणाली. भगवंताने तर माझ्यावर खूप-खूप उपकार करून तो संकट माझ्या पायावरच निभावले. माझ्या पायाचे काय महिने दोन महिन्याने चांगले होऊन जाईल पण तुझे काय झाले असते? मी कोणाला तोंड दाखवू शकली असती का? माझी एवढी मोठी आधाराची काठी कुठे शोधत फिरली असती. माझ्या डोक्यात एक तरी केस

राहिला असता का ? अरे पण मी ही तुला दुसरी एक गोष्ट सांगायची राहिली. तू पाय लांबवायला सांगितले त्याच्या आधी मला केव्हाची इराखत लागली होती आणि मी जाणारंच होती पण कंटाळा करून बसूनच राहिली. ती बुद्धी देवाने बरी दिली, नाही तर तोच दगड माझ्या पायाऐवजी डोक्यावर पडला असता तर काय झाले असते? तुम्ही कोनाच्या दारी भटकत राहिले असते?' 'आई म्हणजे देवाने जे केले ते चांगलेच केले ना?' अप्पा म्हणाला. 'मग आता रडू नको. नको रडू ना आई, नाहीतर मलाही रडू येईल', आईला बिलगत अप्पा म्हणाला. 'बेटा ज्याचा कोणी नसतो त्याचा भगवान वाली असतो' आई म्हणाली आणि तिने लांब श्वास घेतला. 'नेमके काय घडणार होते त्याची तर मी कल्पनाच करू शकत नाही.' अप्पा आणि आई एकमेकांना बिलगून भगवंताचे आभार मानत होते. जिवावर आलेले संकट देवाने पायावर निभावले होते. रात्र संपत चालली होती. झोप कुठे जाऊन रुसून बसली होती देव जाणे. तिन्ही मायलेकांचे काळीज आणि डोळे वेदनांनी जड झाले होते. रात्रभर कोनाचाच डोळ्याला डोळा लागला नव्हता.

सकाळी साडी फाडून तयार केलेला अर्धा भाग आईने साडी सारखा अंगाला गुंडाळून पाय व्यवस्थित झाकून घेतले. उरलेला अर्धा भाग अप्पाने गरम पाण्यात बुडवून आईचे सर्व अंग रगडून पुसून काढले. कारण जखमेमुळे आईची आंघोळ घालता येत नव्हती. आईची अंगावरील साडी जखमेच्या रक्ताने सर्व भरलेली होती. ती साडी आणि आमच्या आंघोळीचे कपडे घेऊन अप्पा आणि मी नदीवर गेलो. आम्ही आंघोळी करून आपले कपडे धुऊन घेतले. अप्पाने आईचे लुगडे रगडून रगडून धुतले. सर्व तर नाही पण बरेचसे रक्ताचे डाग धुतले गेले होते. झोपडीवर आल्यावर अप्पाने आईच्या केसांना विंचरून नीट केले कारण आईचे सर्व केस आईला इकडून तिकडे उचलल्याने विसकटून गेले होते. मी भाकरी टाकू लागलो. भाकरी टाकून झाल्यावर अप्पा भाकरी बांधून कामावर गेला, जातांना 'आईला वेळेवर जेवण देशील, तूही आई बरोबरच जेवशील म्हणजे आई दोन घास जास्त खाईल' असे मला सांगून गेला. अप्पा गेल्यावर थोड्यावेळाने कालचा डॉक्टर परत आला. त्याला पाहून आई म्हणाली 'नमस्ते बाबुजी'. आईचे बघून मी ही म्हणालो 'नमस्ते बाबुजी'.'

वाह बहुत खूब, कैसी तबियत है अम्माजी अब'? त्यांनी विचारले.'अछ्छी हुं माय बाप', आई म्हणाली. 'अरे तुम ऐसे बोलो मत अम्माजी, हम तुम्हारे बेटे जेसे है. हम भी तुम्हारी तरह मजदूर आदमी है', डॉक्टर म्हणाले' भगवान तेरा भला करे बेटा' आई भरल्या कंठाने म्हणाली. 'रातमे निंद आई'? त्याने विचारले. 'नही डाक्टर बाबू निंद कहासे आयेगी?दोनो बेटे और मैं रात भरके जगे है', आई म्हणाली. 'क्यों? बहुत तकलिफ हुई?' डॉक्टरने विचारले.'हा बाबुजी तकलिफ तो भोत हुई पर उससे जादा तकलिफ अब मैं और मेरे दो बेटों का पेट कयसा भरूंगी इसकी हय. मय तो आयसी बिमार पडी हु। किधरसे पैसा आएगा? दिन भला था मेरा मुंडका छोडके वो पत्थर मेरे पावपे गिरा मुंडकेपेच गिरता तो मेरे बेटे का कैसा होता? आब पेट कैसा भरना अवर औषदपानीका खरचा मय किधरसे लाउ'? आई रडत-रडत म्हणाली.' अरे-अरे माँ जी आप तो रोने लगी. आप रोओ मत. तुम्हारे दवा पानी का खरचा कंपनी करेगी. तुमको कुछ भी देना नही होगा. तुम सिर्फ तुम्हारे जख्मकी चिंता करो. जादा हिलना नही, जख्मका पैर जादा हिलाना नही. उससे जख्म फिरसे ताजी हो जायेगी. रातमे खुन तो नही बहा'? डॉक्टरने विचारले. 'बाहर तो नही आया, कपडे कु थोडा थोडा लगा', आई म्हणाली. 'ठिक है भगवानपे भरोसा रखो. उसकी क्रिपासे सब कुछ ठीक हो जायेगा. और हाँ एक बात बताना भूल गया, मैने तुम्हारी खबर कंपनीके सबसे बडे मालिक को देदी है. शायद बडे मालिक कीसीको तुम्हे देखने भेज सकते है, या फिर किसीको कुछ हुकम कर सकते है. ये बात ध्यानमे रखना, घबराना नही. कोई आके कुछ सवाल करे तो सही सही जबाब देना घबराना नही'. डॉक्टरने जरा आपुलकीनेच समजावून सांगितले. 'जी बाबुजी जो होया है मय वोइच सच सच कहुंगी', आईने कृतज्ञ भावाने उत्तर दिले. 'चलो मै अब दवा पानी करता हु. कुछ तकलिफ होगी तो मुहसे बोलना, चिल्लाना नही'. डॉक्टरने सूचना दिली. कालच्या चिटकवलेल्या पट्या कापसाचे बोळे वगैरे त्याने काढले. त्यावेळी पहिल्यांदा आईची जखम पहायला मिळाली. जखम पाहून आई तर हक्की-बक्कीच झाली. चिरलेल्या टरबुजाची फोड बसून जाईल एवढी रुंद आणि खोल जखम मांडी चिरून त्या दगडाने केली होती. 'माजी पाव बिलकूल मत हिलाते जाना, जख्ममे थोडा खून आया

है. ऐसे जख्म बहतेही रहेगी और फिर सुधरनेमे देर लगेगी', डॉक्टरने आईला खबरदार केले.'नही बाबुजी आजका पहला दिन था बच्चे छोटे-छोटे है उनसे मेरा वजन तोला नही जाता. उससे थोडा इधर-उधर हो गया. अब सब काम मै ध्यान देके करूंगी' आईने सांगितले. उसमे तुम्हारीही भलाई है माँ जी डॉक्टर समजावण्याच्या सुरात म्हणाला. आते-आते मुझे बहोत फिकर हो रही थी और मै भगवानसे विनंती करत-करते आ रहा था. की माजी को बहुत तकलिफ ना हो डॉक्टर म्हणाला. 'भगवान भला करे तुम्हारा। आईने डॉक्टरला तोंड भरून आशीर्वाद दिला'. 'नही माँ जी, ये तो मेरा फर्ज है. अपना कोई भी काम जी लगाके करना ऐसा माँ ने सिखाया है' डॉक्टर म्हणाला. 'अच्छा माँ जी, कल तो जख्मसे खून बह रहा था इसलिये ड्रेसिंग अच्छी नही हुई थी, आज एकदमसे अच्छी हो गई, लेकीन हाँ तुम्हारे हिम्मत की भी दाद देनी होगी माँ जी.यहाँ कामपर मैने ऐसे-ऐसे मरीज देखे है जो डॉक्टरके छुनेसेभी चिल्लाने लगते है। लेकिन तुम्हारी इतनी बडी लंबी चौडी जख्म देखकरभी ना तुम घबराई, ना चिल्लाई, ना हाय हुस किया।' एवढे बोलून डॉक्टर उठून उभा राहिला. त्याने त्याचे सामान पिशवीत भरून जाऊ लागला. जाता-जाता परत आईला म्हणाला 'माँ जी याद रखना कंपनीका कोई आदमी आकर कुछ सवाल करे तो घबराना नही उनके सवालोका सही-सही जबाब देना' एवढे बोलुन डॉक्टर निघून गेला. आईने साडी नीट केली. मी कपडे धुवायला आणि लाकूड आणायला नदीकडे निघून गेलो. जान्या आधी हाताशी पिण्यासाठी पाण्याने भरलेला लोटा भरून ठेवून आलो होतो. आई झोपडीत एकटीच होती. मी जवळ-जवळ दोन अडीच तासांनी लाकडाचे ओझे आणि धुऊन वाळलेले कपडे घेऊन झोपडीवर परत आलो. नंतर मी आणि आईने थोड जेवण केले. डॉक्टरने आईला जखमेची ठणक कमी व्हावी म्हणून सुई टोचून गेला होता. त्यामुळे आईच्या अंगातला कन्हारा कमी झाला होता. आरामासाठी आईने अंग टाकले कारण सुईमुळे तिला थोडी गुंगी आली होती. तिची झोप मोड होऊ नये. म्हणून मी झोपडी बाहेर जाऊन बसलो. थोड्या वेळाने चार-पाच लोकांचा घोळका समोरून झोपडीकडे येतांना दिसला. त्यातील एकाच्या डोक्यावर एक जन छत्री धरून पुढे-पुढे चालत होता. त्या घोळक्यात डॉक्टरही

दिसला. मला लगेच शंका आली. कोणीतरी कंपनीचा मोठा साहेब घेऊन डॉक्टर येत आहे. कारण सकाळी जातानाच तसे तो सांगून गेला होता. मी पटकन झोपडीत घुसलो. आईला झोपेतून जागे केले. पाठी मागून हात घालून आईला बसती केली. लोट्यातल्या पाण्याने आईने तोंड धुतले आणि अंगावरील कपडे आवरून सावरून नीट केले.तरी तिच्या डोळ्यात अजून झोप दिसत होती.तेवढ्यात ती गर्दी झोपडी समोर येऊन उभी राहिली. मी झोपडी बाहेर आलो. 'नमस्ते डॉक्टर बाबू' मी म्हणालो. 'बडे साहबको नमस्ते करो', साहेबांकडे इशारा करत डॉक्टर म्हणाले. मी पटकन पळतच पुढे जाऊन त्यांच्या पायावर वाकून त्यांना नमस्ते म्हणालो. तो साहेब म्हणाला 'बेटा माँ जी अंदर है ना?' 'हाव साब हय' मी उत्तर दिले 'चलो अंदर',मोठे साहेब म्हणाले .काही लोक साहेबाबरोबर आत आले, बाकीचे बाहेरच थांबले. आईने हात जोडून सर्वांना नमस्कार केला. तिच्या डोळ्यातून आसवांच्या धारा वाहू लागल्या होत्या. मी तिच्या मागे जाऊन उभा राहिलो. डॉक्टरांनी पुढे होऊन आईला नाव विचारले. 'पार्वती', आईने उत्तर दिले. डॉक्टरने आलेल्या साहेबांची ओळख करून दिली. म्हणाले 'ये साहब अपनी कंपनीकें सबसे बडेसाहब, मतलब मालिक है। गालावरील आसवांचा पूर पुसत आई हात जोडून म्हणाली. 'नमस्ते साब!' आई म्हणाली. 'अरे नही माँ जी तुम्हारे जैसो के पसीनेसेही मै बडा हूँ।' मोठे साहेब म्हणाले .'अच्छा, जो हुवा सो हुवा, अब घबरानेकी बात नही है। तुम यहा अकेली हो ऐसा मत समझना, मै हूँ , मेरे सारे आदमी आपके पिछे तुम्हारी मदद करने और सेवा करने हाजीर रहेंगे। पैसेकी फिकर मत करो। लेकिन जख्मकी फिकर करो। कोई भी हालात में तुम्हारा पैर ठीक होकर तुम घुमने फिरने लगने को होना।' मोठे साहेब आईला धीर देत म्हणाले. 'अच्छा इनका बिल्ला और मजदुरी कार्ड किधर है?' मी पटकन मातीच्या हंडीतून काढून ते त्यांना दाखवले, डॉक्टरने ते माझ्या हातातून घेत साहेबाकडे दिले. साहेबांनी विचारले, 'मरदके साथ आई हो? आईने एकदम मोठा हुंदका दिला. 'नई साब मय विधवा हु' आई रडत-रडत म्हणाली. 'मय मेरे बेटेके बराबर आई हु. अब मय तो बिमार हो गई हम तीन जन हय. ये मेरा छोटा बेटा हय. इससे थोडाच बडा कामपे गया हय. वो बी मेरे पास रोते बैठेंगा तो हमारा पेट कैसा भरेंगा.

साब मेरा सब ध्यान उधर लगा हय साब. वो सुरूंग खोदने का काम करता हय साब. उसकी उमर काम करनेकी नही हय, फिरबी पेटके साठी कर रहा है. उससे तो पहार बी नई उठती. आई रडून-रडून तिच्या मनातली पिडा सांगत होती. मोठे साहेब शांतपणे हे सर्व ऐकत होते. 'डॉक्टर किसीको भेजकर इनके बडे बेटे को जल्दी बुला लाओ' मोठे साहेब डॉक्टरला म्हणाले. डॉक्टरने आईला ठेकेदाराचे नाव व ठेका नंबर विचारले. आईने ते सांगितले. डॉक्टरने बाहेर लोकांना विचारले 'इस नंबरके ठेकेदार कोई है क्या'?'जी सरकार मेरेही ठेकेपर, दोनो माँ बेटा काम करते है', एक जण झोपडीत साहेबासमोर येऊन म्हणाला. 'बहुत इमानदारीसे और सफाइसे काम करते है' 'इनके बेटेको तुरंत बुलाओ। डॉक्टर म्हणाला.'सर आदमी पहलेही भेज दिया है। इतनेमे वे आतेही होंगे ठेकेदार म्हणाला. तेवढ्यात बाहेर पावलांचा आवाज आला. ठेकेदाराने बाहेर ढुंकून पाहिले आणी म्हणाला' वो लोग आगए है सर'.तेवढ्यात अप्पा झोपडीत आला. डॉक्टरला बघून म्हणाला 'नमस्ते बाबुजी', 'अपनी कंपनीके मालीक साब आए है उनको सलाम करो'. डॉक्टर त्याला म्हणाला. 'हाँ बाबुजी' असे म्हणत आप्पाने मालकाचे पाय पकडले आणि त्यांच्या पायावर डोके टेकले.'क्यों भाई इस उमरमे तो आपको स्कुलमें होना चाहिए, और तुम यहाँ सुरंग खोद रहे हो?' मोठ्या साहेबांनी त्याच्या डोक्यावर हात ठेवत म्हटले.'हमको कौन पढायेगा माय-बाप? हमारी तो फकत माता है. हम सब मिलके मजुरी करते हय, तब हमारा पेट भरता हय.' आप्पाने रडक्या पण हलक्या आवाजात सांगितले.'सब मतलब? कौन कौन हो तुम लोग'? मोठ्या साहेबांनी त्याच्या गालाला हात लावत विचारले.'मय, माँ, वो छोटा, अवर मेरेसे छोटा एक है. उसको उधर गावमे छोडकर आए है, वो दिनभर काम करता है और दो टाइम रोटी खाता है'. आप्पाने उत्तर दिले. 'ओह', मोठे साहेब हबकून म्हणाले. थोडा वेळ विचार करून मोठे साहेब ठेकेदार व डॉक्टरला म्हणाले 'देखो भई, मै अब माँ जी से फिर मिलने आ पाऊ ना पाऊ अबसे इनकी सब जिम्मेदारी तुम पर ही छोडकर जा रहा हूँ। कुछ इधर उधर ना करे, या आगे पिछा ना सोचे, जो कुछ हो मुझे सीधे और तुरंत बताते रहना। मरिजकी जिम्मेदारी कंपनीपर होती है ये बात अच्छी तरह ख्यालमे रखना और

दुसरी बात मरिजोंको ड्रेसिंगके लिए हप्तेमे एक बार बुदनीके अस्पतालमे ले जाया करो। तिसरी बात ये बच्चा एक हप्तेके लिए कामपे नही आयेगा. जब तक जख्म जरा सुख नही जाती, ये आम्माजीके पासही रहेगा. क्योकी ये बच्चा अभी छोटा है. टाइमपर ये अम्माजीको इधर उधर क्या हिला सकता है? बडावालाही ये कर सकता है. मरीज एक औरत है. उसको तकलिफ आ सकती है. पिछले हप्ते उसने जितनी रकम का काम किया है उतनी रकम उसको हप्तेके आखरीमें यहा आकर देके जाना. इससे आगेकी बात अब अम्माजी तो काम पर आनेसे रही पिछले चार हप्तेमे अम्माजीने जितने की मजदुरी की है, हर हप्ते उतनी मजदुरी उनको यहा लाकर अदा करनी है और डॉक्टर आपने खबरदारी इस बातकी रखनी है की, दवाईयाँ देनेमे कोई कोताही ना बरते. जिसभी दवाकी जरूरत है ओर वो तुम्हारे स्टॉकमे नही है तो बेशक अपने भोपालके मुख्य कार्यालयको सूचित करके तुरंत मंगाते रहना'. मोठ्या साहेबांनी सर्वाना कडक शब्दात सुचना दिल्या.'और माताजी आप इस बातका ख्याल रखे, जब तक जख्म दुरूस्त नही हो जाती आप किसीभी बातकी फिकर मत करना। अपनी तकलीपसे जादा हलचल मत करना। वरना जख्म फिरसे उभर आयेगी।' आईला सौम्य शब्दात सूचना देऊन, आपल्या कमरेला लावलेला पिस्तूल चाचपडून पाहिला. पिस्तूल ठिकाणावर आणि व्यवस्थित असल्याची खात्री करून झोपडीच्या बाहेर पडले. सर्व ताफा त्यांच्यामागे आला तसा निघून गेला. एखादी जादूची कांडी फिरून जावी तसा आईचा चेहरा खुलून आला. जे घडले ते एखाद्या स्वप्नासारखे होते. कोणी तरी मोठा माणूस झोपडीवर येऊन एवढी मेहरेबानी करून जाईल असे आईला स्वप्नातही वाटले नव्हते.या घटनेची वार्ता सर्व मेजघाटवर वसलेल्या ४०० ते ५०० झोपड्यामधे वाऱ्या सारखी पसरली. जे डोंगर फोडून त्यातून आगगाडीची लाइन टाकायचे काम चालू होते त्या डोंगराचे नाव मेजघाट होते. मेज म्हणजे टेबल, टेबलाच्या आकाराचा डोंगर म्हणून त्याचे नाव मेजघाट. तो खूप लांब चौडा होता. त्याच्या चारी बाजू खोलगट आणि सपाट होत्या. त्याचा चौथरा उंच होता. जस जशी घटनेची वार्ता पसरत गेली तस तशी आईला बघणाऱ्यांची गर्दीची वर्दळ झोपडीवर वाढत गेली. अप्पाने एक हप्ता झोपडीवर राहून आईची सेवा

केली. तो हप्ता संपल्या नंतर मात्र आईच्या देखभालीचे काम माझ्याकडे आले. आईला तोंड धुवायला पाणी देणे, आई बाडगीत तोंड धुवायची. तिला आंघोळ करता येत नव्हती, तिचे सर्व अंग कोमट पाण्याने घासून पुसून देणे. तिला लुगड नेसवणे. जखमेच्या निघालेल्या लांब लांब कापडी पट्या, रक्त व पू ने भरलेले कापसाचे बोळे वगैरे नदीत नेऊन टाकणे. आईला जेवण देणे. कपडे धुणे स्वयंपाक करणे सर्व कामे मला करावी लागायची. अप्पाला एक हप्त्याची मजुरी झोपडीवर आणून देण्यात आली होती. आईला चार हप्त्या पर्यंत दर हप्त्याची मजुरी झोपडीवरच आणून देण्यात आली. डॉक्टर आठवड्यातून दोन वेळा यायचे. दुसऱ्यांदा यायचे तेव्हा मला व आईला बुदनीच्या दवाखान्यात न्यायचे आणि मशीनने जखम तपासून पहायचे. मोठे साहेब झोपडीवर येऊन गेल्या नंतरच्या दुसऱ्या दिवशी डॉक्टर झोपडीवर दवा पट्टी करायला आले तेव्हा त्यांनी सांगितले की कंपनीचे मालक खुद तुम्हाला बघायला आले होते. मी येथे दोन वर्षा पासुन डॉक्टरकी करतो आहे, पण एवढ्या काळात मी त्यांना दुसऱ्यांदाच येथे आल्याचे पाहिले. ते मजुरांची फार इज्जत करतात. या कामा सारखेच त्यांचे दुसरीकडेही मोठ-मोठी कामे चालू आहेत. त्यांच्या कंपनीची बदनामी होऊ नये म्हणून ते मजुरांची फार काळजी घेतात. हे सर्व डॉक्टर एका दमात बोलून गेला. 'हाव ना बाबुजी मेरेकु बोले की मय तुम मजुरके दमपेच बडा आदमी हय' आई म्हणाली. आता पर्यंत डॉक्टर बराच परिचित झाला होता.दिवस सरकू लागले.आईची जखम पूर्ण भरत आली होती. काठी धरून आई हळू हळू चालू लागली. चार हप्ते संपल्या नंतर पाचव्या हप्त्या पासुन आईची मजुरी बंद झाली. पाचवा हप्ता आम्ही कसा बसा काढला. सहाव्या हप्त्याला हिम्मत करून आईने घरातून पाय काढला आणि ठेक्यावर कामाला गेली. पण पहिल्या दिवशी डोक्यावर ओझे घेऊन डोंगर चढायची हिम्मत आणि ताकत पहिल्या सारखी ती दाखवू शकली नव्हती. पण कामावरील लोक फार चांगले आणि दयाळू होते. आईने दगडाच्या ओझाची एक खेप आणली की नेहमीच्या एक टिकली ऐवजी ते दोन टिकल्या देऊन टाकायचे. 'मॉ जी जबतक आप पुरी तरह ठीक नही हो जाती तब तक मै सब देखलुंगा और ऐसाही चलता रहेगा आप फिकर मत करना.लेकिन ये बात किसीसे मत

बताना, अगर भूलसे बताभी दिया तो भी मै देख लुंगा। जब कंपनीके मालिक खुद इतनी दया दिखाकर चार हप्तेकी बैठी मजदुरी दे सकते है तो अब तो आप काम करके पैसा कमा रही है, बैठी तो नही है ना? उसमे थोडीसी मदद और कर रहा हूँ बस. इसमे कहा पहाड टुट जानेवाला है?' ठेकेदारचा मुकादम म्हणत होता. 'भैय्या भगवान आपका भला करेगा. वैसे मुझे बिना काम की कमाईकी भोत चीड आती हय भय्या, पर क्या करू दोन बच्चे हय, घरमे बयठके उनका पेट कैसे भरूंगी?'



# अजगराची शिकार

तो हप्त्याचा शेवटचा दिवस होता. सुटीचा दिवस. सर्व झोपडीवासी आपापली घर कामे, आपापल्या सवडीने करीत होती. आठवडाभरच्या खरेदी साठी बुदनीला दुपारून जायचे असल्याने कोणालाही कामाची घाई नव्हती. सकाळी-सकाळी सर्वकडे सामसूम आणि शांतता होती. दोन तीन झोपड्यात मात्र लगबग होती. मांगुकाका, राजारामकाका आणि रामसिंगकाका आणि आमच्या झोपडीत. मी तर तसा कपडे धुवायला जायच्यावेळी रोज लागणारे लाकडे घेऊन यायचो, पण आई जखमेने आजारी झाल्या पासुन तिला कडक पान्याने आंघोळ करून अंग शेकावे लागायचे. म्हणून चारी झोपडीवाल्यांनी लवकर लवकर काम आटोपून जंगलात जाऊन आठवडा भराची लाकडे आणायचे ठरवले होते. तीन चार वर्षा पासुन सर्वमजुर लोक जळना साठी लाकडे वापरत असल्याने जंगलात लाकडे मिळणे मुश्कील व्हायची. जवळपास तर मिळतच नव्हते. त्यामुळे लांब लांब आणि घनदाट अरण्यात जाऊन लाकडे आणावी लागत होती. जंगलात जंगली प्राणी, साप, जंगली माकडे यांची खूप भिती वाटायची. एकट्या दुकट्याच जंगलात जायची हिम्मतच नव्हती. लोक चार-चार, पाच-पाच लोकांच्या टोळक्यांनीच जायचे. तसी ताकीदही कंपनीवाल्यांनी सर्वांना दिलेली होती. आमची सर्वांची तयारी झाल्यानंतर मांगुकाका, राजारामकाका, रामसिंगकाका आणि मी कोणी कुऱ्हाडी, कोणी विळा घेऊन जंगलात निघालो. मी सर्वात लहान होतो म्हणून मला सर्वात मधे घेऊन

चालले होते. जंगलात काही पाऊल वाट किंवा रहदारीचा रस्ता नव्हता. काटेरी जाळ्या, वेली, इकडे तिकडे पसरलेले काटे कुटे, दगड गोटे, खाचा खळगे हे सर्व चुकवत चुकवत आम्ही चाललो होतो.जातांना मोठी माणसे लाकडांचा शोध घेत होते. 'सांभाळून चाल रे गोइंद्या, काटे-कुटे खड्डे खुड्डे बघून चाल', रामसिंगकाका म्हणाले. बराच वेळ चालल्या नंतर खात्री झाली की त्या भागात अजून लाकूड तोड सुरू झालेली नाही. तसे बघितले तर जाड जूड लाकूड खोडांची बरीच ओली कोरडी लाकडे वादळ वाऱ्याने खाली पडलेली होती पण ती एकेका माणसाला वाहून नेणे मुश्किलीचे होते म्हणून त्यांना कुणीच हात लावत नव्हते. जसजसे पुढे जात राहिलो जंगल दाट होत गेले. सगळ्यांनी वेगवेगळ्या दिशेने एकमेका पासुन फार लांब न जाण्याचा सल्ला करून वेगवेगळ्या दिशेला पसरले. मी थोड्या विरळ जंगलाच्या भागात निघालो. मी तसा खूप लहान होतो, म्हणून जाड लाकडे माझ्या दोन्ही हातांच्या ताकदीने जे तुटतील अशी लाकडे तोडत-तोडत पुढे चाललो होतो आणि तोडलेली लाकडे एका ठिकाणी गोळा करून ठेवत होतो. बऱ्याच अंतरावर नदीच्या पाण्याची धार खडका दगडावरून वहात असल्याने त्याचा खळखळाट ऐकू येत होता. पुढे खूप लांबवर कशाने तरी भरलेल्या गोणपाटाच्या पोत्यांचा खूप मोठा ढीग पडलेला होता. त्यांच्या बाजूलाच जाड बारीक तारांचे बरेच लहान मोठे ढीग पडलेले होते. माझे अर्धे लक्ष तिकडे बघण्यात, अर्धे लक्ष लाकडे शोधण्यात गुंतले होते. तसा मी माझ्या कामात बेखबरच होतो. कारण काकांचे ओझे तयार होतात तेवढ्या वेळात माझे ओझे तयार होते की नाही ह्या काळजीने मला कामही सुचत नव्हते. मी ठीक ठिकाणी ठेवलेले लाकडे गोळा करू लागलो. मी लाकडे उचलायला खाली वाकलो तेवढ्यात मला जरा लांबवरून मानसांच्या बोलण्याचा आवाज आला. मी इकडे तिकडे चोहीकडे बघितले. या जंगलात कोण माणूस आला असेल? अशा विचारात मी गुंतलो असतांना समोरून दोन माणसे माझ्याकडे येतांना दिसली. एकाची दाढी वाढलेली होती, मुसलमानासारखी, एका कानापासून दुसऱ्या कानापर्यंत दुसऱ्याची लांब केसांची रामोशा सारखी मिशी. एकाच्या हातात कागदाचा पुडा होता. 'अबे मुन्ना इधर आवो' त्याचा आवाज एखाद्या दरोडेखोरासारखा करडा होता. एकाच्या खांद्यावर

पांढऱ्या रंगाची लांबी चौडी थैली होती. त्यांचा तो अवतार बघूनच मी खूप घाबरून गेलो होतो. त्यांच्याशी काहीच न बोलता हातात जी दोन लाकडे उचलली होती तीच घेऊन मी गर्रकन मागे फिरलो काकांना सोडून आलो होतो त्या दिशेला जाऊ लागलो. ‘अरे ठहेर तेरेकु मिठाई देनेकी है ना, उधर कायको जा रहा है? इधर आ’, एक ओरडला. दरडावण्याच्या सुरात दुसरा जोराने ओरडला, ‘अरे रूक कहा भागा जा रहा है?’ आता मात्र मी खूप घाबरलो होतो. एका हातात जी दोन लाकडे होती ती फेकायचेही मला भान नव्हते. रस्ता सरळ नव्हता, काटेरी जाळ्या, वेलीतून वाट काढत मी पळू लागलो. पळतांना लगबगीत माझी चड्डी एका काटेरी जाळीत अडकली, ती तशीच ओढून मी पळत राहिलो. जाळीत अटकल्याने ती सरळ फाटली, मला त्याचेही भान नव्हते. जाळीत अडकल्याने चड्डी कमरेवरून खाली सरकली होती. एका हातात लाकडे दुसऱ्या हाताने चड्डी पकडून पळू लागलो. ते पाहून ते दोघेही माझ्यामागे पळू लागले. ‘अरे रूक, रूक कहा भागा जा रहा है। भागके कहा जायेगा?’ असे ओरडत तेही जोराने पळु लागले. त्यांची दरडावनी ऐकून मी जास्तच घाबरत होतो आणि अजून जोराने पळायचा प्रयत्न करत होतो. पळतांना ओ मांगुकाका, ओ रामसिंगकाका असे ओरडू लागलो. काका मला आवाज द्या, माझ्यामागे दोन माणसे लागले आहेत. असे जोर जोराने ओरडू लागलो. काटे, कुटे, वेली, फांद्या, दगड गोटे कशा कशाची पर्वा न करता मी ओरडत होतो. पळत होतो. माझे कान त्यांच्या आवाजाचा कानोसा घेत होते. डोळे समोर मोकळी वाट शोधत होते आणि एकाएक काय झाले मला कळालेच नाही पण मी धाडकन जमिनीवर कोसळलो. मला वाटले मला एखाद्या जाड लाकडाचीच ठोकर लागली असावी म्हणून मी खाली पडलो. लागलेली ठोकर खूप जोराची होती, त्यामुळे माझ्या पायाचा अंगठा आणि त्याच्या शेजारची दोन बोटे फुटून त्यातून रक्त वहात होते. मी तसाच उठलो आणि परत पळत सुटलो. एवढ्या वेळात माझा आवाज ऐकून तिन्ही काका माझ्याकडे लगबगीने येतांना दिसले. ‘काय रे गोइंद्या का बर ओरडतो आहे? तुझ्या पायाला काय लागले आहे? पायांच्या बोटातून रक्तही निघते आहे, काय झाले? मांगुकाका जवळ येत येत मला एका एक मागून एकसारखे सवाल करत होते. ‘काका

बघाना ते दोन माणसे माझ्यामागे लागले आहेत. मला दरडावून सांगत आहेत तुला खाऊ आणला आहे'. मी मांगुकाकाला हे सांगतच होतो तेवढ्यात 'अरे बचाओ कोई तो आके बचाव, उधर कोई है? अरे मेरे दादा, काका भगवानके लिये हमको बचाव' असे ओरडत होते. कोठून आवाज येतो आहे ते पाहिले तर ते दोघे जन उलट पावली पळत होते. मी त्यांना उलट पावली पळतांना पाहून तर अचंब्यातच पडलो. मीच विचारात पडलो की यांना काय झाले, परत फिरून पळत सुटले आहेत? तो पर्यंत दोन्ही काका आमच्या जवळ येऊन पोहचले होते. 'काय झाले मांगु भाऊ?हा का बर ओरडत होता'? त्यांनी मांगुकाकाला विचारले? 'तसे काही झाले नाही पण ते दोघे याच्या मागे लागले होते'. त्या दोघांकडे बोट दाखवून मांगुकाका म्हणाले .'अरे बापरे ते मानसे कदाचित पुलाच्या कामावरीलच असतील'.'माझी खात्री आहे ते तेथलेच माणसे असतील' राजारामकाकाही म्हणाले .'मी ऐकले आहे एवढ्या एक दोन दिवसातच पुलाचे काम सुरू होणार आहे. पुलासाठी खड्डे वगैरे खोदून झाले आहेत. बांधकामासाठीचे सिमेंट-बिमेंट, लोखंड, तारा सर्वसामान पण तयार आहे. पण काहीतरी अडचणीमुळे काम अटकून पडले आहे. पुलाखाली दडपण्यासाठी जीव मिळत नाहीय म्हणे. 'म्हणजे त्याच्या साठीच तर हे माणसे याच्या मागे लागले नसतील ना'? रामसिंगकाकानी शंका काढली? 'सोळा आणे बरोबर', मांगुकाका म्हणाले. 'अरे असतील नाही त्याच्या साठीच हे माणसे याच्या पाठीमागे धावत लागले होते. कारण साधी गोष्ट आहे. मजूर पडले परक्या भागाचे,त्यांचे एखादे मूल पकडले की, ते दिवस दोन दिवस शोधा-शोध करतील, रड बोंबल करतील,आणि पोटापाण्याला लागून जातील, मजुराच्या आरडा ओरडीकडे कंपनीच्या एवढ्या मोठ्या पसाऱ्यात कोण सूध घेईल? हा विचार त्यांनी केला असेल'. 'हेच खरे आहे' मांगूकाका खात्रीने म्हणाले. 'होना आपण ठरलो परक्या गावाचे, मुलगा नेतांना आपण त्यांना पाहिले नसते. कुठे गेला कुठे गेला असे दिवस दोन दिवस, आठवडे दोन आठवडे, महिने दोन महिने ओरडलो असतो, रडून रडून थकलो असतो, खाल्ला जंगली जनावराने असे म्हणून गप्प बसलो असतो. सर्व काही रफा दफा झाले असते. आपण परत आपल्या पोटापाण्याच्या नादात व्यापून गेलो असतो,

भाभी पण एका जबड्यातून सुटून दुसऱ्या संकटाच्या जबड्यात सापडली असती', 'पण असे झाले असते तर दख्खनमामीच काय पण आपण बी गावात तोंड दाखवायला लायक राहिलो नसतो', मांगुकाका तोंड ठोकत बोलत होते. 'अरे भाऊ मला तर निसत्या त्या विचारानेच सर्व अंगाला घाम आला आहे', रामसिंगकाका कपाळा वरचे घाम पुसत म्हणाले .'कितीही आरडा ओरड जरी आपण केली असती तरी कंपनीच्या एवढ्या मोठ्या पसाऱ्यात आपली कोणी पुकार ऐकली नसती'. त्या पळणाऱ्या दोघाकडे पहात राजारामकाका म्हणाले ' बहुतेक ते आपल्याला आलेले पाहूनच याचा पिछूछा सोडून पळून जात असतील'. सगळ्यांचे हात पाय गळून गेले होते. 'अरे, भगवान नेहमी सुद्याचा आणि भोळ्याचा असतो, खरे आहेना'? राजारामकाका म्हणाले . त्यांचे बोलणे संपत नाही तोच जोराचा फुस्स फुस्स असा आवाज कुठून तरी ऐकू आल्याचा त्यांना भास झाला. त्यांनी मांगूकाका आणि रामसिंगकाकांना विचारले 'तूम्हाला काही फुसफुसल्याचा आवाज आला का'? 'नहीरे भो,काही त नाही',पण ते एवढे बोलत नाही तोच परत जोराने खरखरण्याचा आवाज आला, 'काही तरी गजब असेल राजाराम भो', मांगूकाकांनी सुचवले आणि बारीक नजरेने  आवाज आला त्या दिसेने पाहिले. तेव्हा, रंगीबेरंगी ठिपके अंगावर असलेले लाकडा सारखे काहीतरी जोराने सपकन पुढे सरकत असलेले त्यांनी पाहिले, तर रामसिंगकाकांना त्यांच्या जवळच जोराचा फूसकारा ऐकू आला, 'काहीतरी गडबड आहे. सारेजन हुशारीत रहा काही तरी भयंकर प्राणी आपल्या जवळपासच असावा अशी मला भिती वाटते आहे', रामसिंगकाका म्हणाले. 'अरे गोइंद्या तू पडला कसा'? मांगुकाकाने विचारले? 'काका मला त्या लाकडाची ठोकर लागली'. असे म्हणत मी जिथे ठोकर लागली तिकडे बोटाचा इशारा केला.'कुठे आहे लाकूड'? राजारामकाकाने विचारले?' त्या तिकडे' मी परत इशारा केला. तेथे लाकूड तर काही नव्हते पण जे होते ते बघूनच आमच्या तोंडातून वाचाच गायब झाली.'पण काका हा लाकूड त्याचा त्याचा कसा सरकतो आहे पहा ना?' 'अरे तो लाकूड नाही रे','मग काका काय आहे तो?' 'अरे तो अजगर आहे.''तो खूप जाड आणि खूप लांब असतो तोच ना'? 'हा तोच, तुझी ठोकर त्याला लागली? 'हो काका देवाची

शपथ बघाना त्याची ठोकर मला किती जोराने लागली ती, माझ्या पायाच रक्तच वहायला लागले आहे.' ते ऐकून काका जोराने ओरडले 'अरे ओ मांगु भो जल्दी या इकडे'. त्यांची आरोळी ऐकून ते लगेच तिकडे आले. त्यांना राजाराम काकांनी जो तमासा दाखवला तो पाहून ते तर हबकूनच गेले. आता सांगा जो विचार आपल्या मनात येतो आहे. हाच विचार त्या माणसांनी पण केलाच असेल नाही मांगुभाऊ? रामसिंगकाका म्हणाले. 'म्हणूनच त्यांनी हिम्मत केली नाही, ही साधी गोष्ट आहे' मांगुकाका म्हणाले. आमचे बोलणे ऐकून झाडाच्या वाळलेल्या पानांची चरमर ऐकू आली, तसी सगळ्यांची नजर त्या आवाजाकडे गेली.तो अजस्र प्राणी जिकडून आमच्या बोलण्याचा आवाज येतो आहे त्या दिसेने पुढे सरकू लागला होता. 'अरे पळा, धावा, त्या काटेरी जाळीच्या आडून केवढ्या मोठ्या सापाने डोके वर काढले आहे.' राजारामकाकांनी त्या जाळीकडे बोट दाखवून सूचना केली.सगळ्यांच्या नजरा तिकडे वळाल्या, त्याने तोंडाची दिशा आमच्या कडे वळवली होती आणि सर्वांच्या तोंडून एका सुरात निघाले 'अरे पळा तो अजगर आहे'. मधेच राजारामकाका म्हणाले 'या अजगराला पाहूनच ते माणसे मागे फिरून जीव वाचवत पाठीला पाय लावत पळून गेले'. 'हो हेच खरे आहे' मांगुकाका म्हणाले . 'असेही असेल की आपल्याला येतांना त्यांनी पाहिले असेल म्हणून पळून गेले', राजारामकाकानी शंका काढली. 'जे असेल ते असेल पण पोराला सोडून ते पळून गेले हेच खरे आहे'. मांगुकाका म्हणाले. 'अरे ते गेले म्हसनखाईत, पहिले आपले जीव वाचवा त्याच्या पासुन, तो पहा आपल्याकडेच तोंड फिरवतो आहे'. ते बघून आम्ही सारे पळू लागलो. तो फुस्कारे सोडत आमच्या मागे सरपटत धावत होता. एवढे बेरड लोक याला पाहून पळून गेले तर याची काय बिशात होती'? राजारामकाका म्हणाले 'ते सोडा पण आता काय करायचे ते ठरवा, कारण हा आपला पिच्छा सोडणार नाही ही गोष्ट पक्की', मांगुकाका काळजी करत म्हणाले. 'आपण सर्व जन बरोबर राहून पळायचे नाही, रामसिंग भाऊ तू या पोराचा हात पकडून पळ, तो पळेल तेवढे पळेल, पुढे तू त्याला खांद्यावर घेऊन पळशील. आता तिघे तीन दिशांना निघा. तिघांच्या मागे लागायला तो तिन्ही दिशांना पळू शकणार नाही आणि एकाच वेळी तिघांचा

पाठलाग करणार नाही. तो ज्यावेळी एकाचा पिच्छा करेल त्यावेळी दुसऱ्याने त्याच्या अंगावर लाकडे, दगडे फेकून मारायचे म्हणजे तो पहिल्याचा पिच्छा सोडून दुसऱ्याच्या मागे लागेल, ज्यावेळी तो दुसऱ्याच्या मागे  लागेल तेव्हा तिसऱ्याने त्याच्या अंगावर लाकडे दगडे फेकायचे म्हणजे तो दुसऱ्याचा पिच्छा सोडून तियऱ्याच्या मागे लागेल', मांगुकाका सगळ्यांना समजावत होते.'तो चवताळून पिच्छा करेल, घाबरायचे नाही, हिमतीने पळत राहायचे, त्यांनी परत सूचना केली. 'अशा  प्रकारे चकवा देत देत आपण त्याच्या तावडीतून सुटका करून घेऊ'. पण कसले काय तो एवढा मोठा अजगर काटे-कुटे, जाळ्या-जुळ्यातुन सुध्दा पाण्यासारखा वाकडा-तिकडा सरपटत धावत होता. सगळयांची धावत-धावत दम छाक होऊ लागली. तेवढ्यात मांगूकाकांच्या डोक्यात एक खुबी आली. त्याने कुठे तरी लग्नात वाजंत्री वाजवायला गेले असतांना ती गोष्ट ऐकली होती. ती अशी की अजगराच्या समोर जो बी प्राणी येतो त्याला तो तोंड वासुन अख्खाच्या अख्खा सरळ गिळून जातो. प्राणी गिळल्या नंतर प्राणी गिळल्याने त्याच्या वजनाने सरपटतांना त्याच्या पोटाचे वाढलेले वजन त्याला खेचता येत नाही, म्हणून तो सर्व शरीर झाडाला गुंडाळून विळखा घालतो आणि तोंड आणि शेपटी कडुन शरीराला तान देतो त्यामुळे त्याचे विळखे आवळले जातात, पोटातल्या प्राण्याचा चुरा चुरा होई पर्यंत तो तान देत राहतो, जो पर्यंत पोटातल्या प्राण्याचा चुरा-चुरा होऊन जात नाही तो पर्यंत.. नंतर विळखा काढून तो तेथेच निपचित पडून राहतो. त्या शिकारीच्या रक्ताची त्याला धुंदी चढलेली असते. ही गोष्ट त्यांनी तिघांना पळता पळताच सांगितली. रामसिंगकाका चतुर माणूस होता. 'तू सांगितली त्या गोष्टीचा इशारा माझ्या लक्षात आला आहे, आता पळतांना एखाद्या जाड लाकडावर नजर ठेव, सर्व जण लक्षात ठेवा कोणालाही जाड लाकूड दिसला की मला इशारा करा, मग पुढचे पाहू'. त्यांनी आम्हाला सांगितले. आमचे पळणे चालूच होते. एकाएकी माझी नजर एका भल्या मोठ्या उदी लागलेल्या झाडाकडे गेली. उदी लागल्यामुळे ते खोडा पासुन वाळले होते. मी रामसिंगकाकांना इशारा करून झाडाकडे बोट दाखवून खुणावले. इशाऱ्याचा आवाज ऐकताच त्या अजगराने डोके उंच करून माझ्याकडे बघितले होते. 'मांगु भो चाल

ताबडतोब तिकडे'. असे खुणावून ते पळत–पळत आपले धोतर सोडत होते. 'तू हे काय करतो आहेस', त्याला धोतर सोडतांना पाहून मांगुकाकाने त्यांना विचारले. 'काही विचारू नकोस तू चाल फक्त माझ्याबरोबर' रामसिंगकाका म्हणाले. त्यांनी धावत धावतच मला खांद्यावरून उतरवले. तिकडून राजारामकाकाही धावून आले. मी बोटानेच सगळयांना ते वाळलेले झाड दाखवले. सर्वांनी समस्त ताकद लावून ते झाड खाली पाडले. अजगर सरपटत आमच्या मागेच त्या वाटेवर बिलकूल सरळ येईल अशा बेताने ते लाकूड आडवे टाकले, नंतर रामसिंकाकांनी ते कमरे वरून काढलेले धोतर त्या लाकडावर टाकून झाकून टाकले. जणू धोतर पांघरूणच एखादा माणूस झोपला असावा असा तो लाकूड दिसत होता. नंतर आम्ही धावत जाऊन एका दाट जाळीच्या आड लपलो. लाकडे दगडांचा मार खाऊन चवताळलेला अजगर जसा आला तसा जबडा वासुन धोतरा समत तो पूर्ण लाकूड गिळून गेला. रामसिंकाकांची योजना सफल झाली होती. सर्वांनी हळू आवाजात आपआपल्या टाळ्या वाजवल्या. आता आम्हाला धावायची गरज नव्हती. कारण अजगर धावू शकत नव्हता. झाले तसेच, लाकूड गिळल्या बरोबर तो सुस्त होऊन बराच वेळ तिथे तसाच पडून राहिला. नंतर तो सरपटू लागला पण तो पहिल्या सारख्या वेगाने धावू शकत नव्हता, एक तर त्याला मनसोक्त खाद्य मिळाले होते, पण बहुतेक त्यात रक्त नसल्याने त्याला त्याची नशा आली नव्हती. म्हणून तो लवकरच पुढच्या वाटेला लागला. जाता जाता तो डोके उंच करून इकडे तिकडे काही तरी शोधत होता.'तो जाड खोडाचे झाड शोधत असेल' मांगुकाका म्हणाले .'हो बरोबर आहे त्याच्या पोटात झाड गेले आहेना. पोट जड झाले असेल'. राजारामकाका म्हणाले. 'बघू तर खरी त्याची गंमत' रामसिंगकाका म्हणाले. आमच्या मागे धावण्याचा रस्ता बदलून त्याने दुसरा रस्ता बदलला. आम्ही लांबूनच त्याची गंमत पहात होतो आणि हळू हळू त्याच्या मागे मागे पावलांचा आवाज न करता चालत होतो. एका झाडा जवळ तो गेला आणि त्याच्या खोडावर वर वर सरकू लागला. नंतर शेपटी कडुन आणि डोक्याकडुन झाडाला शरीर गुंडाळू लागला. पूर्ण गुंडाळून झाल्यावर त्याने आपले तोंड आणि शेपटी खोडाला घट्ट चिटकवली आणि ते दोन्ही

विरूध्द बाजूला पुढे पुढे रेटत शरीराला ताण देऊ लागला. परत परत तो शरीरावरचा ताण वाढवत होता. शेवटी तो क्षण आला, त्याच्या विळख्याच्या ताणाने लाकुडतर वाकलाही नाही आणि तुटला तर नाहीच पण त्यातल्या लाकडाचा चेंदामेंदा होण्याऐवजी त्या अजगराचेच पोट फाडून ते बाहेर आले आणि दणकन जमिनीवर आदळले. जवळजवळ अर्ध्या तासाने अजगराच्या शेपटी आपटणे व तोंड आपटणे हळूहळू थांबले आणि नंतर तो पूर्णपणे कायमचाच शांत झाला. भीत भितच आम्ही एक एक पाऊल पुढे पुढे टाकत त्याच्या जवळ जाऊ लागलो. लांबूनच आधी दगड मारून, मग काडी टोचून तो मेला की जिवंत आहे याची खात्री करत त्याच्या जवळ पोहोचलो. रामसिंगकाकाने त्याला हळूच धक्का लावला पण तो जागचा हालला नाही. मग जो तो त्याला थोपटून जागवण्याचा प्रयत्न करू लागला. शेवटी तो मेला याची सर्वांना खात्री झाली. मी माझी गोळा केलेली लाकडे उचलून आणली, तिन्ही काकांनीही त्यांची लाकडे उचलून आणली. अंधार पडला तरी आम्ही परत न आल्याने आई काळजी करत होती. त्यामुळे त्यांनी इकडे तिकडे धावाधाव सुरू करून दिली होती. अप्पा मला शोधायला जंगलाकडे निघाला होता. आई त्याला सांगत होती, ‘एवढ्या मोठ्या जंगलात ते नेमके कोणत्या दिशेला गेले हेच माहीत नाही तर तू कुठे फिरशील येड्यावानी. तसाही तो एकटा थोडीच आहे चार-पाच जण आहेत ते. या अंधारात तू एकटा जाऊन कुठे जीव संकटात टाकतो?’ आईने त्याला समजावले. तू वेडेपणा करू नकोस. जंगलात साप, डेडोर, जंगली जनावरे असतात. राहू दे तू नको जाऊ. येऊ दे त्यांना येतील तेव्हा येतील. तेवढ्यात आम्हाला लांबून येतांना आईने पाहिले. ‘घे आलेच तेही’. फटक्यात आम्ही आल्याची बातमी वाऱ्यासारखी पसरली. आम्ही झोपडीवर पोहचत नाही त्याच्या आधीच रस्त्यात लागणाऱ्या प्रत्येक झोपडीतून एकच प्रश्न इतका उशीर का झाला? थकलेले असल्यामुळे मांगुकाका खोल आवाजात म्हणाले ‘काही विचारू नका, एक म्हणता एकच सांगता येणार नाही आणि तुम्ही ते ऐकूही शकणार नाहीत. खरी कमाल या पोराची आहे. ‘म्हणजे? अस काय झाले भो’? ‘मांगुभाऊ नेमके काय झाले? सांग रे गोइंद्या! जंगलात काय झाले ते, अजिबात घाबरू नको’. मांगुकाका

मला धीर देत म्हणाले. मग मी आधी त्या दोन माणसांची घटना सांगितली. 'आईमरी खाय त्यांना, का बर माझ्या पोराच्या मागे लागले होते ते? तुम्ही त्या भडव्यांना पकडून चांगला पाणी पाजायला पाहिजे होते ना'? आई तिन्ही काकांकडे पाहून म्हणाली. 'नाही ना भाभीजी तेवढी वेळच आली नाहीना. कारण त्यांना भिऊन हा आमच्याकडे पळत येत होता, पण मधेच ठोकर लागून पडला. याला ज्याची ठोकर लागली ती वस्तू काही दगड, गोटा किंवा लाकूड फाटा नव्हता तो एक भला मोठा अजगर होता. हा पुढे पाहून पळत होता ना खाली काय आहे हे पहायची त्याला कुठे सवड होती ? त्यामुळे याच्या पायाची त्या अजगराला जोराची ठोकर लागली. इतक्या जोराने की अंगठ्या समत त्याच्या पायाचेदोन तीन बोटे फुटून रक्त भंबाळ झाले होते', मांगुकाका म्हणाले.'काय? काय? परत सांगा काय झाले ते. आईने तोंडात बोट घालून विचारले. 'हो खरच सांगतो मामी, तो एक भला मोठा अजगर होता. त्या अजगराला पाहून याच्या पायाची जखम पहायची आम्हाला सवडच मिळाली नाही, कारण याची ठोकर त्याला इतकी जोराची लागली होती की त्याच्याने तो खुब चवताळून गेला होता, त्या अजगराचा तो अवतार पाहून याच्या मागे लागलेले ते दोनही जन तोंड फिरवून पाठीला पाय लावतच पळून गेले. तो पर्यंत याच्या आरोळया ऐकून आम्हीही याच्या जवळ येऊन पोहोचलो होतो. आल्यावर तो समोरचा देखावा पाहून आमचे तर सात गेले आणि पाचच राहिले होते. पुरती घाबरगुंडी उडाली. इतकीशी वेळ वायबार न घालवता आम्ही चौघे जन वेगवेगळया दिशेला पळू लागलो. मंग मी ऐकले होते की अजगराला जे समोर दिसते त्याला जोराच्या सवासाच्या ताकतीने खेचून आख्खाच्या अख्खा गिळून घेतो. मंग एक जाडा लाकूड पाहून त्याला रामसिंगभाऊच्या धोतराने झाकुन त्याच्यापुढे आडा टाकला, आमच्या मागे लागलेल्या आजगराने ते पाहिले, त्याला वाटले पांढऱ्या कपड्यात माणूसच झोपला आहे. त्याने सपकन त्याला पोटात खेचले आणि त्याचे काम तमाम झाले. असा हा आमचा जंगलातला रामायणाचा नाटक झाला. याचा बाप रामायणाच्या नाटकात मारोतीचे काम करायचा आज बेट्याने या एवढया मोठ्या नाटकात मारोतीचे काम केल्यामुळे हे नाटक वठले'. एवढे सांगून मांगुकाका शांत झाले. आजु बाजूच्या

झोपड्यामधून आम्हाला पहायला आलेली सर्व मंडळी एकदम पुतळ्यासारखी शांत होऊन हे सर्व ऐकत होती. बराच वेळ गेला पण कोनाच्याच तोंडातून आवाज निघाला नाही. त्यांच्या जिंदगानीत त्यांनी असे कधी पाहिले नव्हते पण अजगराची शिकार कशी करावी ही गोष्ट मात्र शिकले. अचानक आई भानावर आली आणि तिने कपाळावर आलेला घाम पदराने पुसला. तिचे सारे अंग घामाघूम झाले होते. मला ओढून तिने जवळ घेतले आणि पोटाशी घट्ट पकडून आवळून घेतले, पटापट मुके घेऊ लागली, तिच्या डोळयातून आसवांच्या धारा वाहू लागल्या, पण तिच्या तोंडातून शब्दही बाहेर येत नव्हते. काहीच न बोलता ती एखाद्या तहानलेल्या हरणी सारखी माझे पटापट मुके घेत होती. डोळ्यातून आसवांच्या धारांना खंड पडत नव्हता, जमलेले लोक आपापसात कुजबुज करू लागले होते. नंतर ती भांबावून म्हणाली 'मांगुभाऊजी मी मुलांना घेऊन सकाळीच गावाला निघून जाते, नको हा पैसा आणि नको हा काम. गावाची माती मानत नाही. कोणी जवळ केले नाही तर, गावची माती कमीत कमी टाकून तरी देत नाही. मेल्यावर ती कमीत कमी साडेतीन हात जागा तरी करून देते. या पैशापायी मी आज या सोन्यासारख्या बाळाला कायमची पारखी झाली असती. गावात मला भाऊबंदांनी तोंड काढू दिले नसते. पोराचे काहीतरी काळबेरे करून आली असे म्हटले असते, अप्पा रात्रीच आपले सामानाची बांधाबांध कर. या देव माणसांना तरी किती काळजीत टाकायचे? भाऊजी तुमच्या शहाण्या हाताने आम्हाला गावाकडच्या गाडीवर बसवून द्या हो भाऊजी.' आई काकुळतीला येऊन म्हणाली. आई मला मांडीवर घेऊन रडू लागली. 'दख्खनमामी गावाकडे जायचा असा एकाएकी विचार करू नका, उद्या आपण ठेकेदाराकडे जाऊन ही सर्व घटना सांगू. हप्ता भरायलाही अजून काही दिवस बाकी आहेत. हप्त्याची पुरी मजुरी घ्या, मग आपून पुढचा विचार करू. मी तुम्हाला मग सवता गावाकडच्या गाडीत बसवून देईन', मांगुकाका म्हणाले 'नई-नई भाऊजी, मला ही भूमीच लहनी नई झाली. एक म्हणता एकदा नही, माझ्यावरच आता पावत दोनदा असे संकट येऊन गेले आहेत. आज नाही म्हणता, तुम्ही होते म्हणून माझा मुलगा वाचला. तसा तर तो रोज कपडे धुवायला नदीवरच जातो आणि तिकडच्या तिकडेच जंगलात जाऊन लाकडेही

गोळा करून आणतो. पण आज पासुन त्याच्या जिवाला धोका उत्पन्न झाला आहे, आज तुम्ही होते म्हणून तुमच्या हिमतीवर त्याने त्या बदमाशांना ठेंगा दाखवून पळ काढला.पळतांना तो तुम्हा तिघांना आवाज देत पळत होता, त्यामुळे त्या बदमाशांना याच्या मागे बरेच लोक आहेत याची खात्री झाली, म्हणून पण ते परत गेले असतील, ते जंगली लोक, त्यांना अशा कामाच्या अनेक खुब्या माहीत असतात. मी एकली बाई याला कुठे-कुठे शोधत फिरली असती? नई भाऊजी, मनभी साथ देत नाहीत. आता मला हे ठिकाण सोडावेच लागेल, कारण ते बदमाश आता सोळा आणे याचा पिच्छाच पकडतील, अशी माझी मनोदेवता म्हणते आहे. त्या बदमाशांना सोळा आणे खात्री झाली असेल की हो ना हो तो मजुरवस्ती वरचाच मुलगा आहे. तो आज ना उद्या लाकडे घ्यायला जंगलात येणारच. कारण  लाकडेही सर्वांचीच रोजची गरज आहे'. आई सर्वांकडे तोंड करून हे सांगत होती.'भाबीजी जरा सबुरीने घ्या बर. एक आई म्हणून तुमची इतकी चिंता करणे सोळा आणे बरोबर आहे.पण चालू हप्ता तर सरू द्या.ठेकेदाराला ही सारी घटना कळू द्या. तो काय म्हणतो,  कंपनी काय सांगते हे सर्व बघू मग आपण सर्व जण परत एकदा बसू आणि यावर विचार करू'. राजाराम काका समजावण्याच्या सुरात म्हणाला. 'हो ताई, भोवती जमलेले आजु बाजूचे लोक आईला म्हणाले. 'सर्वांच्या मनात देव बसो', आई म्हणाली. आई हो म्हणताच जमलेल्या मंडळीतून एक सज्जन म्हणाले, 'मांगुभाऊ आपण सर्व जण मिळून आता एक काम करू. आजचा जो प्रसंग आहे तो साऱ्या मजुरांना काळजी करायला लावणारा आहे. आजचा प्रसंग या बिचाऱ्या गरीब माउलीवर आहे. उद्याचा काय भरोसा तो कोनावर उठेल'? 'अगदी बरोबर भाऊ', सर्व जण एक मुखाने म्हणाले. 'पण मग आपण आता काय करावे'? एकाने विचारले? 'सर्व जण ध्यान देऊन ऐका. एक ते देढ पुरुष लांबीच्या दांड्या एक एकाने एक-एक घ्यायची. त्या घ्यायला आता या वेळी जंगलात जायची गरज नाही. आप आपल्या झोपडीच्याच काढा. तसेच एक एक दोरखंड बी बरोबर घ्या. तीन चार भेंडोळे लावून घेऊन, आत्ताच्या आता जंगलात जाऊन तो अजगर वस्तीवर घेऊन येऊ. मग काय करायच ते उद्या ठरवू. आपण त्याला अशा ठिकाणी ठेवू की तो तिथून मजूर,

ठेकेदार, मालक सर्वांना दिसेल'. सर्वानुमते ते पक्के ठरले. जो तो झोपडीकडे वळला आणि अर्ध्या घंट्यानंतर जवळ-जवळ दीड दोन खंडी मंडळी जमा झाली आणि सर्व मिळून जंगलाच्या वाटेला लागले. ती मंडळी परत आली तेव्हा आभाळातला चोरखाटला डोक्यावर आला होता. त्यांना जायला वेळ नाही लागला, पण परत येतांना अजगराला आणता-आणता त्यांची नानी खडक देवळ्याला गेली होती. कोणी कंबर दुखवत होता तर कोनाचा पायच मुरगळला होता, कोणाचे खांदे दुखत होते. तर कोणाची छाती भरून आली होती. वस्तीवरची मंडळीही, कोणी आरामात नव्हती,ती संखेत जास्त नव्हती, पण खूब गंमत खोर होती.अजगर आणायला गेलेल्या एक एकाची ज्याला त्याच्या बाबत जे माहीत होते त्या शैलीत त्याची स्तुती कमी पण मस्करीच जास्त करीत रात्र जागून काढत होते.जंगलातले ते ठिकाण वस्ती पासुन जवळ-जवळ दोन ते अडीच कोसावर होते.मला आणि अप्पाला त्या लोकांनी त्यांच्या बरोबर जंगलात येऊ दिले नाही. कारण वेळ रात्रीची होती आणि तिथे जाऊन आम्ही काय करणार होतो? जंगलात पोहोचल्यावर ज्यावेळी सर्वांनी अजगरावरून नजर फिरवली तेव्हा 'अरे बापरे एवढा भयानक जनावर'! सगळ्यांच्या तोंडातून धक्का दायक  एकच शब्द बाहेर पडले.तरी तो मेलेला निर्जीव होता. मेल्यामुळे त्याचे शरीर आकसून गेले होते, जिवंत साप ज्यावेळी सरपटत चालतो त्यावेळी तो त्याच्या नेहमीच्या लांबी पेक्षा कमीत कमी सव्वापट लांब होतो. सर्वांनी मिळून आधी त्याला सरळ केले, एकेका हाताच्या अंतराने अजगराखाली दोरखंड व दांड्या टाकण्यात आले. असे आठ दोरखंड लागले, नंतर त्याच्या दोन्ही बाजूंनी दोन-दोन दांड्या सरळ लांब-लांब टाकून दोरखंडाने त्या दांड्या बांधण्यात आल्या. प्रत्येक बाजूला टाकलेल्या दोन-दोन दांड्याच्यामध्ये एक-एका माणसाला उभे करून एक एकाच्या खांद्यावर एक-एक अशा दोन्ही दांड्या ठेवण्यात आल्या. अजगर इतका जड होता की सोळा लोकांनाही त्याचे वजन पेलणे कठीण जात होते. त्यांना धाप लागत होती. त्यांच्यातला कोणी थकला तर त्यांच्या बरोबर रिकाम्या चालणाऱ्या लोकातून एक त्याची सुटका करत होता.

म्हणता म्हणता शेवटी ते धुड वस्तीवर पोहोचवले. हळ-हळू ही

खबर पूर्ण वस्तीत पसरली.आधीची मंडळी जमलीच होती त्यात अजून भर होऊ लागली. त्यामुळे झोपडी समोर लोकांची खूप गर्दी जमली. आणलेला अजगर झोपडी समोर टाकताच लोकांची झुंबड उडाली. कोणी लातांनी अजगराला हलवत होते, तर कोणी हातांनी चाचपडून पहात होते. एवढा मोठा अजगर त्यांनी जन्मात पाहिला नव्हता'मी तर एवढा साप कधीच पाहिला नाही, पाहिला नाही काय राव पाहणारही नाही' अशी चर्चा चालू झाली होती. रात्र थोडीच शिल्लक राहिली असल्याने गर्दी हळू-हळू कमी झाली. सकाळी-सकाळी थोडी पाठ टाकायला मिळाली. आम्ही सकाळची कामे आवरत असतानाच मजूर वस्तीचा नायक येऊन ठेपला. त्याच्या कानावर रात्रीच ही बातमी पोहोचली होती. 'माताजी नमस्ते', त्याने आल्या-आल्या आईला नमस्कार केला. ये सब क्या माजरा है माजी ? ये कैसे हुआ? किनके साथ हुआ? वे सब कुशल तो है ना'? त्याने एका मागून एक प्रश्न आईला केले.'बाबुजी मेरा छोटा बेटा और तीन लोक थे वो'. आई म्हणाली. 'पण वो कैसा हुआ ये मेरेकु मालुम नही. वेच सब लोक तुमकु आके बतायेंगे'. आईने त्याला एका लाइनीत उत्तर दिले.त्याला ती टाळायचा प्रयत्न करत होती.'ये अजगर यहा कैसे लाया'? त्याने तरी पुढचा प्रश्न केला.आणि हलक्या हाताने अजगराला उचलण्याचा प्रयत्न केला पण अजगर तर काही उचलला गेला नाही तोच त्या अजगरावर तोंडावर जाऊन पडला. 'या आल्ला ये तो बहोतही भारी है. दस-पाच से तो कामही नही बननेवाला'. त्याला थोडे खजील झाल्या सारखे वाटले, म्हणून  त्याने आजूबाजूला पाहिले पण त्याच्याकडे कुणाचे लक्ष नव्हते, म्हणून  त्याला हायसे वाटले असेल. आजूबाजूचे सर्व मजूर उशिरा पर्यंत जागले होते आणि आपापले कामे आवरून त्यांना कामावर जायची घाई होती म्हणून त्याच्या कडे कुणाचे लक्ष नाही गेले. नंतर तो नायक आला तसा हळ-हळू निघून गेला. हळू-हळू मजूर लोकही झोपड्या सोडून आप-आपल्या कामावर जाण्यासाठी एकेक करून रस्त्याला लागू लागले. अप्पा आणि आईही आपल्या कामावर जाण्यासाठी झोपडी बाहेर पडले. मी रोजचे ठरलेले काम आवरण्यासाठी झोपडीवरच थांबलो. इकडे कामावर हजर झाल्यावर अप्पा आणि आई कामाला सुरुवात करण्याच्या तयारीतच होते,

तेवढ्यात समोरून मांगुकाकांना येतांना आईने पाहिले. तसी ती मनोमन थोडी चलबिचल झाली कारण कालच्या प्रसंगामुळे तिचा येणाऱ्या प्रत्येक झनावरचा विश्वासच उडाला होता. त्यामुळे मांगुकाकाला पाहिल्या बरोबर ती तोंडाने देवनाम घेऊ लागली आणि पटकन म्हणाली 'भाऊजी काय झाले? तुम्ही इतक्या लवकर आणि इतके झटपट इकडे का आलेत' तिने कापऱ्या आवाजात विचारले.' काही विपरीत तर घडले नाही ना'? 'काही नाही दख्खनमामी काही काळजी करू नका, सारे काही ठीक आहे. कालचा प्रसंग ठेकेदाराला सांगण्यासाठी मी आलो आहे, कारण बारकुला प्रसंगाची नीट माहिती नाही. तुम्ही बाई माणूस तुम्हांलाही त्याची नीट माहिती नाही म्हणून मीच सवता ती सांगायला आलो आहे.आमच्या ठेकेदाराला रामसिंग भो आणि राजाराम भो सांगणार आहेत'. हा हा म्हणता-म्हणता रात्री जेवढी जनता जमली होती त्या सर्वांनी आपल्या-आपल्या ठेकेदारांना ही घटना सांगून टाकली आहे. मग काय सारे ठेकेदार आणि त्यांना ज्यांनी सांगितले ते सारे मजूर लोकांचा तो सर्व जमावच झोपडीकडे जायला निघाले आहेत. जसे मांगुकाकाने ठेकेदाराला ही माहिती सांगितली तसा ठेकेदाराने एकदम सर्व काम बंद करून आई आणि अप्पाला घेऊन तो झोपडीवर आला. तिथे आधीच खूब गर्दी झाली होती.एका बाजाराच्या ठिकाणी व्हावा तसा गोंगाट तिथे चालू होता. सारे ठेकेदार एका बाजूला बसले होते.त्यांच्यात काहीतरी खुसपुस झाली. नंतर त्याच्यातून एकजन उभा राहून म्हणाला. 'हाँ भई ये क्या है? कैसी घटना घटी ये जरा खडे होकर हमको विस्तारसे बताओ'. रामसिंगकाकांनी व राजारामकाकांनी मांगुकाकांना उभे करून ती सारी घटना सांगायला सांगितली. मांगुकाका बोलायला उभा राहिला. नंतर मला बोलवून त्यांच्या समोर उभे केले. 'साबजी ये वो बच्चा है जिसके उप्पर भोत बडी आफत आनेवाली थी।' असे सांगून मांगुकाकांनी तिथे जे घडले ते सारे खुलासेवार आणि समोर डोळ्यादेखत घडत आहे, जसे काही डोळ्यांनीच पहात आहेत असे सांगितले. ते ऐकून सारे ऐकणारे थंडगार झाले. ठेकेदारांपैकी एकजण म्हणाला,' बेचारे मजदुरोके साथ इतनी बडी मक्कारी? ऐसेही चलता रहा तो यहा कामपर एकभी मजदूर नाही रूकेगा और दुसरा कोई भी यहा काम करने नही आयेंगे. फिर ये काम कैसा चलेगा? ये तो बहुत बडा

बखेडा खडा करने वाली बात हो गई'. लगेच दुसरा म्हणाला 'वाकई ये बहुत गंभीर मामला है. ये बात तो पिस्तुलबाबुजीको बतानी बहुत अनिवार्य हो गई है। अगर नही बताई तो वे हमारेही बारा बजा देंगे। कहेंगे इतना बडा वाकिया हो गया, मजदूरोने उनकी समस्या तूमको बताई, पर तुम लोगोने मुझे बताना भी उचित नही समझा? इतना बडा हादसा हो जानेके बावजुद तुम बेफिक्र होकर कैसे बैठे रहे? 'अब जो होना है अलबत्ता अभी होना जरुरी है, हममेसे किसी एक को उनसे मिलकर ये बताना जरुरी है', तिसरा बोलला. इतक्या मजुरांपैकी एकजण म्हणाला 'बाबुजी ये तो हमारे बालबच्चोंके जानको खतरे वाली बात है. ये सब सुनकर यहा कामकरते रहने की हमारी हिम्मतही खतम हो गई है. हमने सुना है इससे पहले भी एक बच्चा यहासे गायब हुआ है, मगर शेर खा गया ऐसी बात बनाकर मामला रफादफा हो गया. मा बाप भी वैसाही मानकर चुप हो गये. क्या पता उस बार भी ऐसाही हुया होगा'?'हा बाबुजी इस बातको तो अब नकारा नही जा सकता. अब तो बालबच्चे वाले यहा एक दिनभी नही रूक सकेंगे। दुसऱ्या एकाने हे कडक भाषेत सांगून टाकले.'अरे भई तुम बच्चोकीच बात क्युं कर रहे हो? ऐसे बदमाशोको अगर सुने घने जंगलमे एक्का-दुक्का आदमी मिल जाये तो वे उसको भी उठा ले जायेंगे उनका तो कुछ भरोसा नही'.'ये बी बात सोला आना सच है बाबुजी' राजारामकाका म्हणाले .'बरोबर है बरोबर है' 'साऱ्या गर्दीतून एकच आवाज आला. 'अरे नही-नही इतना घबरानेकी कोई बात नही है' ठेकेदारा पैकी दोघा-चौघांनी एका आवाजात सगळ्यांना समजावले. 'तुम सबके जानकी हमे और कंपनीको बहोत फिकर है. क्योंकी आप लोग है तो हम सब है और हम सब है तो पिस्तुलबाबुजी और ये कंपनी है, वरना वे भी पिस्तुलबाबु नही रहेंगे. वे हमारे जैसेही किसी कामपर ठेकेदारी करते रहेंगे' दोघा-चौघांनी सगळ्यांना समजावले. 'हमे जरूर जल्दसे जल्द हलचल करनी है' ते समजावण्याच्या सुरात बोलले. तेवढ्यात मांगुकाकाने बोलायला सुरुवात केली,' ये तो एकच बात हुई बाबुजी, अब दुसरी बात सुनो', असे म्हणत मला अजगराची ठोकर लागल्या पासुन तर तो अजगर मारून येथे आणून टाके पर्यंतची सारी गोष्ट सांगितली. त्यांचे बोलने संपताच लोकांनी टाळ्या वाजवत वाहवा-वाहवा असे म्हणून कौतुक

केले. 'वा रे वा  शेरदिल इंसानो। जहाँ तुम जैसे शेरदिल इंसान हो वहा तो डरनेकी कोई बातही नही। तुम सब बधाईके पात्र हो। इतनी भयंकर मुसीबतमे ऐसे हिम्मतसे काम लेना कोई तुमसेही सिखे। तुम कोई किसीसे कम नही है। और ए छोटा मुन्ना तो सबसे बहादूर और चालाख भी बहुत है। अगर वो उन बदमाशोको चकमा देकर भागता ना रहा  होता तो ना ये अजगर मरता  और शायद वो मून्ना भी बस्तीपर फिरसे ना लौटा होता। बहुत खूब मुन्ने, तेरी तो जितनी भी तारीफ की जाए शायद कमही पडेगी। और आप सब लोग कोई फिकर ना करो। यह पुरी खबर पिस्तुलबाबुजी तक जरूर पहूंच जायेगी। हमारेमेसे एक ठेकेदार उनके पास जाकर यह पुरी वारदात उनको विस्तारसे बताई जायेगी, आप सबके असुरक्षीताकी भावनासे उनको अवगत कराया जायेगा। देखते है उनसे इसपर आगे के लिये क्या सूचना या हुकम मिलता है'. एवढे आश्वासन देऊन ते सर्वजन जायला निघाले. जमलेले सारे लोकही उठून आप-आपल्या कामाच्या ठिकाणी जायला रस्त्याने लागले. जाणाऱ्या प्रत्येकाच्या तोंडी आमच्या धाडसाच्या कौतुकाचीच चर्चा चालू होती.आलेला पुढचा एक दिवस शांततेत गेला. तिसऱ्या दिवसी मजूर लोक आप-आपल्या ठेक्यावर येऊन कामाला सुरुवात करण्याच्या तयारीतच होते. तोच लांबून दोन तीन लोकांच्या घोळक्यात एकाच्या डोक्यावर छत्री धरलेली व्यक्ती येत होती. घोळका जवळ आला तसा 'अरे अपने-अपने औजार उठाओ और अपना काम शुरू करो जल्दी'. जो तो ठेकेदार मजुरांना सांगू लागला, तेवढ्यात त्या घोळक्यातून एक जन लगबगीने धावत येत ठेकेदारांना उद्देशून जोराने ओरडला' किसीको कामपे मत भेजो, सबको रोके रखो। कोई काम शुरू ना करे। सबके सब ठेकेदार और मजदूर उधर उस पेडके निचे इकठ्ठा हो जाओ' एवढे बोलून तो तेथेच थांबला आणि मागून येणाऱ्या घोळक्याची वाट पाहु लागला. त्याने ओरडून जे सांगितले ते साऱ्या मजुरांनी आणि ठेकेदारांनी ऐकले होते, त्यामुळे कोणी कुणाला काहीच न सांगता किंवा चौकशी करता आपल्या खांद्या, डोक्यावरील अवजारे ठिकाणावर ठेवून, त्याने सुचवलेल्या झाडाची वाट धरली. सारे मजूर आणि ठेकेदार लगबगीने झाडाखाली जायचा प्रयत्न करू लागले.हप्त्याचा कामाचा शेवटचा दिवस होता. त्यामुळे मी ही आई आणि

अप्पाबरोबरच कामाच्या ठिकाणी आलेलो होतो. कारण मागच्या घटनेमुळे आई अप्पा मला एकट्याला झोपडीवर मागे सोडून जायला भिऊ लागले होते. झाडाचा पसारा बराच चौडा होता. जंगलातले जंगली झाड असल्याने त्याच्या वाढण्याला काही मर्यादा नव्हती. जसजसे मजूर येऊ लागले तसतसे ते घोळक्या घोळक्याने उभे राहू लागले. येणाऱ्या घोळक्यातल्या ज्याच्या डोक्यावर छत्री घरलेली होती ती व्यक्ती पिसतुलबाबुजीच आहेत हे मी आणि अप्पाने लगेच ओळखले.ते अदबीने झाडा खाली आले तसे मी गर्दीतुन वाट काढत पुढे जाऊन म्हणालो, ‘नमस्ते साबजी’ ‘अरे नमस्ते-नमस्ते छोटे मुन्ने तू ऊन माताजीका छोटा बेटाही है ना. जिनके पैरको पत्थर लगकर जख्म हुई थी? अब कैसी है उनकी तबियत’? त्याने आईची चौकशी केली. इतक्या मजुरातून माझे हिम्मत करून बेधडक पुढे येऊन मान देने बाबुजींना आवडले. नंतर ठेकेदाराकडे वळून ते म्हणाले ‘सब लोगोको सामने बैठाओ. हमारे लिए उनके सामने खडे रहने के लिए जगह करो’. सारे ठेकेदार व्यवस्था करू लागले. बाबुजी झाडाखाली एका कोपऱ्याला उभे होते. त्यांच्या मागे थोड्या अंतरावर एक बरीच खोल कपारी असलेला दगड होता. चालून आल्याने बाबुजी जरा थकले होते. इकडची व्यवस्था होईपर्यंत थोडा थकवा काढण्यासाठी ते त्या दगडावर जाऊन बसले. पाय दुखत असल्याने ते पाय लांबवुनच बसले होते. जवळ-जवळ चार पाचशे मजूर त्या झाडाखाली दाटी-वाटी करून बसले होते. व्यवस्था करण्यात बराच वेळ गेला. शेवटी एक ठेकेदार येऊन म्हणाला ‘चलिये सर’. बाबुजी जागेवरून उठून म्हणाले ‘हो गया? अच्छा चलो’ असे म्हणून ते उठले आणि साऱ्या मजुरांसमोर येऊन उभे राहिले. साऱ्यांना उद्‌देशून ते म्हणाले, ‘मुझे बताया गया है की दो दिन पहले यहा बहोत बडे-बडे हादसे हो गये? उसके बारेमे मै विस्तारसे सुनना चाहता हु। आपमेसे जिसको पुरी मालुमात है वो आपने जगहपर खडे रहकर बगैर किसी डरके मुझे और सबको खुलकर बताओ, कूछ छूपाना नही’. ठेकेदारांपैकी ज्याने खुद जाऊन ही माहिती बाबुजींना दिली होती तो पुढे येऊन म्हणाला, ‘मैने सर को थोडीसी झलक बतादी है फिरभी कुछ इधर-उधर हो गया होगा इसलिये, जो उस हादसेके शिकार है, उनमेसे एक सामने आकर फीरसे सबको बताओगे, क्योंकी

ये बहुत गंभीर मामला है. इसलिए उसे तुमसे सुनने के लिए वे खुद यहा आए है'. एवढे बोलून तो खाली बसला. त्याने जाता-जाता मांगुकाकांकडे इशारा केला. मी पिस्तुलजिंना नमस्ते केल्या पासुन मी त्यांच्या घोळक्यातच होतो. पिस्तुलबाबु व माझ्यात थोडे अंतर होते. ज्या रिकाम्या जागेत उभा राहून तो ठेकेदार बोलत होता, तो ती जागा सोडून बाजूला गेल्यामुळे पिस्तुलबाबुंना मी पाहू शकत होतो. मी सहज त्यांच्याकडे नजर टाकली, सर्रकन माझी नजर त्यांच्या पायाकडे गेली. त्यांनी कमरेला सुटबुट घालून पायात पायमोजे घातले होते. त्यांच्या पायातील मोजावर माझी नजर गेली, त्याच्यावर लांब-लांब डोके असलेले काहीतरी वळवळ करत होते. तो जवळ-जवळ बिल्लास एवढाच लांब होता. मी पळत पळत त्यांच्या पाया जवळ येऊन म्हणालो 'बाबुजी-बाबुजी तुम्हारे पावपर ये क्या है'. मी त्या सापाकडे इशारा करून त्यांना दाखवले. त्यांनी खाली वाकून तिकडे पाहिले आणि एकदम ओरडले 'अरे तू दूर भाग', मी लगेच दूर पळालो. त्यांनी पायाला जोराचा झटका देऊन त्याला दूर उधळून फेकला. ठेकेदारांनी ही ते पाहिले, 'सरजी ये तो बहुत जहरीला साप है, इसको एक लहरी साप कहते है'. 'हा मै भी पहचानता हू. ऐसे जंगलमे यह अक्सर पाये जाते है'. बाबूजीने जसा पायाच्या झटक्याने त्याला उधळला होता, तसा तो बाबुजींच्या नोकराच्या छत्रीवर जाऊन पडला होता. साप त्या वेळेपर्यंत सावध झाला होता.त्याने तिथून जी उडी मारली ती परत बाबूजींकडे. पण यावेळे पर्यंत सर्व जण सापा पासुन सावध झाले होते. सापाने कोणत्या दिशेला झेप घेतली त्याकडे सर्वांचे लक्ष होते.त्यामुळे बाबुजीही सावध झाले होते. जसा तो बाबुजीकडेच जातांना दिसला, तसे बाबुजींनी जागा बदलुन दोन पावले लांब मागे सरकून गेले आणि त्यांच्या अंगावर येणारा साप जमिनीवर पडला. जसा तो साप जमिनीवर पडला, त्या बरोबर बाबुजींनी त्याला बुटाखाली दाबला आणि त्याचा ठेसा केला. जेव्हा त्यांची खात्री झाली की सापाचा पुरा चेंदामेंदा झाला आहे. तेव्हाच त्यांनी सापावरचा पाय बाजूला काढला. नंतर ते माझ्या जवळ आले आणि पटकन माझा मुका घेतला आणि म्हणाला 'मुन्ने तेरी ये बारी मेरेपे उधार रही, तुने मेरी जान बचाली.अच्छा ये बता माताजी किधर है'? त्याने मला विचारले, आईही लांबून हे सारे काही पाहातच

होती.'वो उधरकु बैठी है साबजी'. मी बोटाचा इशारा आईकडे करून सांगितले.'अरे मेरे बाप अब तो साबजी बोलना छोड'.माझ्या गालाचा बुथडा खुडत तो लाडाने म्हणाला. आजु बाजूचे सारे लोक हा प्रेमाचा खेळ पाहून एकदम हसू लागले. 'देखो ना भाई आप लोग तो इसको समझावो.ये मानताही नही'. असे म्हणून बाबुजीही हसू लागले.नंतर तो आई जवळ गेला आणि म्हणाला, 'माँ जी उसने आज मूझे नया जीवनदान दिया है.देखो मेरी जिंदगी और मौतमे केवल दो उंगलीयोंकाही अंतर था. अगर इसकी नजर उस सापपर ना होती तो? अगर ए भी तूम्हारे बगलमेही बैठा रहा होता तो, आज अभी इस वक्त का माहोल क्या होता?' आईच्या तोंडातून थरथरत्या आवाजात एकच शब्द बाहेर पडला, 'साबजी ये तो मेरा नशीब है जो आज ये जिता है, नही तो परसोच उसका किधरका किधर हो जाता. एक तो वे बदमास इसकू पूलके तले दाब देते, नही तो अजगर खा जाता'. 'मतलब माँ जी'? एकदम झटका बसल्यासारखा ताठ होत बाबुजींनी विचारले. मला घेऊन जसे पिस्तुलबाबुजी आईकडे यायला निघाले होते, त्याचवेळी मांगुकाकाही आई जवळ येऊन उभे होते. बाबूजी आईचे शब्द ऐकून बेचैन झाल्यासारखे दिसताच ते पटकन पुढे आले, आणि म्हणाले 'साहबजी ये वोही मामला है जिसको सुननेके लिए आप यहा आये है' 'ऐसी बात है तो चलो, जिसके लिए आया हू अब वही बात सुनलेंगे ,बाततो बहुतही गंभीर लग रही है'. म्हणत बाबूजी परत त्यांच्या पहिल्या जागेवर येऊन उभे राहिले.'अभी यहा जो हुआ सो हुआ, भगवान के हुकुमसे मुझ पर तो ये मुसीबत आनेही वाली थी, यहा नही तो और कही आती लेकिन आती जरूर लेकिन यहा आनेसे आप लोगोंकीही दूआ और मद्दसे मेरी मुसीबत टल गयी. आप सबका मै बहुत आभारी हूँ'. पिस्तूलबाबू म्हणाले आणि वर आकाशाकडे पाहून त्यांनी लांब श्वास सोडला.तो पर्यंत मांगूकाका पिस्तुलबाबु समोर येऊन उभे राहिले होते. जमलेल्या लोकांकडे तोंड करून त्यांनी बोलायला सुरुवात केली. आम्ही लाकडे घ्यायला निघाल्या पासून मी ठोकर लागून पडे पर्यंतची सारी घटना त्यांनी सविस्तर सांगितली. ती ऐकून पिस्तूलबाबू एकदम लालबुंद झाले होते. राग अनावर झाल्याने ते थरथर कापू लागले होते. सगळा जमाव चिडिचूप होता. अनेकांचे डोळे माझ्यावर स्थिरावले

होते. 'बहुत बडा हिम्मतवाला लडका है। बहुत चतूराइसे उन बदमाशोसे पिछा छुडाया। वे साथी लोग भी इसके आवाज देनेपर तुरंत उसके पास आगये इसके लिये ये बच गया। नही तो वे बदमाश दुसरे मार्गसे आकर इसको बेशक दबोच लेते और भाग निकलते. इधर माँ बेचारी रोती बिलखती रह जाती,लेकिन उसे उसका खोया हुआ बेटा कभीभी ना मिलता।'असे एक ना दोन अनेक प्रकारची चर्चा जमलेल्या लोकां मधे सुरू झाली.'वैसे बात तो बहूत गंभीर है, इसे हलकेमे लेनेकी ये बातही नही है.लेकिन आप लोग आश्वस्थ रहे। मै इसका पुरा बंदोबस्त करनेवाला हूँ। ये मेरा आपसे वादा है। दिलमे कोई डर या खौफ रखनेकी बात नही फिरभी अगर आगे चलकर वे तुममेसे किसीको मिल जाए तो बिना किसी खौफके उनको बांधकर यहा लेकर आओ, और अगर वे मुझे दुसरे कीसीके जरीये मिल गये तो मै उनको बांधकर यहा लाकर तुम सब लोगोके सामने इस पिस्तोलसे उनकी छलनी करूंगा। उन्होने जो किया वो अच्छा नही किया है. मै उस पूल निर्माणवाले कंत्राक्टरसे मिलूंगा। उसकी भी खिचाई करके खबरदार करूंगा। जिससे की उसका कोई भी आदमी मेरे मजदूरों की तरफ आँख उठाकर भी बूरी नजरसे देखनेकी हिम्मतही नही करेगा। फिरभी मेरी आप सब लोगोसे चेतावनी है, की सब होशियार और चौकन्ने रहना, हमेशा एक दूसरे के संपर्क मे रहो। वक्त-बेवक्त बस्ती छोडकर कही ना निकलना और कोई बहूत मजबुरी या संकट हो तो अकेले के बजाय दो या जादा लोक एकसाथ रहे।' अशा बारीक सारीक गोष्टी पिस्तुलबाबू सगळ्यांना समजावून सांगत होते. 'बाबूजी तुम हमारे अन्न दाता हो,आप जहाभी जाए, जहाभी रहे वहा सुरक्षित और सलामत रहे यह हमारी भगवानसे प्रार्थना है। 'मै फिरसे आप सबको मेरी तरफसे पूरा सहयोग करूंगा और सबको सलाम भी करता हूँ। और हा अब तुमपर या तुम्हारे बालबच्चों पर कभी कोई बूरी नजरसे देखनेकी हिम्मत नही करेगा इसकी भी जुबान देता हूँ। एक बात ध्यानमे रखोगे, मै कोई बडा लाट साब नही हूँ , मै जोभी हूँ आपकी वजहसे हूँ। आप ना रहेंगे तो मै भी नही रहूंगा। इसलिए जितना आपकी सुनुंगा उसके दो गुना आप मेरी सुनेंगे यह विस्वास अब मुझे हो गया है। बराबर है ना'? 'बिलकूल सोला आना बराबर है साहबजी' सारा जमाव एका सुरात म्हणाला.'ठीक है भई अब

आगे बढो। ये जो अजगर यहा लाकर पडा है इसका क्या मामला है? पिस्तुलबाबु मांगुकाकाकडे बघत म्हणाले? 'हा साब अब मै वोही बताने जा रहा हूँ' असे सांगुन मांगुकाका पुढची घटना सांगू लागले.'बाबुजी ठोकर लगकर ये निचे गिरा ये बात पक्की हुई। लेकीन उसको काहेकी ठोकर लगी, जिससे वो गिरा वो यहीच अजगर था। अजगर तो अपनीही धुनमे पडा था। जैसेही लडकेने बदमाशोको देखा डरकर हिम्मत लगाकर भागने लगा। वो आगे भागता और पिछे मुडमुडकर उन बदमाशोपर नजर रख रहा था। उससे उसको पता नही लगा की उसको कायकी ठोकर लगकर वो गिरा? उसको तो बदमाशोसे पिछा छुडाना था ना? और हम तिनोको आवाज दे कर हमे बुला रहा था।' इथपर्यंत सांगुन झाल्यावर नंतर ते तिघे कसे माझ्या जवळ आले? अजगर कसा मेला? आणि त्याला मजूर वस्तीवर कसा आणला हेही सविस्तर सांगितले. एवढे सांगून झाल्यावर मांगुकाका शांतपणे उभे राहिले. जसे मांगुकाका बोलायचे थांबले तसे पिस्तुलबाबु एकदम बेभानपणे टाळ्या वाजवत होते.'आप तो बहोत बहादूर लोग हो भई। मैने अबतक ऐसे और इससे भी बडे-बडे काम किए है, इससे भी बडे-बडे जंगलोमे घुमा हूँ। लेकिन ना वहा किसीको अजगर दिखा, नाही कही अजगर मारने की बात सूनी और ऐसी शिकार करके मारनेकी बात तो बहोत दूरकी है। आज मैने बात भी सूनी, उसे मारनेका तरीका भी सूना, और मारने वालों को भी अपनी आँखोसे अपने सामने खडा देख रहा हूँ, जिसे मारा वो अजगर भी देखरहा हूँ। और इससे भी बडी बात मेरे जिंदगीमे पहली बार अजगर भी देख रहा हूँ। बहादूरो आपका ये साहस और बहादुरी जाया नही जायेगी। मै आप सबकी बहोत कदर करने लगा हूँ. मेरे तरफसे तुम चारोको एक्यावन एक्यावन रुपयोंका तोहफा देता हूँ। और इस छोटे बहादूर को एक्कीस रुपये अलगसे देता हूँ। आपने मेरे उपर और इस मजदूर बस्तीपर बहोत बडा एहसान किया है। ये अजगर जात है इसे अपनी पराजय कभी स्वीकार नही होती। जब वो चिढ जाता है, हर हालमे जिसने उसको चिढाया उसकी जान लेकर ही शांत होता है। उसकी आखोंमे उसे छेडने वालेकी तसबीर और गंध हमेशा घुमती रहती है। उसके आधारपर ही वो छेडने वालेका पिछा करता रहता है. अगर आज ये बच जाता तो वो तुम्हारा पिछा करता ही रहता और तुम्हारे

साथ-साथ सारी बस्ती परेशानीमे रहती। अब तूम और बस्तीके लोग भी सुरक्षीत हो गये है। मै भगवानसे तुम्हारे लिए दूवा मांगता हूँ के तुम्हारी ये बहादूरी हमेशा बरकरार रखै।' बाबूजी बोलायचे थांबले. लगेच त्यांनी खिशातून जाहीर केलेल्या बक्षिसाची रकम काढली आणि प्रत्येकाला जवळ बोलवून त्यांच्या हाताने वाटली. मला बक्षीस देतांना माझ्या गालाला हात लावून पाठीवर थाप मारून म्हणाले, 'मुन्ना जिंदगीमे बहोत तरक्की करना, लेकिन माँजी को कभी मत भुलना।' 'हा साबजी माताजीही तो हमारे लीए सबकुछ है, उनके बिना हमतो कुछ भी नही है, त्याच्या पाया पडत मी म्हणालो' हे ऐकुन आईच्या डोळ्यातून आसू वाहू लागले. त्या वातावरणाने बाबुजीही भारावून गेले होते आणि त्यांच्याही डोळ्यातून आंसवाचे थेंब माझ्या डोक्यावर टपकले. अप्पा एक हात आईच्या मांडीवर ठेवून दुसऱ्या हाताने आईचे आसू पुसत होता. सारा जमाव शांतपणे हे सारे थक्क होऊन काही आवाज न करता ऐकत होता आणि बघतही होता.सार वातावरण स्थिरस्थावर झाल्यावर बाबुजी म्हणाले ,'अच्छा भाइयो, तुम सबने तुम्हारा काम बहोत बहादूरीसे और अक्कल होशियारीसे किया अब मूझे तूम्हारी सुरक्षाके लिए क्या क्या करना है, सोचकर करूंगा। मै अब निकलता हूँ। जाते-जाते मै फिरसे कहरहा हूँ की मै मेरे मजदूर भाइयोंपर बहोत खूष हूँ। क्यों की मुझे पूरा विश्वास हो गया है की आजसे यहा ना तो कोई झगडा होगा ना किसको किससे कोई शिकायत, ना दुश्मनी, पक्का ना? ऐसे ही रहो और खुष रहो। अलबिदा'. असे सांगुन जसे ते जायला निघाले तोच मांगुकाका पुढे सरकून पिस्तूल बाबूला म्हणाले एक बात कहनी है. 'हाँ कहीए क्या कहना है'? बाबुजींनी विचारले, 'बात ये है की व तिनो कलही काम छोडके यहासे जाना चाहती है' मांगुकाका म्हणाले, 'क्यों? क्या बात है? इतना सब कुछ अच्छा चल रहा है तो ऐसेमे एकदमसे जानेकी उनको क्या सूझी'? बाबूजींनी विचारले.'साबजी वे तो परसोसेच रातकोच सब सामान बांधबुंधके जानेकी पूरी तयारी करके बैठी है। हप्तेके कामका आखरी दिन आज था इसलिए वो हप्तेके कामकी मजूरी लेनेको रूक गई है। वैसे तो वो मजूरीके दामके लिए भी नही रूक रही थी, उसको बी छोडकर निकल चली थी। फिर हमने तिनो लोकोने उसकू समजाया तब कही थमी है', मांगुकाका म्हणाले,

'नही-नही, ऐसे कैसे चलेगा? सहीमे तो अब उनको रूकना है। मै उनसे बात करता हूँ, चलो, कोई एक जल्दी आगे जाओ, उनको रूकाओ वरना वे झोपडीसे बाहर निकल पडेगी' बाबूजी घाई घाईने म्हणाले. 'हां आए हूए सब लोगोको रूकनेको कहो। जो भी मामला है, वो इन सब लोगोके सामने मिटनेको होना'. बाबूजी ठाम स्वरात म्हणाले .आम्ही झोपडीकडे जाण्यास निघालो, पण जागेवरून उठून जाण्यासाठी पांगनाऱ्या लोकातून निघत चार पाचच पावले गेलो असू, तेवढ्यात मांगुकाकांचा मागून आवाज आला, ओ दख्खनमामी जरा परत इकडे या, बाबुजी तुमच्याशी काही बोलणार आहेत.आवाज ऐकल्या बरोबर आई, अप्पा पुढे चालायचे थांबले पण मी आपल्याच नादात पुढे चालली होतो, मागून मला अप्पाचा आवाज आला 'अरे गोविंद मागे फिर'. ते ऐकून पटकन मागे फिरलो. पाहिले तर मांगूकाका घाई-घाईत आमच्या मागे येतांना दिसले. 'चला सारेजण तुम्हाला पिस्तुलबाबूजींनी बोलवले आहे', मांगूकाका गडबडीत म्हणाले.' कां? का बरं बोलवले आहे भाऊजी? आईने कापऱ्या आवाजात विचारले. 'काळजी करण्यासारखे काहीच नाही. मला बी नीट माहीत नाही. तुमच्या जखमे-बिखमे बाबत काही पूस तपास करणार असतील', मांगुकाकाने बात फिरवली होती. मूळ मुद्यालाच त्यांनी बगल दिली होती.

कदाचित त्यांच्या मनात शंका आली असावी की मुद्याची बात जर मामीला सांगून दिली तर गाडी जास्तीच बिघडून ना जाये. विषय टाळून इथूनच परत फिरून जाय? कारण आईचा स्वभाव त्यांना चांगला माहीत झाला होता. आधीच त्यांच्या वरून दोन जीव घेणे संकट टळले आहेत. विचार करत-करत आम्ही बाबूजीं पर्यंत येऊन पोहोचलो. आई काही बोलण्या आधीच बाबुजी म्हणाले, 'नमस्ते माँ जी. नही नही बाबुजी तुम बडे लोक हय मेरेकु नमस्ते मत करो'. आई म्हणाली. 'क्यो क्या आपके दोनो बेटे आपको नमस्ते नही करते'? 'वे तो नमस्ते करते हय'.'तो क्या आप उनको नमस्ते नही करने देती' बाबुजींनी विचारले ? 'नही नही बाबुजी वैसी बात नही है. ये तो मेरे बेटे है. उनने तो मेरेकु नमस्ते करनेकुच होना. पण तुम तो भोत बडे लोक है,ये कंपनीके मालक है' आई जरा खंबीर आवाजात म्हणाली.'फिर तो माताजी

आप दो घंटेमेही मेरी बात भूल गई' बाबुजी जरा नाराजीच्या सुरात म्हणाले. 'नही सायबजी मै इतनी बडी हिम्मत कैसी करूंगी' आइ जरा घाबरूनच बोलली. 'ये क्या बात हुइ, मैने आपके चरन छूके तो कही थी के इस नन्हेने मेरी जिंदगी बचाके मेरी जिंदगी उधार लेली है ? तो उसके बराबर मै तुम्हारा बेटा नही हुआ क्या'? बाबुजींनी विचारले. मैने सुना आप डरके मारे वापस गाव जा रही है। अगर आपही डरकर चली गई तो तुम्हारे पिछे पिछे ये सारे मजदूर भी एक एक करके चले जाएंगे, फिर यहा तो सिर्फ जंगल रह जाएगा। 'फिर अब तुम बताओ क्या फिर भी तुम इस सुने जंगल और पहाडको कंपनी कहेंगी'? बाबुजींनी विचारले. 'नही' आई म्हणाली. 'फिर अब तुम बताओ मै किसके दमपर कंपनीका मालीक हु? अगर मजदुरके बिना कंपनी नही तो मै कंपनीका मालीक कहांसे आया'? बाबुजींनी विचारले. 'ये बात तो बराबर हय' आई म्हणाली. जमलेला सारा मजुरवर्ग हे सारे बोलने ऐकतच होता. त्या सर्वांनी एकदम टाळयांचा कडकडाट केला. सारे एका आवाजात बाबुजींचा जयजयकार करत होते. 'अब आप पुरे मजदुर बस्तीमे एक नारी बताव जो बगैर किसीके सहारे बगलमे दो बच्चे लिए इस भयंकर जंगलमे इस पत्थरफोड कामके लिए केवल अपना गाव, समाजहि नही बल्कीं अपना खुदका एक छोटा बेटाभी किसी और के सहारे गावपर छोडकर यहा कामपर आई है? मजुरवर्गातुन एकच आवाज आला 'नही सायबजी एकभी औरत नही है'. 'फिर मुझे बतावो वो नारी कितनी महान होगी' बाबुजींनी सवाल केला. 'बहुत महान है सायबजी'. जमावातुन उत्तर आला. 'सुना माँ जी? कौन बडा है और कौन महान है? अब तो पता चला आपको?' बाबुजींनी सवाल केला. आता मात्र आईच्या डोळ्यातुन आसवे गळत होते. तिच्या कष्टाचे आज पर्यंत इतक्या जवळून कोणीच मूल्यमापन केले नव्हते. तिच्या आयुष्यात तिच्या कष्टाचे इतके तोंड भरून कौतुक कधीच कोणी केले नव्हते. तिच्या कष्टाचे, तिच्या जिवापाड तळमळीचे इतके तोंड भरून केलेले कौतुक तिने आयुष्यात कधी ऐकले नव्हते. 'सायबजी तुमने तो मेरा इतनीसी राइका(सरसोका)कितना बडा पहाड बना दिया' आई गदगदलेल्या कंठाने म्हणाली. 'हा माताजी यही तुम्हारी महानता है, इसी लिये मै आपको हिम्मतवाली और मर्दानी, जिगरबाज नारी समझता हुँ। इसलिए तो

मै आपको माताजी कहता हुँ, और हा इतनी जिगरबाज हिम्मतवाली माता अगर यहाके सब संगी साथी बिचमेही छोडकर गावकी तरफजाने लगे तो मै क्या सोचु? ये सब मजदूर भाई क्या सोचेंगे? आप इतनी शेरदिल, बहादूर होकर डरकर यहासे चली गइ तो ये मजदूर भाईभी एकएक करके डरके मारे काम छोडकर चले जायेंगे. फिर तो निकलपडी सबकी। है ना, माजी? यह लोग सोचेंगे आज माताजीकी बारी थी, कल हमारी हो सकती है, कल हमपर भी ऐसाही वक्त आ सकता है। इक्का बक्का मजदूर जंगलमें गया तो वह भी उस जंगलमें जानेसे डरेगा। आनेवाले बदमाश उसे भी उठाकर ले जायेंगे और पुलके निचे दबा देंगे। बस, फिर वैसाही चलता रहेगा। है ना! माजी! आपको ये मंजूर है? आपके कारण ये मजदूर यहासे काम छोडकर भुके पेट चले जाए, क्या ये भी आपको मंजूर है? आपको ये कदापि मंजूर नही होगा। अगर सब लोग मिलकर एकजुटसे रहोगे तो किसीकी क्या मजाल है जो तुम्हारे रास्तेमे आकर तुमको रोक दे? इसलिए माताजी मै आपसे कहता हु आप गाव जानेकी बात छोड दो, जबतक तुम्हारे साथवाले रहते है, तबतक तुम भी उनके साथ खूशहाल रहो. रही बात उन बदमाशोंकी उनको तो मै खुदही निपट लुंगा. अब आपका क्या कहना है माताजी? मै चाहता हु आप इन सब मजदूर भाइयोंकी हिम्मत बन जावो. बाबुजींनी आईला समजावले. बाबुजींचे बोलने ऐकून सारा मजुरवर्ग 'माताजी की जय' एका सुरात गरजला. तो सारा जयजयकार ऐकून आईचे ऊर पुरते भरून आले. आई जागेवरून दोन पावले पुढे सरकली, तिने सर्वासमोर पदराने डोळे पुसून म्हणाली 'सायबजी जब आप कह रहे हय तो मय नही जाती'. 'पक्की बात अब नही जाउंगी'आईने हात जोडून सर्वाकडे पाहून सांगितले. परत सारा जमाव एका सुरात माताजीकी जय म्हणाला. टाळयांचा एकच कडकडाट झाला. 'अच्छा अब सब ठीकठाक हो गया है, अब मुझे जाना होगा. और कोइभी ऐसा ना सोचे वे परदेशमे है, और यहा उनकी सुननेवाला कोई नही है, और तुम अकेले हो, जरासी बी कोई तकलिफ हो तो बिना डरके आप अपनी तकलिफ अपने ठेकेदारको बताए वे उसीवक्त मुझे सुचीत करते रहेंगे। ठिक है'बाबुजींनी सर्वाकडे पाहून सांगितले. 'तो फिर अब सब ठीक है, मै चलता हुं, अलबिदा', असे सांगून बाबुजी उठून चालू लागले

त्यांच्या बरोबर आलेला लोकांचा घोळका जसा आला होता तसा रवाना झाला. जमलेला मजूर उठून आपआपल्या झोपडयांच्या वाटेला लागले. मांगुकाका, रामसिंगकाका, राजारामकाका, त्या गर्दीतून वाट काढत आमच्याकडे आले आणि म्हणाले. 'चला भाभीजी', 'चला' आई म्हणाली आणि आम्हाला बरोबर घेऊन त्यांच्या बरोबर चालू लागली 'मांगू भाऊजी एक गोष्ट अजून माझ्या लक्षात आली नाही, मी गावाकडे जाते आहे ही गोष्ट बाबूजींना कशी कळाली'? 'भाभीजी मीच सांगितली ना त्यांना. कारण काम सोडून जातांना कंपनीच्या साऱ्या जबाबदार, मोठ्या लोकांना तसी सूचना द्यावीच लागते. त्यांना न सांगता गेले तर समजा मागेपुढे काही बरे वाईट झाले तर कंपनी त्याला जबाबदार असते. म्हणून मी बाबूजींच्या कानावर ही गोष्ट टाकली. पण जे झाले ते बरेच झाले. आपल्या बाबत त्यांच्या मनात काय भावना आहेत तेही आपल्याला त्यामुळे कळाल्या आणि तुम्ही ही गावाकडे जाण्याचा बेत सोडून दिला. खर सांगू भाभी तुमची गावाकडे जायची जी रट होती ना त्यामुळे मला रातभर झोपच आली नाही, कारण तुमची काळजी सतावत होती. तुम्ही गेल्याच असत्या तर पुढचा प्रवास कसा केला असता? आगीनगाडीच्या प्रवासात चांगले-चांगले हुशार आणि जाणकार लोक बी घाबरतात. डोक्यावर एवढा सामानाचा ओझा, सोबत दोन लहान लहान पोर, मग हे सारे घेऊन फलाटा नंतर फलाट कसे बदलले असते.आगीनगाडीचे तिकीट काढणे, आगीनगाडीच्या पट्या ओलांडून जाने, हे सारे तूम्हाला जमलेच नसते या आणि अशा साऱ्या काळज्या मनात येत होत्या, म्हणून डोळ्याला डोळाच लागला नाही. मन सारखे कावरं बावरे होत होते' रामसिंगकाकाने त्यांच्या मनातील भिती खुल्लम खुल्ला बोलून दाखवली. 'मी भगवानावर भरोसा ठेवूनच जायचा विचार केला होता भाऊजी' आई म्हणाली. 'अहो भाभीजी तुम्ही आमच्या भरोशावर गाव सोडले होते ना आणि मला सांगा तुम्ही गबाळ्यासारखे भगवानवर भरोसा टाकणार आणि आगीत उडी टाकनार तर देव काय म्हणेल अरे याने माझ्यावर भरोसा टाकला आहे याला आगी पासुन वाचवतो आणि खरोखरच देव आपल्याला वाचवायला लगेच धावून येईल का? काय भाभीजी किती भोळेपणा आहे हा? नाही का!' 'हो ना! भाऊजी खरच आहे हे' आई म्हणाली. 'बर पुढे समजा

तुम्ही निघून गेले असते, व्हायला नको पण काही झालेच असते तर तुमच्या भाऊबंदांनी आणि गावच्या लोकांनी आम्हाला तिघांना बोलू दिले असते का? नाही, त्यांनी आम्हाला बोलायला तोंडच उघडू दिले नसते खरे आहे ना. जे झाले ते बरेच झाले' मांगूकाका म्हणाले. तेवढ्यात झोपडी जवळ आली. जो तो आपआपल्या झोपडीकडे निघून गेले. झोपडीत गेल्यावर गावाला जायच्या तयारीत बांधून ठेवलेले सामानाचे गाठोडे आई आणि अप्पा सोडू लागले. त्यातले सामान ज्या-त्या ठिकाणावर ठेवले. तिघांनी दोन-दोन घास जेवण केले. हप्त्याचा दिवस होता. आई आणि अप्पा बूदनीच्या बाजाराला गेले. मी घर काम करण्यासाठी झोपडीवर मागे राहिलो. दोन-तीन दिवसा नंतर वस्तीत बरेच नवीन-नवीन बदल दिसू लागले.एक बंदूक धारी तगडा माणूस झोपड वस्तीत खांद्यावर बंदूक धरून दिवस भर इकडून तिकडे फेऱ्या मारतांना दिसू लागला. अपेक्षीत वेळेत कोणी परत नाही आला याची माहिती त्याला द्यावी लागायची.मग तो झोपडीतल्या एखाद्याला बरोबर घेऊन शोधायला जायचा. त्याची जास्त नजर आमच्या झोपडीवरच रहायची.येता-जाता तो माझ्याशी बोलत राहायचा. क्यों मून्ने कही नदीपे जाने का है क्या? क्यूं जाने का है? असे प्रश्न तो विचारत राहायचा. हळू-हळू सगळ्यांच्या लक्षात येऊन गेले की ही सारी पिस्तूल बाबूजींनी मजूर वर्गाच्या सुरक्षेसाठी केलेली सोय आहे. त्यामुळे सारा मजूर वर्ग एकदम बिनधास्त झाला होता, आणि पिस्तूल बाबूजींना दूआ देत होता. दिवसामागून दिवस जाऊ लागले. आकाशात एखाद दुसरा ढग दिसू लागला. जस-जसे आकाशात ढगांची गर्दी वाढू लागली, मजूर वर्गात गावाकडे जायची लगबग सुरू झाली. एक दिवस असा आला की आखतवाडयाच्या साऱ्या मंडळीची झोपडीतल्या साऱ्या सामानाची बांधा-बांध आटपली आणि गावाकडे जाण्यासाठी झोपडी सोडली. जातांना सगळयांनी आपापले बिल्ले आणि मजुरी कार्ड वस्ती व्यवस्थापकाकडे सोपवून ट्रॉली नाक्यावर बूदनीकडून येणाऱ्या ट्रॉलीची वाट पहात बसलो. थोड्या वेळाने ट्राल्या आल्या. सर्वांनी आपापल्या सामानाचे गाठोडे एकदाचे ट्रॉल्यामधे टाकले आणि आमचा मेजघाटावरील मुक्काम संपला. आम्ही जाता-जाता त्याला हात जोडून शेवटचा राम-राम केला. सर्व मजूर ट्रॉल्यामधे बसल्या नंतर

एकदाच्या एका मागून एक ट्रॉल्या सुरू झाल्या. बूदनी स्टेशनवर सारे खाली उतरलो. येथून पुढचा आमचा गावाकडे जाण्याचा परतीचा प्रवास सुरू होणार. गावाकडून येतांनाचा अनुभव आता परतीच्या प्रवासात कामी येणार होता. म्हणून फजिती कमी झाली. एकदाचे आम्ही गावी सुखरूप येऊन पाहोचलो.

गावी आल्यावर परत आपले मागचीच कामाची रीत आणि वेळा चालू करायच्या होत्या. आई आणि भाऊ मिळेल त्या कामावर जाऊ लागले. मी माझे नेहमीचे घरातले धुणे, भांडी, दळण, स्वयंपाक ही कामे करू लागलो. गाव सोडून जातांना मी गाई चारायचे काम करायचो, आता परत आल्यावर गाई वाले परत गायी चारायचे माझ्यावर सोपवतात की कसे हे पहाण्यासाठी मी शाळेच्या ओट्यावर बसून त्यांची वाट पाहू लागलो. बघता-बघता, हळू-हळू एक दोन करत करत गाई वाढू लागल्या. पुरेशा गाई जमल्यावर मी गाई चारायचे काम सुरू केले.



# शाळेत प्रवेश

असाच एक दिवस मी शाळेच्या ओट्यावर बसून येणाऱ्या गाईंमधे अजून भर पडते का अशी आशा धरून बसलो होतो. कधी नाही ती मुले आज चकपाक आणि घड्या करून ठेवलेले कपडे घालून सकाळी-सकाळीच, घोळक्या-घोळक्यात शाळेत येत होते. गरीब पोरांनी फाटलेले कपडे शिवून-सावून घातलेले होते. मोठ्या घरच्या पोरांचे कपडे झकपक होते. त्यांनी आज अर्धे-मर्धे कपडे घातलेले नव्हते, तर पुरे लांब-लांब बाह्यांचे कूरते, लांब-लांब चड्या घालून आले होते. साऱ्या पोरींनी डोक्याला तेल लावून वेण्या घातलेल्या होत्या. खेड्या-पाड्यावरून येणारे गुरूजी लोक कधी नाही ते आज शाळा उघडण्या आधी येऊन हजर होते. काही तरी नवीन, काही तरी खूब मोठे होणार असेल याचीच ही गडबड आहे हे मी ओळखले. खेडेगावात कामकरी लोक जास्तीत जास्त दहा ते साडेदहा वाजे पर्यंत गावात राहतो नंतर जो तो आप-आपल्या कामाला निघून जातो. त्या नंतर नवीन कोणी गायवाला गाय चारायला आणत नाहीत म्हणून मी पण त्या नंतर नवीन येणाऱ्या गाईंची वाट पहात नव्हतो. शाळा सकाळी आठ वाजेला भरायची. शाळेला तीन बाजूंनीच भिंती होत्या. समोरच्या बाजूने भिंत नव्हती, तर कांबड्याच्या जाळीच्या भिंती होत्या. त्यांना दारही नव्हते. कांबड्यांचेच झोपाटे होते. झोपाटे उघडले की उघडली शाळा. त्या वेळी शाळेत पोरांना फार कमी लोक पाठवायचे. म्हणून गावोगावी शाळा नव्हत्या. आज शाळा रोजच्या पेक्षा अर्धा घंटा

लवकर उघडली होती. ही काय गडबड चालू आहे. मला काही समजत नव्हते. मी मोठया नवलाईने या बदलाकडे पहात होतो. नंतर अदमासे एक ते देढ घंट्याने एक बैलगाडी शाळे समोर येऊन थांबली. शाळेचा एक मास्तर शाळे समोरच्या मारुती मंदिराच्या ओट्यावर अदमासे एक घंट्या पासून जाऊन बसला होता. जशी त्याने लांबून येणारी बैलगाडी पाहिली तसा तो घाई-घाईने शाळेत शिरून दुसऱ्या मास्तरांना सांगत होता, गाडी जवळच आली आहे. त्यामुळे त्यांनी शाळेत चाललेला पोरांचा गोंधळ बंद केला. सारे मास्तर लोक घाई-घाईने शाळेच्या झोपाट्याजवळ येऊन अदबीने उभे राहिले. शाळेसमोर थांबलेल्या बैलगाडीतून दोन-तीन लोक खाली उतरले. त्यांच्यात शाळेचे मोठे गुरूजी पण होते. पटकन पुढे येऊन त्यांनी एका गोऱ्या लोकासारखे कपडे घातलेल्या माणसाच्या डोक्यावर छत्री धरली. 'अहो राहू द्या गुरूजी, इथे आता ऊन नाही' तो माणूस गुरूजींना म्हणाला. 'बर सर' असे म्हणत गूरूजींनी डोक्यावरची छत्री काढली. एकामागे एक असे हळू हळू सारे जन पायऱ्या चढू लागले. मोठे गुरूजी थोडपुढे येऊन त्या सायबाला म्हणाले, 'सर आमच्या शाळेत तुमचे स्वागत करतो'. जसे ते सारेजन पायऱ्या चढून वर आले तसे झोपट्या जवळच्या साऱ्या मास्तरांनी त्या सायबाला हात जोडून नमस्कार केला. का कोन जाने माझेही हात आपोआप जोडले गेले आणि तोंडातून 'नमस्ते सर' हे बोल बाहेर पडले. सायबी माणसाने हळूच तिरपी मान करून माझ्याकडे पाहिले आणि मोठ्या मास्तरांना विचारले 'हा विद्यार्थी बाहेर का?' 'नाही सर तो शाळेचा विद्यार्थी नाही. गाई चारणारा एक खूप गरीब विधवा बाईचा मुलगा आहे.' मोठ्या मास्तरांनी त्यांना माझ्या बाबत माहिती दिली. माझ्या बाबतच काहीतरी बोलणे चालू असल्याचे ऐकून मी खूप घाबरून गेलो. 'ओह' असे बोलून तो साहेब माणूस शाळेत शिरला. मुले आप-आपल्या जागेवर गप्प बसून होते. ते बघून साहेब माणसाने मोठ्या मास्तरांना विचारले, 'का हो गुरूजी तुम्ही विद्यार्थ्यांना शाळेत येणाऱ्या पाहुण्यांचे स्वागत करायचे शिकविले नाही का?' मोठे मास्तर एकदम घाबरले, म्हणाले 'सर या गावाला शाळा चालू करून चारच वर्षे झालीत. अजून पर्यंत कोणी असा मोठा साहेब किंवा अधिकारी भेटीला आले नाही म्हणून असा गोंधळ

होत आहे. कारण असा प्रसंगच कधी आला नाही आणि आम्ही सारे नवीनच लोक आहोत. येथून पुढे असे होणार नाही साहेब', मोठे मास्तर विनंतीच्या सुरात म्हणाले 'बर बर! पण एक गोष्ट मात्र खरी की तुमच्या शाळेत शिकणाऱ्या विद्यार्थ्यांपेक्षा तो गाई चारणारा मुलगा निश्चितच हुशार आहे.' 'हो सर हे खर आहे, पण परिस्थिती पुढे कोणाचे चालत नाही.' 'तसे नाही गुरूजी परिस्थिती त्याची आहे. आजू बाजूच्या समाजाची नाही. बर, जाऊ द्या ते आपण आपले कामाचे बोलुया', असे सांगत साहेब शाळेत खुर्चीवर बसले. मी बाहेरून हे सारे पहात होतो आणि त्यांचे बोलणेही मला ऐकू येत होते. मला आजचा हा सगळा प्रकारच नवा होता, कारण आज पावेतो शाळेत असे कधी पाहिले नव्हते. मोठे साहेब माझ्या विषयी काय बोलत होते? उद्या पासुन आपल्याला शाळेच्या ओट्यावर बसू देणार नाहीत, नक्कीच आपल्याला ओट्यावरून हाकलून देतील, जर हाकलले तर आपण मंदिराच्या ओट्यावर बसत जाऊ, तेथून गाईंवर ध्यान ठेवत जाऊ असे ठरवून शाळेच्या कांबड्यांच्या ताटीला तोंड लावून आत शाळेत काय चालले आहे ते पहात बसलो. साहेब लोक असे शाळेत येऊन काय काम करणार आहेत ते पहायची मला आसुस वाटली होती. साहेब हातात बुक धरून येरझरा घालत होते. मास्तर बाजूला उभे होते. बुक वाचून झाल्यावर साहेब पोरांना प्रश्न विचारू लागले. त्या प्रश्नाचे उत्तर पोरांनी द्यायचे होते. प्रश्न विचारला की ते पोरांना विचाराये सांगा याचे उत्तर, पण पोरं उत्तर तर काही देत नव्हती पण त्यांच्या तोंडाकडे पहात गुपचूप बसून रहायचे. कोणा कडुनच उत्तर येत नव्हते. जे येत होते ते एक तर अर्धे असायचे किंवा चूक असायचे. मी अंदाजे दोन सालापासून शाळेच्या ओट्यावर बसून आत मास्तर जे शिकवायचे ते ऐकत बसायचो, जणू एखादी गोष्ट ऐकावी तशी, त्यामुळे साहेबांच्या तोंडातून प्रश्न बाहेर पडला की माझ्या तोंडात त्याचे उत्तर लगेच यायचे. मुलाने चुकीचे उत्तर दिले की माझ्या तोंडातून लगेच आपोआप बोल बाहेर पडायचे, आणि ताटीला तोंड लावून मी बाहेरूनच म्हणायचो 'गुरूजी हे चूक आहे', मग मी बरोबर असलेले उत्तर सांगून मोकळा व्हायचो. असे अदमासे तीन ते चार वेळा झाले. मला भानच राहिले नाही की मी शाळेतला मुलगा नाही. मी असे करायला नको. पण काय

करणार चुकीचे उत्तर माझ्या मनाला पटत नव्हते म्हणून माझ्या तोंडातून त्याचे-त्याचे बोल बाहेर येऊनच जायचे. बरोबरचे उत्तर पोटात रहात नव्हते ते खळबळ करून भसकन बाहेर येऊनच जायचे. एकदा झाले दोनदा झाले, परत-परत तसे होऊ लागले, विद्यार्थ्यांच्या ऐवजी शाळेत न शिकणारा बाहेरचा पोरगा बाहेरून प्रश्नांची उत्तरे अचूक आणि बरोबर देतो आहे, हे पाहून शेवटी मोठे साहेब मास्तरला घेऊन बाहेर माझ्याजवळ आले. ते बघून मी फार घाबरून गेलो. उभा राहून थरथर कापू लागलो आणि रडू लागलो. 'नाहीना साहेब आता नाही करणार, आता नाही बोलणार ना', असे म्हणत थरथरत असल्याने कमरेवरून खाली सरकणारी चड्डी वरवर आवरत होतो.' अरे-अरे असा घाबरू नको, तुला रागवत नाही. मी तुला मारत ही नाही. रडणे बंद कर, नीट उभा रहा', असे सांगून त्यांनी माझ्या पाठीवरून हात फिरवत हळू-हळू माझी पाठ थोपटू लागले. त्यामुळे मला मोठा धिरोसा वाटला. मी उलट्या हातांनी डोळे पुसले, कमरेची चड्डी नीट वर केली, आसवे पुसतांना ओले झालेले हात चड्डीला रगडून पुसून साफ केले.'वा-वा छान हुशार बाळ आहेस. तुझे नाव काय आहे'? सायबांनी विचारले.'गोविंदा' मी उत्तर दिले. 'तुझ्या बापाचे नाव काय'? साहेबांनी परत सवाल केला.'भिकारी' मी तसेच उत्तर दिले 'बर-बर. काय काम करतात ते ? आता कुठे आहेत ते'? त्यांनी परत विचारले.'मरून गेले' माझे उत्तर.'अरेरे, मग आता घरी तुझ्या बरोबर कोण-कोण असतात'? त्यांनी स्पष्ट करून विचारले. आता पावेतो मला बोलायची भिती वाटायची, ती जाऊन मला बरीच हिम्मत आली होती. 'आई आहे, अप्पा आणि अण्णा भाऊ आहे'. मी उत्तर दिले.'तू माझ्यासमोर आता कोणाला बोलवून आणतो' साहेबांनी विचारले. 'आता सारे कामाला गेले.' मी उत्तर दिले. 'बर कामावरून ते घरी केव्हा परत येतात'? त्यांनी विचारले. 'दिवस बुडाल्यावर' मी उत्तर दिले. 'अरे मग आता तू कोणाला तरी बोलावून आणतो का'? त्यांनी विचारले. 'साहेब कोण कुठे कामावर गेले ते मला माहीत नाही.' 'सर काही काम आहे का'? इतका वेळ मोठे साहेब शाळेच्या बाहेर येऊन या पोराला काय विचारत आहेत ते बघायला मोठे मास्तर बाहेर आले, सायबांनी गूरूजींना विचारले, 'गुरूजी या मुलाच्या पालकांना मला

भेटायचे आहे.' 'सर यावेळी ते जरा कठीणच वाटते. याचे भाऊ याच्यापेक्षा मोठे आहेत पण वयाने लहानच आहेत फार तर ११ वर्षापेक्षाही लहान असतील. त्याची आई नेमकी कोनाकडे कामाला गेली असेल ते कळणे कठीण आहे' मोठे मास्तर म्हणाले. 'तरी बघा जमले तर', सायबांनी सांगितले. 'प्रयत्न करतो सर', मोठे मास्तर म्हणाले. 'काय रे! गोविंदा सकाळी होका सांगायला घरी कोणी आले होते का'? मास्तरांनी विचारले. 'हो, नारायण पाहुणे आले होते'. 'कोणते नारायण पाहुणे'? 'बाबूकाका गाई चारतात ना त्यांच्या शेजारी राहाणारे', मोठ्या मास्तरांनी एक मास्तर नारायण पाहूण्याकडे आईचा तपास करायला पाठवले. आई किंवा भाऊ जो कोणी मिळेल, त्याला बोलावून आणायला मास्तरांनी त्यांना सांगितले. नंतर मोठे साहेब आणि मास्तर आत शाळेत गेले. त्यांनी मलाही आत शाळेत बोलावून बसवले. त्यांनी त्यांचे काम पुढे चालू केले. अदमासे अर्ध्या घंट्याने मास्तर परत आला. त्याच्या मागे-मागे आई भीत-भीत शाळेत आत आली. ती घाबरल्या सारखी दिसत होती, त्यामुळे तिने आल्या बरोबर माझ्या गालात जोराची थापड लगावली, आणि दरडावून म्हणाली 'मेल्या तुला हजार दफे बजावून सांगितले आहे ना की कुठे आगाऊपणा करत नको जाऊ म्हणून. घरी काही कुरापत नको आणू म्हणून. मी तुमचे पोट भरू की तुमच्या कुरापती निस्तारू'? आई रडत म्हणाली. 'गुरूजी मी तुमच्या पाया पडते, मला माप करा, माझ्या मुलाने काही तरी गुन्हा केला असेल.' तेवढ्यात सायबी कपड्यातला माणूस खुर्चीवरून उठला आणि म्हणाला 'नमस्ते मावशी, जरा दमाने घ्या, काही तरी विचार मनात आणून मनाला लावून घेऊ नका, तुमच्या मुलाने काही चुकीचे काम केलेले नाही, किंवा कोणता गुन्हा ही केलेला नाही, उलट तुमचा मुलगा हिरा आहे'. तो आईला हात जोडून नमस्कार करत म्हणाला. 'साहेब मी अडाणी बाई आहे, मला तुमचे बोलणे समजले नाही. याने असा कोणता दिवा लावला. जो तुम्ही त्याला हिरा समजू राहिले'? आईने आश्चर्याने त्यांच्याकडे बघून विचारले. 'मावशी बघा इकडे, इथे शाळेत किती मुले बसले आहेत'? सायबांनी विचारले. 'साहेब मला मोजता नाही येत, पण खूप आहेत. पण त्यांचा आणि याचा काय मेळ? हा एखला पोरगा आहे ते दोन

तीन खंडीच्यावर आहेत. हा त्या साऱ्यांना कसा मारेल किंवा सतावेल'? आई म्हणाली. 'मावशी ना त्याने मुलांना मारले ना सतावले, त्याने तसे केले असते तर त्याला कोणी हिरा म्हटले असते का'? सायबांनी हळूच आईला विचारले. 'मी तुम्हाला जे सांगणार आहे ते तुम्ही ध्यानात ठेवले तर त्याचाच उजाळा तुमच्या गरीब संसारात होईल. कारण बघा शाळेत किती मुले आहेत? ते सर्व मोठ-मोठ्या घरातले आहेत, म्हणून शाळेत शिकायला आलेले आहेत. त्यांची ऐपत आहे, शिकून पुढे त्यातून कोणी मास्तर होईल, कोणी माझ्या सारखा साहेब होईल, कोणी सिपाई होईल, तर कोणी अख्या जळगाव जिल्ह्याचा बी साहेब होईल. होईल का नाही मला सांगा'? त्यांनी आईला सरळ प्रश्न केला. 'त्यांची बातच अल्लक आहे साहेब. आम्ही मजूर लोक, दिवस भर काम करून कमवू, त्याचे रात्री आणून खाऊ. त्यांची आणि आमची काय बरोबरी? आणिक दुसरी बात, हे आर्धे गाव माझे आहे. पण मला कोणीच नाही, हे परके लोकच आमचे माय बाप आहेत'. 'मावशी मानसाचे विचार, ध्येय आणि जिद्द नेहमी प्रगतीकडे नेणारे असावेत, असे मागे नेणारे नसावेत. बघा आता तो मोठा दगड समोर रस्त्यावर कितीक दिवस, महिने,वर्षा पासून पडला असेल, तो आजही आधी जसा होता तसाच आहे. आहे ना'? सायबांनी आईला विचारले. 'हो' आई म्हणाली. 'अजून किती वर्षे तो आहे तसाच पडून राहील ते मला किंवा तुम्हाला माहीत नाही,आहे माहीत'? सायबांनी विचारले. 'नाही' आई म्हणाली. 'आता पावेतो किती गाई, म्हशी, कुत्रे, मांजरांनी त्याच्यावर हागून-मुतून घाण केली असेल आणि पुढेही करत रहातील, राहतील ना'? त्यांनी विचारले, 'करतील ना'?त्यांनी आईला पुढचा प्रश्न विचारला 'हो' आई म्हणाली. 'पण जर एखाद्या मूर्तिकाराच्या हाती तो दगड लागला आणि त्याने छिन्नी हातोड्याने त्याला देवाचा आकार देऊन त्याची मूर्ती बनवली तर काय होईल मावशी'? सायबांनी विचारले. 'ती देवाची मूर्ती होईल, लोक त्याला मंदिरात नेऊन ठेवतील'. आई म्हणाली. 'मग लोक काय करतील'? साहेबांनी सरळ प्रश्न केला. 'लोक येता-जाता तिला हात जोडून नमस्कार करतील. कोणी त्याच्या पुढे डोके टेकून नमस्कार करतील कोणी फुले टाकतील, कोणी अगरबत्ती लावेल, आणि आशीर्वाद मागतील, लोकांच्या

मनात तिच्याबद्दल आदर वाढेल'. 'असे का झाले मावशी'? सायबांनीं आईला विचारले. 'कारण त्याची देवाची मूर्ती झाली म्हणून', आईने उत्तर दिले. 'नाही मावशी त्या दगडाला छिन्नी हातोड्याचे घाव सोसावे लागले म्हणून, हातोड्याच्या प्रत्येक घावा बरोबर त्या दगडाच्या झिलप्या तुटत होत्या त्यामुळे त्याला देवाचा आकार येत होता, होता की नाही', साहेबांनी आईला विचारले. 'हो साहेब' आई म्हणाली. 'म्हणजे त्या दगडाने छिन्नी हातोड्याचे घाव सहन केले म्हणून त्याला देवपण आले ना'?' हो सायबजी ते सारे खरे आहे पण या साऱ्या बातांमधे या दगडाचा या साऱ्या पोरांसी आणि याच्यासी काय सारा-दोरा? आई जरा चलबिचल होत म्हणाली. हा सायेब काय घालमेल करतो आहे. ते आईला समजत नव्हते. 'हो मावशी मला तेच तुम्हाला समजावून सांगायचे आहे. मी आता जे सांगणार आहे ते तुम्ही जरा ध्यान देऊन ऐका', साहेब म्हणाले. 'मी ही अशीच गरिबीची झळ सोसली आहे, आणि याच्यापेक्षा वाईट हालातीतून गेलो आहे. या शाळेत ही जी मुले शिकत आहेत. ती सारी श्रीमंतांची आणि चांगल्या घरातली मुले आहेत. मी त्यांच्या बाबत त्यांच्या आई वडलांना का बोलावले नाही? आणि तुमचे नुकसान व्हावे म्हणून तुम्हालाच बोलावले असे तुम्हाला वाटते का? आणि तसे तरी तुमच्या मनाला का वाटावे, तुम्ही माझे दुश्मन थोडीच आहात? आता मी जे सांगेन ते तुम्हाला पटले तर ठीक नाही तर माझे प्रयत्न आणि आशा माझ्याजवळ आणि तुमचे नशीब आणि भविष्य तुमच्या जवळ मग तर झाले'? साहेबांनी शेवटी निकाराचे सांगून टाकले. 'बर मग तुम्हाला काय सांगायचे आहे आणि तुम्ही याच्यासाठीच का एवढा आटा-पिटा चालवला आहे'? 'हा, आता मावशीला थोडा पंधा सापडलेला दिसतो'. साहेब खूष होऊन म्हणाले, तस काही नाही साहेब, मी अडाणी बाई आहे मला आडमार्गे गेलेले समजत नाही. काय सांगायचे ते मला सरळसोट सांगा'. 'याला शाळेत घाला, तुम्ही याला जितके शिकवणार तितका तुमच्या कुटुंबाचा उद्धार होणार आहे'. साहेबांनी सारा गाभा दोन वाक्यात सांगितला. पण मग याचे पोट कोण भरेल, त्याच्या पोटासाठी कोण आतडे तोडेल ? आणि ती काय एक दिवसाची बात आहे? मी आई आहे, माझ्याने होईल तेवढे मी करेल, भाऊही आज हामी भरतील

पण पुढे? पुढे काय? त्यांचे लगीन झाले की ते पांगून जातील, मी आज आहे उद्या नाही? मंग याने अर्ध्या धारेत काय करावे, हातचे बी जाईल आणि पाठचे बी जाईल, तेव्हा याला कोन भीक घालील? एकटी आई एवढी हिम्मत नाही करणार, वेडी बाईबी नाही करणार'. आईने हातवारे करून सांगितले. 'हे बघा मावशी मला याच्या पासून काही लाभ आहे का? एवढी खटपट करून तुम्हाला समजवून सांगत बसण्यात माझा स्वत:चा काही फायदा होणार आहे का'? साहेबांनी विचारले. 'नाही' आई म्हणाली. 'हा, माझा याच्यात काही स्वार्थ नाही'. साहेब म्हणाले. आजु बाजूला उभ्या असलेल्या मास्तरांना साहेब काय सागू इच्छितात ते कळत नव्हते. की साहेबांच्या मनात ही कशा बद्दल रचना रचणे चालली आहे? 'मावशी मी पाचोरा तालुक्याचा सर्वात मोठा आफिसर आहे. या गावाच्या लोकांच्या विनंती वरून इथे शाळा उघडली आहे.चार वर्षे झालीत ही शाळा उघडून, आता सरकार कडुन विचारणा झाली आहे. की, या शाळेची पूर्ण तपासणी करून खात्री करा की शाळा सुरू करून मुलांचा शिक्षणात किती फायदा झाला, का विनाकारण या मास्तर लोकांना पगार देण्यातच सरकारचा पैसा वाया गेला? कारण मुलांना शिकवण्याचा या गुरूजी लोकांना सरकार पगार देतो. यांनी शिकवूनही जर पोरांना काहीच येत नसेल तर मला सांगा सरकारचा पैसा वाया गेला की नाही'? साहेबांनी आईला विचारले. 'हो साहेब बरोबर आहे. तुमचे सांगेन' आई म्हणाली. 'मग सरकार ही शाळा चालू ठेवील का'? त्यांनी आईलाच प्रश्न केला. आता साहेबांचा सल्ला काय आहे आणि तो बाईंच्या किती पदरी पडतो इकडे साऱ्यांचे ध्यान लागले होते. आपले मरण आणि अमृत समोरा समोरच अशी त्यांची स्थिती झाली. मधे पडून एखादे आश्वासन बाईला दिले तरी टाळा बसणार नाही याची त्यांना जाणीव झाली होती. साहेबांच्या या शेवटच्या इशाऱ्याने आई एकदम चलबिचल झाली. 'अहो मावशी याचे सोडा पण त्याच्या कर्तृत्वाने तुमच्याही आयुष्याचे सोने तो करेल, एखादे वेळी तोच मोठा साहेबही होईल, तुम्ही साहेबाच्या आई होणार, तसे नाही झाले तर हा मझा पत्ता घ्या, या पत्त्यावर आल्यावर माझ्या अंगणात उभे राहून जोर जोराने मला शिव्या द्या मग तर झाले'? साहेबही जिद्दीला पेटले. मी आत

शाळेत पोरांची परीक्षा घेत होतो. ही सारी मुले तर शाळेत शिकायलाच येतात. गुरूजी रोज त्यांना जीव तोडून शिकवतात. पोर ही रोज शिकतात. मी पोरांना गुरूजींनी शिकवलेल्या धड्यावरचीच दहा ते बारा प्रश्न विचारलीत, त्यातून बऱ्याच प्रश्नांची उत्तरे तर मुलाकडून मिळालीच नाहीत, पण जी मिळालीत त्यातील एकही उत्तर बरोबर नव्हते, मग या साऱ्या प्रश्नांची पूर्ण आणि बिनचूक उत्तरे कोणी दिली ते तुम्हीच या सर्व गुरूजींना परत विचारा' साहेबांनी आईला सांगितले. ते ऐकून आईने गुरूजीनकडे पाहिले तर गुरूजी आईला सारी हकिकत सांगू लागले. 'मावशी जो शाळेचा विद्यार्थी नाही, ज्याच्या जवळ पाटी पुस्तक नाही, या कामड्याच्या ताटी बाहेर, शाळेच्या ओट्यावर बसून गंमत म्हणून गुरूजी काय शिकवत आहेत. ते नुसते कानांनी ऐकतो, तो पोरगा गुरूजींनी शिकवलेल्या धड्यांचे एकदम बिनचूक आणि मुद्देसूद उत्तरे देतो आणि हा कशाचा परिणाम आहे तर गुरूजींनी चांगले शिकविले याचा, तरी त्याचे अर्धे लक्ष त्याच्या गाई कडे ठेवून. एक गाई चारणारा, शाळेच्या बाहेर बसणारा, बिना पाटी पुस्तकाचा, दीडशे-दोनशे फूट अंतरावर बसून या गुरूजींच्या शिकविण्याने इतका तयार होतो. एवढे बोलून साहेब श्वास घेण्यासाठी थोडे थांबले. इतका वेळ बाजूला चूपचाप उभे असलेले गुरूजी, साहेबांचे त्यांच्या विषयी असलेल्या आत्मविश्वासपूर्ण कौतुकाचे बोलणे ऐकून त्यांच्या भावना अनावर झाल्या. शाळेचे मोठे मास्तर, शिंपी गुरूजी पुढे आले, त्यांनी पटकन मला उचलून छातीला लावले. 'शाबास बाळा आज तुझ्यामुळेच आमच्या कष्टाचे चीज होत आहे,आता शाळा बंद पडली तरी चालेल'. 'हा, तर मावशी मी तुम्हाला एकच विनंती करतो. तुम्ही, याला शाळेत घाला, याला शिकू द्या', साहेब म्हणाले, हे ऐकताच आईचे भांबावणे क्षणात पळून गेले. 'काय, काय सांगितले सायब'? आईने भानावर येऊन साहेबांना विचारले. 'मी परत सांगतो याला शाळेत घाला, याला शिकू द्या, हा शिकला तर तुमच्या कुटुंबाची ही परवड कायमची दूर होईल. पुढे तुम्हाला चांगले दिवस येतील', साहेब म्हणाले. 'बघा मावशी ठरवले तर सारे काही शक्य होते.ते तुमच्यावर आणि तुमच्या मुलांवर अवलंबून आहे'. आता पर्यंतचे जे चालले आहे. ते फक्त माझ्या बाबतीतच चालले आहे. हे मला सारे समजत होते.

म्हणून मी एकदम ध्यान देऊन सारे ऐकत होतो. आता या पुढे साहेब काय सांगतात तिकडे माझे लक्ष लागले. ‘बघा मावशी हा बाळ सकाळी गाई सांभाळायला शाळेच्या ओट्यावर येऊन बसतो, त्याच वेळी शाळा सुरू होते, शाळा अकरा वाजे पर्यंत चालते, तेवढ्या वेळेपर्यंत तो शाळेच्या ओट्यावर न बसता शाळेत बसेल, फरक फक्त येवढाच राहील की तो शाळेच्या बाहेर न बसता आत बसेल आणि तो जो दहा ते साडेदहाच्या सुमारास गाई चारायला काढतो त्या अकरा वाजेला काढत जाईल. गाई गोळा झाल्यावर तो अधून-मधून गाईंनी टाकलेले शेण गोळा करतो, तर ते सारे शेण गाई उठल्यावर पटापट उचलून घेईल. तसे मधल्या सुटीतही तो बराच शेण गोळा करून घेत जाईलच, त्यामुळे त्याला नंतर जास्त शेण उचलावे लागणार नाही. एकच गोष्ट आहे, तो गाई फक्त अर्धा तास उशिरा काढत जाईल. बाकी राहिले इतर कामांचे, तर तो ते सारे करायला नेहमीच्या वेळेवर तर मोकळाच आहे ना? त्यावेळी थोडीच शाळा राहणार आहे? गाई सांभाळायला तो घरचे सारे काम आटोपूनच येतो ना? मग आता सांगा याला शाळेत घातल्यावर तुमच्या कोणत्या कामाची खोटी होते आहे? एवढे सांगून साहेबानी गुरूजींकडे पाहिले आणि सांगितले, ‘गुरूजी आता पर्यंत मी जे सांगितले ते मावशीला समजले नसेल तर तुम्ही तुमच्या भाषेत त्यांना समजावून सांगा’ साहेब म्हणाले. ‘तसं नाही साहेब तुम्ही सांगितले ते मला समजले आहे, पण हे रोजचे आहे, एक दिवसाचे नाही ना? मुलाची जात आहे एक दिवस, दोन दिवस तो हौसेने ते सारे करेलही पण त्याला कायमच्या साठी हे पेलेल का? आईने जरा काळजीच्या सुरात साहेबांना विचारले. ‘काय रे! बाळ मी जे तुझ्या कामाबाबत सांगितले ते सारे तुला समजले आहे का? रोज तू कोणते काम केव्हा करावे हे तुझ्या ध्यानात आले आहे का?’ साहेबांनी सिधे मला विचारले. ‘हो साहेब! पक्के ध्यानात ठेवले आहे मी सारे. मी शाळेत येऊनबी माझे बाकीचे सारे काम टाइमावर करीन, बिलकूल खेळत-खेळत करत जाईन. हो! आई, मी शाळेत जाऊन बी रोजचे काम रोज आपल्या वेळेवर करून टाकत जाईन, पक्का’. मी माझ्याकडून आईला खात्री दिली. ‘बघा मामी तुम्हाला शिकण्याचे फायदे समजायला उशीर लागला तरीबी अजून पुरा समजला नाही. हे आमच्या पैकी

दोन गुरूजी आहेत ना, हे फक्त चौथी पास आहेत, ते आज गुरूजी झाले आहेत, हा बाळ मधले पाच-सात महिने सोडले तर जवळ-जवळ दोन सालापासून या शाळेच्या ओट्यावर बसून गाई सांभाळतो आहे. त्याच वेळी त्याचे नाव शाळेत टाकले असते, तर तो आता दुसरीत राहिला असता. आणखीन सात-आठ साल तो शाळेत शिकला तर तो बी आता मास्तर होण्यालायक झाला असता. आता तर साहेबांनी त्याला कामाची टाकोटाक आखणी करून दिली आहेच. आता मात्र तुम्ही नाही म्हणू नका. शिवाय तो शाळेत दाखल झाला तर शाळा बी कायमची होऊन जाईल.' 'बर का मावशी! मी गोविंदाला सरळ दुसरीत दाखल करणार आहे. पहिलीची परीक्षा तो आताच पास झाला आहे. कारण, आज त्याची पुरी परीक्षा मीच घेतली आहे. शाळेत शिकणाऱ्या नियमित मुलापेक्षा अधिक मुद्येसूद आणि पूर्ण सूलासेवार उत्तरे त्यानेच दिली आहेत. त्याच्यामुळे मी त्याच्यावर खूप खूष आहे. तसे तर त्याने दुसऱ्या इयत्तेच्या पुस्तकावरच्या प्रश्नांचेही पूर्ण बरोबर आणि सविस्तर उत्तरे दिलीच आहेत. त्यामुळे तसे पाहिले तर मी त्याला दुसरी पासचाही निकालपत्र देऊ शकतो. पण नियमाने तसे करता येत नाही. कारण त्याच्यासाठी त्याची शाळेतील हजेरीची आवश्यकता असते. तसेच त्याची शिस्त, वर्तणूक, शिकतांना विद्यार्थ्याने पाळावयाचे नियम या सर्वांबाबत मी दोन्ही परीक्षासाठीचा अभिप्राय एकदमच देऊ शकत नाही. कारण त्याच्या अभ्यासाच्या प्रगती बरोबरच त्या गोष्टींचीही गरज असते. हां, दुसरीत शिकतांना त्याने या गोष्टी त्याच्या शाळेतील वागणुकीने सिद्ध करून द्यावयाचे आहेत. तसेच त्याचे नाव मी नादारीच्या यादीतही टाकणार आहे. नादारी म्हणजे खूप गरीब लोक. नादारीच्या मुलांना सरकार कडून तयार कपडे, पाटी, पुस्तक फुकट मिळतात'. मोठ्या साहेबांनी आईला माहिती दिली. शिक्षणातील बारकावे आईला माहीत नव्हते आणि साहेबांनी जे सांगितले त्यातलेही तिला बरेच काही समजले नाही. मुलाला पहिली आणि तिसरीच्या वर्गाची सवलत मिळणार, कपडे, पाटी, पुस्तके सरकार कडुन मिळणार एवढे मात्र बरोबर कळाले. 'बघा साहेब मी रांडमुंड बाई आहे. मला कशाचाच आणि कोनाचाच आधार नाही. तूम्हीच त्याचे माय-बाप त्याला तुमच्याच हवाले करते आहे. शिकला सवरला तर

बरच होईल. शाळेत शिकणारे पोरे सारे पैसेवाल्याचे आहेत. त्यांच्या नादे हा लागला तर हा बिघडून जाईल, माझा एक हात जाईल, माझ्या गरिबाची म्हातारपणाची काठी जाईल. आता मी याहून दुसर काय सांगू, देवाहून जास्ती तुमच्यावर भरवसा ठेवून मी याला शाळेत टाकते.' शेवटी आईने कबुली देऊन टाकली. नंतर आई म्हणाली 'आता मी जाऊ सायब?' 'थांबा मावशी, आता जास्त वेळ नाही घेणार' असे सांगून साहेबांनी मोठ्या मास्तरांना शाळेचे एक नंबरचे रजिस्टर आणायला सांगितले. मास्तरांनी घाई घाईने जाऊन रजिस्टर आणले साहेबांनी त्याच्यात काय लिहायचे ते लिहिले नंतर त्या नोंदी समोर आईच्या अंगठ्याचा ठसा घेऊन साक्षीदार म्हणून मोठ्या मास्तरची आणि दुसऱ्या एका मास्तरची, आईच्या अंगठ्याच्या ठशाखाली सह्या घेतल्या. मावशी आता तुम्ही जा, साहेब म्हणाले. नंतर साहेबांनी एक नंबरच्या रजिस्टर मध्ये माझ्या नावाची नोंद केली आणि त्या नोंदी समोर नादारी वर्गात असा शेरा मारला आणि त्यापुढे त्यांनी स्वतः सही करून नोंद पक्की केली. त्या साऱ्या नोंदी पुढे सहशिक्षण अधिकाऱ्याच्या आदेशावरून सरळ दुसरीत प्रवेश असा शेरा मारून त्याच्या खाली त्यांनी सही करून ती नोंद बी पक्की केली. नंतर साहेबांनी मोठ्या मास्तरांना ग्रामपंच्यायत आफिसात जाऊन माझी जन्म तारीख आणून रजिस्टरमध्ये नोंद करायची सूचना दिली. नंतर ते माझ्याकडे फिरले आणि म्हणाले. 'आता ओट्यावर बसून गाई सांभाळू नकोस, शाळेत बसून गुरूजी शिकवतील तिकडे लक्ष द्यायचे, थोड्या-थोड्या वेळाने इथूनच या कामड्यांच्या जाळीतून गाईंवर लक्ष ठेवायचे. गाई पांगायला लागल्या की गुरूजींना विचारून, गाईंना ठिकाणावर आणल्या की पटकन शाळेत परत यायचे. सकाळी लवकर उठून तुझे घरातले काम लवकर-लवकर आटोपून शाळेत येत जा. काही दिवसांनी तुला सरकार कडुन नवे कपडे मिळतील. पाटी-पुस्तक मिळेल, तुला मिळालेले कपडे घालूनच शाळेत येत जा.' साहेबांनी मला साऱ्या सूचना समजावून सांगितल्या.'हो साहेब!' असे सांगून मी साहेबांचे पाया पडलो. 'वा, बघा गुरूजी हे संस्कार, मुलाचे पाय पाळण्यातच दिसतात हे खरे आहे ना?' खूष होऊन साहेबांनी गुरूजींना विचारले. 'या मोठ्या घरच्या पोरांनी, सर शाळेत पहीलंदाच शिरले तेव्हा सुद्धा साधा नमस्कार

केला नाही आणि आम्ही साहेबांना नमस्ते करतांना याने नुसते पाहिल्या बरोबर फटक्यात उठून कांबड्यांच्या ताटीत तोंड घालून त्यांना नमस्कार केला. तेव्हा पासूनच तो साहेबांच्या मनात घर करून बसला आहे', आईकडे बघून मोठे मास्तर म्हणाले. मोठ्या साहेबांनी गुरूजींना सूचना दिल्या 'शाळेत शिस्त वाढवा, कोणालाही नरमाईने घेऊ नका, पण मर्यादाही सोडू नका, या मुलाची दुसरीतील प्रगती मला कळवा त्यात याला सरळ दुसरीत प्रवेश दिला असल्याचेही नमूद करा, आता तपासणी आणि चाचणी घेण्याचे काही काम राहिले नाही. आता मला निघाले पाहिजे.' 'साहेब जेवण करून गेले असते.' मोठ्या गुरूजींनी साहेबांना विचारले. 'गुरूजी या वेळी राहू द्या, पुढच्या वर्षी येईन तेव्हा पाहू.' साहेब म्हणाले. सारे जण मिळून त्यांनी गाडीची तयारी केली. साहेब गाडीवर बसले, बैलगाडी नगरदेवळा वाटेला निघाली. बैलाच्या गळ्यातील घंट्यांचा मंजूळ आवाज करत गाडी डोळ्या पुढून अदृश्य झाली. मी पहिल्यांदा दुसरीच्या वर्गात शिरलो. बसायला जागा शोधू लागलो. अय इकड ये, इकड ये असा इशारा करत मुले मला त्यांच्याकडे बसायला बोलवत होते. मी काही तरी नवीन भलतेच करून आलो आहे, म्हणून मोठे साहेब सारे गुरूजी आणि त्याची एक दीड घंट्यापासून काही तरी भानगड चालू होती असे त्यांना वाटत होते, त्यांना माझ्याकडून जाणून घ्यायच्या प्रयत्नात ते होते, म्हणून जो तो मला त्याच्या जवळ बसायला बोलवत होते. कारण आपल्या शाळेच्या ओट्यावर बसून कामड्यांच्या ताटीतून आपली गंमत पहाणारा, गाई  चारणारा हा मुलगा आपल्या दुसरीच्या वर्गात कसा हे त्यांच्या ध्यानात येत नव्हते. शाळा सुटल्याची घंटा झाली. मुले आप-आपले दप्तर हातात घेऊन मला वेढा घालण्याचा प्रयत्न करू लागले. माझे ध्यान मात्र गाईंकडे लागले होते. जो मला आडवा येऊन वेढायचा प्रयत्न करत होता. त्याला बाजूला ढकलून मी पुढे-पुढे जायची वाट काढत चाललो होतो. आज पासून साहेबांनी सांगितल्याप्रमाणे मला कामाची जुळवणी करायची होती आणि त्या प्रमाणेच कामाची सवय लावायची होती.



# कैरीची देन

मेजघाटहून आल्या नंतर नवीन-नवीन गाई येऊ लागल्या होत्या. नऊ ते दहाच गाई जमत होत्या. त्यांचे शेणही जास्त पडत नव्हते. रोजपेक्षा जवळ-जवळ अर्धा घंटा गाई मी उशिरा चरायला काढत जाणार होतो. त्यामुळे गाईंचे मालक काय म्हणतील याची मला काळजी लागली होती. दहा-बारा शेणाचे पोहोटे उचलायला मला जास्त वेळ नाही लागला. ते आवरून मी फटक्यात गाई चारायला काढल्या. एकदा गाई निपाने गावाच्या शिवेवरील नाल्याला लावल्या आणि एका निंबाच्या झाडाच्या सावलीत जाऊन बसलो. आज पासून माझ्या जीवनात केवढा मोठा बदल झाला होता. मी शाळेत जायला लागलो होतो. कोणाच्या ध्यानी, मनी, स्वप्नीही न येणारी अशी गोष्ट घडली होती. बराच वेळ मी त्याच तंद्रीत होतो. नंतर लक्षात आले की घरी जाळायला लाकडे नाहीत. एकदा गायींकडे जाऊन त्यांच्यावर नजर मारून आलो. गाई चरण्याच्या नादात होत्या, दोन वासरे पाण्याच्या आसऱ्याने झाडाच्या सावलीत बसले होते. काळजी करण्यासारखे काही नसल्याने, एक-एका झाडाखाली जाऊन त्यावर लाकडे आहेत का ते पाहू लागलो. पहाता-पाहाता एका आंब्याच्या झाडाखाली बरीच हिरवी पाने आणि छोटे मोठे डगळे पडलेले दिसले. मी त्याच्या खाली जाऊन पाहिले, त्या झाडावरील आंब्यांची मालकाने बेडनी (तोडणी) केलेली होती, मला खूप खुषी झाली कारण माझा दोन्ही कडून फायदा होणार होता. लाकडे तोडता येणार होते आणि डाल्या

पानात लपून राहिलेल्या कैऱ्याही शोधून तोडता येणार होत्या. नजर मारून लाकडे आणि कैऱ्या तोडता-तोडता एक चांगलीच मोठी कैरी झाडाच्या शेंड्यावरील फांदीच्या देठाला लटकून वाऱ्याच्या झोता बरोबर इकडून तिकडे झोके खात होती. तिला पाहताच मला तिचा मोह झाला. झोका-झोकाने, वाऱ्याच्या सपक्याला तोंड देत स्वताःचा तोल सांभाळत मी त्या कैरी असलेल्या डहाळीकडे सरकू लागलो. ती फांदी बारीक आणी बऱ्याच उंचीवर होती. तिच्या वर किंवा खाली उभा राहता येईल अशी जाड आणि दमदार फांदी नव्हती. तशी एक फांदी होती. पण ती कैरीच्या फांदी पासून बरीच खाली होती. ती पण बरीच बारीक आणि लांब अंतरावर होती म्हणून, ती माझा बोझा सांभाळेल का नाही याचा मला अंदाज येत नव्हता. झाडाच्या शेंड्याचा भाग सोडला तर झाडाला जाड-जाड डाल्या खूब होत्या. म्हणून कैरीच्या फांदी खालील फांदीचा वापर करावा लागणार होता. मग डोक्याचा वापर केला, खालच्या फांदीवर पाय ठेवून कैरीच्या फांदीला लटकत-लटकत जायचे, अंगाचा भार वरच्या बारीक फांदीवर तोलत-तोलत, पुढे-पुढे कैरी पर्यंत सरकत-सरकत जायचे. झाडावर चढणे, या फांदीवरून त्या फांदीवर लटकत फिरण्याची मला सवय होतीच.एखाद्या बारीक फांदीवर फिरायचे झाले म्हणजे तिच्या वरच्या फांदीवर अंगाचा भार कसा तोलायचा याचा मला सराव झाला होता. शेवटी देवाचे नाव घेऊन मी कैरीच्या खालच्या फांदीवर पाय ठेवून कैरीच्या वरची फांदी पकडून त्या फांदी वर अंगाचा भार तोलून उभा राहिलो, आणि वरच्या फांदीवर भार तोलला की खालच्या फांदीवरचे पाय पुढे-पुढे, सरकवत-सरकवत, पुढे-पुढे सरकू लागलो. कैरीत आणि माझ्या हातात जेमतेम बिल्लासेक (वीतभर) अंतर राहिले असेल, पुढे सरकण्यासाठी मी एक पाय पुढे टाकला आणि वर पकडलेल्या फांदीचा मागचा हात सोडून पुढे पकडण्यासाठी तो मोकळा केला. जशी फांदी मागच्या हातातून सोडली तसा अंगाचा सारा तोल फांदी पकडलेल्या एका हातावरच आला, तोच सारा भार खालच्या फांदीवर आला आणि काड-काड करून ती तुटली. जशी पाया खालची फांदी तुटली तसा मी वरच्या फांदीला लटकून गेलो. माझा सारा भार वरच्या फांदीवर गेला आणि ती पण काड-काड करून तुटली. मी सारे भान

विसरून गेलो, काय झाले आणि काय करू हे समजण्याच्या आत मी खालच्या दुसऱ्या फांदीवर आडव जाऊन आदळलो. आडवा पडल्यामुळे बरोबर खालची फांदी कंबरे खाली आली, पाय एका बाजूला तर डोके दुसऱ्या बाजूला मधे फांदी, एकदम उताणा, बाकी पुढे नंतर काय झाले ते कळालेच नाही. जेव्हा भानावर आलो, तेव्हा दिवस डोक्या वरून खाली सरकू लागला होता. मी जमिनीवर उताणा पडलेला होतो. जेवन्या पायाची गुडघ्यातून घडी झालेली होती. जिकडे-तिकडे झाडावरून खाली टाकलेले सुकलेले लाकडे आणि सात आठ कैऱ्या पसरलेल्या होत्या. मी उठायचा प्रयत्न केला पण पाठ वाकडी झाली होती. ती ताठ झालीच नाही. तसाच आडवा पडून हळू-हळू पाय नीट केले, पाय तर नीट झाले, पण जेवन्या पायाचा पंजा तिरपा झाला होता. तो थोडासा पण धक्का लावू देत नव्हता. हळू-हळू झोपूनच उलटा झालो. दोन्ही हातावर भार देऊन पाय आवरून दोन्ही गुडघ्यांचा आधार घेत, हात आणि गुडघ्यावर अंगाचा भार टाकून बसलो. अंग डावे उजवे फिरवून कंबर मोडण्याचा प्रयत्न केला, पण ते झाले नाही. शेवटी बसूनच खाली पसरलेल्या लाकडातून एक जाड-जूड लाकडाचा तुकडा घेण्यासाठी हातावर भार टाकत सरकत- सरकत त्या लाकडाजवळ गेलो. त्याचा आधार घेऊन हात आणि लाकडावर भार देत उठून उभा राहिलो. जेवना पाय जमिनीवर टेकला जात नव्हता. तसाच डाखोरा पाय आणि लाकडाच्या आधारे हळू-हळू चरणाऱ्या गायी कडे गेलो. नदी काठचा हिरवा गवत खाऊन साऱ्या गाई सुस्त झाल्या होत्या आणि झाडाच्या सावली खाली बसून वाघूळ करत बसल्या होत्या. वाटेतच आवळीचे मोठे झुडूप होते. त्याचे कोवळे-कोवळे गोंडे तोडून ते बिछान्या सारखे जमिनीवर पसरवले, नंतर त्यावर आवळीचे पान फुले पसरवले. लांब-लांब डाल्यांच्या साली काढल्या. पसरवलेल्या पाना- फुलावर जेवन्या पायाचा गुडघा ठेवला आणि पुरा गुडघा पसरवलेले गोंडे, पाने, फुले यांनी लपेटला, मग तो लपेटा आवळीच्या सालीने पक्का बांधला. तो पाय जमिनीवर न टेकता डावा पाय आणि लाकडाच्या आधारे गाई जवळ येऊन परत एक नजर गाई वर टाकून आधीच्या निंबाच्या झाडा खाली येऊन बसलो. भाकरी बांधून आणायला वापरलेल्या फाटक्या उपरण्यात

आस्ते- आस्ते कैऱ्या गोळा करून बांधून ती हातातल्या लाकडाच्या एका शेंड्याला बांधली. गाई  गोळा करून लाकडाच्या आधारे, गाईंच्या मागो माग चालत घरी यायला निघालो. गाव जवळ आल्यावर गाई आपापल्या गोठ्याकडे निघून गेल्या. मी लंगडत-लंगडत लाकडाच्या आधारे घरी पोहोचलो. झाडावरून पडल्यामुळे मूक्का मार लागलेला होता, त्याचा खूब कन्हारा आला होता. अंग गरम झाले होते. तसाच जपून-जपून हात पाय धुतले, चूल पेटवले, कशा बश्या भाकरी थापल्या. नंतर रोजच्या सारखा अंगणातल्या कपडे धुवायच्या दगडावर येऊन बसलो. संध्याकाळी आधी अप्पा आले नंतर अण्णा आले. अप्पाने माझा पाय पाहिला आणि विचारले काय झाले रे? 'कैऱ्या तोडतांना झाडावरून पडलो.' ते ऐकून अप्पा कलंदर काकाला बोलवायला निघून गेला. अण्णा माझी पाठ, अंग सारे दाबून कोठे-कोठे मार लागला आहे ते पाहात होता. दळणाला उशीर झाल्यामुळे आई घाई-घाईने घरी येत होती. येऊन पहाते तो हा माझा जास्तीचा प्रसाद वाढून ठेवलेला. 'काय रे! काय झाले?' आईने विचारले. मी आईला सर्व सांगून टाकले. आईने गरिबीच्या नावाने दहा पाच शिव्या दिल्या.'अप्पा अजून कामावरून आला नाही का? कुठे-कुठे लागले रे तुला'? आईने विचारले. मी खुणेनेच पाय आणि कंबर दाखवली. 'काय सांगू तुला आता? तू झाडावर का चढलास हेही मी तुला विचारू शकत नाही, कारण  ती आपली रोजचीच गरज आहे', आई डोळे पुसत म्हणाली. सारे काही आजच घडायला पाहिजे होते का, आई खोल गेलेल्या आवाजात म्हणाली. 'बर अण्णा तू पुढे जाऊन बघ तर जरा अप्पाला उशीर का होतो आहे ते', आईने अण्णाला सांगितले. तो ताडकन जागेवरून उठला आणि जायला निघाला, तो घराबाहेर थोडा पुढे जात नाही तोच समोरून अप्पा येतांना दिसला. कलंदर काका त्याच्या मागे-मागेच येत होते. अण्णा गरकन मागे फिरून परत आला आणि आईला म्हणाला 'आई अप्पा आणि कलंदर काका येत आहेत. हे जवळच आले आहेत'. तेवढ्यात कलंदर काकाही घरात आले. 'भाबीजी क्या होगया मून्नेको?' त्याने आईला विचारले. 'क्या रे तू भौत उठापटक करता रहता है बोले'? त्यांनी मला विचारले. महिने दो महिने मे कूछ ना कूछ आफत लाता ही राहता है। क्या किया इस बार?

त्याने हसत-हसत मला विचारले. 'नही काका मै आमके झाडपरसे गिर गया', मी कण्हत-कण्हत सांगितले. या अल्ला, अरे कमनशीब, पैर बीर तो नही तोडके लाया?' त्याने काळजी करत विचारले.'काका पयर कू अवर कंबरकू बी मार लगा है', मी म्हणालो. 'अरे पगले पेड क्या तेरा गुलाम है, जो तू तेरे मनसे किसी भी हलकी बारीक फांदिपर जाकर उसकू कहेगा की ले मुझे संभाल'? कलंदर काका जरा नाराज सूरात म्हणाले.'संभलके नही चढने आता क्या?' त्यांच्या रागात प्रेम होते. कलंदर काका मला बोलण्याच्या नादात लावून माझे ध्यान दूखण्यावरून हटविण्याचा आणि हळू-हळू मार लागलेली जागा चोळून-चोळून, किती आणि कोठे-कोठे कसा मार लागला आहे ते तपासत होता. माझे त्यांचे बोलणे ऐकण्यापेक्षा दुखण्याकडेच ध्यान होते. जस-जसा तो कमी जास्त दाबून दुखणे तपासत होता तस-तसे माझे कण्हणे कमी जास्त होत-होते. 'अबे अब चूप कर यार, इतना क्यूं कन्ह रहा है? ऐसी तोहमत मत कर, मुझे मेरा काम ठिकसे करने दे, सूना ना तूने, अब चूप कर.' काका म्हणाले, अप्पा माझा पाय पकडून बसले होते, अण्णा पाठीकडून बसले होते, तेही समजावत मला म्हणाले , 'भैया जरा कळ काढ ना, आता तू कळ काढशील ना, उद्या मी तुला एक केळ घेऊन येईल, बस आता कळ काढ', अप्पा म्हणाला. अप्पा रोज केळी टाचणीच्या कामाला जात होता. कलंदर काकांनी पाय आणि कंबर इकडे तिकडे दाबून-दूबुन मार लागलेली जागा तपासून पाहिली. मग त्याने पिसोडीतून एक तेलाची बाटली काढून पाय आणि कंबरेला तेल लावून आधी सपाट तळहाताने रगडून मालीश केली. भाबीजी 'कूछ जादा मार नही लगा है', असे बोलून त्याने आईकडे पाहिले, पण त्याने बोलतांना आईला डोळे मिचकावून तोंडातून आँ असा इशारा केला, हे मी बघून घेतले होते. पण मी रडायला न लागता चूप राहिलो. रडून काही फायदा होणार नाही हे मला समजून गेले होते. 'मै इसका पाव ठीक करता हूँ, नदीमें जाकर आवळीका पाला लेकर आ तो बेटे', कलंदर काका अण्णाकडे पाहून म्हणाले. 'काका उसने जंगलसे आते आतेच पावको भोत आवळीका पाला बांदके लाया है, अप्पा म्हणाला. 'आरे वा तू तो भोत हुशार हय रे. मार लगे जगेपे आवलीका पाला बांधने का तेरेकू किसने

सिकाया रे'? कलंदर काकाने मला विचारले. 'वो क्या है ना काका, मांगले टाइमकू मेरा हात बगलमेसे निकल गया था ना तब तूमनेच मेरे बगलमे आवलीका पाला बांधा था ना, बस मेरे ध्यानमे रह गया, अवर अब मैने सब पाव आवली के पालेसेच बांद लाया', मी सांगितले. 'वा बेटे भोत खूब, तू तो आधा बैदच बन गया रे'? काका खूष होऊन म्हणाले. 'भाबीजी ये भोत हुशार निकलेगा', काका आईकडे पाहात म्हणाले. 'बस करोना भाऊजी, उसकी जादा बढाई मत मारो, आज सुबहसे उसकी बढाई पे बढाई मय सून रही हूँ. अवर वो बढाईच उसकू नजर लगा गई, अवर ये तोहमत वो घरमे लेके आया', आई म्हणाली.'भाबिजी घरमे दगड पेंड हय क्या?' काकाने आईला विचारले. 'हय तो इधर लेकर आओ'. 'क्यूँ भाऊजी?' आईने विचारले. 'इसके पावका पंजा मूंदनमेसे उखड गया है, पेंडके मददसे उसको बैठाना पडेगा नही तो ये खडा नही हो सकेगा', काका म्हणाले. 'अरे बापरे' आईने कपाळाला हात लावला. 'आरे भाबीजी तूम तो इन बच्चोसे कम हिम्मत वाली हो. देखो ये बच्चा इतना होकर भी कितनी हिम्मत लगाकर मेरे सामने बैठा हय. चलो चलो जल्दी करो, अभी मार ताजा ताजा है बैठाना जरा सोपा जायेगा', काका घाई करू लागले. आप्पाने पटकन उठून, घरातून जात्या वरून ते दगडी पेंड घेउन आला. नंतर मला उजव्या कानीवर झोपवून माझ्या पायाचा तळवा जमीनीवर नीट उभा केला. म्हणजे पायाचा अंगठा वर आणि करंगळी जमिनीवर आडवी करून, पायाचा तळवा उभा येईल असा पाय ठेवला. अण्णाला पंजाचे पाची बोटे नीट लायनीत राहातील असे दोन्ही हातांच्या तळव्यात पक्के पकडायला सांगितले. तळवा उभाच राहायला पाहिजे, आडवा अजिबात होऊ द्यायचा नाही अशी कडक सूचना अण्णाला दिली. अप्पाला पायाची पोटरी पक्की दाबून ठेवायची, जराशी पण फिरू द्यायची नाही असे समजावले, आईला माझे डोळे एका हाताने झाकून ठेवायचे आणि दुसऱ्या हाताने हळू-हळू पाठीवरून हात फिरवत राहायला सांगितले. सगळ्यांनी आप आपल्या मिळालेल्या सूचना प्रमाणे कामांची तयारी केली. नंतर काकांनी ते जात्याचे पेंड माझ्या पायाच्या मूंदनावर ठेवून, मुले खेळाची मांडोली फिरवतात तसे हलक्या हाताने दाबून-दाबून मागे पुढे फिरवू लागले. मी घसा

फाडून-फाडून ओरडत होतो. 'बेटे घबराने का नही, तू तो भोत बहादूर बच्चा हय ना'? मला समजावत-समजावत त्यांचे काम त्यांनी चालूच ठेवले. 'तूम बी घबरानेका नही, उसकू चिल्लाने दो, इस टाइम को उसकी किव करनेकी नही, मै बोलूंगा छोडो तबच छोडने का, बिलकूल पक्का पकडकर रखो, ढिलाई मत करना'. काका असे बोलत बी होते आणि त्यांचे काम पण चालू ठेवत होते. जागा टाळून-टाळून ते पेंड फिरवत होते. पेंड फिरवता-फिरवता एकदम खट्ट आसा आवाज आला. 'या खुदा, बेटे खुदा खैर करे' असे म्हणून कलंदर काकांनी पायावरचा पेंड खाली ठेवला आणि एक मोठा सुस्कारा सोडला. 'आब सब जने छोड दो', आसे सांगून ते थोड शांत बसले. 'बच्चे की किस्मत आच्छी है उसका पाव बिलकूल ठिकसे बैठ गया है', असे म्हणत त्यांनी माझ्या पाठीपरून हात फिरवला. 'आब डरने की कोई बात नही', कलंदर काका आईला धिर देत म्हणाले. 'पावका इतना बखेडा हो गया फिरबी घरतक कैसा आयाबे'? त्यांनी मला लाडाने विचारले? 'जो हो पर तूने भोत हुशारी का काम कीया बेटे पावको आवलीके पालेमे बांधके रखा नही तो ये काम इतना सोपा नही था', काका माझी पाठ थापडत म्हणाले. 'जो देखो वो उसके गूनच गा रहा हय', आई म्हणाली. 'क्यूँ और क्या होगया भाबीजी' काकांनी विचारले, तेव्हा आईने आप्पा आणि अण्णाच्या समोर आज शाळेत घडलेली सारी गोष्ट सांगितली. 'वा, भाबिजी भोत अच्छा किया तूमने इसकू स्कूलमे भरती कर दिया. क्या पता ये आगे चलके जिंदगीमे क्या बन जायेगा और क्या कर गूजरेगा? हॉ एक बात और भाबीजी, कोई बी आदमी किसकी बढाई बेफिजूल नही मारता, उसकी कूछ तो बात होती है. इससे येच बात साबीत होती है', कलंदर काका म्हणाले. 'आई, तू खरीच गोइंदाला शाळेत घातले? आई तू खूब चांगले केले. मी रोज शाळे समोरून जातो, तेव्हा मला सारखे चुकल्या-चुकल्या सारखे वाटायचे. माझ्या भाऊपेक्षा धाकले-धाकले पोरे शाळेत जातात आणि माझा भाऊ गाई चारतो. तो शाळेत जात जाईल, मोठा होऊन नौकरी करीन मला नौकरी वाल्याचा भाऊ म्हणतील.' अप्पा आईला म्हणाला. 'हो ना आई, मला असेच वाटायचे बर का' आन्नाबी म्हणाला, आणि माझ्याजवळ येऊन म्हणाला 'आता गाई-बीई चारायच्या

नाहीत बरका. बस शाळा शिक', 'गोऱ्या सायबा सारखा डोक्यावर उलटी बोधोनी घालून आपला गोइंदा कितला चांगला दिसेल?' त्याने आईकडे पाहून तिला विचारले. अण्णा आणि अप्पा आप-आपल्या सोईच्या गप्पा मारण्यात गुंग झाले.'अच्छा चलो इसका पाव तो ठीक हो गया अब इसकी कंबर क्या कहती है येबी जरा देख लेंगे', कलंदर काका म्हणाले. 'रात होने कू आई है. खाना खाने पे घरपे मेरा रस्ता देख रहे होंगे' असे सांगून कलंदर काकाने दगडाचे पेंड उचलून एका कोपरय्‌ात ठेवले. मी त्यांनी पायावर केलेल्या कामामुळे धास्तावलो होतो. पण कंबरेचे दूखणे पण सोय खात नव्हते. पाठीत कळा येणे आणि चमका येणे चालूच होते. जी होईल ती तकलिफ आताच एकदा होईल, पण दुखणे कायमचे निपटून जाईल, अशी हिम्मत करून मी ताठ झालो. कलंदर काकांनी पाठीला त्यांच्या पायाचा घूटणा लावून दोन्ही हातांनी माझी छाती पकडून मागे ओढून, गुडघ्याने जोराने कंबरेला ठोसा मारला मी एकदम जोराने किंचाळलो, 'अरे बच्चे जरा सबुरी पकड, इसमे जरा तकलिफ होगी, जरा हिम्मत करके सहन करले', असे सांगून एका मागून एक असे दोन तीनदा त्यांनी परत-परत ठोसे मारले. पण त्याच्याने त्यांचे समाधान झाले नाही. मग त्यांनी मला जमिनीवर उलटे झोपवले. हाता बोटाने दाबत-दाबत दुखण्याचे नेमके ठिकाण चाचपडून पाहिले. जिथे-जिथे त्यांनी दाबतांना मला कळ लागत होती, ती जागा ध्यानात ठेवून, त्या-त्या ठिकाणी त्यांनी दुसऱ्या हाताच्या बोटानी दाबून ठेवले. नंतर त्यांनी माझ्या कंबरेखाली गोधडीची घडी ठेवायला सांगितली. त्या गोधडीच्या घडीवर मला उलटा झोपवून कंबरेचा भाग त्या घडीवर ठेवायला लावला. नंतर ज्या ठिकाणी बोटांनी कंबरेच्या भागावर दाबून ठेवले होते. त्या भागावर त्यांच्या पायाची गुडघ्यातून घडी करून पोटरी ठेवली आणि पुरी ताकत लावून त्या पोटरीने दाबून ठेवून, एका मागून एक असे दोन-तीन वेळा झटके दिले. प्रत्येक झटक्यावेळी कड-कड अशी कंबर वाजली आणि दोन मिनिटात कंबरेतली चमक येणे कमी झाली.'चलो भाबीजी होगया काम, अब उसकू बुढ्ढा होने तक डरनेका काम नही रहा. और हाँ बेटे अपनी औकातके बाहर जाकर कोई काम मत करना समझा'? त्यांनी मला कडक भाषेत समजावले. 'कभी भी कोई काम जिद मनमे रखकर

मत करा कर समझा'? त्यांनी बजावले. 'उसमे कभी-कभी ही जीत मिलती है, हमेशा नही ध्यानमे रख'. जाता-जाता कलंदर काकानी आईला खबरदार केले, 'याला एक महिना जास्त चालू फिरू देऊ नका. नाही तर परत बखेडा उभा राहून जाईल'. कलंदर काका पुढे बोलणार तोच आई म्हणाली 'नाही-नाही भाऊजी तस होणार नाही. नंतर कलंदर काका निघून गेले. नंतर आम्ही तिघांनी मीठ भाकरीचे जेवण करून झोपून गेलो. मला मात्र रात्रभर झोप लागली नाही. पायात आणि कंबरेत ठणक येत होती. दुसऱ्या दिवसापासून मी फक्त घरातले काम आणि शाळा करू लागलो. दुसऱ्या दिवशी मी पायाला आवळीचा पाला बांधून शाळेत गेलो. गाई वाले गाई घेऊन येत होते, त्यांना माझा पाय मोडला असल्याने मला चालता येत नाही. म्हणून गाई चारने बंद आहे असे सांगून परत केले. गूरूजींनी विचारले 'अरे गोविंदा पायाला काय झाले'? मी जंगलात घडलेली सारी हाकीकत साऱ्या पोरांसमोर गुरूजींना सांगितली ती ऐकून गुरूजींनी साऱ्या मुलांना प्रश्न विचारला 'शाळा शिकता-शिकता हा जसा काम करतो तसे कोण कोण घरी काम करतो ते उभे राहून सांगा'. मुलांनी बसूनच उत्तर दिले 'नाही गुरूजी, आम्हीतर शाळेचाच अभ्यास करतो'. 'तुम्ही अभ्यास करता? दिवस भर अभ्यासच करता तुम्ही? कोणता अभ्यास करता दिवसभर, बघू तुमच्या पाट्या? तुम्ही जर दिवसभर अभ्यासच करतात तर काल साहेबांनी विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे का नाही देता आले एकालाही'? गुरूजींनी सर्वांना रागाने प्रश्न विचारला. 'गुरूजी त्यावेळी आम्ही उत्तर याद करत राहायचो, त्याच्या पहिलेच हा उत्तर देऊन टाकायचा ना. कारण त्याचे सारे उत्तर पाठ आहेत गुरूजी', पोरांनी गलका करीत उत्तर दिले. 'कोठून उत्तरे पाठ करतो तो, त्याच्या जवळ पाटी पुस्तक आहेत का?' गुरूजींनी विचारले, 'तो तुमच्या सारखा शाळेत येत होता का ? तो दिवस भर गाई चारत जंगलात फिरतो, तुमच्या सारखा काम सोडून दिवसभर अभ्यास करत बसतो का? दिवसभर गाई चारतो, सकाळी-संध्याकाळी, घरातली कामे करतो तरी तो तुमच्यापेक्षा आधी उत्तरे देतो खरे आहे ना'? 'हो गुरूजी' मुलांनी उत्तर दिले. 'मग तुम्ही का नुसती मोठाईकी मारता, तुम्ही शाळेत शिकतात याची'? गुरूजींनी विचारले. 'आजपासून ध्यानात ठेवा, तुम्हाला

रोज घरी अभ्यास देत जाईन ते तूम्ही तोंडी पाठ करून यायचे, मी रोज ते घेत जाईन' समजले सर्वांना? 'हो गुरूजी आम्ही बरोबर करून आणत जाऊ' सारे मुले आनंदाने म्हणाले. 'मग आम्ही पण त्याच्या सारखे पटापट उत्तरे देत जाऊ ना गुरूजी'? पोरांनी विचारले. 'अगदी बरोबर, पण पक्के ना'?'हो गुरूजी एकदम पक्के'. सारे मुले आनंदात म्हणाले. गुरूजींनाही हुरूप आला आणि त्यांच्या डोक्यात एक युक्ती आली. ते म्हणाले, 'ठीक आता तुम्ही म्हणाले, ते खरेच करून दाखवणार की नुसता टाइम पास केला हे आपण पुढच्या सोमवार पासून पाहू'.'म्हणजे कसे गुरूजी?' एका पोराने विचारले.'हे बघा मी सोमवार ते शनिवार जे शिकविले त्यावर सोमवारी सकाळी पहिला तास आपण बाजाबाजी लावू, अर्धे मुले एका बाजूला आणि अर्धे दुसऱ्या बाजूला, कोणता गट जास्त बरोबर उत्तरे देतो, तो जिंकला, जो गट जिंकेल त्या गटाच्या एका मुलाला, हरलेल्या गटाच्या एका मुलाने एक गोळी द्यायची, पक्के.' हे ऐकून सारे मुले आनंदाने उड्या मारू लागले.'प्रत्येक गटाने दुसऱ्या गटाला पाच-पाच प्रश्न विचारायचे, आधी एक गट प्रश्न विचारील, नंतर दुसरा गट पहिल्या गटाला प्रश्न विचारील, ठरले पक्के'? गुरूजींनी सर्वांना विचारले. 'हो गुरूजी ठरले पक्के'. सारे मुले आनंदाने म्हणाले, 'विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे बरोबर की चूक हे गोविंदा सांगत जाईल, सर्वांच्या लक्षात आले'? गुरूजींनी विचारले. 'हो' सारे मुले म्हणाले. ठरल्याप्रमाणे सोमवारी ही बाजाबाजी झाली. वर्गात हसण्याचा आणि टाळ्यांचा गलका होत होता. ही बातमी साऱ्या शाळेत पसरली, दुसऱ्या सोमवार पासून साऱ्या शाळेतल्या वर्गांमध्ये टाळ्यांचा आवाज होऊ लागला. रस्त्याने येणारे-जाणारे हा गलका ऐकून शाळेच्या ओट्यावर जमू लागले. कामड्यांच्या जाळीतून तेही हे पाहू लागले आणि पोरांच्या गलक्यात गलका करू लागले, टाळ्या वाजवू लागले. अशा प्रकारे साऱ्या शाळेचे वातावरण बदलून गेले. गावाच्या चौका-चौकात याची चर्चा होऊ लागली. या बदलामुळे पोरही रोज मन लावून अभ्यास करू लागले. साऱ्या शाळेत खेळी-मेळीचे वातावरण पसरले. यामुळे गावातील लोकही खूष होते. गुरूजी शाळेत येऊ लागले.



# पूराशी सामना

मेजघाटहून येऊन दहा-पंधरा दिवस निघून गेले. रोहिणी लागली होती. पावसाळा सुरू झाला होता. आभाळात बादल गर्दी करू लागले होते. शेत मालक पेरणी आधीच्या कामाला लागले होते. जिकडे-तिकडे शेतात खत टाकण्यासाठी बैलगाड्यांची धावपळ सुरू होती. शेतात खत पसरविणे, वखरणे, पसरविलेले खत मातीत मिसळवने, शेतातील कचरा वेचणी करने ही कामे जोरात चालू होती. एके दिवशी रोहिणीच्या पावसाने गावाला व आजू-बाजूच्या शिवाराला असे झोडपले की विचारता सोय नाही. माझे गाई चारने बंद झाल्यामुळे आई आणि मी घरातले कामे लवकर-लवकर आवरून मजूरांबरोबर कामाला जाऊ लागलो होतो. मी लहान होतो म्हणून मला अर्ध्या माणसाची मजुरी मिळायची. त्या दिवशी आम्ही माना पाटील काकांच्या बदरखे रस्त्यावरील कुंभाऱ्या शिवारातील शेतात कचरा वेचण्याच्या कामाला गेलो होतो. दिवस डोक्या वरून कलला होता. बादलांच्या गडगडाटाला सुरुवात झाली, गरा-गरा भोवरी मारणारा सोसाट्याचा वारा वाहू लागला, विजेचा कडकडाट सुरू झाला, लांबच-लांब विजा चमकू लागल्या, विजांच्या लखलखाटाने सारा आभाळ झळकला जाऊ लागला, सारे वातावरण एकदम हादरून गेले. काही वेळातच पावसाचे टपोरे-टपोरे थेंब पडू लागले, पाहाता-पाहाता पावसाच्या धारा सरळ दोरासारख्या न तुटता पडू लागल्या, सारे मजूर, जीव जितरब चिन-भिन होऊन, आसरा मिळेल तिकडे धावू लागले.

काही वेळातच निंबू सारख्या गारा पडू लागल्या, कोणाला कोणाची सूध नाही राहिली. पाटील काकांच्या शेतात मोठे आंब्याचे झाड होते. सारे मजूर त्या झाडाखाली उभे होते. एवढे मोठे झाड, पण ते इकडून-तिकडे झोकांड्या खात होते. त्याच्या पानावर पडणाऱ्या गारांच्या माराने आणि वाऱ्याच्या सपक्याने त्यांचा इतका सूळ-सूळाट आणि खड-खडाट होत होता, की खेटून-खेटून उभ्या लोकांना एक दुसऱ्याचे बोलणे ऐकू येत नव्हते. गारांच्या धारा इतक्या दाट होत्या की पाच हाताच्या अंतरावरचे काहीच दिसत नव्हते. आईने मला पदरा खाली पोटाला घट्ट चिटकून पकडले होते. सारे जन भिजून एकदम चिंब झाले होते. आईच्या झाकलेल्या पदरातून इतके पाणी झिरपत होते, की मला हवा घेता येत नव्हती. सारखा-सारखा माझा दम कोंडला जात होता आणि हवा घेण्यासाठी मी तडफडत होतो. त्यामुळे आई घाबरू लागली होती. थोडी मिळणारी हवा पण पदर ओला झाल्याने त्याच्यातून येणे बंद झाली आणि हवा न मिळाल्यामुळे मी जमिनीवर आदळलो. सारे मजूर घाबरले. पण त्यांना मी पडण्याचे कारण ध्यानात आले नाही, एक जण जरा हुशार होता त्याने पटकन माझ्या तोंडावरून आईचा पदर काढला. मला हवा मिळताच मी उठून बसलो. माझी दशा पाहून आई सारखी रडत होती. सगळ्यांनी मोकळा श्वास घेतला. आईने पटा-पट माझे मुके घेतले. मला घट्ट छातीला धरून शांत बसून राहिली. अदमासे दोन-अडीच घंट्याने पाऊस बराच कमी झाला. तो पर्यंत संध्याकाळ होत आली होती. जिकडे तिकडे पाणीच पाणी पसरले होते. कोठेच जमीन उघडी नव्हती. परत पाऊस सुरू ना होवो या भीतीने साऱ्या मजुरांनी घरचा रस्ता धरला. आभाळात बादल अजून भरलेच होते. रस्ता पानंदीतून होता. पानंद पाण्याने तुडुंब भरली होती. म्हसोबाच्या मंदिराजवळून अम्रावंती नदी वहाते. तिला दोन्ही थडी तट्ट भरून भयंकर पूर आला होता. नदीचा उगम मोठया डोंगरातून असल्यामुळे पुरातून लहान मोठे झाडेही वहात जातांना दिसत होते. पांदीतून गुडघ्यापर्यंत चे पाणी होते. त्यामुळे पाण्यात काट्या-कूट्याची जास्त भिती होती, म्हणून एक-एक पाऊल सांभाळून-सांभाळून टाकावे लागत होते. पुढे आसाब्याचा नाला आडवा येणार होता. नेरी आणि वडगाव शिवारातील शेत मळयाच्या शिवारातील साऱ्या पावसाचे

पाणी त्या नाल्याला येऊन मिळते. नेरी आणि म्हसोबा शिवारातील साऱ्या जीव, जितरब आणि माणसांचा वापर याच नाल्यातून होतो. त्याला दोन्ही थडी तट्ट पूर आला होता. पुराच्या लहान मोठ्या लाटा उफळतांना दिसत होत्या. नाल्याच्या काठाला लागून शिवलाल मामा व लोटन मामा यांची गावपांढरीचे शेती आहे, तिच्यात त्यांचे खळे होते. शेती बागाइती होती. त्यावेळी विजेवर किंवा डिझेलवर चालणारे मोटरपंप नव्हते. त्यामुळे बागाईत मोटेच्या पाण्यावर व्हायची. आम्ही आसाब्यापर्यंत आलो. पुढे नाला दोन्हीथडी भरून वहात होता. गावातील लोकांनी, जंगलातून येणारे जे नाल्याच्या पुराने तिकडच्या काठावर अटकले होते, त्यांना काढण्यासाठी विहिरी वरील मोटांचे नाडे (जाडे दोर) काढून ते एकमेकांना बांधून जाड आणि लांब दोरखंड तयार केले होते. रतनकाका आणि लोटनमामा यांचे मळे नाल्याच्या आमने-सामनेच्या काठावर होते. त्या दोरखंडाचे एक टोक रतनकाकाच्या शेतातील झाडाच्या खोडाला तर दुसरे टोक लोटनमामांच्या शेतातील झाडाच्या खोडाला बांधले होते. ते दोरखंड पक्के पकडून एका मागून एक असे अडकलेले माणसे, जनावरे इकडच्या काठावर आणले जात होते. नाल्याच्या पुरातून येतांना फार सांभाळून यावे लागत होते, कारण पुरा बरोबर लहान मोठे झाडे-झूडूपे, काट्या-कुट्यांच्या जाळ्या, वाहून येत होते. काही पाण्यावर तरंगून येत होते तर काही पाण्या खालून वहात जात होते. दोरखंड धरून नाला ओलांडणाऱ्यांच्या पायात ते अटकून त्याला त्याच्या बरोबरच ओढून नेण्याची भिती होती. म्हणता-म्हणता आईची आणि माझी पाळी आली, नाडा हातात मजबूत पकडून नाल्याचा पूर ओलांडून तिकडच्या काठावर जायचे होते. नाडा हातात कसा पकडायचा, पुरात पाऊल पुढे टाकायचा असतांना मागचा हात सोडून त्या हाताने पुढे कसा पकडायचा हे आईने आधी ओलांडून जाणाऱ्या लोकांकडे बोटाने दाखवून मला समजावून सांगितले होते. आई पुढे होऊन हातात नाडा पकडून पुरात उतरली, तिने सांगितले ये आता माझ्या मागे. आई एक-एक पाऊल पुढे चालत होती, तिचे पाहून-पाहून माझी पण हिम्मत वाढत होती. मी हळू-हळू आईच्या मागे-मागे चालला होतो. थोडे-थोडे करत आमच्यातले अंतर वाढत होते. पुराच्या लाटांच्या हेलकाव्याने नाडा पण खालीवर होत

होता. आई, नाडाची पकड, पुरातून वहात येणाऱ्या झाडा-झूडूपा पासून बचाव, असे तिन्हीकडे ध्यान द्यावे लागत होते. जस-जसा नाल्याच्या मध्य भागाकडे जाऊ लागलो तस-तसा पाण्याची खोली वाढत चालली होती. हातातल्या नाड्याचे हेलकावे लहान मोठे होत होते. पाण्याची खोली आधी पाय बुडे पर्यंत होती. ती वाढत-वाढत कंबरेच्या वर गेली. अचानक माझ्या दोन्ही मांड्यांच्या मधे, बोरीच्या काट्यांची जाळी अटकली. बोरीचे वाकडेकाटे चड्डी आणि कूरचीत अटकले. काही मांड्यांना तर काही गुडघे पोटरीत घुसू लागले. लाटांच्या झटक्याने ते जास्ती-जास्तीच कातडीत घुसून कातडी फाडू लागले. एक हाताने नाडा सोडून ती जाळी काढायचा प्रयत्न करायला गेलो आणि दोन्ही हातातून नाडा सुटला. जंगल शेतातून निघालेल्या नाले नदीच्या पाण्याला खूब ओढ असते. जसा हातातून नाडा सुटला तशी मी पहिली गटांगळी खाल्ली आणि पुराच्या पाण्या बरोबर वहात जाऊ लागलो. पुराच्या पाण्यात उलट-सुलट गटांगळ्या खात चाललो होतो. मला वाहून जातांना नाल्याच्या दोन्ही काठावरील लोक मला पहात होते. त्यांनी जोर-जोराने ओरडायला सुरुवात केली. 'आरे धावारे धावा, पोरगा पुरात वाहून चालला आहे, त्याला कोणी तरी वाचवा. ज्याला पोहता येते त्याने पटकन उडी मारा, जल्दी करा, वाचवा त्याला'. आईने धीरच सोडून दिला. 'अरे वाचवा रे, माझ्या पोराला. रडता रडता ती ओरडत होती. तिला रडतांना पाहून काठावरील लोक म्हणत होते 'भाभी तुम्ही आधी काठावर या. हिम्मत सोडू नका, हाताचा नाडा सोडू नका, मुलाचे आम्ही पहातो आहे . तुम्ही आधी काठावर या'. एकच गलबला सुरू झाला. 'आरे लवकर कोणी उडी मारा रे'. आरडा ओरड ऐकून आजू बाजूचे शेतवाले पण धावून आले. कोणी तरी पुरात उडी मारली. उडी मारणारा लोटन मामाचा सूरतसिंग होता. तो तिरप्या चालीने पोहत-पोहत पुढे सरकत होता. काठावरील लोक त्याला धीर देत होते. पुराचा जोर जास्त असल्याने सूरतसिंग जरा जास्त तिरपाईने पोहू लागला. गटांगळ्या खाऊन-खाऊन माझे हात पाय गळून गेले होते. त्यांच्यात पुराच्या जोराला विरोध करण्याची बिलकूल ताकद नव्हती. पाणी जिकडे ओढेल तिकडे मी गटांगळया खात वाहात चाललो होतो. मी पुरा शुद्धीवर नव्हतो. मी बेजान

लाकडा सारखा पाण्याच्या ओघात वाहात होतो. अचानक धप्पकन माझ्या पाठीवर जड हाताची थाप पडली. नंतर ते हात हळू-हळू खांद्याकडे सरकत येऊन माझे खांदे पक्के पकडून मला ओढायला सुरुवात केली. काठावरील लोकांनी, मोटीला बांधून ठेवलेल्या शेली म्हणजे दोऱ्या काढून त्या एकीला एक बांधून लांब दोर तयार करून तिच्या एका टोकाला जाड लाकडाचा ठोकळा बांधला आणि नाल्याच्या वरच्या बाजूला जाऊन तो पुरात अशा बेताने सोडला की तो बरोबर वाहात जाऊन सूरतसिंग जवळ जाईल. बाकीच्या लोकांनी सूरतसिंगला इशारा करून तो ठोकळा पाण्यात सोडल्याचे दाखवले. सूरतसिंगने पाहिले आणि एका हाताने मला धरून, दुसऱ्या हाताने पोहत-पोहत त्या ठोकळ्याकडे जाऊ लागला. ठोकळा पकडण्याच्या प्रयत्नात आम्ही बरेच लांब वाहून गेलो. सूरतसिंग पोहण्यात पटाईत होता. त्याने बरोबर तो ठोकळा पकडला. त्याने ठोकळ्या समवेत त्याला बांधलेला दोर पकडला, काठावरील लोकांनी हो हल्ला करून तो दोर ओढायला सुरुवात केली. त्यांनी काळजी करत-करत हिम्मतीने आम्हाला काठावर ओढून घेऊन पाण्याच्या बाहेर काढले. तो पर्यंत आईही हळू-हळू, चालत-चालत काठावर येऊन गेली होती. पळतच पुढे येऊन तिने सूरतसिंगचे पाया पडले, तो नात्याने भाचाच लागत होता 'बेटा तू देवा सारखा धावलारे माझ्या पोराला वाचवायला', आई त्याला म्हणाली. 'आत्या माझ्या पेक्षा या लोकांचे आभार मान, ते ओरडले नसते तर मी केळीच्या बागेत, केळीच टाचत राहिलो असतो' सूरतसिंग म्हणाला. काठावरच्या लोकांनी सुरतला शाबासकी दिली. सुरतने मला हळूच बगलेत उचलून काठावरून सपाट जमिनीवर पालथे टाकले, मी बेशुद्धच होतो. पुराच्या पाण्यात गूचक्या घेतांना माझ्या नाका तोंडातून पाणी पोटात गेले होते. सुरतने नंतर हळू-हळू पाठीवर दाब देऊन-देऊन माझ्या पोटातले पाणी काढले. आई बाजूला बसून डोळे पुसत होती. बऱ्याच वेळाने मी हळू-हळू शुद्धीवर येऊ लागलो. थोडा आराम केल्यावर आईने हात पकडून मला उभे केले आणि हात धरून घरी घेऊन आली.



# आप्पाचा शोध

त्या साली पाऊस टाईमो-टाइम आणि खूप झाला होता. शिवारो-शिवारी पीक खूप चांगले आले होते. शेतकरी आणि मजूर सारे खूष होते. जुन्या काळी आता सारखा तास-दोन तासांचा पाऊस पडत नव्हता. पडायला लागला की दोन-दोन, तीन-तीन दिवस संततधार पडत राहायचा. गुरे ढोरे चिखलात चारायला नेण्या शिवाय, दुसरे कोणतेच काम करता येत नव्हते. वेळ पडली तर झाडा झटक्याला पण तशा पावसातच जावे लागायचे, दळण-दाने, तेल, मीठ, आठ-आठ दिवसाचे घरात भरून ठेवावे लागे. न थांबता तीन दिवस पाऊस पडला तर मजुरांची आठवडा भरची मजुरी बुडायची. कारण अखंड पावसाने शेतात जमलेले पावसाचे पाणी जमिनीत जिरून काम करण्या इतपत सुकल्या बिगर काम करताच येत नव्हते. मग दुसरे बिगर शेतीचे काम शोधावे लागे. अशावेळी अप्पा किल्ल्याच्या डोंगराला जाऊन सागाच्या दांड्या तोडून आणायचा आणि आखतवाडे, मोहोळाई, बदरखे या गावात नेऊन विकायचा. चिमनापूरचा किल्ला आखतवाड्या पासून तीन ते साडेतीन कोसावर होता. त्या दांड्या शेतकरी वख्खर, कोळपी, लाकड्या नांगर बनवण्यासाठी वापरायचे. ते सारे शेतीच्या कामासाठी लागणारे नेहमीचे साधन होते. पुरुष किंवा सव्वा पुरुष लांबीच्या आणि एक मूठ ते सव्वा मूठ गोलीच्या दांड्या अशा साधनांना लागतात, अशा चार ते पाच दांड्या अप्पा आणत असे. ओले लाकूड फार जड असतात, तेवढे वजन घेऊन ते तीन ते

साडे तीन कोस यायचे. सकाळी कोंबड्याने बांग देते वेळी ते घरातून बाहेर पडायचे, ते रात्री अंधार पडल्यावर घरी यायचे. रात्रीची शिळी भाकर घेऊन जायचे. रस्ता बघितलेला असल्याने आणि खांद्यावर कुऱ्हाड असल्याने त्यांना भिती वाटत नव्हती. हा दांडीचा धंदा किल्ला पराड्यातील डूक्करदरी, हरनबारी, मोरबारी या जंगली भागातून व्हायचा, कारण तो दाट जंगलाचा भाग होता आणि त्याच भागात जास्त साग होता. गाव-गावचे दांड्यातोड त्याच भागात यायचे. येणारे कमी अधिक एकाच वेळी जंगलात ठरल्या ठिकाणी जमायचे. त्यांच्यातील एक जण खाली थांबायचा बाकीचे झाडावर चढून दांड्या तोडायचे. कोणी जंगल खात्याच्या सायबाचा जवळपास सुगावा लागला, की तो ठरलेल्या आवाजात शिट्टी मारायचा, सगळे हुशार होऊन झाडावरच पानांच्या आड दपून जायचे आणि खालचा माणूस एखाद्या दाट करवंदीच्या जाळीत जाऊन बसायचा. एखाद्या वेळी दिवस-दिवस वाया जायचा.

असाच एक दिवस उगवला. अप्पा नेहमी प्रमाणे भाकरी आणि कुऱ्हाड घेऊन दांड्या तोडायला जंगलात गेला. त्या दिवशी त्याला जंगलात कोणीच सोबत मिळाली नाही. सारी हरनबारी आणि डूक्करदरी तो फिरला पण मापात बसणाऱ्या दांड्याही सापडत नव्हत्या. फिरून-फिरून दिवस कलता झाला, पण हाती काहीच लागले नाही फिरता-फिरता शेवटी तीन दांडया जवळ-जवळच सापडल्या. त्या तोडून गोळा करून त्या एकत्र बांधत असतांना अचानक दूर अंतरावर त्याला मानसांच्या बोलण्याचा आवाज आला. त्याने बांधणे सोडून करवंदीच्या जाळीत लपला. कोणीच जोडीदार नसल्यामुळे तो खूप घाबरून गेला होता. आभाळात बादलांनी दिवस झाकला गेला होता. बाहेर ऊन नसतानाही तो घामा-घूम झाला होता. अदमासे एक घंटा झाला तरी कोणी आला नाही, पण बोलणे मात्र ऐकू येत होते. नंतर बादलांच्या गडगडाटाला सुरुवात झाली आणि येणारा बोलण्याचा आवाज हळू-हळू दूर होत गेला आणि येणेच बंद झाले. अप्पा करवंदीच्या जाळीतून बाहेर आला. त्याने घाई-घाईने दांड्या बांधल्या आणि डोक्यावर घेतल्या.पावसाच्या धारा सुरू झाल्या. अंधार वाढत चालला होता. तसाच काट्या कुट्यातून वाट काढत अप्पा घरच्या रस्त्याला लागला. हळू-हळू वाट काढत जात असतांना,

अप्पाला एकदम धस्स झाले, कारण मघाचाच बोलण्याचा आवाज त्याच्या मागूनच येऊ लागला होता. त्यांच्या बोलण्यातून अप्पाला स्पष्टपणे समजून गेले होते की, बोलणारे वन अधिकारीच होते. अप्पा सोनेवाडी गावाच्या रस्त्याने चालला होता. अप्पा तेव्हा अदमासे जेमतेम अकरा ते साडे अकरा सालचे असतील. आता धीर, हिम्मत धरून-धरून कितीक धरणार? त्यातून आज तो एकटाच होता. अप्पा घाबरला होता. आता काय करावे हे त्याला सुचत नव्हते. काही झाले तरी आता आपण पकडले जाणार हे त्याला समजून चुकले होते. पकडले गेलो तर आपल्याला कन्नडलाच नेतील हे नक्की, हे पण त्याला कळून चुकले होते. आता त्याची हिम्मत खचू लागली आणि त्याची पुढे जाणारी पावले जड होऊ लागली. वरून पाऊस सारखा चालू होता. चालता-चालताच त्याला शेवटची आशा वाटली. जरा हिम्मत वाढवून थोडे पावले चाललो तर पुढे एक पाय विहीर आहे. आपण तिच्यात उतरून, लपून बसू, पाणी पिऊ, थोडे आराम करू. हे साहेब लोक निघून गेले की मग आपण बाहेर निघून घरी जाऊ. ही अक्कल डोक्यात येताच अप्पाचे पाय त्यांचे-त्यांचे फटाफट उठू लागले. विहिरी जवळ येताच तो डोक्यावरील मोळी समेत त्या विहिरीत उतरला. विहिरीला पायऱ्या होत्या, त्याने डोक्यावरची मोळी पाण्या खालच्या एका पायरीवर ठेवून विहिरीच्या कठड्याला पाठ लावून गुपचूप बसून राहिला. फक्त एकच फिकर होती, ते साहेब लोक पण पाणी प्यायला विहिरीत उतरले तर मग काय करायचे? बस गुन्हा कबूल करून घ्यायचा. मागून ऐकू येत असलेले बोलणे जवळ-जवळ येऊ लागले, तसा अप्पाचा जीव खालीवर होऊ लागला. ते पायविहीरी जवळ आले आणि तिथेच थांबले. अप्पाचे सात गेले आणि पाचच राहिले. तो नाकाने घ्यायचा श्वासाचा पण आवाज होऊ देत नव्हता. बिलकूल गडीगूप आणि एक भिती त्याच्या पोटात कळ धरू लागली, जर ते पण विहिरीत आले तर? जे होईल ते पाहू अशी त्याने मनाची समजूत काढली आणि देवाचे नाव घेत बसून राहिला. पाऊस थांबायचे नाव घेत नव्हता. आता तर त्याचा जोर वाढतच होता. हा पाऊस आता किती वेळ चालतो आणि काय चालतो देव जाने. जो पर्यंत पाऊस थांबत नाही तो पर्यंत कदाचित ते लोक पण हालणार नाहीत.

अप्पा मनातच बोलला. तो पर्यंत अप्पाला पण बाहेर निघता येणार नव्हते. होता-होता दिवस बुडाला, अप्पाला आता जास्त वेळ विहिरीत रहाने धोक्याचे वाटू लागले. कारण विहीर फार जुनी होती आणि अशा विहिरीत पान सापाची फार भिती असते. पण दुसरा इलाज पण नव्हता. आता मात्र अप्पांचा धीर सुटत चालला होता. त्याच्या अंगातील कपडे वल्लेचिम झाले होते. म्हणून तो थंडीने कुडकुडत होता. थोडी जरी कुड-कुडतांना चूक झाली तर पाण्यात पडण्याची भिती होती. पाण्यात पडलो तर पाण्याचा आवाज होईल आणि ते लोक येऊन मला पकडून घेतील, अशी दुहेरी भिती अप्पाला सतावत होती. हवालदिल पणे अप्पा देवाचे नाव घेत बसला होता. इकडे घरी, एरव्ही अंधार पडायच्या आत संध्याकाळ पर्यंत हमखास घरी पोचणारा अप्पा अंधार पडला तरी न आल्याने आम्ही सारे जण चिंता करत बसलो होतो. आता काय करावे, आईला काही उमजत नव्हते. काय झाले असेल पोराला? दांडी तोडतांना झाडावरून तर पडला नसेल? पडला असेल तर जास्त तर लागले नसेल? लागले असेल तर त्याला कोण उठवेल? सूद-बीद तर नसेल गेली त्याची? तसे असेल तर केव्हा सूदीवर येईल? एक ना दोन, ती बेचैन होऊन विचारांच्या जाळ्यात अडकत चालली होती. जोराचा मार लागून झाम-बीम तर नसेल आली.....? नको-नको असे भलते-सलते विचार......? नकोरे देवा असे काही दाखवू नको, असे काही करू नको रे बापा आई कळवळली.तो आहे तर माझी सारी ही मथुरा काशी आहे. नाही,नाही झाडा-बीडा वरून तो पडणार नाही, मग ? त्याला सायबा-बियबाने तर नाही पकडून नेला असेल? अरे देवा याचा काय भरवसा? हो असे होऊ शकते. पण अप्पा फार चतुर आणि हुशार आहे. आजू-बाजूचा सारा सुगावा घेऊनच तो कोणते पण काम करतो. मग नेमके काय झाले असेल ? पावसा-बिवसात तर नाही अटकला? तसा कितीही पाऊस असला तरी तो सरंधार पावसात पण धाडस करून बागे-बागे आता पर्यंत येऊनच गेला असता. काही केल्या आईला चैन पडत नव्हती. एकदम आईला काय झाले कुणास ठाऊक, आई अण्णाला म्हणाली. तू नथी फफूकडे जाऊन कंदील घेऊन ये, बापू तू जाळण्याच्या लाकडातून दोन मोठे-मोठे लाकूड घेऊन ये'. अण्णा कंदील घेऊन आला, मी दोन

लाकडे घेऊन आलो. तो पर्यंत आईने जुन्या कापडाच्या चिंध्या काढून ठेवल्या होत्या. एका लाकडाला एका टोकाला त्या चिंध्या गुंडाळल्या, नंतर कंदील आणि गुंडाळलेल्या चिंध्यावर घासलेट टाकून काडी लावून पेटवले. आईने कंदील व एक लाकूड हातात घेतले. दुसरे लाकूड अण्णाच्या हातात देऊन म्हणाली, 'बापू तू घरी थांब आम्ही अप्पाला घेऊन येतो'. ते ऐकून अण्णा एकदम दचकला आणि आईला म्हणाला. 'आई तू येशील अप्पाला शोधायला?' 'मग काय झाले?' आई म्हणाली. 'नको, नको तू नको येऊ. तू बाई माणूस इतक्या रात्री अंधारात कुठे माझ्याबरोबर भटकशील ? तू राहू दे, मी बापूलाच बरोबर घेऊन जातो. मी पुरा रस्ता आणि जंगल पाहिला आहे आणि जंगलात आराम करण्याचे व थांबण्याचे सारे ठिकाणे मला माहीत आहेत', अण्णा आईला म्हणाला. 'आरे बाबा तुम्ही पोर भाई जंगलात आशा किट्ट अंधारात कुठे भटकणार'? आई म्हणाली.'आग आई तू अजिबात काळजी करू नको, सकाळचा उजाळा होये पर्यंत आम्ही अप्पाला घेउनच येतो, बघच तू', अण्णा आईला म्हणाला. 'अरे अण्णा हा एवढासा जीव याला कुठेकुठे ओढत फिरशील', आई काळजी करत म्हणाली. 'आई तू बिलकूल काळजी करू नको 'अण्णा म्हणाला. 'मी अजिबात थकणार नाही' मी आईला म्हणालो. 'मी अण्णाच्या मागे-मागे बरोबर जाईन. ही काठी पाहिलीस का? कोणी जर आम्हाला अडा आला तर त्याला मीच लंबा पाडून टाकीन', आईला हातातली काठी दाखवत मी म्हणालो. 'बर-बर अण्णा याला सांभाळून ने आणि सांभाळून आण. विच्चू काट्याकडे ध्यान देशील.जातांना आरामाचे सारे ठिकाण रस्त्याच्या आजूबाजूला थोड्या अंतरावर जरी असल्या तरी त्या झोपड्या-झापड्या पण पाहून घेशील', आईने आम्हाला सूचना केली. 'हो आई काळजी करू नको', अण्णा म्हणाला. असे सांगून आम्ही घरा बाहेर पडलो.म्हसोबाच्या पानदीने पेम्बाव वरून आम्ही सोनेवाडी खेडयावरून रस्त्याच्या आजूबाजूचे छोट्या-मोठ्या झाडांचे आसरे, झोपड्या-झापड्या, पहात-पहात चाललो होतो.घरून निघून आम्हाला अदमासे देढ घंटा झाला असेल. अण्णा पुढे मी मागे-मागे चालत एक दुसऱ्याच्या मनातील भिती घालवत आम्ही चाललो होतो. बिना कामाची वायफळ बडबड करत आम्ही चाललो होतो. गप्पांमध्ये मुद्दाम एक

दुसऱ्याच्या नावांचा उल्लेख करत होतो. मतलब असा होता की चालता-चालता आमच्या नजरेतून जरी अप्पा सुटला तर चुकून अप्पाला आमचा आवाज गेला तर तो आम्हाला आवाज देऊन थांबवून घेईल. बरीच पायपीट झाल्यामुळे आणि झोपेच्या ताणामुळे आम्ही दोघेही बरेच थकलो होतो. कुठे तरी थोड थांबून, थोडा आराम करावा असे आम्हा दोन्हींना वाटू लागले होते. तेवढ्यात अण्णा म्हणाला 'थकला कारे?' 'नाही अण्णा' मी म्हणालो. 'मी तर थकलो रे, दिवस भर काम करून आलो आहे ना?' अण्णा न कचरता म्हणाला. 'अण्णा मग आपण थोडा आराम करून घेऊ' मी अण्णाला म्हणालो. 'अरे पण इकडे इतका पाऊस झाला आहे की एका पण झाडाखाली बसायला सुकी जागा नाही. आपण असे करू, इथून थोड्या अंतरावर पायवीहीर आहे, तेथे झाडाखाली पाराचा ओटा पण आहे, पायवीहीरीत उतरून पाणी-बीणी पण पिऊन घेऊ', अण्णा म्हणाला, थोडं चालून गेल्यावर ती पायवीहीर आली. एक मोठा पसारा असलेल्या गूलमोहोरच्या झाडाखाली मोठा चौडा ओटा त्याच्या खाली बांधलेला होता. सारख्या चालीमुळे आमच्या अंगातून घामाच्या धारा वाहात होत्या. कूरचीच्या कोपऱ्याने तोंडावरचा घाम पुसत आम्ही ओट्यावर जाऊन बसलो. थोडा आराम केल्या नंतर, अण्णा म्हणाला 'चल पायवीहीर कशी असते तुला दाखवतो. आम्ही दोन्ही भाऊ पायविहीरच्या काठावर आलो. मी कधी पायविहीर पाहिली नव्हती. विहिरीत उतरायला पायऱ्यांचा जिना पाहून मला खूब नवल वाटले. कारण तसा जिना विहिरीत बांधलेला मी कधीच पाहिला नव्हता. 'अण्णा या विहिरीत जिना का बर बांधला रे? आपल्या कडे साऱ्या विहिरीत असे जिने थोडीच असतात?' मी अण्णाला विचारले. 'आरे ही जंगलातली विहीर आहे. जंगलात येणारे माणूस, जीव जितरब, बरोबर दोर बादली घेऊन फ़िरतात का? जेव्हा तीस लागते तेव्हा कोणी पण पायऱ्या उतरून पाणी पिऊन तीस भागवतात. आपल्या कडच्या विहिरी गावात किंवा गावाच्या जवळपास असतात ना ? तेथे माणसांची, जीव-जनावरांची, पोरा-सोरांची सारखी येव-जाव असते, विहिरीवर सारखी गर्दी असते ना म्हणून त्यांना पायऱ्या ठेवत नाहीत'. असे बोलत-बोलत हातात कंदील घेऊन अण्णा पुढे-पुढे मी मागे-मागे चालत विहिरीचा जिना

उतरत चालत्नो होतो.'आरे इकडे ये पटकन इथे जिन्याच्या पायरीवर कोणी तरी पडला आहे', अण्णा घाई-घाईने ओरडून मला म्हणाला, ते ऐकून मी झपा-झप उड्या मारत पायऱ्या उतरत अण्णाकडे गेलो. भीत-भीत अण्णाने कंदीलचा उजाळा त्या इसमाच्या तोंडावर टाकला आणि त्याच्या तोंडातून खोल आवाज आला 'अप्पा'. ते बोल ऐकताच मी ओरडलो, 'वो बापरे'. अण्णाने फटक्यात कंदील माझ्या हातात दिला, अप्पाचे डोके मांडीवर घेतले. अप्पाचा श्वास चालू होता, पण अप्पा बेशूध्द होता. त्याच्या अंगातले कपडे ओलेचिंब होते, अंगातून तापाच्या वाफा निघत होत्या. 'आरे अप्पाचे तळपाय चोळ लवकर-लवकर', अण्णा घाई-घाईने मला म्हणाला. तो अप्पाचे तळहात चोळू लागला, मी पटकन खाली बसून अप्पाचे तळपाय खसखस चोळू लागलो. अण्णा 'अप्पा-अप्पा' करून त्याला आवाज देऊ लागला. त्या आवाजाने अप्पा हळू-हळू भानावर येऊ लागला. अर्ध्या भानावर असतांना अप्पा म्हणाला, 'साहेब लोक गेले का? तू कोण आहे?' 'आरे अप्पा मी अण्णा आहे'. ते ऐकताच अप्पा म्हणाला' तू? तू इथे कसा? मी कुठे आहे'? 'अप्पा आपण सारे पायविहीरीतल्या पायरीवर आहोत. पण तू इथे कसा आला? काय झाले'? अण्णाने अप्पाला विचारले? अप्पा तापाने फन-फनत असल्याने त्याला बोलणे सूधरत नव्हते. 'थांब तू थोडावेळ असाच शांत पडून राहा,बोलू नको' अण्णा म्हणाला. 'आम्ही आहोत, आता मनातली सारी भिती काढून टाक. काहीच काळजी करू नको. तुझा थोडा थकवा गेला का मंग आपण वर पारावर जाऊ. अण्णा म्हणाला. त्याला अण्णाच्या मांडीची ऊब मिळत होती. काही वेळा नंतर अप्पा बराच सावध झाला. मी पाय चोळणे चालूच ठेवले होते. अप्पाच्या डोळ्यातून सारखे आसवे वाहात होते. त्याचे आसू पाहून अण्णा आणि माझ्या पण डोळ्यातून आसू वाहू लागले होते. तेवढ्या फन-फनत्या तापात पण अप्पा माझ्या डोळ्यातले आसू पुसण्यासाठी उठायचा प्रयत्न करू लागला, अप्पा अजूनही पुरा भानावर नव्हता. त्याला एकदम वन अधिकाऱ्यांची आठवण झाली, त्यांची भीती अजून त्याच्या मनातून गेली नव्हती. तो उठायचा प्रयत्न करू लागला, अण्णाने त्याच्या मानेखालून हात घालून त्याला उठून बसवले. 'चला वर

आता, आपण  मोकळ्या हवेत जाऊ, तिथे अप्पाला अजून ताजेपणा येईल', अण्णा म्हणाला. त्याने अप्पाचे हात पकडून त्याला उभे केले मी कंदील हातात घेऊन उठलो. तापामुळे अप्पा बिलकूल निशक्त झाला होता, म्हणून त्याचा सारखा तोल जात होता. अजून पण त्याचे सारे अंग तापाने लोखंडा सारखे तापले होते, त्याच्या तोंडातून गरम वाफा येत होत्या. अण्णाने त्याच्या बगलेत हात घालून बखोटे पक्के पकडले आणि आधार देत आम्ही एक-एक पायरी चढून वर आलो. गुलमोहोर झाडाच्या खोडाच्या आजू-बाजूची जागा बरीच कोरडी होती, अप्पा खोडाला पाठ लावून बसला, आम्ही त्याच्या आजूबाजूला बसलो. 'तूम्हाला कोणी सांगितले मी इथे आहे. असे'? अप्पाने अण्णाला विचारले. 'तू हे सांग सिधा घरी न येता तू इथे कशा करता बसला होता'? अण्णाने त्याला विचारले? तो प्रश्न ऐकताच अप्पाला काहीतरी आठवले, तो म्हणाला 'अण्णा बघ मी पडलो होतोना त्या पायरीच्या खालच्या पायरीवर पाण्यात दांड्याचा बोझा दपवून ठेवला आहे. सांभाळून जा आणि त्या काढून आण, बापू तू कंदील घेऊन जा अण्णाला उजाळा दाखव'. 'का बर दपवून ठेवल्या त्या?'अण्णाने विचारले. 'तू आधी त्या घेऊन त ये, मंग सांगतो तुला सारी बात' अप्पा म्हणाला. आम्ही दोन्ही जन पटकन उठून विहिरीत जाऊन दांड्यांचा ओझा घेऊन आलो. मोळी पारावर पटकून आम्ही पण वर येऊन बसलो. अप्पा आता बराच हुशारीत आला होता. 'आता थोडा आराम करून आपल्याला लगेच निघावे लगेल. तांबड फुटण्यात आले आहे, आपल्याला खूब लांब जायचे आहे. मला झपझप चालणे होणार नाही' अप्पा म्हणाला. 'चला मंग उठू आपण', 'अप्पा तू चालण्याची घाई करू नको, तुझ्या अंगातला ताप अजून उतरला नाही', अण्णा म्हणाला.'चालरे, चालीत पडल्यावर होईल, आपोआप कमी', अप्पाने अण्णाला सुनावले. 'तू अस कर तुझी कूर्ची काढून घे, ती खूब ओली आहे, मी माझी कूर्ची देतो, ती तू घाल, त्याच्याने तुझा ताप उतरून जाईल'. अण्णाने अप्पाला सांगितले.'आणि या कूर्चीने या गारठ्याचा त्रास होणार नाही', असे सांगत अण्णाने त्याच्या अंगातली कूर्ची अप्पाला घालायला काढून दिली. अप्पाने पण त्याच्या अंगातली कूर्ची काढली आणि अण्णाची कूर्ची अंगात घातली, त्याला लागलीच लागणारी

सर्दी कमी वाटू लागली. अण्णाने अप्पाची कूर्ची अंगात न घालता ती खांद्यावर घेतली. 'कारे तू उघडाच राहिला ना' अप्पा म्हणाला. 'आसू दे अप्पा घंट्या दोन घंट्याने काही बिघडत नाही, चला आता आपण लवकर-लवकर', अण्णा म्हणाला. अण्णाने ओझे डोक्यावर घेतले, मी कंदील हातात घेतला, बिगी-बिगी रस्त्याला लागलो. रात्र किती झाली काही समजत नव्हते. कारण आभाळात अजून पण बादल दाटून भरले होते. आम्ही पेंम्बावच्या मंदिरा जवळ आलो असणार, तो समोरून एक भला मोठा लांडगा कंदिलाचा उजेड पाहून लांबूनच डोलत-डोलत निघून गेला. त्याच्याकडे बोट दाखवत अप्पा म्हणाला, 'बघ रे बापू, तो समोरून लांडगा कसा डोलत-डोलत चालला आहे'. मी त्याला बघूनच घाबरून गेलो, ? 'अपुऱ्या उजाळ्यात त्यांची भिती नई वाटत' ? मी विचारले ? 'आरे आम्ही तीन-चार लोकांच्या टोळीत आहोतना म्हणून, तो एकला चाल करत नाही, ते आमच्या आजू बाजूने निघून जातात', अप्पा म्हणाला. आमच्या गप्पा गोष्टी मध्ये रस्स्ता किती चालून आलो ते कळले नाही. आम्ही म्हसोबाच्या चौथऱ्याजवळ आलो तेव्हा रतन काकाच्या शेतातील जागल्याच्या झोपडीत कोंबडा बांग देत होता. आसाबाच्या मशिदीजवळ आलो, तेव्हा आभाळात शुक निघत होता. इकडे आभाळात बादल खूबच कमी होते.आम्ही गल्लीच्या कोपऱ्यावर गेलो, तेव्हा आमची नजर घराकडे गेली, तर आई ओट्याच्या पायरीवर खांबाला पाठ लावून दिवा समोर ठेवून गल्लीच्या कोपऱ्यावरच नजर लावून बसली होती. समोरच्या अंगणात कंदिलाचा लाइट दिसताच आई धावतच गल्लीच्या कोपऱ्या पर्यंत पळतच आली, आणि अप्पाला मिठीत घेत रडू लागली. 'आई, तू कशाला रडते आहे? चल घरात.' असे बोलून अप्पाने आईचा हात पकडला आणि घरी आणले. घरी आल्यावर आम्ही तिघांनी आईचे पाया पडले. तोवर अण्णाने आणलेली मोळी भिंतीला लावून उभी केली होती. अप्पाच्या अंगाला हात लावताच आईने झटकन हात मागे घेतला आणि म्हणाली 'का रे अंगात इतका ताप? अण्णा तुझी कूर्ची कुठे आहे'? 'घरात चला आपण सारे जण, आता उजाळा पडला आहे, थोडावेळ घरात शांत बसू. लवकर-लवकर कामे आवरून कामाला पण जायचे आहे', अप्पाने त्याचा दिवस भरचा किस्सा

आणि अण्णाने आमचा साऱ्या रस्त्याभरचा किस्सा, आणि अप्पा आणि आमची भेट कशी झाली तो किस्सा आईला बित्तंबात सांगितला. ते ऐकून आईने भगवंताचे लाख-लाख आभार मानले. आईने डोळे पुसले आणि जो तो आप आपल्या कामाला लागले. शाळेची साल अखेरची परीक्षा संपली. दुसऱ्या इयत्तेत मी पहिल्या नंबरने पास झालो. पाचोऱ्याच्या साहेबांच्या सूचने प्रमाणे माझा अहवाल मुख्याध्यापक साहेबांनी पाचोऱ्याला लिहून पाठवला. त्यात त्यांनी साहेबांना कळवले की त्याची आता लगेच तिसरीची पण परीक्षा घेऊन घ्यायला काहीच हरकत नाही. मुख्याध्यापकांचा अहवाल वाचल्या नंतर ते गुरूजींशी बोलले, त्यांच्याकडे विषयवार चर्चा करून त्यांना लेखी आदेश पाठवून माझी तिसरीची परीक्षा घेण्याचे आदेश दिले. लगेच माझी तिसरीची परीक्षा घेतली गेली. तिच्यातही मी चांगल्या मार्कांनी पास झालो. तसा अहवाल परत सायबांना पाठविण्यात आला, आणि मला चौथीत प्रवेश देण्यात आला. माझी नियमित शाळा सुरू झाली.



# आग्यावेताळ

गावात एक नवीनच चर्चा सुरू झाली. खाजोळा आखतवाडे गाव शिवेवर बापूजींच्या शेताच्या बांधावर जे पिंप्रिचे झाड आहे. त्या झाडावर आग्यावेताळ, जाळाचा गोळा बनून निघतो. तो आजूबाजूच्या शेतशिवारात रात्रीच्या वेळी फिरत असतो. रात्री दहा ते अकरा वाजेच्या दरम्यान तो निघतो. त्यासोबतच अशीही आवळ उठली की, तो ज्या भागातून फिरतो त्याच भागातून केळीचे घोडे, संत्रे, मोसंब्या चोरीला जाऊ लागले आहेत. तो आग्या त्या पिंप्रिच्या झाडाखालून हवेत आगीचे गोळे फेकत-फेकत चालतो. त्याचा त्या शिवारातील शेतकऱ्यांवर खूब जरब बसली होती. एक पण शेतकरी रात्रीच्या वेळी बाग राखायला जात नव्हते. मजूर लावून मजुरांना बाग राखायला पाठवायचे. भिती अशी होती की ज्याला आग्या लागतो, तो त्याच्या आगीत जळून जागीच मरून जातो. आग्या हा एक भयंकर भूत असतो. अण्णा, बापूजींकडे खाता-पिता पंधरा रुपये प्रमाणे महिन्यावारी कामाला होता. शिवेच्या शेतात ज्वारी पेरलेली होती. ज्वारीचे पीक कापणी करून काढण्या जोगे झाले होते. परंतु बागायती पिकांची आधी तयारी करावी लागते. म्हणून, कापणी लांबली होती. उभ्या ज्वारीची लानी करून कणसांच्या चोरीचेही बरेच प्रसंग घडत होते, म्हणून बापूजी नाम मात्र राखणदार म्हणून रात्रीच्या वेळी त्या शेतात एक माणूस पाठवायचे, ते काम अण्णाला सोपवण्यात आले होते. तसेच सकाळी उठून त्यांच्या शेताच्या बांधाला लागूनच शिवेचा नाला होता, म्हणून अण्णाला

सकाळी उठून बैलही चारायचे काम लावण्यात आले होते. न्याहीरीच्या वेळे पर्यंत बैल चारून, अण्णा बैल घेऊन घरी यायचा. मागच्या पाच-सात दिवसा पासून अण्णा थंडी तापाने आजारी होता,म्हणून रात्रीच्या राखणीचे काम मी करत होतो. शेताच्या राखणी साठी संध्याकाळीच जावे लागे. चार-पाच दिवस पाहिल्यावर माझ्या ध्यानात आले होते की, आसपासच्या राखनदारीवर येणारे बहुतेक सारेच राखणदार थोडा अंधारपडे पर्यंत, शेतात थोडा फेरफटका मारायचे, आणि मग जे आथंरूनात जाऊन झोपायचे ते उजाळा झाल्यावर उठायचे. आग्यावेताळ कुठून येतो कुठे जातो याच्याशी त्यांना काही देणे-घेणे नसायचे. बागेत चोरी झाली तर, मालकाला काही पण सांगून टाइम मारून न्यायचे. मालकांना पण त्यांच्यावर जास्तीची जोर जबरदस्ती करता येत नव्हती, कारण त्या राखणदारांचा जिवाचा सवाल होता. आग्या त्याचा नेहमी सारखा झाडा खालून निघायचा. आपली-आपली फेरी आणि त्या बरोबर काय आणि कोठे हात मारायचा तो मारायचा आणि झाडाखाली परत येऊन आपला अवतार संपवायचा. तो आग्यावेताळ त्या झाडावरच राहतो अशी वार्ता सारीकडे पसरली असल्याने दिवसा पण त्या झाडाखाली जायची कोणाची हिम्मत नव्हती. ते श्रावण महिन्याचे दिवस होते. पाऊस सरी मागून सरी चालूच राहायचा. एकदा तो जो सुरू झाला ते चारपाच दिवस थांबलाच नाही. अण्णा महिनदारीने कामावर होता, त्यामुळे त्याला रोजच कामावर जावे लागत होते. पाऊस येवो ना येवो. भर पावसात शेताच्या बांधावरून गुरांना चारा कापून आणणे, जोराच्या पावासाने शेतातून वाहात जाणाऱ्या पाण्याने फुटलेले शेताचे बांध बांधणे, असे काम करतांना तो भिजून-भिजूनच आजारी पडला होता, म्हणून मी शाळा सोडून त्याच्या बदली कामावर जात होतो. पहिल्या दिवशी दिवस भर आग्यावेताळाची भिती मनात होती, कारण ज्या झाडावर तो राहात असल्याची आवाई होती, तो झाड बापूजींच्या शेताच्या बांधावरच होता.मी दिवसभर त्या झाडाकडे चरायला बैल जाऊच दिले नाही. शिवेच्या अर्ध्या भागातच बैल वाळत राहिलो. संध्याकाळी घरी येऊन जेवण केल्यावर रात्रीच्या राखणदारीसाठी परत शेतावर जायचे होते. आजारी अण्णाने मला खबरदार केले. 'झोपडीच्या बाहेर बिलकूल निघू नको. गोधडीतच गुपचूप झोपून राहायचे. ज्वारीच्या

शेतात आग्या आला तरी गोधडीने झाकलेले तोंड उघडू नको, त्याला हटकू नको, बाहेरून कोणी बोलावले तरी गोधडीतून बाहेर पडू नको,आणि कोणाच्या हाकेला ओ, पण देऊ नको समजले ना'? तो म्हणाला. 'हो अण्णा मी असेच करीन' असे सांगून मी शेताची वाट धरली. अंधार पडल्यावर मी झोपडीत ठेवलेल्या लाकडी पाट्यावर अर्धी गोधडी पसरवली आणि अर्धी अंगावर पांघरून आडवा पडलो. यावेळे पर्यंत एरवी डोळ्यात झोप मावत नसे, पण त्या दिवसापासून जंगलात डोळ्यात फक्त आग्याच फिरायचा. डोळ्याला-डोळा लागत नसे. आभाळात चोरखटला डोक्यावर आला का मंग मात्र झोप थांबायची नाही. मंग बिनधास सकाळचा उजाळा पडेपर्यंत झोपायचो. डोक्यात एकच विचार घुमत राहायचा, आग्या निघतो कसा? जमिनीवरून आल्हाद कसा चालत असेल? आधी-मधीच तो छोटा-छोटा कसा होत जातो? आणि मंग एकदम भडका कसा पकडत आसेल? तो कोणत्या बाजूने येतो,कोणत्या बाजूने जातो, हे सारे आपल्याला कसे पाहाता येईल असे विचार सारखे माझ्या डोक्यात घोळ घालत राहायचे. मी गोधडीत पडलो, की माझी नजर त्या पिंप्रिच्या झाडाकडेच राहायची, आज पण माझी नजर त्या झाडाकडेच होती आणि अचानक पिंप्रीच्या झाडाखाली एकदम जाळ झाला. काही वेळ तो जमिनीवरच राहिला. मग बागे-बागे तो जमिनी पासून अदमासे अर्धा पूरूस वर गेला आणि धिमी चालीने पुढे-पुढे सरकू लागला. काही शेतांना वळसा घालून तो जाळाचा गोळा परत त्या पिंप्रिच्या झाडाखाली आला. त्याचा हा खेळ अदमासे अडीच ते तीन घंटे चालला. पिंप्रिच्या झाडाखाली आल्यावर तो थोडा वेळ जळत राहिला आणि मग छोटे-छोटे भबके घेत बंद झाला. तो जाळाचा गोळा फेरी मारत होता तेव्हा, तो काही अंतर गेला की बागे-बागे छोटा-छोटा होत जायचा आणि मग एकदम भबका पकडून मोठा व्हायचा. ते पाहातांना मला भिती कमी पण गंमतच जास्तीची वाटायची. रात्र डोळ्यातच निघून गेली. दुसरा दिवस सुरू झाला. दिवस भरचे आजचे काम पण कालच्या सारखेच करायचे होते. उजाळा पडला बैल चारायला सोडले. बैल चारतांना कालच्या सारखीच खबरदारी घेत होतो. पिंप्रिच्या झाडाकडे बैल जाऊ द्यायचे नाही. पण नेमकी मला संडास लागली म्हणून मी ज्वारीच्या पिकात गेलो.

थोडा वेळ लागल्याने बैल पिंप्रिच्या झाडापलीकडे निघून गेले. झाडाखाली आग्या असल्याची भिती पोटात होतीच, तरी पण बैल वाळून आणणे भाग होते. तोंडात रामाचे नाव घेत होतो. त्या झाडापासून लांब अंतर ठेवत, पायांचा आवाज न करता हळू-हळू मी पुढे-पुढे चाललो होतो. पण मी तिरप्या नजरेने झाडाकडेच पाहात होतो. त्या झाडा खालची खोडा जवळची दीड हाताची जागा, एवढ्या पावसाळ्यात सुध्दा बिलकूल साफ बिना हिरव्या गवताची, बिना काडी कचऱ्याची होती. कारण तेवढी जागा सोडली तर तिच्या चौफेर पाय ठेवायला जागा नाही. पावसाळा सुरू होऊन सव्वा ते दीड महिना झाला होता. तरी फक्त तेवढ्याच जागेत गवत का उगवले नव्हते?त्या विचारातच मी त्या जागे पर्यंत कसा गेलो ते माझे मलाच कळले नाही. मी त्या मोकळया जागेत उभा राहून तिच्या आजू-बाजूच्या चौफेर भागाची पाहानी करत होतो. गवत उंच-उंच वाढलेले होते, म्हणून गवताखालच्या जमिनीवर काय आहे ते दिसत नव्हते. कारण या जागेत आगीचा गोळा असता, तर त्याच्या आगीने गवत किंवा काडी कचऱ्याला त्याची आस का लागली नाही. याचा मला उलगडाच होत नव्हता. त्या साफ जागेत एका कोपऱ्याला मातीचा बराच गोल आकाराचा भाग उकरून परत माती टाकून मातीचा वरचा थर पसरवून साफ केलेला होता. त्याच्या बाजूनेच थोड्या अंतरावर गवतात बऱ्याचशा जळालेल्या आगकाड्या इकडे-तिकडे पसरलेल्या होत्या. त्याच्यातच अर्ध्या-मर्ध्या पिऊन फेकलेल्या काही बिड्यांचे तुकडे पण होते. तसेच जळालेल्या कापडाचे बारीक-बारीक तुकडे पण गवतात पसरलेले होते. कोरून बुजलेल्या खड्यावर पसरवलेल्या मातीतून घासलेटचा वास येत होता. मला आग्यावेताळा बाबत जास्त काही माहीत नव्हते. तरी एक सवाल मनात येऊनच गेला की तो जर भुताखेतांच्या सारखाच एक वेगळा भूतच असतो. तर मग त्याला का बिड्या प्यायची तल्लफ असते? त्याला घासलेट का लागते, तो कापड का जाळतो? वेताळ अंगाला कपडा गुंडाळून तो कपडा आगकाडीने जाळून अंगावर जाळ घेऊन फिरत असेल? पण याला आग लावायला आगपेटी, कपड्यावर टाकायला घासलेट, ओढायला बिडी या साऱ्या वस्तू कोण आणि कुठून आणून देतो? कोणी दुसरा भूत त्याला साथीदार असेल का? पण मला या साऱ्या सवालांचे उत्तर माहीत

नव्हते. त्या विचारातच मी पुढे जाऊन बैल वाळून आणले. संध्याकाळी बैलांना पाणी पाजून खूंटूयांना बांधून अंधार पडायला सुरुवात झाल्यावर घराकडे जायला निघालो. रस्त्याने चालतांना एक विचार मनात आला की या बाबत अप्पा अण्णाला काही विचारावे. पण लगेच दुसरा विचार मनात आला की जर मी विचारायला गेलो, तर अप्पा, अण्णा माझा समाचारच घेतील, म्हणतील त्या झाडाकडे जायला याला नाही सांगितले, तरी हा गेलाच कसा? डोक्यात आलेला विचार तसाच डोक्यात ठेवून घरी काहीच न बोललेले बरे आणि मनातला सवाल मनातच ठेवायचे ठरवून घरी पोहचलो. आई, अप्पा माझी वाटच पाहात होते. कारण लहान वयातच मला ज्वारी सांभाळून बैलांचे चाऱ्यापाण्याच काम माझ्याकडून होतील की नाही, याची त्यांना काळजी वाटायची. कारण  नारायण बापूजींशी पाहुण्याचे नाते होते. आमच्या घराला साऱ्या गावापेक्षा त्यांचाच मोठा आधार होता. कोणत्याही प्रकारे त्यांना नाराज करून चालणार नव्हते. आम्ही जेवायला बसलो, पण अण्णाला तापामुळे जेवण जात नव्हते. आम्ही इकडच्या-तिकडच्या बाता सांगून त्याला कसेबसे जेवू घालत होतो. मी मात्र त्या बोलण्यात रोजच्या सारखा मनमोकळे पणाने बोलत नव्हतो आणि वागतही नव्हतो. कारण माझ्या मनात त्या आग्याचेच विचार घोळत होते. माझ्या मनात त्याच्या बाबत जे सवाल पैदा झाले होते, त्याचे उत्तर मला सापडत नव्हते, आणि त्यामुळे आग्या बाबतची भिती माझ्या मनातून काही केल्या जात नव्हती. जर तो खरोखरच आग्यावेताळ असेल, तर तो माझ्या अंगात घुसून जाईल, मग माझे काय होईल? ही भिती मनात आली की मी कावरा-बावरा झाल्या सारखा बोलू लागत होतो. 'आई बघना, तो आल्या पासून गूमसूम आहे, मधे जे बोलतो आहे, जसा कोणीतरी त्याच्यासामने काठी धरून त्याला बोलायला लावतो आहे', अप्पा काळजीच्या सुरात आईला म्हणाला'. 'बर ते जाऊ दे, तुला त्या आग्यावेताळाची भिती वाटत असेल नाही का? मग तू आज नको जाऊ, मीच जातो' अप्पा म्हणाला. 'नाही रे अप्पा मला अण्णाच्या तापाची काळजी वाटते आहे, म्हणून माझे चित्त ठिकाणावर नाही'. मी विषयाला एकदम बगल देऊन म्हणालो. 'बर मग अंधार होन्या अगोदर निघशील, अंधारात नीट दिसत नाही', अप्पा माझ्या पाठीवरून हात

फिरवत म्हणाला. मी अण्णाच्या अंगाला हात लावून तापाचा अंदाज घेत अण्णाला म्हणालो,'बर अण्णा जातो मी', असे बोलून हातात काठी घेऊन घराबाहेर पडलो. शेतात आल्यावर झोपडीत शिरलो तर समोरच पिंप्रिचे झाड उभे होते. बैल आरामशीर बसून वाघूळ करत होते. गोधडी काढून ती अर्धी लाकडी पाटीवर टाकून अर्धी अंगावरून घेऊन मी पडून राहिलो. डोळे लागता-लागत नव्हते. डोक्यात एका मागून एक विचार येत होते. डोळ्यांपुढे त्या झाडाखाली पाहिलेले अर्धे-मर्धे जळालेले आगकाडीचे आणि बिड्यांचे तुकडे, जमिनीवर पडलेले घासलेट,जळलेल्या कापडाच्या चिंध्या दिसत होते. ते सारे कोण्या माणसाचेच काम असले पाहिजे, हे माझे ठाम मत झाले,पण तिथे तर त्या झाडावरच आग्यावेताळ आहे, तर कोणाची हिम्मत होईल त्या झाडाखाली जाऊन बिडी प्यायची? आणि बे मतलब कापडे जाळत बसायची? दुसरे-तिसरे कोणाचेच काम असू शकत नाही? ते सारे जेव्हा पासून त्या झाडाखाली पाहिले, तेव्हा पासून हा सवाल मला चैनच पडू देत नव्हता. म्हणून माझी गोधडीत पडून-पडून सारखी चुळबुळ चालू होती. अदमासे सव्वा ते देढ घंटा त्या चूळबळीत गेला असेल. नुसता पडून-पडून अंग आखडायला लागले. म्हणून, मी गोधडीत उठून बसलो. नंतर मी उठून उभा राहिलो आणि माझे पाय त्या पिंप्रिच्या झाडाकडे वळले. कुठून आपोआप हिम्मत आली देव जाणे, पण माझे त्या झाडाकडे हळूहळू पावलामागे पाऊल टाकणे चालूच होते. शेताच्या बांधावर काही दिवसा आधी बोरीच्या झाडाची एक जाळी कोणी बकऱ्या वाल्याने छाटलेली होती. त्या जाळीला नवीन आधीपेक्षा जास्त डिर्‍या फुटलेल्या होत्या, त्या जाळी पर्यंत जाऊन पोहोचलो. काल ज्या वेळेला त्या झाडाखालून जाळ निघाला होता. त्याच्या आधी मला अशा ठिकाणी लपायचे होत की तिथून त्या जाळाची सारी हालचाल मला पाहता येईल. त्या जाळीच्या आडून, झाडाखालची ती जागा बिलकूल साफ दिसत होती. नवीन डिऱ्यामूळे जाळीचा आकार एकदम बदलून गेला होता. कालच्या टाइमावरच जर आग्या येणार असेल तर ती वेळ आता झाली होती. कारण आभाळात दिसणारा बिच्छू बरोबर डोक्यावर आला होता. जे होईल ते अशी मनाची पक्की गाठ बांधून मी त्याच जाळीच्या आड बसायचे ठरवले. अंगाला काटे लागणार नाहीत या

बेताने थोडअंतर ठेवून त्या आग्यावेताळाला जवळून पाहायला मी बसून राहिलो. भुतांना ताज्या मांसाचा वास फार लांबून येतो असे मी पहिले ऐकले होते. जर तो आला आणि त्याला माझा वास गेला आणि तो झाडाखाली न जाता एकदम माझ्या समोरच येऊन उभा राहिला तर, हा विचार मनात येताच माझ्या अंगाला काटा आला. पण मी आणखी मनातून हिम्मत वाढवली, येऊ दे त्याला, मी काल त्याची चाल पाहिली आहे. तो बिलकूल बागे-बागे तर चालतो. मी अशी गावाकडे धूम ठोकेल ना तो माझ्यामागे पळूच शकणार नाही. कारण त्याला तर पाय पण नाहीत. तो जमिनीवर थोडाच चालतो. आणि दुसरी बात म्हणजे, तो चालून-चालून लवकर थकतो आणि छोटा-छोटा होतो, दम घेतल्यावर तो मोठा होतो, तो पर्यंत मी तर गावात घुसून जाईल, या विचारातच बराच वेळ होऊन गेला, पण त्याचा अजून पत्ता नव्हता. कुठूनच त्याचा मागमूस किंवा सासूल लागत नव्हता. डोळे पण झपाझप लागू लागले होते. मनात आता उठू तेव्हा उठू असा विचार यायचा पण आशा होती तो येईलच याची. अचानक पिंप्रिच्या झाडाच्या पलीकडून काळे-काळे काहीतरी हळूहळू सरकत-सरकत पुढे येत होते. पावसाळ्यातली अंधारी रात्र होती, त्यामुळे ते काय आहे ते नीट दिसत नव्हते. झाडाखाली आल्यावर तर ते काळे काहीतरी झाडाच्या सावलीत गडप झाले. मी दाट बोरीच्या जाळी आड लपलेलो असल्यामुळे तिच्यातूनही पुढचे नीट दिसत नव्हते. झाडाच्याखोडाजवळ काही तरी खूसूर-फूसूर ऐकू येऊ लागली होती. मग आगकाडी आगपेटीवर घासण्याचा आवाज आला. आता मला वाटले की हा आग्याचाच खेळ चालू झाला असावा. फरकन आगकाडीचा जाळ झाला. त्याच्या उजाळ्यात एकाच्या तोंडात बिडी घेतलेला चेहरा दिसला. तो जसा बिडीच्या जाळा जवळ तोंड आणून तिचा फुरका ओढत होता. तसा, बिडीला लागलेला जाळ मोठा व्हायचा. त्या उजाळ्यात आता दोन चेहरे दिसू लागले. बिडी पिऊन झाल्यावर त्या पिणाऱ्याने ती बिडी जवळच्याच गवतात फेकली. त्यामुळे तिथे परत अंधार झाला. त्या अंधारातून समोर काही बरोबर दिसत नव्हते, म्हणून त्या अंधाराचा फायदा घेऊन मी हळूहळू त्या झाडाच्या आडोशाचा फायदा घेत, अजिबात आवाज न करता त्या झाडाच्या खोडा जवळ त्या आडोशातच येऊन

उभा राहिलो. आता घासलेटचा वास पण येऊ लागला होता. थोड्यावेळाने परत आगकाडी घासण्याचा आवाज आला आणि आगकाडी पेटली. ती पेटवलेली आगकाडी कशाला लावली ते पण मला साफ दिसले. ते एका लांब लाकडाच्या शेंड्याला गुंडाळलेला कापडाचा जाड-जूड भेंडोळा होता, त्या भेंडोळ्यावर घासलेट टाकलेला होता, त्यामुळे त्याने लगेच पेट घेतला. त्याच घासलेटचा वास मला येत होता. मला लगेच समजून गेले की, तो टेंभा आहे. त्याला जाळलेली काडी लागताच त्याचा एकदम भडका झाला. त्याच्या उजाळ्यात आता सारे साफ दिसत होते. ते दोन लोक होते. त्यांनी सारे अंग काळ्या कपड्यात झाकलेले होते. टेंभा पेटवताच ते टेंभा हातात घेऊन झाडा खालून निघाले. काल ज्या रस्त्याने ते गेले होते. त्याच मार्गाने ते निघाले. मी सुद्धा त्यांना ऐकू जाणार नाही इतके, अंतर त्यांच्यात आणि माझ्यात ठेवून त्यांच्या मागे-मागे जाऊ लागलो. दोन-तीन शेली अंतर गेल्यावर त्या टेंभ्याचा जाळ हळूहळू कमी-कमी होऊ लागला. दुसऱ्याच्या हातात घासलेटचा डब्बा होता. टेंभा वाला थोडा थांबला. हा पटकन पुढे जाऊन त्याने टेंभ्यावर घासलेट टाकले. घासलेट टाकताच टेंभ्याने एकदम भडका घेतला, ते परत पुढे-पुढे जाऊ लागले. मी त्यांच्या मागे-मागे मांजर पावलांनी चालत होतो. आता माझ्या लक्षात पुरे आले होते की, आग्या-बीग्या काही नाही, तो सारा या दोघांनीच रचलेला हा कुभांड आहे. वेताळाच्या जाळाचा भडका-बिडका काही होत नाही. तर, विझत जाणाऱ्या टेंभ्यावर घासलेट टाकताना टेंभ्याचा जाळ भडका घेतो. असा हा प्रकार आहे. ते थोडपूढे गेल्यावर एक केळीचा बाग लागला. ते बांधावर चालतांना इकडे-तिकडे, चगर-मगर पाहात चालू लागले. मी हळूच हिंगनबेटाच्या झाडाच्या खोडाआड लपून गेलो आणि त्यांची गंमत पाहू लागलो. कोणी दिसत नाही, तसेच विहिरी जवळच्या झोपडीत पण त्यांना सामसूम दिसली. टेंभ्या वाल्याने त्याची चाल बागे केली, तेवढ्या वेळेत घासलेट वाला बागेत घुसला आणि काही वेळातच तो खांद्यावर केळीचा घोडा घेऊन बाहेर आला, आणि टेंभेवाल्याच्या मागे चालू लागला. थोड पुढे गेल्यावर अजून एक केळीचा बाग होता. यावेळी पण तसेच झाले. त्या दोघांनी इकडे-तिकडे पाहिले, कोणाचाच सासूल नव्हता. टेंभेवाला धिम्या चालीने पुढे

जाऊ लागला, त्याच्या मागच्याने खांद्यावरचा घोडा बांधावर ठेवला आणि पटकन बागेत घुसला आणि खांद्यावर केळीचा एक घोडा घेऊन बाहेर आला. बांधावर ठेवलेला आधीचा घोडा टेंभेवाल्याने खांद्यावर घेऊन ते नंतर शेताच्या बांधावरून कोपऱ्यावरील मोठ्या आंब्याच्या झाडाखाली थोड थांबून इकडे-तिकडे पाहून, कोणीच पाहिले नाही याची खात्री करून ते मोसंबीच्या बागेत घुसले. थोड्या वेळाने बाहेर आले. तेव्हा, त्यांच्या हातात एक पिशवी मोसंबीने आर्धीच्यावर भरलेली होती. दोन्ही केळीचे घोडे आणि मोसंब्यांची पिशवी घेऊन मातीत उभा गाडलेला टेंभा काढून ते पिंप्रिच्या झाडाखाली आले. टेंभ्याच्या उजाळ्यात दोन्ही घोडे, मोसंब्याची पिशवी एका गोनट्यात घातले. शिवेच्या नाल्यात असलेल्या पाण्याच्या डाबूरड्यात टेंभा बुडवून विझवले. गोनटे आणि टेंभा घेऊन जसे आले होते तसेच निघून गेले. मी शेवट पर्यंत त्यांचा पाठलाग करतच होतो. ते गेले आणि मी पण झोपडीत आलो. गोधडी अंगाच्या खालीवर घालून अंग टाकले. आता मनातून आग्यावेताळाची भिती पूर्ण निघून गेली होती. दिवस भरच्या खटाटोपाने खूप थकून गेलो होतो. त्यामुळे पटकन डोळे लागले. पण जास्त वेळ झोप नाही मिळाली. कारण,खाजोळे वाल्याच्या शेतात जागलकी करणाऱ्या जागल्यांच्या झोपडीतील कोंबडा जोर-जोराने बांग देत होता. बांग ऐकून मी पटकन उठलो आणि गावाची वाट धरली. गावात घूसतांना समोरून सुरतभाऊ येताना दिसला. त्यानेच मला एकदा नाल्याच्या पुरात वाहून जाण्यापासून वाचवले होते. इतक्या सकाळी-सकाळी मला गावाबाहेरून येतांना पाहून त्याने मला विचारले 'कायरे कुठे फिरतो आहे सकाळी-सकाळी रिकामटेकड्यासारखा? काल तू शाळेत का गेला नाही? तू आवाज दिला नाही म्हणून, सिताराम पण शाळेत गेला नाही'. सुरत भाऊ लोटन मामांचा मुलगा होता. लोटन मामाचें घर शाळेच्या समोरच होते. शाळेत जायला त्यांच्या अंगणातून जाणे-येणे करावे लागत होते. नेमक्या शाळेत जायच्या वेळी सुरतभाऊ ओट्यावर बसून सकाळचे दात घासतांना दिसायचा. त्याचा लहान भाऊ सिताराम हाही माझ्याच वर्गात होता. त्यामुळे सूरतभाउ मला ओळखत होते. मी शाळेत दुसरीतून सरळ चौथीत सितारामच्या वर्गात गेलो त्यामुळे सूरतभाऊला माझ्याबद्दल आपलेपणा वाटायला लागला होता.

मी शाळेत येतांना सूरतभाऊ दिसला की त्याला नेहमी नमस्ते करायचो. मी रात्री जे पाहिले ते सांगण्यासाठी तोच एक योग्य माणूस होता. सूरतभाऊ एक कुस्त्या खेळणारा पहिलवान होता. तो मोठमोठ्या कुस्त्या जिंकायचा. घरी आई आणि भाऊंना सांगण्यापेक्षा सुरत भाऊला सांगणेच बरोबर होईल, कारण आई, भाउला सांगितले तर आग्यावेताळा समोर जायची त्यांची हिम्मत होणार नाही, अण्णा आणि अप्पा त्यांच्यापेक्षा खूप लहानपण होते. सूरतभाउचे चार-पाच दोस्तपण  पहिलवान होते. ते सारेजन एकाच ठिकाणी कसरत करायचे, आणि कुस्त्यांना पण बरोबरच जायचे. मी त्याला नमस्ते केला. आणि सरळ त्याला सवाल केला 'भाऊ मी तुला एक बात सांगू का?' 'बोल' ते म्हणाले, 'दादा मी अण्णाच्या बदली बापूजींकडे कामाला जातो आहे', मी सांगायला सुरुवात केली. 'मला पाहुण्याने सांगितले आता पाऊस पडतो आहे. तुझ्या कडून दुसरे मोठे-मोठे काम होणार नाही तर, तू खाजोळा शिवारातील शिवेवरच्या शेतात दिवसा बैल चारत जा आणि ज्वारी पण सांभाळत जा. तिकडे चोऱ्या पण होऊ लागल्या आहेत. ज्वारी पक्की झाली आहे. कोणाचा नेम नाही, उभी ज्वारीच खुडून नेतील. संध्याकाळी बैलांना चारा-पाणी करून रात्री तिथेच पडून राहात जा. मी आज रात्री तिथे झोपायला गेलो होतो. लोक म्हणतात त्या जंगलात रात्री आग्यावेताळ निघतो, मला तर रोजच भिती वाटत होती, दोन-तीन दिवस तर झोपच लागली नाही. पण  आज रातच्याला मी सारे पाहिले'. मी त्याला सांगत होतो. तो एकदम दचकून म्हणाला 'काय?' ' दादा आज राती मी त्याला पाहिले. तो कुठून येतो, कसा येतो, काय करतो, कुठे जातो, केव्हा जातो. सारे-सारे काही मी बिलकूल आमने-सामने पाहिले'. 'काय सांगतो तू?, माझी थट्टा तर करत नाही'?. 'नाही रे दादा, मी आईला पण सांगितले नाही, सगळ्यात पहिले तुलाच सांगत आहे, अगदी देवा शपथ', मी म्हणालो. 'बर सांग आता तू त्याला कसे पाहिले, आणि एकदम आमने-सामने कसे पाहिले का?' सूरतदादाने विचारले. 'दादा मला फार भिती वाटत होती, म्हणून पहिले तीन-चार दिवस मी त्या झाडाकडे जाणेच काय, पण पाहात पण  नव्हतो. काल बैल त्या झाडाच्या अवती-भवती चरत होते, त्यावेळी त्यांना वाळायला तिकडे गेलो होतो. तेव्हा त्या झाडाकडे तिरपी नजर

गेली, मला त्या वेताळाचे घर पाहायच होते,कारण तो दिवसभर तिथे राहूनच रात्री निघतो ना? पण त्या झाडाखाली पाहिले तर तिथे काहीच नव्हते, गवत, तन काढून बरीच जागा साफ केलेली होती. त्या जागेच्या भोवती वाढलेल्या गवतात अर्ध्या प्यालेल्या बिड्या आणि आगकाड्या फेकलेल्या होत्या. त्या जागेचा घासतेलाचा वास येत होता. वेताळ पाणीच्या बदले घासतेल पितो का? तो बिडी पित असेल का? हे माझ्या मनाला पटत नव्हते. त्याला आगपेटी, बिडी, घासतेल या चिजा रोज कोण आणून देत असेल ? माणूस तर ते आणून देणार नाही, मग कोण आहे. हे सवाल माझ्या डोक्यात घुसले, मला दिवसभर त्या सवालांनी आरामच पडू दिला नाही, आणि रात्री पण झोप लागली नाही. अदमासे अर्धी रात्र निघून गेली तेव्हा, खाजोळ्याकडून साऱ्या अंगावर काळे कपडे घालून दोन जण आले. ते सफाई केलेल्या जागेवर आले, बिडी ओढली, लाकडाच्या दांड्याला कापडाचे तुकडे गूंढाळून टेंभा तयार केला, त्यावर येतांना बरोबर आणलेल्या टंबरेल मधून घासतेल टाकून ते पेटवले आणि एकाने हातात टेंभा घेऊन एका मागे एक चालू लागले, त्या टेंभ्याचे घासतेल जळून गेले की दुसरा लगेच त्या टेंभ्यावर घासतेल टाकायचा, त्यामुळे तो टेंभा भडका पकडायचा. जातांना ते सांडूदादाच्या शेतात घुसले, तिथून एक केळीचा घोडा कापला, मग लोटनदादाच्या शेतातून एक घोडा कापून, धनाबाबाच्या शेतातून अर्धी पिसोडी मोसंबीच्या तोडून परत आले, टेंभा पाण्याच्या डाभूरल्यात बुडवून विझवला आणि खाजोळयाच्या वाटेने निघून गेले. ही सारी बात मी सूरतदादाला सांगितली, आणि गप बसलो. सूरतदादाच्या तोंडातून एक शब्द पण बाहेर पडत नव्हता. 'तू कुठे होता'? बऱ्याच वेळाने दादाने मला सवाल केला. दादा मी त्यांच्या मागे मागेच हळू हळू थोड्याअंतराने झाडांच्या आडून जात होतो'. मी जे पाहीले ते मी सूरतदाला सांगून टाकले. 'पण दादा तो वेताळ नाही ही बात आता पक्की. ते चोरांचेच काम आहे'. 'अगदी सोळा आणे बरोबर बोलतो आहे तू' दादाने सारे मन लावून ऐकून घेतले. 'गोइंद्या तू खरा शेरचा बच्चा आहे, एवढीसी जाण आहे, पण एवढा मोठा कांड करून टाकला. लय भारी, भरवसाच बसत नाही, आणि माझ्या ठिकाणी कोणी राहिला, तर तो हे ऐकूनच येडा होऊन जाईल. तो

आग्यावेताळ कोणत्या वाटेने येतो? तो कधी लहान तर कधी मोठा कसा होतो'? त्याने सवाल केला. 'दादा तो खाजोळा वाटेने येतो'. 'मला एक सांग माझ्याशिवाय तू आणखी कोणाला पण ही बात सांगितली नाही ना?'. ' नाही' मी म्हणालो. 'पण खरेच गोइंद्या तुझ्या हिमतीची कदर करावी लागेल. चांगले झाले तू कोणाला सांगितले नाही. बर ठीक आहे. चल आता घरी, जिजी वाट पाहात असेल. त्या आग्यावेताळाचा काटा एकदाचा कायमचा काढावाच लागेल'. बोलत सूरतदादा मला गल्लीच्या कोपऱ्या पर्यंत घेऊन आला, आणि तेथून परत घरी गेला. आई वाटच पाहात होती. 'चल लवकर कामावर जायचे आहे ना'? आई, अप्पा आणि मी कामावर जायला निघालो. तो समोरून सूरतसिंग झपाझप पावले टाकत घराकडे येत होता. अप्पा आणि मी गल्लीच्या कोपऱ्यावरच होतो. तेवढ्यात सूरतसिंगने आवाज दिला, 'आरे गोइंद्या ही बात कोणाला सांगू नको बर का. नाही तर सारा फसकारा होऊन जाईल'.' हो दादा मी कोणालाच सांगणार नाही, आईला पण नाही सांगणार'. मी त्याला म्हणालो. तेवढ्यात अप्पा म्हणाला 'काय भानगड आहे रे? कोणती बात आहे ? काय दपवतो आहे आमच्या पासून? खबरदार काही भानगड, तंटा आणि काही कुरापत असेल तर तुला झोडपून काढीन'. अप्पाला पहिल्यांदा इतका रागवतांना मी पाहात होतो. 'आरे सुरत आमची मोडकी वडांग आहे, बेरड लोक तिच्यात पाय टाकायला कचरत नाहीत रे. भिऊन राहिलेलेच बरे नाही का?' 'काही नाही रे, काही काळजी करू नकोस, मी आहेना, त्याचा काही संबंध नाही, तू बिनधास्त रहा'. सुरतसिंग म्हणाला. 'तू आहेस म्हणून ठीक आहे, पण एवढे पहा भो आम्ही गरीब लोक आहोत आमच्यावर काही बालंट नइ यायला पाहिजे' अप्पाने त्याला खबरदार केले. 'अरे जारे बाबा तुझ्यापेक्षा हा बहाद्दुर आहे, काय भेकडपणा करतो आहे कोनास ठाऊक' असे सांगून सुरत चालता झाला. 'पयभारे तुमची काय गरबड चालू आहे रे' अप्पाने मला परत विचारले? 'काही नाही अप्पा तो काय सांगतो आहे मलाच काही समजून नही राहिले' मी अप्पाला सांगितले. 'बर जा आता, पण हुशारीने रहा, पिंप्रिच्या झाडाकडे जाऊ नको. खाजोळे वाल्यांच्या बांधाकडे बैल जाऊ देऊ नको ते फार भानगडखोर लोक आहेत'.'हो अप्पा मी ध्यानात ठेवीन' मी बोललो अप्पा त्याच्या वाटेला

निघाला आणि मी माझ्या वाटेने निघालो. मी शेतात पोहोचल्यावर बैलांचे रात्र भरचे शेण, चाऱ्याची उगार आवरली. चारायला बैल सोडले आणि शिवेच्या नाल्याला चरायला लावले. आता माझ्या मनात अजिबात भिती राहिली नव्हती. आग्यावेताळाची गोची समोर आल्यामूळे मी बिलकूल मोकळा होतो. त्यामूळे रोजच्या सारखी बैलांवर नजर ठेवायची चिंता नव्हती. तीन दिवसापासून पाऊस थांबला होता, मी एका झाडाखाली बसूनच बैलांवर नजर ठेवून होतो. दिवस डोक्यावरून कलंडू लागला होता. तेवढ्यात झोपडी समोर, 'अरे गोइंद्या आहे का रे?' असी हाक आली. कोण आला असेल यावेळी? मी विचार करू लागलो पण  आवाज ओळखीचा वाटला. झाडाखालून उठून मी झोपडीकडे जायला निघालो. लांबूनच बघतो तर झोपडी समोर चार जन उभे होते. बापरे कोण असतील ते? रात्रीच्या दोघांनी तर मला पाहिले नसेल? ते जर असतील तर? काही समजत नव्हते. मी बाहेरूनच विचारले 'कोण आहे, काय पाहिजे? मी इकडे आहे, झोपडीच्या बाहेर'. मोठी हिम्मत करून मी बोललो.त्या चौघातून सूरतदादा झोपडीच्या बाहेर आला.'काय करत होता रे, पिंप्रिच्या झाडाकडे गेला होतास ना?' त्याने विचारले. त्याचा आवाज ऐकल्या बरोबर माझी भिती गेली. 'नाही रे दादा, उन्हामुळे त्या जवळच्या झाडाखाली बसलो होतो'. बाकीच्या तिघाकडे बघितले तर ते गावातलेच दादाचे मित्र होते. पण माझ्या ओळखीतले नव्हते. कारण, माझा सारा जाणते पणाचा काळ जंगलो-जंगलीच गेला होता. 'हं आता बोल गोविंद रात्री तू काय, कसे, कुठे पाहिले ते. आम्हाला ती जागा दाखव'. मी त्या चारही जनांना घेऊन आधी पिंप्रिच्या झाडाखाली नेले. सूरतदादा सारे बारकाईने पाहात होता. ती मोकळी जागा, त्या जागेत कोरून बुजलेल्या खड्ड्याची ती जागा, त्या जागेच्या आजू-बाजूच्या गवतात फेकलेल्या जळालेल्या आगकाड्या, अर्ध्या पिऊन फेकलेल्या बिड्या ते सारे दाखवले. ते साऱ्यांनी पाहिल्या, नंतर रात्री ते लोक ज्या वाटेने गेले ती वाट, सांडूदादाच्या शेतातून केळीचा घोडा कुठून तोडला ती जागा, लोटनदादाच्या शेतातून केळीचा घोडा कुठून तोडला ती जागा, धनाबाबाच्या शेतातून मोसंब्या कुठून तोडल्या ती जागा दाखवून त्यानी टेंभा कोणत्या डाभूरल्यात बूझवला ते, असे  सारे दाखवून परत पिंप्रिच्या झाडाखाली घेऊन आलो. नंतर

त्यांनी केळीचे घोड आणि मोसंब्या गोणपाटात भरून ते कोणत्या वाटेने गेले ती वाट दाखवली, त्यांच्या मागे जातांना मी कुठे-कुठे लपलो, त्यानी कुठे टेंभ्यात घासतेल टाकले ते पण त्यांना दाखवले. त्यांनी पण बागेत घुसून कोणत्या झाडावरचे घोडे तोडले, कोणत्या झाडावरून मोसंब्या तोडल्या ते प्रत्यक्ष झाडा जवळ जाऊन पाहिले. सारे जण त्या पिंप्रिच्या झाडाखाली बराच वेळ थांबले. 'का रे सुरत!, हा एवढासा पोरगा पण  त्याची हिम्मत केवढी दांडगी आहे? वरवर पाहाणाऱ्याला तर या साऱ्या गोष्टीवर भरवसाच बसणार नाही, की या शेमड्या पोराने साऱ्या गावाचा एवढा मोठा पेच सोडवला'. एक जण, जो त्या साऱ्यात मोठा होता तो सूरतदादाला हे सारे सांगत होता. 'आरे त्याने मला ही सारी खबर सकाळी-सकाळीच दिली. पहिले-पहिले मला पण या साऱ्या गोष्टीवर भरोसा बसत नव्हता, जसा मी सांगितल्यावर तुमचा भरवसा बसत नव्हता बिलकूल तसाच. पण मी दुसरा विचार केला की हा एवढासा पोरगा माझ्याशी मस्करी करणार नाही आणि तो एवढा मोठा बाताड्या पण नाही. हा फाटक्या चड्डीत गाई चारणारा सात आठ सालचा गिदडा, इतका बाता फिरवूच शकत नाही. म्हणून मी याच्यावर पुरा भरवसा ठेवला. 'आपण झोपडीत बसून काय करायच ते ठरवू. कदाचित कोणी आपल्याला इथे पाहिले तर कानो-कानी बात पसरू शकते तसे होऊ नये म्हणूनच हा सकाळी सकाळीच मला हे सगळे मला सांगून गेला होता. फसकारा झाला तर ही बात चार चौघात जाईल तर आपले हासु होईल. चला आता टाइमपास करण्यात मजा नाही', सूरतदादा म्हणाला आणि लगेच आम्ही पाचही जण तिथून उठून झोपडीत आलो. पोटभर चरल्यावर बैलपण आरामशीर नाल्यातल्या झाडाखाली बसले होते. झोपडीत गोधडी आंथरून ते चार जण तिच्यावर बसले. मी बाजूला जाऊन बसलो. आधी असे ठरले की ते बदमाश पिंप्रिच्या झाडाखाली आल्यावर आणि त्यांनी टेंभा जाळल्यावर, त्यांच्यावर चारींनी एकदम झडप घालायची. त्यांचे हात-पाय बांधून त्यांना आपल्या गावचावडीवर न्यायचे. या मुद्यावर सारे बराच टाइम शांत बसले. कोणीच काही बोलले नाही.काही वेळाने मी म्हणालो 'त्यांनी नुसता टेंभा जाळताच त्यांना पकडले तर त्यांचा कोणता गुन्हा केल्याचे तुम्ही सांगणार'? 'अरे बरोबर ही बात तर आपण ध्यानात घेतलीच नाही'.'पोरगा

आहे खरा चतुर' एक जण म्हणाला. 'मग असे करू, एक जण झाडाखाली दपून राहून त्यांचा मार्ग काढील, ते झाडा खालून निघाले का तो त्यांच्या मागे-मागेच, दपून-दपून येईल, दुसरा सांडूदादाच्या बागेत दपुन त्यांच्यावर नजर ठेवील, तिसरा लोटनदादाच्या बागेत दपून नजर ठेवील, सूरतसिंग घनाबाबाच्या आंब्याच्या झाडावर चढून बसेल, ते जसे-जसे पुढे जात राहतील तसे एक-एक जण आपण भेटत जाऊ. ते घनाबाबाच्या आंब्याखाली आले की सूरतसिंग झाडावरून कूदी मारून अचानक त्यांच्या पुढे उभा राहील, तो पर्यंत त्यांच्या मागे येणारे आपण तिन्ही जण सूरतसिंगच्या बाजूने येऊन उभे राहतील आणि मग एकदम झडप मारून त्यांच्या सामाना समत त्यांना ताब्यात घेऊन पिंप्रिच्या झाडाखाली आणून मग त्यांचे हात-पाय बाधुंन त्यांना गावचावडीवर घेऊन जायचे', असा डाव सुरत दादाने जमवला, हारकत नाही. असे पण जमू शकते बाकीचे तिघेजण म्हणाले. 'पण दादा एवढा खटाटोप करण्यापेक्षा आपण सारेच्यासारे मी ज्या बोराटीच्या जाळी आड दपलो होतो. तिथे, ते साराभाग फिरून यायच्या पहिले जाऊन दपले तर, बाकीची सारी झंजट कमी होईल. कारण त्याच्यात एक धोका आहे. एक जन अलग-अलग जागी लपून बसेल आण, बदमास पूढे जात रातील, आण आपला एक-एक जन भेटत राहील, भेटल्यावर त्यांच्यात इतकस जरी बोलन झाल किंवा मागे पुढे चालता-चालता, दडदड-खडखड झाली तर, सारा खेळ बिघडून जाईल' मी माझी शंका सांगितली. ते ऐकून सारेच गप्प झाले आणि माझ्या तोंडाकडे टकमक पहात राहिले. 'अरे हा, बिलकूल बरोबर', एक जण म्हणाला. एकाच्या डोक्यात अचानक एक विचार आला, तो सूरतदादाला म्हणाला, 'का रे! आपून त्यांना पकडले आणि गावचावडीवर नेले ,तिथे लोक जमतील त्यांच्यात या शिवारातले लोक पण राहतील, ते आधीच वेताळाच्या भीतीने घाबरलेले आणि झालेल्या नुकसानीमुळे चवताळलेले असतील, त्यांनी आशा बनावट आग्यावेताळाला पाहिले आणि त्यांचे डोक फिरून त्यांनी यांचेच बरे-वाईट करून टाकले. तर, आपल काय होईल? 'मग आपून त्यांना पोलीस पाटलाकडे देऊ, मग पाटील जाणे आणि पोलीस जाणे, बिलकूल बरोबर'. सूरतदादानेच त्याच्यावर तोडगा काढला. 'पण पोलीस पाटलाने त्यांना पोलिसात दिले. तर,

मग तरीपण  पोलीस आपल्याच मागे लागतील. उठ-सूठ ते आपल्याला पकडून पोलीस स्टेशनला ओढत घेऊन जातील आणि विचारतील कारे तुम्ही रातच्या टाइमाला त्या जंगलात काय करायला जात होते? तुमची त्या शिवारात शेती नाही, तुम्ही गुरे-ढोरे चारत नाही, मग तिकडे गेलेच का? म्हणजे तुम्ही पण त्यांच्यात सामील असतील, अशी एकना दोन खूप आळ आपल्यावरपण पोलीस घेतील', एका मागून एकाच्या डोक्यात वेगळे खूळ येत होते आणि त्यांच्यात आपसातच बेबनाव वाढत होता कारण, चांगले काम करून पण डोक्यावर बदनामीचे खापर फोडले जान्याची भिती त्यांच्या मनात खूप लागली होती. पुरी म्हैस पाण्यात चालली होती. मी एक दुसऱ्यांच्या तोंडाकडे वेड्यासारखा पाहात होतो, कारण त्याचे पण सांगणे खरे होते आणि बरं ते आजू-बाजूच्या गावामधे नावाजलेले कुस्ती खेळणारे पहिलवान होते, आणि यामुळे त्यांची पत खलास होणार होती. शिवाय समजा ते बदमास आखतवाड्याचे निघाले तर कमी वांधा होईल? कारण गावपंचायतीत काही तरी तोडगा निघून जाईल, पण समजा शेजार पाजारच्या गावाचे निघाले तर, दोन गावाचे लोक आमने-सामने येतील, काही मिटवण्याचे प्रयत्न करतील, तर काही शिंगावर घेऊन आदळायचा प्रयत्न करतील, दोन गावात दूही होईल. आशा रीतीने या वांध्याचा रांधा वाढतच चालला होता, आणि शेवटी अशी वेळ आली की 'जाऊ दे जे होते आहे ते होऊ दे, आपले घर जाळून दुसऱ्याच्या घरात उजाळा करून काय फायदा  म्हणून सोडून द्या. पण हा विचार सूरतदादाच्या मनाला पटत नव्हता, अशाने नंग्यांचे फावते आणि भित्र्यांचे जळते, असी लूटमारच सुरू होईल. पण या पेचावर त्याला उतारा सापडत नव्हता. बर तुम्ही सांगता तसे करू पण आता हा वांधा आपण थोडा थांबवूनच घेऊ. जे करायचे ते आजच्या बदल्यात उद्या करू, उद्या नई जमले तर परवा करू, पण असे मधेच सोडायचे नाही. कारण जर ही बात पुढे लोकांना समजली तर आपून जो विचार केला, त्याच्यापेक्षा जास्त बदनामी आपली साऱ्यांची होईल हे पण ध्यानात ठेवा'. सुरतदादांचे हे बोलणे ऐकून साऱ्यांचीच हवा निघून गेली. त्यांच्या मधे जो मोठा दिसत होता तो म्हणाला ''अरे मर्दांनो गुन्हा आपल्या डोळ्या समोर घडतो आहे, आणि आपण म्हणतो तो खुशाल होऊ दे, तुमच्या मालावर,

घरावर चोर डाखा टाकत आहे, तुम्ही म्हणता लुटून घे. हे समजदार माणसाच्या काय, पण या समोरच्या शेमड्या पोराला पण पटणार नाही. तुम्ही काय भितऱ्या भागूबाई सारखे विचार करत आहेत? हातात बांगडया भरल्या आहेत का? कुस्ती खेळायला आखाड्यात उतरल्यावर समोरच्या पहिलवानाला तुम्ही असे सांगता का, अरे तू खूब ताकतवाला आहेस, मी तुझ्या ताकतीला घाबरतो, तू माझ्यासाठी माटी चाटून घे, या मर्दानगीच्या बाता नाहीत, जे होईल ते, पण दोन-दोन हात होऊन जाऊ द्या ना'? हे ऐकून सूरतदादाला पण बरे वाटले, तो म्हणाला 'आपूण ते त्यांना असे सोडणार नाहीच भाऊ, पण जरा अक्कल हुशारीने सारा खेळ करावा लागेल. 'दादा असे झाले तर? त्यांना आपूण आपल्या गावात घेऊन जायच्या बदल्यात, त्यांच्याच गावात घेऊन जायचे आणि त्या गावाच्या मोठ्या लोकांना बोलावून त्यांच्या सामने त्यांना त्यांच्या साऱ्या सामाना समेत हजर करून, त्याच्याच तोंडाने त्यांनी काय केले, केव्हा पासून करू रायले, ते सांगायला लावायचे. आपूण त्या गावावाल्यांना सांगू की हा त्यांच्या गावाच्या आबरूचा सवाल आहे, म्हणून आम्ही ही बात सिदी तुमच्याकडे आणली, आता यांचे काय करायचे ते तुम्ही बघा. पण हे खराब काम परत व्हायला नको', हे मी सुचवले. 'याला म्हणतात न्हाईच्या हातानेच सुतक काढणे', सूरतभाऊ असे बोलून हासायला लागले. 'पण दादा त्यांना आपण इथेच इतके बदडू, की तिचा धाक ते जिंदगी भर ध्यानात ठेवतील. इकडची वाट पाहिली तरी त्यांच्या अंगाला काटा यायला पाहिजे', मी म्हणालो. 'इतके बदडायचे की हप्ते दोन हप्ते खाटल्या वरून उठलेच नई पाहिजे. अरे आपूण सारे पहिलवान आहोत, कोठे-कोठे मारायचे हे आपल्याला चांगले माहीत आहे. एक जण म्हणाला. चला आता या ठरावात बदल करायचा नाही'. 'हे सारे करतांना बदमाशांच्या आमने-सामने झाले तर त्यांनी आपल्याला ओळखले नाही पाहिजे. त्यांची धुलाई करतांना कोणीपण तोंडातून आवाजच काढायचा नाही' सूरतदादाने साऱ्यांना खबरदार केले. हे सारे ठरवता-ठरवता संध्याकाळ होत आली होती. 'बर जे ठरले ते साऱ्यांच्या ध्यानात आले? मोक्याच्या टाइमाला कोणीच मचमच करायची नाही, समजले नाही, तर गप्प उभा राहून नुसती गंमत पहात रहायचे समजले, चला आता लवकर

जेवण करून माताबाईच्या मंदिरात या', सुरत दादाने साऱ्यांना परत एकदा खबरदार केले. गोविंद्या तू लवकर आला, तर झोपडीत गूच्चूप बसून राहा,अजिबात भायेर येऊ नको' दादाने मला सांगितले. 'हो दादा' मी मान हालवली. ते परदेशींच्या शेताकडून निघाले, मी खाजोळ्याच्या पानदीने निघालो. घरी येऊन झटपट जेवण करून, मी परत यायला निघालो. 'इतक्या जल्दी का बर चालला रे'? अप्पाने विचारले.'त्या शिवारात कोणाची तरी म्हैस आली आहे,दोनदा, तिला हाकलले पण ती परत-परत येते आहे, ती शेतात घुसून जाईल म्हणून चाललो'. मी जातांना दादांच्या कडून न जाता सिदा शेतात येऊन झोपडीत बसलो, आणि त्यांच्या येण्याची वाट पाहात रायलो. अदमासे अर्ध्या घंट्याने ते आले. थोडा वेळ बसल्यावर, ते आपला साज तयार करण्यात लागले. अंगातली कूर्ची काढून तिच्याने डोके, कपाळपाटी, कान, नाक, डोळे सोडून पुरा तोंड कूर्चीच्या पुढच्या भागाने झाकून, कूर्चीचा मागचा भाग डोक्यावरून पाठीवर टाकला आणि उरलेला, पुढच्या भागावरून खाली सोडला, दोन्ही बाह्यांनी पुढचा आणि मागचा गळ्याभोवती आवळून, मानेला घट्ट बांधून घेतले. कूर्चीचा मानेखाली राहिलेल्या भागाने पोटाचा व पाठीचा भाग झाकून घेतला. कमरेच धोतर काढून, तो दुहेरी करून मुसलमान लोकांसारखी कमरेला लुंगी गुंडाळून घेतली. झटापट झालीच तर डोक्याला बांधलेली कूर्ची आणि कमरेला गुंडाळलेला धोतर सुटणार नाही असे पक्के बांधून तसी त्यांची तपासणी करून घेतली. त्या बदमासांची यायची वेळ होण्यास थोडा अवकाश होता. दादाने परत साऱ्यांना सूचना दिली काम पुरा होई पर्यंत कोणीच तोंडातून शब्द काढायचा नाही. बोलायचेच झाले तर वंजारी लोकांची बोली बोलायची. ते गावोगाव कुस्त्यांना फिरायचे, म्हणून त्यांना ती बोली येत होती. चला आता आपण आपल्या जागेवर जाऊन बसू दादा म्हणाला. 'त्यांचा सुरू पासून पुरा फेरा होई पर्यंत कोणीच बोलायचे नाही, हे परत ध्यानात ठेवा, ते फार जरुरीचे आहे बर का', दादा म्हणाला. सारे जन निघाले आणि त्या जाळीदार बोरीच्या झूडूपाआड जाऊन बसले. बऱ्याच वेळाने, मी सांगितल्या प्रमाणे काळे-काळे झगे घातलेले दोन जन समोरून येतांना दिसले. झाडाखाली आल्यावर बरोबर एकाने बिडी पेटवली, दुसऱ्याने टेंभा काढून त्याच्यावर घासतेल टाकले, तो

पर्यंत पहिल्याने पोत्याची घडी उकलून ते नीट ठेवले, बिडीवाल्याची बिडी पिऊन झाल्यावर, त्याने टेंभा पेटवला आणि हातात घेतला दुसऱ्याने घासतेलचा डबा आणि पोते हातात घेऊन, ते एका मागे एक असे झाडाखालून त्यांच्या कामगिरीवर निघाले. एका घंट्यानंतर त्यांच्या टेंभ्याचा जाळ लोटनदादाच्या शेताच्या बांधावर, नंतर त्यांच्या बागेतून बाहेर पडतांना दिसला. हळू-हळू तो टेंभा मोसंबीच्या बागेत घूसतांना दिसला. ते आंब्याच्या झाडाखाली आल्यावर इकडे हे चौघ बिलकूल आवाज न करता हळू-हळू प्रिंपिच्या झाडाखाली येऊन एका पाठोपाठ एक असे लाइनीत खोडा आड उभे राहिले. हळु-हळु ते बदमाश नेहमीप्रमाणे बिनधास्तपणे झाडाखाली आले. दोघांनी आप-आपल्या खांद्यावरील केळीचे घोडे खाली टाकले. हातातील घासतेलचा डबा आणि पोताखाली ठेवले. एकाने पोता उघडला, दुसरा पोत्यात केळीचा घोडा टाकण्यासाठी वाकून उचलणारच होता तेवढ्यात मागून त्याच्या कमरेत लात बसली. जसी लात बसली तसा तो घोडा टाकण्यासाठी उघडलेल्या पोत्याच्या तोंडात जाऊन पडला. हे काय होते आहे ते समोरच्याच्या ध्यानात येण्या आधीच, त्याच्या पण कमरेत मागून लात पडली. तो पण तोंडावर जाऊन पडला. जे घडत होते ते त्यांच्या ध्यानीमनी पण  नवते. त्या अचानक हल्ल्याने ते एकदम हादरून गेले, आणि थरथर कापू लागले. काय बोलावे, करावे, त्यांना काहीच कळत नवते. ते चारही जण झाडाच्या आडून निघून समोर येऊन उभे राहिले. किती वेळाने एकाच्या तोंडातून हूंडू फुटला, 'मला माफ करा, हे सारे तुम्ही घ्या, पण मारू नका', तो थरथर कापत म्हणाला. चारींपैकी सारेच, समोरचे काय सांगत आहेत ते ऐकायच्या मनस्थितीत नव्हते. एका मागून एक पाठीवर, तोंडावर, कमरेवर, पोटऱ्यावर, मांड्यांवर. जिथे जमेल तिथे ठोकरांनी, लातांनी, हातांनी रपाटे लावत होते.  ते बऱ्याच दिवसापासून गावकरी झेलत आलेल्या भीतीचे, त्यांच्या झालेल्या नुकसानीचे, विचार डोक्यात ठेवून बेभान झाले होते. एका मागून एक चार दांडग्यांचा मार त्यांच्या साऱ्या अंगावर चालू होता. एक लोटा पाणी प्यायला जेवढा वेळ लागतो. तितक्या वेळात त्यांची शिट्टी-पीट्टी गूल झाली होती. त्यांना हात जोडून माफी मागायला पण फुरसत मिळू देत नव्हते. छाती आणि डोके सोडून साऱ्या अंगावर सपासप दांडक्यांचे

टोले बसत होते. मधेच एकाचा दांडका मोडला तर त्याने त्यांच्याच टेंभ्याच्या दांड्याचा त्यांना झोडपण्यासाठी वापर सुरू केला. दोन्ही बदमाश जास्त वेळ मार सोसू शकले नाहीत. त्यांची मार सहन करायची ताकतच संपली होती. नंतर तर त्यांच्यात उभे राहायची ताकतच संपली आणि त्यांनी धडाधड जमिनीवर अंग टाकले. तरी पण वरून दांडक्यांचा मार कमी झाला नाही. वंजारी बोलीत सूरतदादा म्हणाला 'साले लाडीचे पाचसात महीन्यापासून गरीब लोकांना आग्यावेताळाचा धाक दाखवून धोक्यात ठेवत होते, आपल्या बापजाद्यांच्या शेतातून हरामाचा माल लुटत होते. हरामाचा खाऊन तुमच्या अंगावर खूब चरबी पण आली आहे, नाही का! हेल्यासारखे फुगून गेले आहेत ना? तूम्हाला त्यावेळी लाज तर वाटलीच नाही, आणि कोणाचा भ्याव पण वाटला नाही, की आपण इतका हरामाचा खातो आहेत, याची कधी ना कधी एकदा भरपाई करून द्यावी लागेल. एवढे ऐकून पण त्यांच्या तोंडातून एकपण शब्द निघत नव्हता, ते खचून गेले होते. त्यांचे सारे ध्यान दांडक्यांचा मार वाचवण्यात होता. मार वाचवण्यासाठी ते इकडून-तिकडे अंग चोरत होते. तरी पण वरून दांडक्याचा मार चालूच होता. बागे-बागे त्यांचे अंग चोरणे कमी होत गेले. त्यांचे डोळे जड होऊ लागले, तोंडातून लाळ गळू लागली. त्यांचे हालणे डुलणे, तोंडातून हा हूँ चे उसासे सोडणे सारे बंद झाले. ते पाहून सूरतदादाने बाकीच्यांना इशारा करून मार बंद करायला सांगितले. बदमासांनी आणलेले केळीचे घोडे, मोसंब्या तसेच तिथे सोडून देऊन, तिथून निघून ते झोपडीवर आले. साऱ्यांनी आप-आपले कपडे नीट केले. येतांना त्यांनी आणलेले दांडके तिथेच टाकून दिले. मला सूरतदादाने खबरादार केले की 'हा जो सारा सोंग आपून केला, तो कोठेच कोनालापण सांगू नको, ही बात ध्यानात ठेव'. 'हो दादा मी कोणालाच सांगणार नाही, आई, भाऊलापण सांगणार नाही'. त्यांनी पण आपसात पक्के ठरवले की ही सारी कूरापतची भानगड कोणालाच कानोकान खबर करायची नाही. ही सारी बात आज ना उद्या साऱ्या गावात पसरेल, तिची गल्लीच्या खूटा-खूटावर चावळ होईल, आपल्या समोरपण होईल, पण आपण कोणालाच सांगायचे नाही की हे आम्ही केले. उलट त्यांच्या बरोबर त्यांना चावळू लागायचे आणि त्याचा माग पण काढायचा की कोणी आपल्याला तो

लफडा करतांना पाहिले तर नाहीना? कारण जर आपल्याला एखाद्याने पाहिले असेल आणि ही भानगड पोलिसात गेली तर सरकार दरबार होईल. तर आपल्याला पण सरकार दरबारी येरझऱ्या माराव्या लागतील. आपण तसी खबरदारी तर खूब घेतली आहेच, पण वाघ कितीपण हुशार असला तरी कधी ना कधी तरी, तो फासात फसतो ना? असा सल्ला मसलत करून ते चारी जन घरी निघून गेले. झोपडीत मी एकटाच मागे रायलो. मी गोधडी टाकून झोपायला अंग टाकले. पण बरीच रात निघून गेली होती. त्यामुळे झोप मोड झाली होती. मी तसाच खालीवर गोधडी घेऊन पडून राहिलो. एक देढ घंटावेळ निघून गेली असेल, एकदम मला पिंप्रिच्या झाडाखली गलबला ऐकू आला. मला वाटले ते बदमाशच भानावर येऊन त्यांना मारणाऱ्यांना शिव्या देत असतील, म्हणून मी झोपडी बाहेर येऊन पाहू लागलो. पण, तसे काही नवते, झाडा खाली दुसरेच दोन-तीन लोक होते. ते त्या बदमासांना हालवून-हालवून जागवत होते. पण ते हूँ की चूँ पण करत नवते. मला भिती वाटू लागली मार खाऊन साले मरून तर नाही गेले? ही झोपडी जर त्या लोकांना दिसली, तर ते इकडेपण येतील, पूस तपास करायला. मी पटकन झोपडीत जाऊन खालीवर गोधडी घेऊन डोळे गच्च लावून पडून रायलो. तिकडे झाडाखालचा गोंधळ वाढतच राहिला. नंतर रडारड सुरू झाली. नंतर इकडेपकड, तिकडेपकड, अध्धर पकड, हात धरा, पाय धरा, खाली हात घालून उचला, असे बोलण्याचा गोंधळ सुरू झाला. तो गोंधळ जवळ जवळ तासभर चालला. मग हळू-हळू सारे शांत झाले. आवाज येणे एकदम बंद झाल्यावर मी हळुच झोपडीच्या बाहेर येऊन पाहिले, तिथे कोणीच नव्हते. थोड्या वेळाने कोंबड्याने बांग दिली, मी घाई-घाईत उठलो, बैलांचा शेण पूंजा आवरला. झुंजू-मूंजूचा टाइम झाला होता. मी लगेच घरचा रस्ता धरला. गावात घुसताच सरळ घरी न जाता गल्लीला चक्कर मारून सूरतदादाकडे गेलो. ते जंगलातून घरी आल्या नंतर पिंप्रिच्या झाडाखाली काय झाले ते सारे सांगायचे होते. सूरतदादा समोरच घराच्या उंच ओट्याच्या पायरीवर बसून दात घासत बसला होता. त्याला तो सारा मामला सांगितला. त्याने ते सारे शांतपणे ऐकून घेतले. मग तो म्हणाला. 'ही सारी बात कोणालाच सांगू नको. काही दिवसांनी लोक समजतील. जसा

आग्यावेताळ एकदम उगवला, होता तसाच तो एकदम एकाच जागेवर राहून-राहून त्या जागेला उबगून निघून गेला. हाक होणार नाही आणि बोंबपण होणार नाही. समजला ना’? मी मानेनेच हो म्हणालो आणि घराकडे निघून आलो. आशा रीतीने एकदम उगवलेला आग्यावेताळाचा भूत त्याचा-त्याचा गाडला गेला. त्याचे कोणाला नवल वाटले नाही ना त्याची कोणाला नंतर आठवण आली.



# गाव सोडले

साल दरसाल दिनमान बदलत गेले, काम मिळेनासे झाले. काही दिवसांपासून मजुरी आणि महिनदारी बंद झाली होती, घरात कणभर दाणा सुद्धा अवघड झाला होता. आईला काय करावे हे सुचत नव्हते. एके दिवशी शेजारील मोठी आई, आईला म्हणाली ‘तु कुसुंब्याला जा. तिथे काहीना काही कामधंदा मिळून जाईल.’ नाही जिजी, जनमभूमी सोडण्याचं मन नाही होत.’ आई म्हणाली. ‘आगं कूसूंब्याकडे खूब गुऱ्हाळ चालतात. तिकडे साऱ्यांना चांगला काम मिळेल. मजुरीही इकडच्याने जास्तीची आहे. मी देते भाउला निरोप’, तिने आईचा हात पकडून सांगितले. ‘गुऱ्हाळाचे काम सरले का लगेच दुसरे खूप काम लागतात’. मोठी आई आपुलकीने म्हणाली . ‘राहू दे जिजी.भाउला का बर त्रास द्यायचा, इकडेबी दिवस निघतात ना, आणि आम्हाला तिकडे करमणार पण नाही.सारा देश नवा,लोक नवे,कोणी आपल नाही,कोनाशी ओळख नाही,सारा संसार नवीन उभा करावा लागेल’. आई ने तिला समजावण्याची कोशीश केली.‘खानदेशात सारे आपले राहून पण इतके साल साऱ्यांशी मेळ बसायला लागले, तो तर आणखी हुशार लोकांचा देस आहे. फुकट थट्टा होईल माझी’. आई घाबरत घाबरतच म्हणाली. ‘आग घर सोडले की, वाटा आपसूक मिळुन जातात. आता तूच पाहा तू डोंगरगावला गेली, तूला सारी वाट माहीत होती का? नाही, पण तू बरोबर जाऊन भिडली ना’. नादर मोठी आई आण आईची कुजबुज आवाजातली बोलणी शेजारची वनीकाकू पण ऐकत होती. ती त्यावेळी ओट्यावरच्या चुल्याला पोतारा मारत

होती. तिचा पण माहेर कूसूंब्याचाच होता, आण नादर मोठी आईच पण माहेर कूसूंब्याचाच होता. त्यांच्या बोलण्यात कूसूंब्याचा नाव आला, म्हणून ती पण त्यांच्या जवळ आली. 'काय झाले कूसूंब्याला जिजी?' तिने नादर आईला विचारले आणि त्यांच्या गप्पात येऊन मिळाली. नादर आईला आता सांगणे भाग पडले. तिने वनीकाकूला सांगितले, 'आग वनी इला आण इच्या पोरांना पण गुऱ्हाळाचा सारा काम येतो, तुला माहिती आहे ना आपल्या कूसूंब्याला पण, डोंगरगावसारखे गुऱ्हाळाचा खूप काम चालते, खर आहेना? मग मी इला सांगते आहे आग इथे रोजची मोल मजुरी करण्या पतूर, तिकड जा, फार काम पण आहे, आण मजुरी पण वधारून मिळते. बरोबर आहे की नाही'? तिने वनी काकूला विचारले. 'होना पारबती जिजी, तिठे तर तुमचे पांगच फिटून जातील सारे, आण बर का जिजी, कूसूंब्याचा सिवार बी इतका मोठा आहेना, तिथे वरीसभर कामाचा तोटाच नसतो. भरमसाट काम धंदा पण मिळेल आन पैसा पण मिळेल'. 'नाही तर काय? काम धंदा शोधायला कूसूंब्याला गेल्यावर इथल्या सारखी देसोदेस फिरायचा टाइमच येणार नाही'. 'अगदी बरोबर बोलली वनी तू, तिठे इचे दिवसच पालटून जातील' नादर आई म्हणाली. 'कूसूंब्याला एक दख्खनची बाई पण आहे, ती माझ्या भावाच्या शेजारीच राहते. ती खूब गरीब आण मनमिळाऊ सबावाची आहे. ती तुला मदत पण करील ना जिजी' वनी काकू म्हणाली. 'बर का तू हामी भरसील तर मी माझ्या रामडू भाऊला पण निरोप पाठवते. टाइम पडला तर तो पण तुला मदत करील' मोठी आई म्हणाली. 'आग जिजी दूर कशाला, माझाच भाऊ येतो आहेना, मी त्याला निरोप दिलाच आहे. इचा आण त्याचा मिलाप करून देऊ, मग तर झालेना. मग तिला पुढे काइच अडचण येणार नाही', वनीकाकू म्हणाली. 'आवर ग आता, पहा देव कसा सूद्याचा असतो, तो म्हणतो कर आता मनाचा हिय्या. इथले भाऊबंद अजून जोवर गाफिल आहेत, तोवर निघून जा, या नरकातून, तरच तुझे भले आहे. कारण तो जास्ती दिन शांत रानार नाही, केव्हा पण आगीचा डोंब भडकेल. मग तुला कोणी सावरायला यायचा नाही. मागच्या सारखा, आणखी मोहोळ उठेलच, ही बात ध्यानात ठेव, आण कर तुला काय करायचे ते. या पतूर आम्ही जास्त काइ सांगत

नाही. चल ग वनी घरातले सारे काम अजून आवरायचे आहेत', मोठी आई म्हणाली  आण वनी काकूचा हात पकडून आपल्या घरात निघून गेल्या. 'बर जिजी मी पाहाते देव मला काय बुद्धी देतो, जाणाऱ्या मोठी आई आन वनी काकूला आई  म्हणाली'. साऱ्याजणी पांगल्या. आई दिवसभर त्याच विचारात गुरफटून राहिली. पण एक बात पक्की होती, आता आखतवाड्यात कोणाचेच ध्यान लागत नव्हते. हो ना, हो ना, करता करता आई ने जायचे मन पक्के केले. कूसूंब्याला जायचेच. कूसूंब्याचा सफर डोंगरगाव सारखा पायी जायचा नवता. आखतवाडे ते कजगाव एवढाच रस्ता पायी चालावा लागणार होता. पुढे कजगाव ते चाळीसगाव व चाळीसगाव ते धुळे आगगाडीने व धुळे ते कूसूंबा लाल गाडीने जाव लागणार होता. आम्हाला आगगाडीचा सफर माहीत होता, पण लाल गाडीने पहीलीच वेळ होती. फक्त आण्णालाच ते माहीत नव्हते. आईने घरातला सामान आवरायला सुरुवात केली होती. वनी काकूचा भाऊ यायला आणखी दोन तीन दिवस बाकी होते. सार सामान आवरून आईने त्याचे चार गाठोडे बांधून तयार केले होते. माझा पण चवथीच्या परीक्षेचा शेवटचा दिवस होता. पास नापासला अजून थोडे दिवस बाकी होते. नंतर सुट्टी लागणार होती.जसा निरोप आला होता तसा वनी काकूचा भाऊ बरोबर त्याच दिवशी आला. भाऊ आल्यामुळे वनीकाकूकडे गडबड चालू होती. अण्या मामाचा म्हणे कूसूंब्यात खूब धाक होता. तो गावचा पोलीस पाटील होता.त्याला कूसूंब्यात पोलीस पाटीलच म्हणायचे. आन्यामामा आल्या दिवसा पासून, आई ने कोनालाच मजुरीवर जाऊ दिले नाही. आम्ही सारे घरातच राहायचो. कोणालाच भेटलो नाही. त्यामुळेच, आमच्या बोळीतल्या गल्लीत कोण कोण पोर राहातात ते कळाले. आजवर त्यांच्याशी बोलायची किंवा त्यांच्या बरोबर खेळायची वेळच आली नव्हती. आन्यामामा जवळपास चार पाच दिवस राहिला. मग कूसूंब्याला परत जायला निघाला. तो माहोळाई, बदरखे करून नातेवाइकांना भेटून, पुढे नागद रस्त्याने येणार होता.

आम्ही एकएकाने एक एक गाठोडे डोक्यावर घेऊन आखतवाडेगाव सोडले. जन्मगाव सोडले तेव्हा आम्हाला काही वाटले नाही. पण हे गाव सोडतांना मातर आपण आपले काही तरी मागे टाकून जातो आहेत असे वाटू

लागले, गल्लीतून डोक्यावर गाठोडे घेऊन जातांना रस्त्याने भाऊबंद, मुले, बाया घरच्या ओट्यावर उभे राउन टूकूर टूकूर पहात होते. त्यांच्या त्यांच्यातच काही तरी आमच्याकडे पाहून कुजबुजत होते.गल्लीच्या कोपऱ्यावर सिवलाल मामाचा डिगांबर भेटला,'आरे गोइंद्या कुठे चालला रे' त्याने विचारले? 'आम्ही कूसूंब्याला चाललो मी म्हनलो'. 'कूसूंबा खूप मोठा गाव आहे, तिथे माझा मामा राहतो, तो म्हणाला पण मी काहीच बोललो नाही. अण्णाच्या मागे मागे चूपचाप चालू लागलो. डोक्यावर गाठोडे घेऊन चालता चालता थकून गेल्याने, आम्ही भोटेक गावाला रस्त्या काठच्या मंदिराच्या ओट्यावर थांबलो. थोडा आराम केल्यावर, परत कजगावच्या वाटेला लागलो. डोक्यावरचा दिवस कलंडता कलंडता आम्ही कजगावला पोचलो. रेलवेच्या फलाटावर बसून रेलवेची वाट पाहू लागलो. पुढे टाइम मिळतो ना मिळतो, म्हणून फलाटावर बसूनच भाकरी खाऊन घेतल्या. बऱ्याच वेळाने स्टेशनवर लोक गडबड करू लागले, दूर पाहिले तर धूर सोडत रेलवे येत होती. लोकांनी गाडीत चढायची एकच घाई केली. तरी स्टेशनवर जास्ती गर्दी नव्हती. गावे मागे  टाकत रेल्वे पळत होती. तिसरा पहाराला गाडी चाळीसगावला आली. स्टेशनवर तपास करून, आम्ही धुळ्याला जाणाऱ्या गाडीच्या फलाटावर येऊन, गाडीची वाट पाहात बसलो. संध्याकाळी धुळ्याला जाणारी गाडी आली.घाइघाईने गाठोडे डोक्यावर घेऊन आम्ही गाडीत बसलो. रात्रीच्या जेवनाखावनाच्या वेळी गाडी धुळ्याला आली. फलाटावर उतरून कूसूंब्याला कसे जावे, ते एका तांगेवाल्याला विचारले. तो भला माणूस होता. तो दोन आण्यात आम्हाला मोटरगाडीच्या स्टेशनवर घेऊन आला. तिथे एक दोनच लोक होते.एकाने सांगितले, तसे आम्ही त्या ठिकाणी बसलो.रात्र जास्त झाली होती, म्हणून  गाडी बंद झाली होती. सारी रात्र आम्ही तिथेच राहिलो. दुसऱ्या दिवसी दिवस उगवल्यावर कूसूंब्याला जाणारी गाडी आली. गाडी कूसूंब्याला थांबल्यावर गाडीतून उतरून, आता कोणाला विचारावे ते कळत नवते. गाव फार मोठे होते. गावाच्या साऱ्या गल्ल्या, चौड्या-चौड्या, एक सारख्याच होत्या. थोडावेळ तिथे थांबल्यावर, समोरच मारुतीचे मंदिर होते. गाठोडे घेऊन आम्ही मंदिरावर गेलो. आई आण अप्पा आन्यामामाचा तपास

करायला जवळच्या पानाच्या दुकानावर गेले. अण्या मामाचे नाव घेताच, लगेच तपास लागला. आन्यामामा गावचा पोलीस पाटील होता, म्हणून सारे गाव त्याला ओळखत होते. त्याने मोटर गाडीच्या वाटेवर उभा राहूनच आन्यामामाच्या गल्लीची खून सांगितली. गल्ली एकदम नीट होती, म्हणून समजायला सोपे होते. जशा उभ्या गल्ल्या चौड्या होत्या तशाच आडव्या गल्ल्यापण चौड्याच होत्या. कोपऱ्या वरच्या घरवाल्याला मामाच घर विचारले. त्याने त्याच्या अंगणातूनच खुणेने मामाचे घर दाखवले. त्याने दाखवलेल्या घरासमोर आम्ही जाऊन उभे राहिलो. घर एक गाळ्याचा तीन डब्यांचा लांब होता. आदमासे आठ नऊ पुरुष लांब घर होते ते. ओट्याच्या काठालाच एक भले मोठे निंबाचे झाड होते. डोक्यावरचे गाठोडे खाली ठेवायला पण अंगणात जागा नव्हती. अंगणात आजी उभी होती. ‘कोण पाहिजे तुम्हाला? पोलीस पाटील घरी नाहीत, ते गावाला गेले आहेत.’ एवढे बोलून, कोणी उतरकरू लोक त्यांची भानगड घेऊन पोलीस पाटीलाकडे आले असतील असे वाटून आजी घरात जाऊ लागली. ‘ओ बय हाम आखतवाडेसे आरेंगे, व्हॉ आन्याभाउ मिलो थो, वाने कही तूम कूसूंबेमे गये का सिदो आपले घरे जाबेको आन बयखु मेरो नाव कै दे तुमको मिने धाडो. मी पण तुमारे मांगे मांगे दोन तीन दिनमे आरूंगा करके’. आईची धनगरी बोली ऐकून आजी गरकन मागे फिरली, आखतवाड्याची आपल्याच जातीचे आहेत, कोनाचे कोन आहेत, देव जाने?, ‘आरे भगवान तू आखतवाड्याची आहे का? बर मग तू अस कर तूमच्या डोक्यावरचे गाठोडे अंगणात खाट टाकून घे, आण तिच्यावर ठेव. दुसरी खाट टाकून तिच्यावर बसून घ्या. असे सांगून आजी घरात गेली. आजी परत येई पर्यंत शेजारच्या ओट्यावर उभ्या असलेल्या बाया, आई बरोबर बोलू लागल्या, बाहेर सासू कोणाशी बोलते आहे, ते पाहायला आन्यामामाची बायको पण ओट्यावर आली, ‘मी तूम्हाला कुठे तरी पाइल्या सारके वाटते आहे’. ‘हो तू वनी दिरानी कडे आली होती ना? तवा आपून भेटलो, बोललो बी आहेत’. ‘हा बराबर आता याद आली. तुम्ही वनाबाईच्या चुलत जेठानी आहेत’. थोड्या वेळाने छोट्या बादलीत, गिलास आण पाणी घेऊन आजी आली. आजीने ती बातचीत ऐकली. ‘हा मग तू बी पढरीन आहे का’? असे विचारले.

'हो' आई म्हणाली. 'म्हणजे कोणाची कोण तू'? आजीने विचारले.'मी दामू म्हताऱ्याची मोठी सून' आई ने उत्तर दिले. 'इकडे कसे काय येणे झाले? तू कोणाची मुलगी, तुझे माहेर कुठले'? आजीने, आईजवळ खाटेवर बसून विचारले. 'आखतवाड्याला मोल मजुरी मिळत नाही, म्हणून पोट भरायला मी इथे आली आहे', आई म्हणाली .'मी डोंगरगावच्या सागरेंची मुलगी आहे. सिल्लोड जवळचे डोंगरगाव माझे माहेर आहे' आई म्हणाली. आईचा हा खूलासा ऐकताच आन्यामामाच्या घराला घर लागून असलेल्या ओट्यावर उभी बाई ओट्याच्या खाली उतरून आई जवळ आली. 'बाई तू तर दख्खनची आहे. तू कोणा सागरेची मुलगी म्हणाली?' एका बाई ने आईला विचारले. ती दगडी मावशी होती. 'मी आनाजी सागरेची मुलगी आहे. काय? तू मुक्या हिरामनची बहीण आहे ? जमनी म्हतारीच्या सवतीची पोरगी'?. दगडी मावशी शेजारची दुसरी मावशी म्हणाली. 'हो पण तुला कसा माहीत हा सारा गोतावळा? आई ने तिला विचारले'. 'आग, ती माझी फूइ लागते' ती म्हणाली. ते ऐकून आई चे मन आतल्या आत एकदम मोठे झाले. कोणी तरी पाठीराखा आहे. इतक्या परक्या ठिकाणी तिला कोणीतरी जवळचे मिळाल्याची खुशी झाली होती. त्या मावशीने अंगणातूनच आवाज दिला 'चिंधी, आरी ओ चिंधी, या जिजीला तुझ्या ओट्यावर तिला भाड्याचे घर मिळे पर्यंत राहू दे, ही आपली एकदम जवळच्या नात्यातली आहे. माझी फूइ बहीण आहे., तिला ओट्यावरच स्वयंपाक पण करू देत जा'. 'हो आई' चिंधीबाई म्हणाली. आम्ही तिनी भाऊंनी आजी आण दोनी मावशींचे पाया पडलो. आम्ही गाठोडे उचलून, चिंधी बहिणीच्या मागे मागे निघालो. खरेच मावशीचे घर आण ओटा मोठा होता. 'चला रे मला सामान आणायला हात लावा', ती आम्हाला म्हणाली. आम्ही तिनी भाऊ पटकन उठलो, 'तू इथेच बस हलक भारी सामान असेल, तर तूझ्या हातून पडून नुकसान होईल', अप्पा मला म्हणाला. बहीण घरात एक जुने पाण्यासाठी माठ, जुने चूल, दोन ताट, असे बारीक सारीक सामान काढून ठेवत होती. आई तिला नको नको म्हणत होती. अण्णा, अप्पा काळजी घेऊन सामान सांभाळून ओट्यावर आणून ठेवत होते. आई एक एक करून सोयीच्या ठिकाणावर ठेवत होती. काही वेळाने एक माणूस आला,

ओट्यावरची ही सामानसूमानाची गर्दी पाहून त्याने चिंधी बहिणीला विचारले, ‘हे पाहुणे कोन ? कुठले’? ‘ही माझी सग्गी फूइ बहीण आहे’, चिंधी बहीण म्हणाली. तो माणूस चिंधी बहिणीचा नवरा होता. ‘काय कूसूंब्याला यायचा पहिलाच टाइम ना? कसं आहे कूसूंबा गाव, आवडला का’? त्यांनी आम्हाला विचारले. आप्पाला गरिबीने समाजात कसे वावरावे ते चांगले शिकवले होते. पण तो थोडा कमी बोलणारा होता.‘जीजाजी गाव तर आखतवाड्यापेक्षा मोठे आहे, गावातले मानसे आण त्यांचे मन तर त्याहून पण अजून खूब मोठे आहे’. अप्पा हासत हासत म्हणाला. ‘आरे वा तुम्ही तर त्याच्याहूनबी मोठी बात करून टाकली. पाहुणे म्हणाले. ‘मला सांगा, हे माझे तिनी साले, रिकामटेकडे, बिन कामाचे आहेत का उद्योगी आहेत?’. पाहुण्यांनी आईला विचारले ‘ओखरनी, कोळपणी, पेरणी, लाकड्या होवो लोखंड्या होवो दोनी नांगरांनी नांगरणी, त्या साऱ्या औतांची सवता जोडणी करून, ते काम आम्हाला करता येतात’, अप्पा आणि अण्णा दोनी, न भिता, न शरमता बोलले. आम्हाला गुऱ्हाळाचे काम पण येते’. ‘पण जीजा एकच बातची कमी आहे, आम्ही धाकले धाकले आहेत, म्हणून आमचे वजन खूब कमी आहे ना, औतावर भार पडत नाही. म्हणून मोठ्या मोठ्या दगडांचा भरण औतावर ठेवावा लागतो’. अप्पा जरा बारीक आवाजात बोलला. ते ऐकून पाहुणे मोठ्याने हासू लागले. आम्ही आल्या नंतर दुसऱ्याच दिवसी आन्यामामा कूसूंब्याला आले. आल्यावर दोन दिवसांनी ते आईला भेटले.‘पारूबाई येतांना फजिता झाली का’? त्यांनी अंगणातून आईला विचारले. ‘नही भाऊ, तुझ्या आण वनी बहिणीच्या तोंडात साखर पडो. पहा ना इथे आल्यावर मी कशी नात्या गोत्यात येऊन पडली. भगवानाचीच ही मर्जी असेल म्हणून हे सार घडून आले. माझ्या सग्ग्या भाऊबंदाहून पण जास्तीच्या जोडेच्या नात्यातले आण, जे नात्यातले नाही, ते पण, त्यांच्याहून जास्तीचे जिवाळ्याचे लोक इथे मिळाले. आखतवाड्यातून पाय काढतांना डोळ्यातून गाव पारखे व्हायचे आसू गळत होते, पण इथे आल्यावर मातर गणगोत मिळाल्याचे आसू डोळ्यातून येतात. येतांना काय काय अडचणी येतील, याचा इचार करून आसू येत होते, पण इथे आल्यावर मरणाच्या वाटेवरून परत आली, म्हणून आसू येत आहेत’,

आई बोलतच चालली होती.तिने चिंधी बहिणीकडे तोंड करून तिला हात जोडलेले होते. 'बर पारूबाई रडणे बंद कर, मी मोठ्या बहिणीकडे जातो आहे, तुला खोली देण्याबाबत विचारून येतो', असे सांगून आन्यामामा पुढे निघून गेला. थोड्या वेळाने मामा लगेच परत आला 'बाई शेतात गेली आहे, संध्याकाळी ती घरी येईल, तेवा मी परत तिच्याकडे जाईन, तेवा मी तुलाही बरोबर घेऊन जाईल. तू आमने सामनेच तिच्याशी बोलून घेसील. तेवा तू घर बी पाहून घेसील आणि पटले तर पुढचे तेवाच बोलून पण घेशील'. एवढे बोलून आन्यामामा पुढे निघून गेला. दोनी भाऊ महिना भरासाठी कामाला लागून गेले होते, मी रिकामाच होतो. मला काहीच काम नवते. संध्याकाळी आन्यामामा आला. आईला घेऊन त्याच्या मोठ्या बहिणीकडे घेऊन गेला. तिला आई ची भेट करून दिली. त्याने तिला तिच्या घराला खेटून असलेली खोली भाड्याने द्यायला सांगितले. मावशी ती कोनालाच रहायला देत नव्हती. पण सग्गा भाऊ सांगतो आहे, म्हणून, ती खोली द्यायला राजी झाली होती. दुसऱ्या दिवशी पहाटेच आम्ही आमचे गाठोडे घेऊन त्या खोलीवर आलो. खोलीची झाडझूड, साफ-सफाई करून घेतली. खोलीत आयती चूल मांडलेलीच होती. खोली मजीदला लागूनच होती. त्यामुळे घर चुकायची कटकटच नव्हती. घरापासून नदी आणी आड जवळच होते. त्या दिवसी अप्पा कामावर गेला नाही. आई आण आप्पाने रोजच्या लागणारा सारा सामान दिवसभर इकडून तिकडून विकत आणून घरात सोईने लावून दिले. धूडकू जीज्याने एक महिन्याची मजुरी आगाऊ देऊन टाकली होती.त्याच पैशातून सामान विकत आणले. आई ने मला लाकडे आणायला जंगलात धाडले. मी नदीच्या काठा काठाने लाकडे गोळा करायला गेलो. ती आखतवाड्याच्या नदीहून तीन चार पटीने चौडी होती. आखतवाड्याच्या नदीत शेन आणि लाकडे गोळा करायला खूब अडीअडचणी मधून जावे लागायचे, इथे बिलकूल मोकळे मोकळे वाटत होते. नदीच्या दुसऱ्या काठाला खळवाड होती.थोडा पुढे गेलो तर मला भली मोठी आमराई दिसली. आमराई पाहून तर मी भन्नाट खूश झालो. वा काय सारी आयती सोय आहे या गावाला, मी माझा माझाच बडबडलो. लाकडे आणणे, तर बिलकूल आयते मिळल्यागतच झाले होते. दोन झाड जरी चढलो

तरी लाकडेच लाकडे. सपासपा पावले टाकत मी आमराईत गेलो. एकच झाड चढून लाकडे तोडले.त्यांचा बोझा बांधला तर तो मला उचलता येत नव्हता. मी लाकडे आणले त्या लाकडांवरच दुपारच्या जवळपास आई ने स्वयंपाक केला. आम्ही तिघे जेवलो. जेवना नंतर आई चिंधी बहिणीच्या घरी गेली. 'आता सकाळ पासून मजुरीची काळजी आहे'. आई ने तिला सांगितले. 'काही काळजी करू नको जिजी, ती समुरच दगडी जिजी राहते, मी तिला रात्रीला जाऊन सांगून येते. तसच मागच्या गलीत, संपतनानाची बायको ठगी जिजी राते तिला पण सांगून येते. त्या तुला रोज काम सांगायला येत जातील, मी पाहाते ना जाऊन',तिने आईला सांगितले. ते ,ऐकून आई च्या डोक्यावरचा फार मोठ ओझ उतरून गेल. नवीन गावात सार काही नवीन आसतांना, सारी काळजी कसी चुटकी बरोबर मिटून गेली, याची आईला फार खुशी झाली. आता आमचे रोजचे काम बीगी बीगी सुरू झाले. मला मात्र काही काम नव्हते, म्हणून सकाळचा आण रात्रीचा स्वयंपाक, घरचे सारवणे, पोतारने, धून धूने, घरातले सारे भांडे घासने, लाकूड फाटा आणणे, शेण गोळा करणे हे कामे मला आई ने नेमून दिले.



# पुन्हा शिक्षणाला सुरुवात

दिवसामागे दिवस निघू लागले. एक दिन संध्याकाळच्या वेळेस आन्यामामा एका मानसाला घेऊन घरी आला, त्या मानसाचे कपडे, त्याची बोलण्याची ढब, पाहून तो कोणीतरी चांगला मोठा माणूस आहे असेच वाटत होते. त्या खोलीत आल्या पासून आन्यामामा आमच्याकडे पहिल्यांदाच आले होते. घाई-घाईने अप्पाने ओट्यावर गोधडी टाकली. पण आन्यामामाने अंगणातूनच आई घरात आहे का विचारले? 'मामा आई बाहेर गेली आहे, आता येतच असेल' अप्पा म्हणाला. 'असु दे मी शेजारी बसतो, आई आली का मला हाक मार', मामाने अप्पाला सांगितले. इतक्यात आई पण समोरून आली. मी घरात चूल्या समोर बसून, भाकरी थापत होतो. आन्यामामा त्या मानसाला घेऊन घरात येताच, मी पिठाने भरलेला हात धुऊन आलो. समोर पाहिले तर माझा भरोसाच बसेना. मामा बरोबर आलेला नवीन माणूस दुसरा कोणी नाहितर आखतवाड्याच्या शाळेत मला शिकवणारे माझे गिरासे गूरूजी होते. मी त्यांना नमस्कार करून त्यांचे पाया पडलो. 'काय रे गोविंदा, तुला भाकरी पण करता येतात'? त्यांनी मला विचारले. 'पाटील साहेब हा आमचा फार गुणी विद्यार्थी आहे'. ते आन्यामामाला म्हणाले. तो एखाद्या श्रीमंताच्या घरात जन्मला आसता, तर, तर कल्पनाच करता येत नाही, तो काय झाला असता? पण तो गरीब कुटुंबात जन्मला हेच त्याचे दुर्भाग्य आहे'. गिरासे गूरूजी मामाला सांगत होते. 'पण हेही तेवढेच खरे आहे की जे कमळ

विद्याची देवता सरस्वतीचे आसन आहे ते चिखलातच उमलते, खरे आहे ना पाटील साहेब'? ते पुढे म्हणाले. 'मी आखतवाड्याला याला पाहिले, तेव्हाच माझा त्याच्या बद्दलचा समज बिलकूल असाच झाला होता', मामा गूरूजींना सांगत होते. 'आहो पाटील साहेब, या गावच्या लोकांना माहीत नाही, या पोराला आमच्या जळगाव जिल्ह्याच्या शिक्षण अधिकाऱ्याने, त्याची हूशारी पाहून सरळ दुसरीत नाव घातले, पहिलीच्या वर्गात तो एक दिवसही गेला नाही आणि दूसरी नंतर एकदम चौथीत नाव घालायची शिफारस केली आहे'. त्यांनी मामाला समजावले. ते ऐकून मामा कावरे बावरे झाले हे असे कसे होईल? पण मामा मात्र आपल्या मिशावर बोटे फिरवत कधी गूरूजींचे तर कधी माझे तोंड पाहत शांत बसले होते.'त्याला सरळ चौथीत टाकले, पण त्याच्या काही अडचणीमुळे तो, चार साडेचार महिनेच शाळेत हजर होता. तरी तो दुसऱ्या साऱ्या पोरांपेक्षा जास्त मार्कांनी पास झाला आहे. पंच्यान्नव टक्के मार्क त्याने मिळवले आहेत'. गुरूजी म्हणाले, 'दर वर्षी शिक्षण अधिकारी साहेब, खास त्याच्या बाबतच विचारणा करत असतात. या वर्षी ही त्यांनी, याच्या बाबत चौकशी केली आहे. याची प्रगती ऐकून साहेब एकदम खूश झाले आहेत. त्यांनी याला नगरदेवळ्याच्या शाळेत टाका असाही आदेश दिला आहे, साहेबांच्या आदेशाप्रमाणे आम्ही तपास करत त्याच्या घरी गेलो, तर, आमचा डोळ्यावर विश्वासच बसेना, त्या घराला दारच नव्हते. तर कामड्यांच्या ताटीने बांधून ते घर बंद केलेल होते.तेथे असे कळाले की, ते कुटुंबच तुमच्याकडे राहयला कूसूंब्याला निघून गेले आहे.हे आम्ही साहेबांना कळवले. तर ते म्हणाले त्याचा दाखला घेऊन एक कूसूंब्याला जा, तिथल्या शाळेच्या हेडमास्तरांना तो दाखला देऊन, त्यांना सांगा त्या पोराच्या आई बापाला स्वत: भेटून, त्या पोराला तिथल्या शाळेत दाखलच करून घ्या, हा माझा निरोप आहे, असे त्यांना सांगा. म्हणून तो तपास करत करत मी इथ पर्यंत आलो आहे. आता येथून पुढे तुमचीच मदत आम्हाला लागणार आहे. मी इकडचाच म्हणजे होळनाथ्याचा राहणारा आहे. म्हणून आमच्या हेडमास्तरांनी हे काम माझ्यावर सोपवले आहे. याचा हा दाखला मी इथल्या हेडमास्तरांना देऊन जाणार आहे आणि त्यांना आमच्या साहेबांचा निरोपही देऊन जाणार

आहे'. गुरूजी बोलायचे थांबले. तेव्हा मामांनी एक मोठा सुस्कारा सोडला. काय बोलावे हे त्यांना सुचतच नव्हते. हे बिचारे गावोगाव पोट भरण्यासाठी डोक्यावर सारा संसार घेऊन या गावाहून त्या गावाला फिरत आहेत. पण मुलाचे नशीब सतरा पडद्यांच्या आडून त्याला पुढे आणण्यासाठी एक ना दोन खटपटी करत आहे. ही सांगड कशी जमायची? कपाळावर हात फिरवत फिरवत, ते तोंडातल्या तोंडात काही तरी बडबडले.'गोइंदया, मामाला आण गूरूजींना पाणी देरे बेटा', आई म्हणाली. अप्पाने त्यांना पाणी दिले. अप्पा व अण्णा कपडे घालून कामावर जायला निघाले. 'आई आम्ही जातो कामावर. असे सांगून मामा व गूरूजींना नमस्कार करून दोघे कामावर निघून गेले. मोठा श्वास घेऊन आई म्हणाली,'सोन्याची सुरी कोणी पोटात लपवतो का गूरूजी, पहा हा माझा संसार,या भिकारी संसाराला मी कसी चालवू? त्याचे म्हणा का आमचे म्हणा, बिना मेहनत करून कमवल्या बिगर, पोट कसा भरेल'? गूरूजी थकलेल्या मनाने घरातल्या उघडया संसारावरून नजर फिरवत होते. 'काकू तो तर आज घरात भाकरीच थापतो आहेना? कमवायला थोडीच जातो आहे'? गुरूजींनी मोठ्या हिमतीने आईला विचारले. 'गूरूजी तो आमच्याहून जास्तीचे काम रोज करतो. तो जे काम करतो ते जर आम्ही करायला लागू, तर रोजचे दहा-अकरा घरातच वाजत जातील, त्यावेळी आम्हाला कोन कामाला लावायला येईल. आम्ही दिवस भर अंगणातच खट्टा मारत बसू का? गूरूजी आमचे सारे हातावरचे आहे इकडून कमावून आणायचे,तिकडे करून खायचे. तो सयपाक, धूने, भांडे, सारवणे, पोतारने, जंगलातून लाकड आणणे, महिन्याकाठी दहा बारा रुपयाचे शेण गोळा करणे, हे सारे काम तो करतो', आई जरा कडकपणेच बोलली. गूरूजींनी आईची मंशा समजून घेतल्या नंतर, पुढे जास्तीची चर्चा व्यर्थ ठरेल असे समजून बोलणेच बंद केले. मामा काहीच बोलू शकले नाही. 'बर काकू मी जातो', असे सांगून मामा बरोबर गुरूजी घराबाहेर पडले. आई कामाला जातांना घर नीट सांभाळ म्हणाली, पण तिच्या बोलण्यात रोजचा गोडवा नव्हता. तिचा आवाज एकदम दबल्या सारखा झाला होता. आई गेल्यावर मी माझ्या कामाला लागलो, घरातले सारे भांडे घासून, धुणे घेऊन ते धुवायला गावा

बाहेरच्या पाटावर गेलो. मी चौथी पास झालो हे ऐकून मला खूप आनंद झाला होता. नेहमी प्रमाणे जो तो आपापल्या कामाला लागला.

गिरासे गुरूजी जाऊन दहा पंधरा दिवस लोटले असतील. तो बुधवारचा दिवस होता. बुधवारी कूसूंब्याचा बाजार भरतो. बाजाराच्या दिवशी मजूर लोकांना कामावरून लवकर सुटी मिळायची. आई कामावरून येऊन ओट्यावर बसून पाणीच पीत बसली होती, तोच आन्यामामा बरोबर दोन तीन लोक, ओटयावर येऊन आईसमोर बसले. ती गर्दी पाहून मी घरात निघून गेलो. घरातून एक गोधडी घेऊन आलो, आणि ती अंथरायला लागलो, 'नको टाकू' आन्यामामा म्हणाले. त्यांच्यात एक शहाणा माणूस, आईला म्हणाला ताई आम्ही या मूलाचे नाव या शाळेत दाखल करायला आलो आहोत. 'दादा ते बिलकूल जमणार नाही, मी पहिले पण कोण गुरुजी आले होते त्यांना सपस्ट सांगून टाकले आहे', आई म्हणाली. 'त्यांच्या बरोबर हे माझे भाऊ पण होते. भाऊ सांगना तू पण या सायबांना. तुला तर समदे माहीत आहे, तू तर मला आखतवाड्यापासून पाहातो आहेना', आई मामाकडे पाहून बोलली. 'त्याचे काय आहे दादा, आजून एक देढ वर्सात हा बी कामाला लायक होऊन जाईल, तो कामाला लागला की आमचा संसाराचा गाडा सूकाचा चालू होऊन जाईल. हा आज शाळेत अटकला, तर मग हा कायमचा हातातून निघून जाईल. माझे दुसरे दोनी पोर, त्यांना चड्डी नेसता येत नव्हती, तवा पासून मोल मजुरी करत आहेत, ते कूठ पतूर याला असे आयते पोसत रातील? वरीस दोन वरीसात त्यांचे लगीन झाले, तर मंग याला कोण कमवून आयता पोसेल? फकत हवा पानीवर पेट थोडीच भरतो दादा, सांगाना तूम्ही. घरात आज आहे, कालच्याला काही नाही, असी आमची दैना आहे'. जितके बोलता आले तितके बोलून आई मोकळी झाली. आईची कळकळ आणि चिंता त्या लोकांना दिसत होती. त्यांनी आईचे सारे बोलणे शांतपणे ऐकून घेतले. 'ठीक आहे ताई, तुम्ही जे सांगितले ते सारे आम्हाला बिलकूल पटले आहे. पण तरी तुम्ही मला एक सांगा तो आखतवाड्याला कसा शिकला? त्या गावाला तुमचे कसे भागले'? त्या सज्जन मानसाने बिलकूल शांतपणे आईला विचारले.'दादा तिथे तो गाई चारायचा, त्यांचे सेन गोळा करायचा,

गाई  सांभाळायची मजुरी, शेणाचे खत विकून येणारे पैसे, कसे बसे तो पंधरा वीस रुपये कमावून आणायचा. घरातले सारे काम तो, लवकर लवकर आवरून घ्यायचा आण मग शाळेच्या ओटयावर बसूनच, शाळेतला अभ्यास सिकायचा. एक बी दिन तो शाळेत गेला नाही,पाटी नाही, लिखनी नाही, बुक नाही काही बी त्याला लागला नाही. आण, म्हणून आमी बी मजुरी करायला मोकळे रायचो', आई ने खुलासा केला.'बर आता तुमचे कामाची कशी आखणी आहे'? त्या मानसाने विचारले. आई ने आमच्या साऱ्यांच्या कामाची आखणी सांगितली.'ठीक आहे. मग ताई तस जर पाहिले, तर तुमच्या इथल्या कामाची आखणी पाहिली तर त्याच्या, आजच्या कामात फक्त स्वयंपाकाचाच मुद्दा असा आहे की तो तूम्हाला विचारात पाडतो आहे, बाकीचे धुणे, भांडे, सारवणे, लाकडे, सेन गोळा करणे सारे काम तर तो करतोच आहे ना ? फक्त शेणाचे आणि लाकडे आनायचे कामच तो शाळेच्या वेळे नंतर करू शकतो. कारण शाळा फक्त सहा तासच भरते, सकाळी तीन आणि दुपारचे तीन तास. फक्त तीन वर्षांचा काळ आहे, पाचवी, सहावी, सातवी, नंतर तो माध्यामिक शिक्षणाला गेला की,अकरा वाजे नंतर तो शाळेत जात जाईल, तेव्हा तो त्याचे सारेच्या सारे काम एकटा करत जाईल', तो सज्जन माणूस बोलायचा थांबून ,आईच्या तोंडाकडे पाहू लागला.'मी सांगितलेली सारी आखणी समजली असेल तर, मला नाही वाटत तूम्हाला आता काही अडचण असेल', त्याने आईला  विचारले.'हा आणखी एक गोष्ट माध्यमिक शाळेतल्या काही गुरूजींनी, जर त्याला पाणी भरणे, झाडझूड करणे, असे काही काम दिले तर, तो तूम्हाला तिकडून बी पैसे कमवून आणत जाईल', तो माणूस म्हणाला. आसी साऱ्या कामाची आखणी त्यांनी करून दाखवली.'आई  मी पाणी भरत जाईन, अण्णा म्हणाला, आई मी तुला स्वयंपाकात मदत करत जाईन, अप्पा म्हणाला. ते सारे ऐकून आई गूरमळून गेली. या लोकांना काही देणे घेणे नसतांना, यांचा याच्यात काही लाभ नसतांना, या बिचाऱ्यांची माझ्या घरी चकरा मारायची काय गरज? याच्या सिकल्याने त्यांचे काही भले होणार नसतांना, एवढा आटापिटा करून यांना कोणी जहागिरी तर देणारच नाही, मंग असे काय आहे, एकदम तिला आखतवाड्याच्या मोठ्या मास्तरांचे बोल आठवले ताई

तुझा मुलगा हिरा आहे हिरा.', आई मनातून एकदम ठाम झाली. हो नाही, हो नाही करता करता आई शेवटी हो म्हणाली. गुरुजींनी आईचे शेवटी आभार मानले. त्यांनी मला सोमवार पासून सकाळी आठ वाजे पासून शाळेत यायला सांगितले.

अशा रितीने माझी कूसूंब्यात पुन्हा शिक्षणाला सुरुवात झाली.त्यावेळी पाचवीला मला तानाजी गूरूजी होते.शाळेत, सूतबेसीक पण शिकवले जायचे. माझी अभ्यासातली तयारी, शाळेतला नियीमत पना, शिस्त पाहून गुरुजी खूश असायचे. सूत बेसीकच्या कामातला सफाईदारपणा, समान प्रतीची सूतकताई, मागावरची सफाईदार कापडाची विननी, सूताचे घट्ट ताने बाने, ताठ ठेवणे, सफाईदारपणे फाळके भरणे, माझे हे सारे काम पाहून शाळेचे मुख्याध्यापक आणि दर आठवड्याला धुळ्याहून येणारे सूत बेसीकचे शिकाऊ मास्तर लोक खूप खूश असायचे. मी केलेले सारे कामाचे नमुने, शाळेच्या सूचना फलकावर नावा समत लावलेले असायचे. दुसऱ्या वर्गावर मी बनवलेले पेळू, कातलेल्या सूताची टकळी, पिंजलेला कापूस मुलांना नमुना म्हणून दाखवले जायचे. वार्षिक परीक्षेच्यावेळी तर, मोठ्या साहेबांना सारे मीच बनवलेल्या वस्तू हजर केल्या जायच्या. साऱ्या जिल्हयात सूतबेसीक बाबत कूसूंब्याची शाळा एक नंबरवर असायची. त्या काळी बेसीक शाळांना, जी.बी.टी.सी. शिकणारे शिकाऊ मास्तर लोक, मूलांना पाठ शिकविण्याच्या चाचणी परीक्षेसाठी कूसूंब्याच्या शाळेत दर शनीवारी यायचे, सांस्कृतिक कार्यक्रमही त्याचा एक भाग म्हणून असायचा. त्या प्रत्येक कार्यक्रमात माझा सहभाग असायचा. एक पात्री नाटक, गायन, नकला, विनोद असे निरनिराळे पार्ट मी त्यात सादर करायचो. या साऱ्या कार्यक्रमात आमचे तानाजी गुरुजी हिरिरीने शाळेकडून हजर रायचे. माझे काम पाहून ते माझ्यावर फार खूश होते.ते मला नेहमी म्हणायचे 'आरे गोविंदा तू दिसतो कोकरू पण आहे शिंगरू'. ते ऐकून बाकीचे गुरूजी खूप हसायचे. मला त्यावेळी त्या म्हणण्याचा अर्थ कळत नव्हता, नंतर मला तो समजला. ते मला कधी कधी आठवले की खूप हसायला येते. याच काळात गूरूजींनी मला, कन्या शाळेतली शिक्षिका कांबळेबाईंकडे पाच रुपये महीन्या प्रमाने पाणी भरायचे काम लावून दिले होते.त्यांचा मुलगा अशोक ही

माझ्याच वर्गात होता. दिवसा मागे दिवस निघत गेले. मी सातवीची परीक्षा दिली. त्या काळी सातवीला व्हरनाक्यूनल फायनल म्हणायचे. ती परीक्षा पास झाले म्हणजे मराठी शाळेत शिक्षकाची नोकरी पक्की असायची. त्याकाळी सातवी पास म्हणजे फार मोठी पदवी होती. परीक्षेचा निकाल लागला, मी अख्ख्या जिल्ह्यात तिसरा आलो होतो.त्या वर्षी कूसूंबा शाळेला शिक्षण खात्याकडून उत्कृष्ट शाळेचे प्रमाणपत्र मिळाले होते. शाळेत माझेही कौतुक झाले होते शाळेने खास कार्यक्रम आयोजीत करून मला सातवीचे प्रमाणपत्र दिले होते.त्या कार्यक्रमाला, आईला खास बोलावण्यात आले होते आणि आईचाही सन्मान करण्यात आला होता. त्या रात्री आई मला छातीला धरून खूप रडली होती. कारण तिच्या जिंदगीत तिने तिचा असा सन्मान झालेला कधीच पाहिला नव्हता. आता मी शेती कामाला पुरता तयार झालो होतो. तरी मला महिनेवारीने पण लावायला कणीच येत नवता. कारण मला पुरा कूसूंबा कोणत्या ना कोणत्या कारणामुळे ओळखत होता, म्हणून एवढ्या हुशार आणि कलाकार पोराला, कसा कामाला लावावा, ही पण एक अडचण होती. रोज मजुरीवरच दिवस निघत होते. जड काम करण्याची तशी माझीपण कुवत नव्हती. किरकोळ कामाचे होके पण कधी यायचे, कधी नाही.

एके दिवशी तानाजी गुरुजी घरी आले. त्यांच्याबरोबर अजुन तीन लोक होते. तानाजी गुरुजींना तशी माझ्या दिवसभरच्या कामाची बरीच माहिती झाली होती. आई भाऊ तयारी करून केव्हा कामावर जातात,मी कांबळेबाई कडून पाणी भरून घरी केव्हा येतो, ही सारी माहिती त्यांना होती. आई, भाऊ कामाला जाण्याआधी आणि मी पाणी भरून यायच्या वेळीच ते बरोबर घरी आले. त्यावेळी अप्पा अण्णा पण घरीच होते, आई गुरूजींना चांगली ओळखत होती. त्या साऱ्यांनी आईला नमस्कार केले. इतके शिकून मोठे झालेले लोक, आपल्याला अंगणात उभे राहून नमस्कार करतात या भावनेनेच आईला एकदम धन्य झाल्या सारखे वाटले. तिने डोक्यावरचा पदर व्यवस्थित करून एकदम भांबावल्यागत करत ती अंगणात खाट टाकायला लागणार, तेवढ्यात गुरूजी बरोबर आलेल्या पैकी एक जण पुढे होऊन, पटकन आई च्या हातातून खाट घेत, ती टाकून घेतली. दुसरी व्यक्ती थोडी पुढे होऊन म्हणाली 'मावशी मी

तुमच्याकडे एक मागणी घेऊन आलो आहे. काम आणी मजुरी या शिवाय आईला  दुसरे काहीच माहीत नव्हते, तिने अजून पर्यंत, पूर्ण कूसूंब गाव पण पाहीलेल नव्हत, दिवसभर जंगलातले काम आण सांजच्याला घरी आल्यावर दिवसभरच्या कामाने थकून आल्यावर खाऊन पटकन झोपून जाने, सकाळीच लवकर उठून, ज्याने त्याने आप आपले काम आवरायचे आणि परत आपल्या कामावर जायचे, एवढेच आमचे जग होते, गावातल्या रिकाम्या भानगडींशी काही देणे घेणे नव्हते, गावात काय चालले आहे, कोन कोनाचा काय लागतो, कोण पुढारी आहे? कोन सदाचारी आहे? या बाबत कोनाला काहीच माहीत नव्हते, मंग मी यांना काय देऊ शकते, आईला कळेना. 'गुरूजी आण तूमी पण माझ्या गरीब बाईची फजिती करायला आले आहेत का? आई म्हणाली. तो माणूस पुढे आला, त्याने माझ्या डोक्यावर हात ठेवला आणि म्हणाला मला माझ्या हायस्कूलसाठी विद्यार्थी म्हणून हा मुलगा पाहिजे आहे, मावशी अजिबात नाही म्हणू नका. 'मी जेम तेम करून त्याला पोट भरण्या इतके कमावता करण्याची कोशिश करते आहे. पण मधेच त्याला बारा फाटे फुटत आहेत. इकडची तिकडची लालूच दाखवून, त्याला सिकन्यात अटकवू रायले. हा सिकन्यात लागला का पुरा सूक्काळ्या बनून जाईल, मंग टाइम येईल तवा उनातानात काम करायला याची नानी सपनात येईल. आज त्याची बढाई मारणारेच त्या वेळी याला सूक्काळ्या म्हणतील, का म्हणू नाही? आव सायब तूमीच सांगाल बाप नवता, आईने पण याला कामाचा हेडा लावला नाही. आता पावत तो लई धाकला हाये म्हणून मी ऐकून घेतल, पण आता अजिबात ते होणार नाही, हे शेवटचे बोलणे.  मला माफ करा', आई ने सवाल मिटवायचा प्रयत्न केला. 'बघा ताई मी इथल्या पूर्ण शाळेचा मुख्य आहे. शाळा आमचीच खूद आहे. शाळा चालू करायला तिनच वर्ष झाले आहेत. शाळा कायम चालावी, गावच्या गरीब पोर बाळांना, शहरात जाऊन शिकणे परवडणार नाही, पैसे वाल्यांचे पोरे जातील पैशांच्या जोरावर, पण त्यांच्या  पोरी शहरात जाऊन शिकायची हिम्मत करणार नाहीत, पण गरिबांच्या पोरबाळांना शिकता यावे म्हणून मी हुशार पोरांच्या आई बापांना खूद जाऊन भेटतो आहे आणि त्यांना आमच्या शाळेत भरती करतो आहे. त्याच्याने,

हुशार पोर सालोसाल पास होत जातील शाळेचा लौकिक वाढून सरकारी मदत शाळेला मिळत जाईल आणि शाळा अजून पुढे जाईल. बाकीच्या पोरांना फी द्यावी लागते, मी तुमच्याकडून एक नवा पैसा फी घेणार नाही. तुमचा मुलगा फार हुशार आहे. त्याच्या मुळे कूसूंबा गावच्या मराठी शाळेचा नाव लौकिक साऱ्या जिल्ह्यात गाजतो आहे, असा हुशार पोरगा भगवंताने तूम्हाला दिला तो असाच नाही, तो पाहातो आहे तुम्ही त्याची बरोबर काळजी घेता आहात का नाही. तूम्हाला देवाच्या प्रसादाची हेळसांड केली तर काय भोग येतात त्याची एक गोष्ट सांगतो. एका भक्ताला मछिंद्रनाथांनी राखेचा प्रसाद दिला. हं हे काय राखेचा प्रसाद, आशा गढूळ मनाने त्या भक्ताने तो प्रसाद घेतला आणि उकिरड्यावर फेकून दिला. काही दिवसांनी मछिंद्रनाथ तिकडून जात आसतांना त्यांना त्या भक्ताची आठवण झाली. ते त्याच्या घरी जाऊन त्याला भेटले आणि विचारले दाखव माझ्या प्रसादाचे फळ कोठे आहे ते? भक्त म्हणाला देवा, ती तर राख होती, ती मी उकिरड्यावर फेकून दिली. तेव्हा मछिंद्रनाथ भक्ताला म्हणाले दुर्दैवी भक्ता, ताबडतोब जाऊन त्या उकिरड्यातून माझा बाळ घेऊन ये. भक्त धावत गेला त्याने तो उकिरडा कोरला तर त्यात गोरक्षनाथ खेळत होता. तेवा तो भक्त रात्र भर तोंड बडवत रडत राहिला. पण बाळाला बाप आणि आई कोणीच लाभले नाही. कारण जेव्हा दोन शहाने लोक चांगला सल्ला देतात, त्यात खास भगवंताची इच्छा आहे असे समजावे. गावात पोरांची काय कमी आहे का? पण लोक त्याचीच का वाहवा करत आहेत. त्याने चांगले शिक्षण घेतले, तर त्याचा व त्याच्या बरोबर तुमच्या घराण्याचा लौकिक होईल, ही पहिली गोष्ट, त्याच्या यशामुळे आमच्या शाळेचे नाव होईल ही दुसरी गोष्ट, तो आमच्या शाळेत शिकतो हे ऐकून गावातले आणि बाहेर गावचे पण चांगले हुशार हुशार मुले आमच्या शाळेत, शिकायला येतील ही तिसरी गोष्ट, त्यामुळे आमच्या शाळेचा दर्जा उंचावेल ही चौथी गोष्ट, त्यामुळे आमची शाळा कायम होईल आणि गावातील गोरगरिबांचे पोर पण शिकतील ही पाचवी गोष्ट आता सांगा, किती पण अडानीतला अडाणी माणूस पण या कामाला नाही म्हणेल का?' तो माणूस बोलायचा थांबला. आमची अशी इच्छा आहे की, अशा सर्वगूनी मुलाने

आमच्याच शाळेत शिकावे. त्याच्या आणि तुमच्या, येणाऱ्या भविष्य काळातील प्रगती रोखून, तुम्ही त्याला भाकरी थापायला लावून, एका होतकरू मुलाच्या आयुष्याचे नुकसान करणार, याच्या हुशारीचे नाव साऱ्या जिल्ह्यात झाले आहे. कदाचित ते तूम्हाला माहीत नसेल. तुमची घरची परिस्थिती पाहून, इतरांवर जसा मी गावच्या हक्काने त्यांच्या मुलांचे नाव परस्पर शाळेत टाकून घेतो तसी जबरी सलगी मला करता येत नाही.हा,एवढी हामी मी देऊ शकतो की,तुमच्या कडून कोणतीही फी किंवा शाळेत लागणाऱ्या इतर साहित्याच्या खर्चाची रक्कम किंवा इतर लागणारा कोणताही किरकोळ खर्च. जो इतर पोरांकडून  घेतला जातो तो घेतला जाणार नाही, म्हणजे थोडक्यात याने फक्त शाळेत येऊन शिकायचे आहे बस.त्याने फक्त त्याच्या वह्या, पेन, पेन्सिल हेच सामान आणायचे आहेत. अभ्यासाठी त्याला शाळेचे पुस्तके दिली जातील. ती पण व्यवस्था मी करून टाकतो बस. शाळेचे मालक एक एक करत बोलतच चालले होते', तेवढ्यात त्यांच्या बरोबर आलेले शाळेचे हेडमास्तर मधेच म्हणाले, 'पाटील साहेब मी याला माझ्याकडे घरचे पाणी भरायचे व घर अंगणाच्या झाडझूडचे  काम देतो त्याला मी महिन्याचे सात रुपये देत जाईन. तसेच दुसरे सर पण आहेत, तेही याला कामावर ठेवून घेतील, तर कदाचित याला महिन्याकाठी तीस पस्तीस रुपयाची कमाई सहज होऊन जात जाईल'
'झाले तर मग अजून काय पाहिजे?' आईकडे पाहून शाळेचे मालक म्हणाले.
'पारूबाई आता मागे पुढे काही पाहू नको, आण मागे पाय काही ओढू नको', आन्यामामा म्हणाले. आखरीला कापऱ्या आवाजात आई म्हणाली 'तुम्ही इतके मोठे मानसे, मला कवाचे समजावून सांगू रायले, हे मला कसे तरीच वाटते आहे. मला इथे येऊन तीन साडेतीन साल होत आले, माझ्या दारी मजुरी सांगणाऱ्या लोकांना सोडून कोणी कधी आला नाही. तुमच्या सारख्या धनी लोकांचे माझ्या दाराला पाय लागले, ते याच्यामुळेच हे पण काही कमी नाही. तुमचा इतका मोठा इस्वास माझ्या झोपडीतल्या या पोरावर आहे हे पण काही कमी नाही. आनाभाऊच्या साक्षीने केला मी माझा दगड तुमच्या हवाले, आता तो ठोकरा खावो, नाही तर फूल झेलो, हे आता त्याच्या करणीवर, आण त्याच्या भाग्यावर सोडते'. असे बोलून आई ने साऱ्यांना हात जोडून

नमस्कार केला. ‘मावशी तुमच्या मुलाला कफल्लक नाही, कोळशातून हिरा बनवूनच त्याला आमच्या शाळेतून बाहेर काढू. मी या हायस्कूलचा मालक, तुम्हाला आजच शब्द देतो. मी आणि आमचे हेडमास्तर याच्यावर बारीक लक्ष ठेवतील तुम्ही बिलकूल काळजी करायची नाही’. ‘हा गूरूजी माझे तुम्हाला सांगणे आहे, याने कोणत्या पण कामात अगर अभ्यासात कुचराई केली तर, याला मिन्नत करून शाळेत घेतले आहे हे, भुलून जायचे आण माझी पण पर्वा करायची नाही, असा नीट करायचा की, पुढे जन्मात तो त्या वाटेवर जाणार नाही’. आई म्हणाली. ‘तुमचा फार फार आभारी मावशी’ असे बोलून पाटील सायबांनी आईला नमस्कार केला, सारे जण हळू-हळू ओट्याखाली उतरून निघून गेले. गल्लीतली सारी मंडळी ओट्या, पायरीवर उभे राहून पाहात होते, ऐकत होते. आई आणि भाऊ कामावर जायला घरा बाहेर पडले अण्णा अप्पाच्या हातावर टाळी देत होता.



# शिक्षण ते नोकरी

दुसऱ्या दिवसापासून माझे हायस्कूलमधे जाणे सुरू झाले. दिवसामागे दिवस सरकत गेले. जस-जशा शाळेतल्या परीक्षा, निरनिराळ्या स्पर्धा, शारीरिक शिक्षणाचे कार्यक्रम होऊ लागले, तस-तसा त्यांच्यातला माझा सहभाग वाढू लागला आणि त्यातील माझे वर्चस्व सिद्ध होऊ लागले. परीक्षा असो, मैदानी खेळ असो, इतर खेळ असो किंवा सांस्कृतिक कार्यक्रम, भाषण, वादविवाद असोत, त्यात माझा पहिला नंबर ठेवलेला होता. शाळे व्यतिरिक्त होणाऱ्या इतर हिंदी, इंग्रजी भाषांच्या परीक्षा, गणित, चित्रकला अशा ज्याही शासनमान्य परीक्षा निरनिराळया बोर्डाकडून व्हायच्या त्यात पण माझा नंबर ठेवलेलाच. त्यामुळे जसा मी शाळेत, तसाच गावात सुध्दा लहान मोठे, गरीब, श्रीमंत, मजूर, हमाल, कलाकार, जेष्ठ, श्रेष्ठ सारी मंडळी माझे कौतुक करू लागली. मला शाळेतील पाच सर आणि गावच्या तलाठ्याकडेही पाणी भरायचे काम मिळाले. शिकता शिकता मी माझी महिन्याची जी कमाई व्हायची ती आईला देऊ लागलो. त्यामूळे माझे अकरावी म्हणजे त्यावेळची एस.एस्.सी. बोर्ड परीक्षे पर्यंतचे शिक्षण पुरे झाले. बोर्डाच्या एस.एस.सी. परीक्षेत मी ७१ टक्के मार्क मिळवून पास झालो. तालुक्यात माझा अकरावा नंबर आला. अकरावी पूर्व परीक्षा दिल्या नंतर, मी धुळ्याला काम शोधायला आलो. राहायची सोय नव्हती. धुळ्यात गली नं.५ मधे, कूसूंब्याचे आमचे कूळ बंधू राहात होते. त्याने मला त्याच्या खोलीत, सह भाडेकरू म्हणून घेतले. त्यावेळी अकरावीची

वार्षिक परीक्षा व्हायची होती. दिवसा मिळेल ते काम करून, रात्री परीक्षेचा अभ्यास करायचा होता. शहरात आल्यावर खोलीभाडे आणि रोजचा जेवणाचा खर्च मलाच सांभाळायचा होता. म्हणून काम शोधणे मला भाग होते. आधी मला गली नं ४ मधे महात्माजींच्या डेअरीवर दूध वाटपाचे काम मिळाले. चैनी रोड पासून डॉ. चौधरींच्या दवाखान्यापर्यंत दूध वाटप करावे लागे. दूध वाटपाचे काम करता करता मी दुसऱ्या कामाचा पण तपास करत होतो. एकाने मला प्रकाश टॉकिजच्या मागच्या अग्रवाल नगरमधे नवीन बांधकाम चालू होते तिथे बारा आणे ब्रास प्रमाणे भिंतींना, प्रायमर मारायच्या कामाला बोलावले. पूर्ण कॉलनीचे नवीन बांधकाम चालू होते. त्यामुळेच तिथले काम भरपूर दिवस चालणारे होते शिवाय दिवसभर जितके जास्त काम होईल तेवढी मजुरी जास्त मिळणार होती, म्हणून मी दूध वाटायचे काम सोडून दिले. त्याचा शेजारच्या प्रकाश टॉकीजमधे बोर्ड रंगवायचे काम करणारा पेंटर आणि मी एकाच भागात राहयचो. तो माझी प्रायमर मारण्याची सफाई पाहून खूष होता. श्री. गोरे हे टॉकीजचे मॅनेजर होते. त्याने एके दिवशी सहज विचारले अरे पोरा तुझे शिक्षण झाले आहे का? मी म्हटले 'हो काका, मी दहावी पास आणि आता अकरावीची परीक्षा देणार आहे'. 'काय म्हणतोस? अकरावीची परीक्षा देणार आहे, तर अभ्यास केव्हा करतो?', 'रात्री वेळ काढून अभ्यास करतो'.'वेळ मिळतो'? 'काय करणार काका, खोलीभाडे आणि खाण्या-पिण्याचा खर्च निघेल इतके तरी कमवावेच लागेल ना?' थोडावेळ विचार करून तो म्हणाला 'तू सिनेमा टॉकीच्या गेटवर काम करशील का? दुपारी बारा ते रात्रीचे बारा वाजेपर्यंत गेटवर थांबावे लागेल. तिथे खरे काम सिनेमा सुरू होईपर्यंतच असते एकदाचा पिक्चर सुरू झाला की तू इंटरपर्यंत खुशाल अभ्यास करत जा'. झाले, दुसऱ्या दिवसापासून टॉकिजवर काम करू लागलो. सकाळी पाच वाजेला उठून आंघोळ व पाच सहा पोळ्या करून सात वाजेला रंगाच्या कामाला लागून जायचो. साडेअकरा वाजेपर्यंत ते काम करून टॉकीजला यायचो. जवळच हॉटेल होती तिथे चार आण्याची भाजी घेऊन, सोबत आणलेल्या पोळ्या आणि भाजी खाऊन लगेच टॉकीच्या गेटवर कामावर हजर व्हायचो. महिन्याला वीस रुपये ही मिळयाचे आणि पेंटिंगच्या कामाचे कधी

वीस तर कधी पंचवीस रुपये यायचे. पेंटर सिनेमाच्या प्रोजेक्टरवर पण सिनेमाचे रीळ चालवायचे काम करायचा. शेवटी बोर्डाची परीक्षा दिली. परीक्षेनंतर मला अभ्यास नव्हता. मग त्या रिकाम्या वेळात पेंटर मला वर प्रोजेक्टर हॉलमधे बोलवून, प्रोजेक्टर चालवायला लावायचा. मी ते काम दोन तीन दिवसातच शिकून गेलो. त्याने ही गोष्ट मॅनेजरला सांगितली, मॅनेजरने खूश होऊन मला लगेच दत्तूच्या मदतीला सिनेमा ऑपरेटर म्हणून ठेवून घेतले. मला आता महिन्याचे चाळीस रुपये मिळू लागले. परीक्षेनंतर मी धुळ्यालाच सरकारी नोकरीच्या प्रयत्न करण्यासाठी राहून गेलो. माझा खर्च काढून मी घरी आईला महिन्याचे पंचवीस रुपये पाठवू लागलो .साधारण एक महीन्यानंतर, शिक्षकाच्या नोकरीसाठी जाहिरात निघाली. ती माहिती मला पार्टनरने दिली. तो दोन दिवस खोलीवर आलाच नाही, आल्यावर त्याला विचारले, ‘कारे अण्णा दोन दिवस कोठे गेला होतास? सांगून पण गेला नाही’. त्याने मला त्या जाहिरातीबाबत सांगितले. मग आम्ही बरोबर अर्ज पाठवला. साधारण एक महीन्यानंतर, परत पार्टनर दोन दिवस खोलीवर आला नाही.तो परत आला तेव्हा आल्या आल्या त्याने मला विचारले, ‘का रे गोविंदा तुझी मुलाखत कशी झाली’? मी गोंधळून गेलो आणि त्यालाच विचारले ‘कसली मुलाखत रे’? तेव्हा तो मला म्हणाला, ‘अरे आपण शिक्षकाच्या नोकरीसाठी अर्ज केला होता ना’? ‘हो’ मी म्हणालो. ‘त्या नोकरीसाठीच मुलाखतीला बोलावणे पत्र आले आहेत, मी मुलाखतीला जाऊन आलो. तिथे तुझे नाव त्या मुलाखतीच्या यादीत तर माझ्या पण वर आहे, पण चुकून ते जी. बी. गढरीच्या ऐवजी आर. बी. गढरी झाले आहे, म्हणून विचारतो तुझी मुलाखत कशी झाली’? ‘नाही रे मला मुलाखत पत्रच मिळाले नाही’ मी म्हणालो. ‘असे कसे होईल, मला तुझ्यापेक्षा सरासरी मार्क कमी असून मला बोलावणं पत्र आले आणि तुला आले नाही म्हणजे नवलच आहे. तू आताच जिल्हाधिकारी कार्यालयाला जाऊन तपास कर’. मी तसाच जिल्हाधिकारी कार्यालयाला गेलो. मुलाखती देणाऱ्या मुलांची खूप मोठी रांग लागली होती. मी दारावर उभ्या, दोन्ही तिनी चपराश्यांना माझ्या हातातली सारे सर्टीफिकिटे दाखवून आणि नोकरीसाठी केलेल्या अर्जाची पावती दाखवून साहेयबांनी भेटायचे अशी विनंती करत होतो. ते सारे आतून

मोठ्या सायबाने पाहिले. त्यांनी जोराने घंटी वाजवली. त्या बरोबर दारावरचा शिपाई धावत आत गेला. साहेबांनी त्या चपराश्याला विचारले 'काय भानगड चालू आहे दारावर?' तेव्हा चपराश्याने त्यांना सांगितले, 'सर कोणी जी. बी. गढरी नावाचा पोरगा आहे, त्याने नोकरीसाठी अर्ज केला आहे, तो म्हणतो आहे तो नोकरी साठीच्या साऱ्या अटींची प्रथम श्रेणीत पूर्तता करतो आहे, तरी त्याला मुलाखतीसाठी का बोलावण्यात आले नाही? त्याच्यापेक्षा कमी गुणवाले आणि काही अटी न पूर्ण करणाऱ्यांनाही बोलावण्यात आले आहे मग त्याला का नाही? सायबांनी रागावून मला आत बोलावले आणि विचारले 'काय गडबड चालवली आहेस तू दारावर. मी, माझ्या हातातली सर्टीफिकेटसची फाटकी थैलीच त्याच्या समोर उलटी केली आणि रडून म्हणालो साहेब ही माझी गरिबाची जिंदगीभरची कमाई आहे, ज्यांच्या जवळ याच्या निम्मी पण कमाई नाही ते सारे रांगेत उभे आहेत. सगळयात मधे बसलेल्या साहेबाने ती पिसोडी उघडली, तर त्यांच्या हातात पहिलेच अकरावीचे एकहात्तर टक्के मार्क मिळवलेले सर्टीफिकेट पडले. ते पाहिल्याबरोबर ते स्वताशीच बडबडले 'अरे हे कसे? काय काय कागद भरले आहेत रे इतके तू या पिशवीत'? माझ्याकडं पाहून ते हळूच म्हणाले, 'सर सारे सर्स्टीफिकेटच आहेत. तू काय बी.ए.एल.एल.बी. पास केले आहे का इतके सर्टीफिकेट जमवायला? त्यांचे ही इतके सर्टीफिकेटस् जमत नाहीत'? त्यांनी मला हसत हसत विचारले. 'सायब काही बोर्डाचे आहेत तर काही शासन मान्य अधिकृत कोर्सचे आहेत', मी उत्तर दिले आणि मग त्यांनी एक एक करून सारे सर्टीफिकेट पाहायला सुरुवात केली. सारे पेपर पाहून झाल्यावर त्यांनी दारावरच्या चपाराशाला घंटी वाजवून बोलावले, चपराशी धावतच आला, 'याला आत का सोडत नव्हते?' त्यांनी दरडावून विचारले. 'साहेब याचे नावच यादीत नाही, यादीत आर. बी. गढरी नाव आहे, याचे नाव जी. बी. गढरी असे आहे'. 'आण ती यादी, दाखव मला', 'साहेब आर. बी. गढरी नावाची एक पोरगी दोन दिवस आधीच मुलाखतीला येऊन पण गेली', चपरासी म्हणाला 'ठीक आहे, हा नंतरचा विषय आहे, आधी याची केस पुरी करू. बर तुम्ही सर्वांनी या मुलाचे सारे पेपर पाहिलेत', साहेबांनी त्यांच्या सहकाऱ्यांना विचारले. 'हो साहेब' ते

म्हणाले. ‘बर मि. गढरी तुम्ही नोकरीसाठी अर्ज केला आहे का? त्याची आमच्या कार्यालयाकडून पोहोच मिळाली आहे का’? त्यांनी मला विचारले.‘हो सायब ही ती पोहोच आहे, खिशातून एक पावती काढून मी त्यांना दाखवली. ‘वा छान. आपल्याला याची मुलाखत घ्यावीच लागेल’ सायब म्हणाले. ते ऐकून मला फार आनंद झाला. पण मी तो मनातच जिरवला. मी डोक्यावरची टोपी नीट केली, शर्ट नीट करून उभा राहिलो. साहेबांनी सवाल विचारायला सुरुवात केली, ‘नाव काय तुझे’? ‘माझे नाव गोविंद भिकारी गढरी’, मी उत्तर दिले ,‘वडिलांचे नाव काय म्हणालास’? त्यांनी विचारले.‘भिकारी’ मी उत्तरलो. ‘भिकाजी का नाही रे’? त्यांनी विचारले. ‘साहेब त्या बाबत आई ने मला एक किस्सा सांगितला आहे’, मी म्हणालो. ‘चला आपण याचा किस्सा पण ऐकून घेऊ, सांग रे बाबा’ साहेब म्हणाले. आई ने सांगितले ‘आजोबांचे तीन चार लेकरे दोन दोन, तीन तीन महिन्याचे होऊन वारले. वडिलांचा जन्म झाल्यावर ते महिना सव्वा महिन्याचे झाल्यावर, एक मुसलमान फकीर दाराला भीक मागायला आला, आजीने भिक्षा म्हणून आजोबालाच त्याच्या झोळीत टाकून दिले आणि म्हणाली देव देतो पण लाभू देत नाही. तर तूच याला घेऊन जा. तो फकीर फार भक्तीवाला होता, तो म्हणाला ‘माँ जी, बडे भाग्यसे मिला है आपकू ये। खुदा की देन, ये तो जिंदा रहना ही चाहीए अगर जिंदा रहा, तो पिरबाबाके दूआसे ये बडा हुन्नरी निकलेगा, इसका नाम आजसे भिकारी ही रखना’, म्हणून वडिलांचे नाव भिकारी ठेवले होते’. मी सारी हाकीकत सांगून टाकली. बर ठीक आहे. राहणारा कुठला’? ‘मी आखतवाडे तालुका पाचोरे इथला राहाणारा आहे’. ‘काय आखतवाडे ? अरे पण तुझा पत्ता तर कूसूंब्याचा आहे’, ‘साहेब मी आखतवाडड्याचाच राहणारा आहे, पण सात आठ वर्षा पासून आम्ही कूसूंब्याला पोट भरायला आलो आहोत’. मी खुलासा केला.‘कोण कोण आहेत तुझ्या घरात’? त्यानी पुढे विचारले. ‘मी, आई आणि दोन मोठे भाऊ’ माझे उत्तर. ‘मोठे भाऊ पण शिकलेले आहेत का’? त्यांचा प्रश्न. ‘नाही साहेब सालदारी करतात’ माझे उत्तर. ‘मग काय ते सालदारी करून तुला शिकवत आहेत’? ‘हो साहेब, पण मी ही थोडथोड कमवून आईला देत होतो’ माझे उत्तर. ‘काय काम करायचा तू’? त्यांचा प्रश्न, ‘घर अंगणाची

झाड झूड, पाणी भरणे ही कामे, मी सराकडे पाणी भरायचे काम करायचो, आई  भाऊंच्या मजुरीत खोट पडू नये म्हणून, मी संध्याकाळचा स्वयंपाक करणे, भांडी घासणे, सगळ्यांचे कपडे धुणे, जळणासाठी जंगलातून लाकडे आणणे, शेण गोळा करून त्याचे खत करून विकणे ही रोजची कामे ही करायचो'. ते ऐकून साहेबांनी हातातले पेन खाली ठेवले आणि एकटक माझ्याकडे बघत राहिले. निवड समितीचे बाकीचे सदस्य हा सारा संवाद शांतपणे ऐकत होते. मधून मधून कधी माझ्याकडे तर कधी साहेबांकडे पहात होते. 'बर ते असू दे, तुझे मार्क लिस्टस् आणि सारे सर्टीफिकेट तू तुझ्या हाताने एक एक करून दाखव' साहेब म्हणाले .' हो साहेब' म्हणत, मी पुढे जाऊन त्यांच्या टेबलावरील माझी पिसोडी उचलून, तिच्यातून जवळ जवळ १५ ते २० सर्टीफिकीटांचा गठ्ठा त्यांच्यापुढे धरून उभा राहिलो. 'अरे नुसते प्रमाणपत्रच दाखव', तो गठ्ठा पाहून साहेब म्हणाले. 'साहेब ते फक्त प्रमाणपत्रच आहेत, प्रशस्ती पत्रकांचा गठ्ठा दुसरा आहे. मी उत्तरलो. 'अरे तू अकरावी पर्यंत दोनच परीक्षा बोर्डाच्या दिल्या आहेत ना'? साहेब जरा त्रासिक सुरात बोलले? 'हो साहेब पण हे सूध्दा शासन मान्य परीक्षेचेच प्रमाणपत्र आहेत' मी नम्रतेने म्हणालो. 'अरे तू कितवी पर्यंत शिकला आहेस? अकरावीच ना? का त्याच्या बी पुढे बी.ए. एलएलबी. तर नाही ना'?  त्यांनी जरा त्रागा करूनच विचारले. 'हो साहेब' माझे उत्तर. साहेब त्यात गणिताच्या तीन, संस्कृतची पंचम, हिंदीची पंडित, शाळेच्या मैदानी खेळांचे, सांस्कृतिक कार्यक्रमातील निरनिराळया कला नैपुण्यांचेही प्रमाणपत्र आहेत, मी परत नम्रपणे सांगितले. साहेबांनी तोंडाचा मोठा चंबू करून ऑ करून माझ्याकडे पाहिले. बाकीचे सदस्यही थोड शशांकच होते. साहेबांनी स्वत: ते प्रमाणपत्रांचे भेंडोळे त्यांच्या हातात घेतले आणि एकेक प्रमाणपत्र पाहून म्हणाले 'खरेच आहे तू सांगितल ते. अरे तुझ्या आयुष्याची ही खरी कमाई आहे, आणि तू त्यांना अशा पुटकुळ्या गुंडाळून ठेवतो आहेस'? साहेबांनी मला समजावले. 'बर असू दे', साहेब शांतपणे म्हणाले. 'वा! व्हरनाक्यूलरमधे अ श्रेणी, अकरावीमधे ही अ श्रेणीचे. राष्ट्रीय पातळीवरच्या तिन्ही भाषेतही प्रभुत्व, गणितासह त्या साऱ्या परीक्षेमधे स्नातक पदवीचे प्रमाणपत्र, मैदानी खेळातला एक असा खेळ नाही

ज्यात प्रथम क्रमांकाचे प्रमाणपत्र, कलाक्षेत्रातील भाषण, विनोद, लेखन वादविवाद, यांच्यातही नैपुण्य आणि सरते शेवटी जनरल चँपियनचे पारितोषिक हा सारा पसारा पाहून आम्ही तुझी मुलाखत घेत आहोत की, तू हे सारे दाखवून याच्यापैकी तुम्ही कोठे आहात ते आम्हालाच विचारतो आहेस, हाच आता खरा आमचा सोस आहे'. तुझ्याकडे शैक्षणिक क्षेत्रातील सर्वच मुद्यावरचे नैपून्याविषीचे प्रमाणपत्र आहेत, तर आम्ही कोणत्या मुद्यावर तुझी मुलाखत घ्यावी तोच आमच्या पुढे प्रश्न आहे. घ्या तुम्ही ही, स्वत: या प्रमाणपत्रांचे अवलोकन करून घ्या', असे सांगून मोठ्या साहेबांनी ते साऱ्या प्रमाणपत्रांचे पुडके बाकीच्या साहेबापुढे पुढे ठेवून दिले. चारही सदस्य एक एक करून प्रत्येक प्रमाणपत्र उलटून पूलटून पुन्हा पुन्हा पाहू लागले. जवळ जवळ अर्धा तासानंतर सर्वांच्या पण तोंडून एकच वाक्य बाहेर पडले 'ही होल्डस् ऑल' तर मग ठरले', साहेबांनी विचारले? 'बेलाशक' सर्व जण म्हणाले .'घे रे बाबा तुझी ही संपत्ती, जपून ठेवशील', साऱ्या प्रमाणपत्रांचा गठ्ठा माझ्याकडे सरकवत मोठे साहेब म्हणाले, 'बर कां, तसे तर सांगता येत नाही, पण आता लपवण्या सारखेही काही नसल्याने, तुला सांगूनच देतो, तुझी निवड पक्की झाली आहे. नुसतीच झालेली नाही, तर सर्वात प्रथम क्रमांकाने झाली असून, तू कामावर हजर होण्यासाठी तुझ्या तयारीत राहा', साहेबांनीच हसत हसत स्वत: सांगितले. माझा पार्टनर बाहेर माझी वाट पहात होता, मला पहाताच त्याने विचारले? 'आम्ही तर दहा मिनिटात बाहेर आलो होतो. तुला एक तासाच्यावर वेळ लागून गेला. काय झाले? 'काही नाही रे अण्णा, प्रत्येक साहेबाने माझे एक एक प्रमाणपत्र तपासत बसले, शेवटी, प्रमाणपत्र पाहिल्या नंतर म्हणाले, आम्हाला काही विचारायचा मुद्दाच सापडत नाही'. असे सांगून त्यांनी माझे सारे प्रमाणपत्र परत करून म्हणाले 'तुझी निवड प्राथमिकतेच्या क्रमाने करण्यात येत आहे', मी म्हणालो. 'मग तुला आत्ता पासूनच गूरूजी म्हणावे लागेल' खोलीवर जाऊन मी प्रमाणपत्र पेटीत ठेवले. तोवर बारा वाजत आले होते, मॅटिनी शो ची वेळ झाली होती. मी घाई घाईने प्रकाश टॉकी गाठली, पेंटर माझी वाटच पहात होता.'का रे उशीर झाला'? त्याने विचारले. काही 'नाही पेंटर, मी शिक्षकाच्या नोकरी साठी अर्ज केला होता. त्याची

आज मुलाखत होती. तिथे टाइम लागला. 'बर ते जाऊ दे आता, खाली थिएटरमधे लोकांनी सारा थिएटर डोक्यावर उचलून धरला आहे, जास्तवेळ घालवला तर लोक खूर्च्यांची मोडतोड करतील', मी पेंटरला म्हणालो.'बरं बरं चल, फिल्मची पेटी काढ',पेंटर म्हणाला. मी एक मिनिटात बॉक्समधून एक नंबरची पेटी काढून लगेच प्रोजेक्टरवर चढवली,आणि सिनेमाचा खेळ सुरू केला. थिएटर मधला गोंधळ एकदम बंद झाला. दहा बारा दिवसांनी अप्पा बरोबर काम करणारा विनायक पाटील धावतधावत प्रोजेक्टर कॅबिन मधे आला 'आरे गोविंदा लवकर चल अप्पाने आत्ताच्या आत्ता तुला घरी बोलावले आहे, काही तरी नोकरीचे सांगत होता. मी मार्केट मधे कापसाची गाडी लावून आलो आहे, तू ताबडतोब घरी निघ'.एवढे सांगून तो ताबडतोब परत गेला. पेंटर बाजूलाच बसला होता,'अरे तुला मास्तरकीचे बोलावणे आले असेल, तू जा मी प्रोजेक्टर सांभाळून घेईल. पेंटर, मला इथली मजुरी अजून मिळालेली नाही,खाली कलरिंगच्या कामाची पण मजुरी मिळालेली नाही,तिथे साधारण बीस ब्रास काम केले आहे', मी म्हणालो.'तू ती काळजी करू नकोस मी तुझी दोन्ही ठिकाणची मजुरी काढून घेईन, तू असे कर हे पन्नास रुपये घेऊन, आत्ताच्या आत्ता निघ'. माझ्या हातात पन्नास रुपये ठेवत पेंटर म्हणाला. त्याला धन्यवाद म्हणत, मी झपाझप खाली आलो आणि खोलीचा रस्ता धरला. तेथून कपडे वगैरे घेऊन मी घरी आलो. मला शिक्षकाच्या नोकरीचा आदेश आलेला होता. माझी नेमणूक वारूड-पास्टे या गावाला झालेली होती. घरी सारे जण माझी वाटच पहात होते. मी घरात जाताच, आई ने मला तिच्या मिठीत कवटाळून रडायला लागली. अप्पा आणि अण्णा शांतपणे बसले होते, त्यांच्याही डोळ्यातून आसवे गळत होती. शेजारी पाजारी अंगणात जमा होऊन गंमत पहात, एकमेकात कुजबुजत होते,' आई ने मला मिठीतून सोडल्यानंतर, मी अप्पाला विचारले 'अप्पा दाखव मला आलेला हुकूम कुठे आहे तो'. 'हुकूम काही आला नाही. पण भिलाबाबा म्हणाले हुकुमांची यादी तयार झाली आहे. तिच्यात तुझा पहिला नाव आहे. हुकुमाचे पत्र लिहिण्याचे काम सुरू झाले आहे'. ते ऐकून मी एकदम भामटाच झालो. कारण असे हस्ते परहस्ते निरोपावर भरोसा ठेवायला नको होता, पण मला

कोणावरही राग करता येत नव्हता. मी गप्प राहिलो, पण माझे बोलणे एकदम बंद झाले. मला आता घरात अजिबात करमत नवते. कारण हा आता नशिबाचा भाग म्हणून देवावर भरोसा ठेवून मी दिवस काढत होतो. मी सारे हातचे सोडून घरी येऊन रिकामा बसलो होतो. एक दिवस मी खोलीवर जाऊन माझी राहिलेली सामानाची पेटी घेऊन आलो. तिथे अण्णाने विचारले, 'का रे आला का तुझा नेमणूक हुकूम'? 'नाहीरे अण्णा. आई, भाऊंनी भिलाबाबाच्या बोलण्यावर भरोसा करून मला घरी बोलवून घेतले'. 'नाही रे ते चुकीच काहीच सांगणार नाहीत. जाऊ दे थोडदिवस, मग मुलाखतीच्या वेळी केली, तशी धिटाई करून आपण माहिती काढून आणू'. अण्णा म्हणाला. दहा बारा दिवस निघून गेले. मग दूपारच्यावेळी पोष्टमनने एक कागदाचे पाकीट आणून दिले. मी घरीच होतो. लाकडाचे ओझे घेऊन जंगलातून नुकताच आलो होतो. मी पाकीट खोलून वाचून पाहिला,तर मला शिक्षकाच्या नोकरीचा नेमणूक हुकूम आला होता, वारूड : पाष्टे: या गावी जाऊन हजर व्हायला सांगण्यात आले होते. म्हणजे भिलाबाबाने सांगितलेली खबर बरोबर होती. संध्याकाळी आई, अप्पा, अण्णा कामावरून घरी आले. मी त्यांना माझ्या नोकरीचा आलेला हुकूम दाखवला, ते फार खूष झाले. आमच्या घरात त्या दिवसी पहिल्यांदा गव्हाच्या पोळ्या, वरण भात शिजले होते. आमच्या कुटुंबाचा तो सोन्याचा दिवस होता. दुसऱ्या दिवशी वारूडला जायचे होते. धूळयाच्या खोलीवरून आणलेला स्टोव, मीठ, मसाला पीठ असे सामान भरलेली पेटी तयारच होती. मला कपड्यांचा मात्र एकच जोड होता. दोन पांढऱ्या कपड्याच्या लांब चड्या होत्या  आणि एक गोधडी , एका मोठ्या पिसोडीत भरून माझी जायची तयारी पुरी झाली. पेंटरने दिलेले पन्नास रुपये पेटीत ठेवलेलेच होते. मी कुसूंबा आणि धूळ्या-शिवाय दुसरे कोणतेच गाव पाहिले नव्हते. पण धुळ्यात राहिल्यामुळे मला बरेच बाहेरचे ज्ञान झाले होते. साऱ्या गलीत मला नौकरीचा हुकूम मिळाल्याची बातमी पसरून गेली होती. दुसऱ्या दिवशी रामप्रहारातच आई, अप्पा व अण्णाचे पाया पडून, मोटर स्टँडवर पोहोचलो. धुळ्याला स्टँडवर उतरल्यावर, एका तिकीट फाडणाऱ्याला कोणत्या गाडीने जावे लागेल त्याचा तपास करून घेतला. वारूडला मोटर जात नव्हती. तिथून

डोक्यावर पेटी आणि हातात कपड्यांची पिसोडी घेऊन, पायीच चालत, वारूडला जाऊन पाहोचलो. दुपारची शाळा भरलेली होती. शाळेच्या ओट्यावर सामान ठेवून, मुख्याध्यापकास माझा नेमणूक हुकूम दाखवला. त्यांनी मला कामावर रुजू करून घेतले. संध्याकाळ होत आली होती. भाड्याच्या खोलीची सोय त्या दिवशी झाली नाही. शाळेच्या ओट्यावर झोपूनच रात्र काढली. एक शिक्षक, घरी चला म्हणाला, पण एकाच रात्रीचा प्रश्न होता म्हणून, मी त्याला धन्यवाद सांगून मना केली. दुसऱ्या दिवशी सकाळी शाळा सुरू झाली, मला दुसरीचा वर्ग दिला गेला. शाळेचा पहिला व दुसरा सत्र मुलांशी ओळख करून घेन्यातच गेला. उद्या पासून तूम्हाला शिकवायला सुरुवात करू, सूचना पोरांना देऊन, शाळेचा पहिला दिवस पार पडला. त्या दिवशीही खोलीची व्यवस्था झाली नाही. दुसऱ्या सकाळी सारा शिक्षकवृंद, माझ्याभोवती गोळा झाला, सगळयांशी वैयक्तिक विचारपूस झाली. सुरुवातीला त्यांनी चर्चा त्यांच्या पुरतीच मर्यादित ठेवली. शाळा सुटली. त्या शिक्षकामधे दोघे तिघे गावचेच होते. दुपारच्या सत्राची शाळा सुरू झाली, मी वर्गात जाऊन पोरांना शिकवायची सुरुवात केली होती. साधारण तासा भराने, एक व्यक्ती सरळ वर्गात आली, 'ओ मास्तर तुला तात्यांनी आत्ताच्या आत्ता बलावले, लगेच माझ्या मागे मागे चल', असा धमकी वजा भाषेत बोलला. 'का रे बाबा, तू सरळ वर्गात कसा घुसला. मी त्याला विचारले. 'वो तू कोणाशी बात करतो आहे माहीत आहे का? गुपचूप चाल, तो वरच्या सुरातच बोलत होता'. 'मित्रा तू आता बाहेर जा, तात्यांना माझा नमस्कार सांग, आणि सांग की, मी वर्ग सोडून बाहेर येणार नाही, 'अरे वा! तात्याशी मुजोरी? असे सांगून तो तावा तावाने निघून गेला. शाळेतली मुले चूपचाप हे सारे बघत निस्तब्धपणे बसले होते. पाच सहा मिनिटातच तीन चार लोकांचा घोळका वर्गाच्या अंगणात आला,'अरे ओ मास्तर जरा बाहेर ये, काय समजतो रे तू स्वतःला? इथे का ऐरे गैरे लागले कारे तुला, एक खादी कपडे घातलेला माणूस मिसी चोळत जोरजारात बोलत होता. 'दादा तुम्ही जरा हळू बोला, इथे शाळा चालू आहे, 'अरे ओ मला अक्कल शिकवायला लागला का? त्या मुख्याध्यापकाची आणि साऱ्या शाळेची ऐसी की तैसी. एका दिवसात तुझा बाडबिस्तरा आवरायला

लावतो बघ तुला. तुला गाव सोडणे मुश्कील करून टाकीन, मी वर्गातून बाहेर येऊन सरळ मुख्याध्यापकांच्या कक्षात गेलो, ते खिडकी जवळ उभे राहून, ही सारी गंमत चोरून चोरून पहात होते, मला आल्याचे पाहताच, ते पटकन त्यांच्या टेबला जवळ जाऊन, बळेच इकडाचा कागद तिकडे आणि तिकडचा कागद इकडे करण्याचे नाटक करत होते 'गुरुजी बाहेर काय चालले आहे ते तूम्हाला ऐकू येत नाही का? सरळ सरळ शाळेच्या मुख्याध्यापकाचा, त्यांच्या खूर्चीचा आणि शिक्षक पेशाचा अपमान करत आहेत, मी म्हणालो .'हे बघा मास्तर ही जिल्हा परिषद आहे, इथे कागदावरचे कानून कायदे चालत नाहीत, हवा चालते, दिशा बदलावी लागते. तो माणूस जिल्हा परिषदेचा सभासद आहे. जे झाले ते, जे होईल ते, मी पाहिलेही नाही आणि ऐकलेही नाही, आता तुम्ही जाऊ शकता'. मुख्याध्यापकाने माझी पाने माझ्याच तोंडाला पुसून मला परत पाठवले. मी तिथून जो निघालो, तो वर्गात न जाता ओट्याच्या कोपऱ्यावरच ठेवलेली माझी पेटी आणि पिसोडी घेऊन, नरडान्याचा रस्ता पकडला. जमलेली पुढारी मंडळी, शिक्षकवृंद, मुख्याध्यापक आणि शाळेतली सारी मुले, अगदी चोरा सारखे गप्प होऊन माझी गंमत पहात उभे होते. नरडान्याला येऊन, धुळे गाडी पकडून मी धुळ्याला आलो. पण रात्र झाल्यामुळे कूसूंब्याकडे जाणारी शेवटची मोटर गाडी निघून गेली होती. रात्र मी स्टँडवरच काढली. रात्री मी रिकामाच असल्यामुळे स्टँडवर बसूनच, मी मे. जिल्हा शिक्षणाधिकाऱ्याच्या नावे एक पत्र तयार केले. त्यात शाळेत घडलेला सारा प्रकार नमूद करून, त्यात लिहिले, शिक्षकपेशा आणि शिक्षणाची पायमल्ली झाल्याने मी नोकरी सोडली आहे, मला नेमणूक हुकूम दिल्याबद्दल आपले शतष: धन्यवाद. दुसऱ्या दिवसी सकाळी सकाळीच मी कुसुंब्याला घरी परत आलो. डोक्यावर सामानाची पेटी आणि हातात कपड्यांची पिसोडी घेऊन परवा जसा घरातून बाहेर पडलो होतो तसाच घरी परत येत होतो. जातांना जितक्या लोकांनी माझी गंमत पाहिली होती, परत येतांना त्याच्यापेक्षा जास्त लोक माझी गंमत पहात होते. अप्पा कामावर जायला निघाला होता, लांबूनच मला परत येतांना पाहून तो जागच्या जागी थांबला. मला पायऱ्या चढतांना काहीच न बोलता, माझ्यासाठी पायऱ्या मोकळ्या सोडून बाजूला सरकले. मी

कसा बसा पायऱ्या चढून घरात आलो, पण लगेच मला परतीचे कारन विचारायची कोणाची हिम्मत झाली नाही. मी ही कोणाशी काहीच न बोलता कोपऱ्यात पेटी आणि पेटीवर पिसोड्या ठेवून गुपचूप बसून गेलो. 'निघरे लवकर कामावर, उशीर झाला तर मालक ओरडेल', आई अप्पा आणि अण्णाला रागावून बोलली, ते काहीच न बोलता कामावर निघून गेले. मी मात्र पिळलेल्या धोतरासारखा बसूनच राहिलो. आई मला एक पण शब्द बोलली नाही. मुकी मुकीच जागेवरून उठून मातीच्या भांड्याच्या उरतनीजवळ जाऊन एक पाकीट काढून तो माझ्या समोर फेकला. मी तो उचलला आणि फोडून वाचून पाहिला, कशाचे आहे ते. आई ने एकेरीत मला विचारले? 'मी बंडींगचे खड्डे खोदत होतो ना? त्या सायेबाच्या नोकरी साठीचा हुकूम आहे.' मी खुशीत येऊन बोललो.'त्या नोकरीच्या ठिकाणी तुला हे कसे माहिती झाले की तुला या नव्या नोकरीचा हुकूम घरी आला आहे'? आई ने चकित होऊन विचारले. मला या नोकरीचा हुकूम आल्याचे तिथे नाही कळाले, मी ती नोकरीच सोडून आलो आहे', मी आईला खरी बात सांगून टाकली'. तिथल्या एका पुढाऱ्याने तिथल्या शाळेचा, मोठ्या मास्तरचा आण माझा पण अपमान केला म्हणून मी नोकरी सोडून आलो'. मी आईला सांगितले. 'तूच सोडली का तुझ्या बरोबर साऱ्या मास्तरांनी सोडली नोकरी' आई ने विचारले. 'बाकीच्यांनी का सोडावी नोकरी, सवाल माझ्यावरून सुरू झाला होता म्हणून मीच सोडली'. मी म्हणालो.'अरे बेटा मजुरी करणाऱ्याने माना पानाच्या बाता करून मुंजोरी करू नये, असेच जर नोकरीच्या ठिकाणी झाले, तर तू का साऱ्याच नोकऱ्या सोडून घरी येसील, अशाने तर तू भुकाच मरसील', आई ने रागावूनच मला सवाल केला. आई मला ते फार उद्धटपणे बोलत होते, मोठ्या मास्तरला पण अरे तूरे करून बोलत होते, मला ते अजिबात आवडले नाही. म्हणून मी नौकरीच सोडून येऊन गेलो'. मी आईला म्हणालो, 'आता या कामासाठी कुठे जासील'? आई ने विचारले. 'मला चाळीसगावला, तीन महिने काम शिकवले जाईल, मग, कुठे नोकरीला जायचे तो हूकूम मिळेल', आईला मी समजावले. 'तू चाळीसगावला कवा जाशील' आईने विचारले.'आज पासून तीन दिवसांनी शिकवायचे सुरू होईल, तर मी कालच चालला जाईन'.

मी आईला  सांगितले.'बर बर', असे सांगून आई  कामाला जायची तयारी करू लागली. दुसऱ्या दिवशी सकाळीच मी चाळीसगावला आलो. रेल्वे पुलाच्या बाजूलाच ट्रेनिंगच्या क्लासची इमारत होती. क्लासमधे चाळीस मुले होती. डंपीलेव्हलच्या मदतीने जमिनीची कंटूरिंग करून, समान उच्चांकी उंचीचे बिंदू काढून, त्यांना जोडनारा बांध बांधून, पावसाचे वाहून जाणारे पाणी आणि पान्याबरोबर शेतातली वाहून जाणारी माती अडवून जमिनीची धूप थांबवणे हे मुद्याचे काम त्या खात्यात करायचे होते. जमिनीची धूप थांबवणे, या बरोबरच आडवलेले पाणी जमिनीत मुरून, जमिनीतील जल पातळी उंचावणे, हाही दुसरा मोठा फायदा, त्या मृदसंघारनाच्या कामातून होणार. दर आठवड्याला, ट्रेनिंगमधे शिकवलेल्या अभ्यासावर, मुलांच्या कार्य कौशल्याची चाचणी व्हायची. प्रत्येक चाचणीत माझा पहिलाच नंबर यायचा.

ट्रेनिंगला, दोन ते सव्वा दोन महिने झाले असतील, पावसाळा सुरू व्हायला दीड ते दोन महिने बाकी होते. अचानक भंगाळे सरांनी मला क्लासमधे उभे केले, 'मिस्टर गढरी आतापर्यंत घेतलेल्या चाचण्यांच्या आधारे मे. डी.एस.ओ. साहेबांनी तुला, ट्रेनिंगमधे क्वालीफाय करून, टेकडी पायथ्याच्या नाला बंडींगचे काम हाती घ्यायचा आदेश दिला आहे. तू आताच एस.डी.एस.ओ कार्यालयाला जाऊन हजर व्हायचे आहे. ते, ऐकून मी तर उडालोच, एकदम असे काही घडेल, हे कुणाच्या ध्यानी मनी ही नव्हते. 'पण एक लक्षात ठेव, जो भाग तुला दिला आहे, त्या भागात दोन वर्षा पासून काहीच काम झालेले नाही. ती सपाटीची जमीन नसल्याने, तिकडे फार काम करावे लागणार आहे. म्हणून जो तो, त्या भागात रुजू होण्यास इच्छुक नाही. प्रत्येक जन याला त्याला भेटून गाठून, त्यांच्या सोईचा भाग मिळवून घेतात. तू हे आव्हान सहज पेलवून नेशील. गुड लक'. भंगाळे सरांनी लगेच शुभेच्छाही देऊन टाकल्या. कामाची जाणीवही करून दिली. क्लासमधल्या साऱ्या मुलांनी टाळ्या वाजवून माझा सत्कार ही करून टाकला. भंगाळे सरांना व मुलांना नमस्कार करून, मी उपविभागीय मृदसंघारन कार्यालयाला रवाना झालो. तेथे साहेबांना भेटून त्यांना माझा परिचय दिला.'ओह, वा! छान छान! .या, या, प्रशिक्षण पूर्ण होन्या आधीच तुमचे नेमणूक आदेश निघाले, काही तरी विशेष असल्याशिवाय हे

शक्य नाही, साहेब म्हणाले. माझा रुजू रिपोर्ट तयार करून, मला माझे कक्ष दाखवण्यात आले. कक्ष दहाबाय दहाची खोली होती. त्यात एक डंपीलेव्हल, मीटर पोस्ट, दोनसे फूट लांबीवाला टेप, काही छोट्या छोट्या त्रिकमानी पताका, काही कोरे रजिस्टर, एक टेबल,एक खुर्ची, नोंद वह्या, कार्बन पेपर, पेन्सिल अजून काही बारीक बारीक सामान होते. मदतीला एक मजूर लावायची परवानगी देण्यात आली होती. एका नळकांड्यात जळगाव जिल्ह्याचा व चाळीसगाव तालुक्याचा नकाशा ठेवण्यात आले होते. ज्या भागात बंडींग काम करायचे त्याचा तपशील आणि कामाचे वर्क चार्ट भिंतीवर टांगून ठेवण्यात आले होते, प्राधान्य क्रमाने गाव सिवारांच्या नावाची यादीही लावण्यात आली होती. प्रथम क्रमांकावर दहीवद, चांदा खोरदड या गावांचे नाव होते. तालुक्याचा नकाशा पाहिल्यावर, त्या शिवारात एक नाला दाखवण्यात आला होता. त्या नाल्याच्या परिसरातील सर्व जमिनीचे, डंपीलेव्हलच्या साहाय्याने कंटूरिंग करावी लागणार होती. आणि त्याच्यामदतीने उंची दाखवणारे सारे बिंदू जोडून, जी एक लाइन कागदावर तयार होईल, त्याच्या प्रमानेच त्या शिवारातील जमिनीवर, तो बांध टाकावा लागणार होता. नाल्याचा ज्या दिशेने उतार होता, त्याच्या विरूद्ध बाजूच्या शेतात खड्डे खोदून, निघणाऱ्या मातीने बांध बांधावा लागणार होता. दुसऱ्या दिवसा पासूनच मला कामाची सुरुवात करायची होती. तशी सूचना मी मजुराला देऊन ठेवली. तिकडे गेल्यावर स्थानिक गावातून दोन रोजंदारीवर मजूर लावायची सूचना त्याला दिली गेली होती. दुसऱ्या दिवशी सकाळी आठ वाजेला आम्ही निघालो. लेव्हल मशीनचा बॉक्स, तिचा स्टँड आणि रिडींग पोस्ट मजुराने खांद्याला लावून, तोही माझ्या मागे मागे येत होता. आम्ही दहिवड गावी आलो, मजुराने गावातून दोन रोजंदार मजूर घेऊन आला आणि आम्ही शेत शिवारात नाल्याकाठी आलो. एक समतल ठिकाण पाहून, तिथे एक मोठा दगड खोल गाडून त्याला बेंचमार्क नमूद केले. मजुराकडे मीटर पोस्ट देऊन, त्याला दहा दहा फूटांच्या अंतराने, निरनिराळ्या ठिकाणी, सरळ नीट उभा पकडायची सूचना केली. मी डंपी लेव्हल लावून त्या मीटर पोस्ट वरून त्या त्या ठिकाणांची बेंचमार्क पासूनची उंची मोजून नोंद वहीत त्याची नोंद करू लागलो. सर्वेनंबर नूसार दिवस भरातून आठ ते दहा सर्वे

नंबरचे रिडींग घेऊन संध्याकाळी, परत चाळीसगावला खोलीवर आलो. असे पाच सहा दिवस रिडींग घेऊन झाले. जवळ-जवळ नाल्याच्या दोन्ही काठचा एक मैलाचा परिसर मोजून काढला. नंतर त्या रिडींगच्या आधारे उच्चतम उंचींचे बिंदू जोडून एक कटूरिंग लाइन तयार करून, त्या नाल्यावर बांध घालायची तयारी केली. त्या बांधाला किती उंचीवर किती उंचीचा सांडवा काढावा, हे निश्चीत केले व त्याच्या आधारे बांधाची सरासरी उंची किती राहील, तेवढ्या उंचीच्या बंधाऱ्यासाठी त्याची उंची गुणिले दहा फूट लांबी, एवढ्या भरावासाठी किती मातीची गरज पडेल, आणि किती खोलीचे खड्डे खोदावे लागतील, याचा सारा आढावा काढून, तो बंधारा कोन कोणत्या सर्वे नंबर मधून जाईल याचा, गाव नकाशाच्या आधारे एक नकाशा काढण्याचे काम चालू केले होते. हे सारे काम पूर्ण करत मी कार्यालयातच बसलो होतो. मजूर ओट्यावर बसून माझ्या सूचनेची वाट पहात बसला होता. इतक्यात दोन तीन कडक परीटघडी खादीचे कपडे घातलेले इसम बाहेर आले, ते त्या मजुराकडे चौकशी करत होते,'दहीवड शिवाराचे बंडिंगकामाचे साहेबांचे हापीस हेच आहे का'? 'हो काय काम आहे'? मजुराने त्यांना विचारले? 'त्यांना भेटायचे आहे', एक म्हणाला. मला आत बसून बाहेरचे सारे ऐकू येत होते. 'पाठव त्यांना आत', मी आतूनच मजुराला म्हणालो. एकच खुर्ची होती,आणि तिच्यावर मी बसलो होतो.ते आत आले आणि उभेच राहिले. 'भाऊसाहेब, तुम्ही आठ दहा दिवसा पासून आमच्या गावशिवारात परस्पर येऊन काय चालवले आहे'. संभाषणाचा रंग बरोबर नाही हे माझ्या लगेच लक्षात आले. 'म्हणजे? मी त्यांना विचारले. 'नाही म्हटल, तू आमच्या शेतात जे मोजमाप केले, ते कोनाच्या परवानगीने केले? तू सरपंच, पोलीस पाटील, यांना वर्दी दिली का ? आम्ही शेत मालक आहोत, आमची परवानगी घेतली का?' एक जण ऐटीत म्हणाला. 'हे बघा, मी काही डोंबारीचा खेळ करणारा डोंबारी नाही. मी सरकारचा माणूस आहे, सरकार जे सांगेल ते आणि जसे सांगेल तसे काम करणारा सरकारी नोकर आहे. सरकारच्या आदेशानूसारच शेतकऱ्यांच्या भल्याचे काम करतो आहे. जेथे सरकारी आदेश आहे तिथे कोनाची परवानगी घेण्याची काही गरज नाही',मी म्हणालो. किती वर्षे झाली रे तुला कामावर

येऊन एकाने विचारले?'. 'पंधरा दिवस' मी म्हणालो. 'बघू बर आमच्या शेताचे मोजमाप घेऊन तू आमचे कोणते कल्याण करणार आहेस ते. आणि खरेच तू आमचे कल्याण करणारंच असेल तर, आम्ही तुझी मिरवणूक काढू, नाही तर धिंड तर काढणारच' दुसरा जरा समजुतीच्या सुरात म्हणाला.'बर तू बांधच घालणार आहेस, तर आम्हाला ते समजावून सांग, कोन कोणत्या सर्वे नंबर मधे तू बांध घालणार आहे, ते तर दाखव', तोच माणूस पुढे येऊन म्हणाला. त्याच्या विचारन्या वरून, मी त्यांना काढलेला नकाशा दाखवत त्या बांधाचा नकाशा दाखवला. तो बांध आणि ज्या सर्वे नंबर मधून तो बंधारा जातो आहे ते पाहून त्यांच्यातले, दोन जन तर तो नकाशाच सोडायला तयार नव्हते.'बर हा बांध बांधायला माती कुठून आणणार आहेस'? तिसऱ्याने विचारले.'ज्या शेतातून तो बांध जातो आहे, त्याच शेताची बंधाऱ्याला लागून असलेल्या जमिनीत खड्डे खोदून, निघालेली माती त्या बांधावर टाकणार, मी म्हणालो.'नाल्यापासून जसजसा बांध लांब लांब जात जाईल, तसतसा बांधाची उंची कमी कमी होत जाईल, आणि खड्डेही लहान लहान होत जातील', मी समजावून सांगितले. 'म्हणजे आमची शेती पाण्याखाली जाणार, आम्ही हा बंधारा होऊ देणार नाहीत, हा बंधारा एक दोन सर्वे नंबर वर सरकावून घेऊन काम कर'. दोघे जन एकदम बोलले. तिसरा मात्र गप्प होता. त्याचे शेत बंधाऱ्या पासून बरेच वर होते. 'हे शक्य होणार नाही, नियमात आणि मोजमापात जे योग्य आणि जास्तीत जास्त फायदेशीर राहील, तेच मी करीन', मी न डगमगता आणि ठामपणे म्हणालो. आत्ताच नोकरीला लागला आहेस, जास्तीचा हवेत उडू नकोस',त्या दोन्ही पैकी एकजन बोलला.'जरा सांभाळून बोल आणि जरा मर्यादेतच राहा, मीही माझ्या शब्दात जरा एकेरीवर येऊनच बोललो. भिंतीला लागूनच सूपरवायझर साहेबांच्या आफिसचा बंगला होता. आमच्या संभाषणाचा आवाज त्यांनी ऐकून, त्यांनी ओट्यावर बसलेल्या मजुराला आवाज देऊन बोलवून घेतले. तिकडे काय चालले आहे, त्याची चौकशी केली, आणि लगेच त्याला बरोबर घेऊन ते माझ्या कक्षमधे येऊन, दाखल झाले. 'काय गडबड चालली आहे इथे', त्यांनी आल्या आल्या आमच्या साऱ्याकडे पाहून विचारले? 'आपण कोण'? त्या दोघापैकी एकाने त्यांना विचारले. 'मी

यांच्या वरचा सूपरवायझर आहे', त्यांनी त्याला आपली ओळख दिली. 'बरे झाले तुम्ही आले, आम्ही तुमच्याकडे येण्यापेक्षा तुम्हीच आमच्याकडे आले', तोच शेतकरी म्हणाला.'का बर? काय झाले असे', सूपरवायझरने विचारले? मग त्यांच्या पैकी एकाने, मी कसा परस्पर त्यांच्या शेतात जाऊन मोजणी केली, त्यांची शेती पान्याखाली जाईल, ते सांगितले. त्यांनी बांधाची जागा बदलायला सुचवल्यावर, मी कसा नकार देतो आहे, मी त्यांच्याशी कसा एकेरीवर येऊन बोलतो आहे, वगैरे वगैरे त्यांनी माझ्यासमोर त्यांना सांगितले. मी बिलकूल गप्प होतो. त्यांचे बोलणे ऐकून घेतल्यावर सूपरवायझर त्यांना म्हणाला, 'तो जे करतो आहे ते आणि जे सांगतो आहे ते बिलकूल नियमा नूसार आणि कायद्यानूसार बरोबर आहे आणि तोच काय, पण त्याच्या जाग्यावर दूसरा कोणीही आला तरी तो ही तेच करील, जे हा करत आहे', सूपरवायझरने त्यांना समजावून सांगितले. त्यांचे ऐकून ते दोघे जरा नरमले. 'पण साहेब पाण्याखाली आमची जमीन जाणार नाही असा काही तरी मार्ग असेलच ना? तुम्ही आम्हाला सांगा आम्ही वाटेल ते करून ते करू, हजार दीड हजारापर्यंत लागले तरी आमची तयारी आहे'. दोघांपैकी एक बोलला. 'मोजमापा नूसार आणि नियमाने तसे काहीच करता येत नाही. आणि तसे केले तरी ते लपून राहत नाही. कारण सुमार पाऊस जरी झाला, तरी बंधाऱ्यात साचलेले त्याचे पाणी, बंधाऱ्याचा बोजवारा उडवून देईल. मग ज्याने तो घातला आणि ज्याने तो पास केला त्यांच्यावरच त्याचा ठपका ठेवला जाईल. मग त्या बंधाऱ्याचा सारा खर्च त्याच्या कडून वसूल केला जातो'. सूपरवायझारने त्यांना साऱ्या गोष्टी समजावून सांगितल्या. 'तुम्ही थोड थांबा यांनी घेतलेले मोजमाप, मी माझ्या ऑफिसात नेऊन तपासून पहातो, तसे काही आढळले तर यांना योग्य त्या सूचना देतो'. असे सांगून सूपरवायझरने माझे रजिस्टर बरोबर घेऊन जायला निघाला, तेवढ्यात त्यांच्या पैकी एक जण म्हणाला 'साहेब आम्ही सांगितले त्या प्रमाणे तुम्ही कराच, पुढे जे होईल, ते दादांना सांगून, आपण मिटवून घेऊ'. दादा त्यावेळी, समिती या पक्षाचे, त्या भागाचे आमदार होते. सूपरवायझर मला बरोबर घेऊन त्यांच्या ऑफिसात आला, आत मला समोर बसवून म्हणाला, 'हे बघा गोविंदराव तुम्ही अजून नवीन आहात, आपली

नोकरी नेहमी जंगलाशीच संबंधित आहे, तसेच आपल्या कामात तंतोतंत शंभर टक्के जरी बघितले नाही तरी चालते, जंगलात आपल्याला, आपली कामे, समोरच्यासी सामोपचाराने आणि तडजोडीनेच करावे लागतात. थोड उन्नीस बीस करून कामे काढून घ्यावी लागतात. कारण महिन्याच्या शेवटी कामाचा कोटा आणि कार्यकुशलता हे ही खात्याला दाखवावे लागतात. यातून तूम्हाला काय समजायचे ते समजून घ्या, आणि जितके शक्य आहे तितका मधला मार्ग निवडून, वाद मिटवून टाका. कारण आपन आपलेच रेटले आणि त्यांनी त्यांच्या शेतात काम करणाऱ्यांना, पायच ठेवू दिले नाही तर, तुमच्या साऱ्या कामाचाच फसकारा होऊन जाईल'. सूपरवायझार दबल्या आवाजात मला समजावत होता. हे त्याचे बोलणे मी शांतपणे ऐकून घेतले, 'आपल्याला आपले काम निर्विघ्नपणे, नियमाने, कामाला होणारा विरोध कायद्याने झिडकारून करताच येणार नाही का'? मी त्यांना विचारले. 'नाही आपल्याला कामाच्या ठिकाणी, जंगलात कोणाचेच संरक्षण नसते, शिवाय कामाला आलेला बहुतांश मजूर वर्ग, हा स्थानिकच असतो, तो आपल्या बाजूने जवळ जवळ नसतोच. त्यामुळे नको ते प्रसंगही येतात, आणि अशा अतिप्रसंगावेळी, आपल्याला कोणाचे संरक्षण मिळत नाही. मग ते गुमान पने आपल्यालाच सहन करावे लागतात. शिवाय आपल्यावर ठपका बसतो तो वेगळाच. 'साहेब मी माझ्या नोकरीचा राजीनामा देतो आहे' 'का रे ? हे तर असेच चालणार' ते म्हणाले. 'ज्या कामात सरकार कडूनच नियमाने काम करणाऱ्याला पूर्ण संरक्षण नाही, नियमानुसार कामालाच जर अनेक पर्याय आहेत आणि अराजकतेला प्रतिबंध नाही, ती शासकीय नोकरी नाही, ती चोरांची गुलामगिरी आहे आणि मी अशी नोकरी करणार नाही', एवढे बोलून मी शांत झालो. सूपरवायझर एकदम सुन्न झाला आणि एखाद्या पुतळ्यासारखा मख्खपणे माझ्या तोंडाकडे पहात बसला होता. नंतर मी माझ्या नोकरीचा राजीनामा लिहून, त्यांच्या सूर्पूत केला. ऑफिसच्या बाहेर येऊन, मजुराला आवाज दिला, तो लगेच आला. त्याला माझ्या राजीनाम्याच्या पेपरवर साक्षीदार म्हणून सही करायला लावली. माझ्या कक्षेची चावी सूपरवायझर कडेच देऊन, सरळ खोलीवर गेलो. खुंटीवर टांगलेले कपडे पिशवीत भरले, दुसरे सामान

लोखंडी पेटीत टाकले, आणि खोली बंद करून, चावी घर मालकाकडे दिली आणि घरचा रस्ता पकडला. संध्याकाळी मांजरझापेच्या वेळी, मी कूसूंब्याला घरी पोहोचलो. आई, अप्पा आणि अण्णा कामावरून घरी आलेले होते. मला साऱ्या बाढबीस्तरासह आलेला पाहून, सारेच गप्प झाले. साऱ्यांच्या चेहऱ्यावर एकदम मलिनता आलेली दिसली. कोणीच काही बोलले नाही, कोणीच काही विचारले नाही. मी पिशवीतून एक गोधडी काढून, बाहेरच्या ओट्याच्या काठावर जाऊन झोपलो. कारण दिवसभर मी भेज्यावर तान सहन करत होतो त्यामुळे मला केव्हा झोप लागून गेली ते कळालेच नाही. रात्रीचा कोणता प्रहर होता कोन जाने, आई ने हळू हळू हलवत मला झोपेतून जागे केले. मी खडबडून जागा झालो. मी उठल्या बरोबर आई ने माझ्या तोंडावर हात ठेवून बोलू नको असा इशारा केला. माझा हात पकडून मला बाजूला असलेल्या गूरांच्या गोठ्याच्या ओट्यावर नेले. 'हं, आता मला सांग तू असाच भसकन का आला? काय झाले? तुझा सारा सोटा दूपटा घेऊन यायची पाळी का आली? खोट बोलू नको'. मी सुरुवाती पासून शेवट पर्यंतची सारी घटना जसी घडली तसी खरी खरी आईला सांगून टाकली. 'आई तू काही म्हण, पण मला ते अजिबात पटले नाही, म्हणून मी घरी येऊन गेलो. मी जसा लहानपणी, भाकरी मागून खाऊन पोट भरले, तसाच भीक मागून खाऊन पोट भरीन, पण मला असले काळे बेरे धंदे करणे आवडणार नाही, खोटे नाटे तर अजिबात आवडणार नाही, मला तर माझे साहेबच ज्यावेळी तसे करायला सांगत होते म्हणून मी सारा राग पोटात घालून निघून आलो. बर खोटे नाटे करूनही पुढे जिवाला धोकाच म्हटल्यावर तर, मला त्या नोकरीचीच चीड आली आणि लगेच तिथून निघून आलो. शाळा शिकलो म्हणून काय झाले, माझ्या भावांसारखी सालदारकी करायची माझ्यात हिम्मत आहे. पण ज्या मर्दानी पणाने माझ्या आईने आलेल्या साऱ्या संकटाना, आमच्या डोळ्यादेखत, एकटीने झुंज देऊन, कोणापुढेच न झुकता, आम्हाला लहानाचे मोठे करून, इथपर्यंत आणले, त्या आईचे शिर, माझ्या खोटयानाट्या कामांनी झुकवणे मला मरणाहून जास्त त्रासदायक वाटते'. पुढचे माझ्याकडून बोलवेना, मी आईच्या पायावर डोके ठेवून हुंदके देत रडू लागलो. आई बिलकूल स्तब्ध

बसली होती. मी रडायला लागल्या बरोबर, तिने मला तिच्या पायावरून उचलून छातीला लावून घट्ट मिठी मारली. 'आयुष्यात हेच ध्यानात ठेव, आपल्या हातून कोणाचे भले होत नसेल, तर वाईट तर बिलकूल करू नये. आपली सुबुद्धी जागी ठेवून आपल्या हातून जेवढे चांगले होईल तेच करायचे. जे चांगले आहे तेच पहायचे, लालूचच्या पोटी कोणाचेही नुकसान करू नये. आपल्या प्रत्येक चांगल्या कामाला परमेश्वर पहातो आहे. त्याला कधीच विसरू नये. कारण आपल्या प्रत्येक करणीला तो साक्षी असतो. त्याला दुसऱ्याच्या साक्षीची गरज नसते. मला तुझ्यावर पुरा भरोसा आहे, जग दुनिया काय म्हणेल, याची काळजी करू नको, तिकडे ध्यानही देऊ नको. अगदी तुझ्या कानात बोंबा मारून सांगतील तरी. मी काहीच ऐकले नाही असेच सांगायचे. कोणी तुला हिणवले तरी त्याच्यावर चिडू नको, उलट सुलट बोलणाऱ्यांच्या तोंडी लागू नको, अन्यायाने कोणी ताडन केले तर, सहन करू नको, जशाला तसा ठोसा द्यावा, ताकत कमी पडली तरी विरोध कमी करू नको, तो चालूच ठेवायचा, कोठे पण खऱ्या बात साठी, लाचारी धरायची नाही, आपण, केलेल्या कामाचे मोजमाप, महत्त्व, त्याची उपयोगिता, आपल्यालाच माहीत असते, त्याची कोणी वाहवा केली किंवा हेटाळणी केली तरी तिकडे ध्यान देऊ नको', आई ने मी नोकरी सोडून परत आल्या नंतर, लोक मला काय म्हणतील याचा अंदाज घेत, मला आगाऊच समजावून दिले.'आई तुझ्या पायाची शप्पत, मी, तू जे जे सांगितले त्यातला एकबी सबद जिंदगीभर भुलणार नाही'. मी आईला शपथेवर वचन दिले.'बस चल आता झोप,रात खूब झाली आहे' असे सांगून आई ने मला झोपवले.

आठ दहा दिवस असेच गेले. सकाळी सकाळीच रतन भाऊ पोस्टमन घरी आला. हे रतन भाऊ म्हणजे, मराठी शाळेतला सगळ्यात जुना शिपाई. मी त्यांचा, तेव्हा पासूनचा फार आवडता विद्यार्थी. आल्या-आल्या, घाई घाईत ते मला म्हणाले, 'अरे गोविंदा, तुला नाना साहेबांनी ताबडतोब बोलावले आहे, चल माझ्याबरोबर'.'काका, हे नाना कोण आहेत?' 'अरे आपल्या गावाचे पोस्टमास्तर साहेब आहेत ना ते, चल लवकर, असे सांगून ते पुढे झपझप चालू लागले, मी त्यांच्या मागे मागे चालू लागलो. चालता चालता

रतनभाऊ म्हणाले, ‘अरे पोस्ट खात्यात नोकरीची जाहिरात निघाली आहे’, ‘का रे रतन आला का गोविंदा?’. मी रतन काकांच्या मागेच होतो, म्हणून मलाही त्यांचे बोलणे ऐकू आले होते. रतनकाकांच्या मागे मलाही त्यांनी पाहिले, ‘अरे गोविंदा, ये मधे ये’, मी लगेच मधे गेलो. ‘ही बघ पोस्ट खात्यामधे क्लार्कच्या जागेकरता जाहिरात निघाली आहे,त्याला लागणारा फार्म मी तयार करून ठेवला आहे. अर्ज सोबत तुझे मॅट्रीक पासचे सर्टीफिकेट व मार्क लिस्टची एक एक सत्यप्रत तयार करून हेडमास्तरांची सही शिक्का घेऊन ये. आपण ते लगेच पाठवून देऊ. थोड्या वेळाने शिक्के मारून मी सर्व कागदपत्रे परत आणून दिले. नानानी ते काळजीपूर्वक तपासून पाहिले आणि लगेच ते रजिस्टरही केले.‘आठ आणे फी झाली, आहे का तुझ्या जवळ?’ नानांनी मला विचारले. ‘नाही नाना, मी उद्या आणून देतो’ मी म्हणालो. पुढे जाऊन नानांना नमस्कार केला,‘घरी आलो, आई घरी वाटच पहात होती. ‘चल लवकर मजूर निघाले ना, कशा करता बोलावले होते तुला पोस्टमनने? काही भानगड बीनगड झाली का’? आई ने विचारले. ‘नाही आई, टपाल खात्यात कारकूनच्या नोकरीची जाहिरात निघाली आहे, त्याच्यासाठी मला अर्ज करायला पोस्टमास्तर सायबांनी बोलवले होते’ मी उत्तर दिले. ‘दोन तीन वेळा मी जे अर्ज केले होते ते त्यांनीच करून दिले होते. म्हणून त्यांना भरोसा आहे, की त्यांच्या हातून जर माझा अर्ज गेला ,तर या टाइमाला पण मला नोकरी लागेल. ‘बरं कां आई, खूद्द मास्तरांनी माझा अर्ज लिहून, भरूनही दिला आणि माझ्या कागदांची नक्कल पण करून दिली’. ‘चल, सारा गावच तुला मदत करतो. मास्तरसारखा मास्तर, तो तुझा लिखाण काम करून देतो, पण तुला तुझ्या मनासारखी नोकरीच मिळत नाही’. आई जरा गहिवरलेल्या आवाजात म्हणाली. ‘नाही आई ही नोकरी सरकारी म्हणजे दिल्लीच्या सरकारची आहे म्हणे’. ‘देवा तुझे जमजम भलेच होवो’. आई मोठ्या आशेने म्हणाली.




# पोस्टात पदार्पण

असेच दिवसामागे दिवस जाऊ लागले. मी आणि आई बरोबर कामाला जाऊ लागलो. किती तरी वेळा लोक मला हिणवण्याच्या हेतूने पळपूटया, कामचोर असे आडून-आडून बोलायचे पण, ना मी तिकडे ध्यान दिले, ना आई ने. मी आणि आई झिपा अप्पाच्या काळ्या जंगलातल्या शेतात भुईमुगाची गरी तोडायच्या कामाला गेलो होतो. दुपारच्या जेवणाची वेळ अजून झाली नव्हती. पूंजू चौधरी, नवीन पोस्टमन, लांब लांब ढांगा टाकतच थेट गरी जवळ येऊन गेला, त्याने मला लांबूनच आवाज दिला, 'अरे ओ गोविंदा, लवकर चल, तुला नानांनी आत्ताच्या आत्ता आफिसात बोलवले आहे, तुला पोस्टात कारकूनच्या नोकरीची आर्डर आली आहे'. मी गरी मधून भुईमुगाच्या झाडांची कवळी छाती जवळ धरून वर उचलत होतो, त्यामुळे माझे तिकडे लक्ष नव्हते.'अरे गोविंद खाली उतर लवकर, तो कोन लांब ढांगा टाकत इकडेच येतो आहे आणि काही तरी नोकरी-नोकरी असे बोंबा मारतो आहे'. आई ने मला ओरडून सांगितले. आईच्या मोठ्या आवाजाने मी एकदम घाबरून मागे वळून पाहिले, तेव्हा आईने पूंजूकडे बोट दाखवून सांगितले, 'तो तुला बोलावतो आहे'. अरे हा तर पूंजू आहे. तो मला हाताच्या इशाऱ्याने थांबायला सांगत होता. माझ्या हातातली भुईमुगाची कवळी मी तसीच खाली टाकली. पूंजू माझ्या वर्गात शिकणाऱ्या पोपट चौधरीचा मोठा भाऊ होता. तो जसा आला तसा मला बिलगला. 'अरे हा घे गूळ, तोंड

गोड कर, आधी आईचे मग तुझे'. तो आनंदाने म्हणाला. 'पण का रे, पोपट नोकरीला लागला का', मी त्याला विचारले. 'अरे नाही तुला नोकरी लागली आहे, तोंडात गूळ टाकत म्हणाला. पोस्ट खात्यात कारकुनाची नोकरी', त्याने उत्तर दिले. 'आरे नानांनी मला आधी तुझ्या घरी पाठवले, मी घरी गेलो दार बंद होते, मी बाजूला तपास केला, तेव्हा मला कळाले की तुम्ही या शेतात गरी तोडायला आले आहेत, मग मी तसाच पळत इथे आलो'. तो एका दमात म्हणाला. ते ऐकून मी पटकन त्याला मिठीच मारली. लगेच आईचे पाया पडलो. ते ऐकून आईला काय करावे आणि काय न करावे, काहीच सुचत नवते. मी आईच्या तोंडात गुळाचा खडा टाकून आईचे तोंड गोड केले. आईच्या डोळ्यातून आसवे वाहू लागली. तु पोष्ट ऑफिसात काय करत होता? मी त्याला विचारले. 'अरे आफिसात स्टँडवरून टपाल थैल्या आणणे गावोगावच्या टपाल थैल्या पाठवणे, आफिसात आलेल्या टपालाची आणि जाणाऱ्या टपालाची छपाई करणे, या कामासाठी आपल्या आफिसला एका जागेची मंजुरी मिळाली आहे, मी अपंग आणि दहावी पास म्हणून नानांनी माझ्या नावाची सिपारीस करून पाठवली तिकडून लगेच मंजुरी आली आणि नानांनी मला खात्यात कामाला लावून घेतले. आफिसात तसी जाहिरात लावली होती. म्हणून मी नोकरीसाठी अर्जही केला होता. आज मला सहा दिवस झाले कामावर रूजू होऊन'. 'भंडारी नानांचे आशीर्वाद आणि तुझा पायगुण म्हणून, आपण दोन्ही जन पोस्टात कामाला लागू नाही का?' मी म्हणालो. 'नाही रे बाबा तुझी नोकरी कुठे आणि माझी नोकरी कुठे, उद्या तूच माझा साहेब होऊन येशील' तो म्हणाला. आमचे असे बोलणे चालूच होते, तो पर्यंत गरी तोडणारे सारे मजूर आमच्या भोवती येऊन गोळा झाले होते. 'काय झाले काकी गोइंद्याला नोकरी लागली'? प्रत्येक जन आईच्या भोवती घोळका करून विचारू लागला. 'हो ना, तो पोरगा निरोप घेऊन आला आहे'. आई गदगदलेल्या आवाजात म्हणाली. 'दोन नोकऱ्या सोडल्या, दांडग्या लोकांची ललोपती आण हाजी हाजी झुगारून, आण त्यांना चांगली फटकार सुनावून, त्यांच्या हातात राजीनामा फेकून निघून आला. ही नोकरी म्हणे दिल्ली सरकारची आहे', आई म्हणाली. 'इथे कोण्या ऐऱ्या गैऱ्याचे काहीच

चालत नाही. गल्ली बोळातल्याच काय, पण मामलेदार फौजदारला बी इच्च्यात काइ करायचा अधिकार नाही. सारे काम सरकारी कानून कायद्या प्रमाणे करायचे, आण रातला आरामाने झोपायचे. मला सांगत होता, भले मी भावा बरोबर सालदारकी करीन, पण कोनाची हाजी हाजी करणार नाही. ही त्याच्याच पसंतीची नोकरी आहे'. सारे मजूर आईला सोडून माझ्याकडेच एकटक पहात होते. मी आईचे पाया पडलो, मजुरातील वडीलधाऱ्यांचेही पाया पडलो. साऱ्यांनी मला तोंड भरून आशीर्वाद दिले. गावात जाण्यासाठी मी पूंजू बरोबर गरीचा तळ सोडून बाहेर पडलो. तोच शेतमालक तेथे येऊन पोहेचले, 'काय झाले रे? त्यांनी साऱ्यांकडे पाहून विचारले. 'आणि हा दगा भाऊच पोरगा इथे का बर आला'? त्यांनी पूंजूकडे पाहून विचारले. 'नाही अप्पा या पारबताबाईच्या पोराला नोकरीचा हुकूम आला आहे. तो निरोप घेऊन तो आला आहे' ठगी काकीने सांगितले. 'अस्स, काय रे गोविंदा!' त्यांनी मला विचारले. 'हो अप्पा मला पोस्ट खात्यात नोकरीचा हुकूम आला आहे. तो निरोप देऊन पोस्टमास्तर साहेबांनी याला पाठवले आहे'. मी त्यांना सांगितले.'नशीबवान आहे गड्या तू. रात्री माझ्या ओट्यावरच्या पलंगावर, गावातली आपली मंडळी जमते, तिथे रोज एकदा तरी तुझा बाबत बात निघतेच. म्हणे तू दोन नोकऱ्या सोडून आला आहे. ही तरी नोकरी टिकवून ठेवसील, आरे नोकऱ्या लोकांच्या पोरांना सोदून मिळत नाही. आमच्या मूलांना कुठे शिपायाची जरी नवकरी मिळाली तरी आम्ही सवताला धन्य समजू'. आप्पांनी त्यांच्या मनातली खंत माझ्या विषयात घोळवत बोलून दाखवली. 'हो' सांगून आम्ही गावाची वाट धरली. आम्ही आफिसात पोहोचलो. नाना वाटच पहात होते. 'काय रे पूंजू इतका वेळ लावला' त्यांनी विचारले. 'नाना हा भुईमुगाच्या शेंगा तोडायला आई बरोबर कामाला गेला होता. कामाचे शेत शोधत वेळ झाला', पूंजू म्हणाला. 'गोविंदा असा मधे ये, अभिनंदन!' नाना म्हणाले. मी ऑफिसात जाऊन स्टूलवर बसू लागलो, 'अरे आता लाजू नको, ती खुर्ची रिकामीच आहे, ती घे आणि असा माझ्याजवळ येऊन बस' नाना म्हणाले. काय माहीत एक दोन वर्षांनी तूच या ऑफिसचा पोस्ट मास्तर होऊन येशील आणि या माझ्या खुर्चीवर बसशील' नाना म्हणाले. 'नाही नाना, अस नाही होणार' मी

नम्रपणे म्हणालो. 'नाही काय,अरे तसेच होणार, हे माझे बघ. मी पूंजू सारखाच खातेबाह्य कर्मचारी म्हणून खात्यात लागलो होतो, मला काम शिकायचे होते म्हणून, मला जो कोणी काहीही काम सांगायचा, ते मी कधीच टाळले नाही. मी हळू हळू खात्याच्या परीक्षा देत गेलो आणि आज या पदावर येऊन पोहोचलो.आधी शिपाई, मग पोस्टमन नंतर कारकून अशा बढत्या मिळवत गेलो', नानांनी त्यांची प्रगतीची गुरू किल्ली मला दिली. 'तू चिकाटीने, इमानदारीने आणि शिकण्याच्या जिद्दीने काम करत राहशील तर तूही असाच प्रगती करशील', नानांनी समजुतीच्या सुरात मला यशाचा मार्ग दाखवला. 'करणाऱ्याला या नोकरीतून फार काही करता येते. डोळे उघडे ठेवून, जाणीव पूर्वक कामा बरोबरच, खात्यात निघणाऱ्या निरनिराळ्या परीक्षांचे व्यवस्थित अभ्यास केले तर कारकुनाचे अकौउंट, शहर निरीक्षक, बिनतारी रेडिओ लायसेंस निरीक्षक, डाक निरीक्षक अशा परीक्षा देत देत आणि तिथेही चिकाटीने आणि इमानदरीने काम केले तर शेवटी शेवटी डाक अधीक्षक या पदापर्यंत पाहोचता येते', नाना सांगत होते आणि मी ते एक चित्त होऊन सारे ऐकून मनात साठवत होतो. 'हो नाना मी हे सारे निश्चित करून दाखवेल', असे सांगून मी नानांचे पाया पडलो.नानांनी त्यांच्या टेबलाच्या खणातून एक पाकीट काढून ते माझ्या समोर ठेवले, आणि म्हणाले 'हे घे, पोस्ट खात्याच्या अथांग सागराला लावलेल्या दाराच्या कुलुपाची किल्ली. तुझा खात्यातील प्रवासाची सुरुवात नंदूरबार गावापासून होत आहे. ऑफिस बऱ्या पैकी मोठे, तिथे तुला खूप काही शिकायला मिळेल. तुला तीन तीन महिन्याच्या तुझ्या कामातील प्रगतीच्या निरीक्षणाच्या आधारावर ठेवतील, दर तीन महिन्यांनी तुला, नोकरीत ब्रेक दिला जाईल. झालेल्या तीन महिन्याच्या काळातील तुझी वागणूक, कामातील सफाई, कामातील बिनचूकपणा आणि वेग, तुझी काम करण्यातली आवड यावर तुझे निरीक्षण आधारीत राहील. त्या नूसार तुला पुढे तीन महिन्यांची मुदत वाढवून द्यायची की नाही ते अधीक्षक कार्यालय ठरवेल आणि त्याचा अहवाल वर मंडल ऑफिसला पाठविला जाईल. कमी चुका आणि साधारण काम असेल, तर वरून आदेश आल्यावर कामावर घेतले जाणार, नाही तर नाही. परत तीन महिन्यासाठी कामावर घेतले जाईल, असे

साधारनता तीन ते चार वेळा आढावा घेतला जाईल, चौथ्या वेळेसही कामात सुधारणा झाली नाही तर तुमची खात्यातील निवड रद्द होईल' नानांनी सारे बारकावे मला समजावून सांगितल्या मुळे मी एकदम खबरदार झालो. तरी पण पन्नास टक्के भिती पोटात राहिलीच.नानांनी माझ्या चेहेऱ्याचे निरीक्षण केले आणि ते पाहून म्हणाले, 'मला तुझ्या बाबतीत शंभर टक्के खात्री आहे. तू पहिल्याच परीक्षणात पास होऊन, लगेच कारकून होशील. पण तरी एक ध्यानात ठेव तुझे काम तू नीट करशील. तसे तेथे एम जी पठाण माझे मित्र आहेतच, मी नानांचे सारे सल्ले ऐकून घेतले. तशी त्यांना त्या बाबत परत ग्वाही देऊन त्यांचे पाया पडून आशीर्वाद घेऊन घरी आलो. अप्पा, अण्णा, आई संध्याकाळी घरी आले. अप्पा अण्णाला मला नोकरी लागल्याचे ऐकून आनंद झाला. त्यांनी आणि आई ने माझी नंदूरबारला जायची पूर्ण तयारी करून ठेवली. माझे रोजचे कपडे, गोधडी, स्टोव, जरमलचे ताट, चटणी, मिरची इत्यादी, एका पत्र्याच्यापेटीत भरून व कपड्यांची वळकटी बांधून ठेवले. दुसऱ्या दिवशी सकाळीच, साक्रीमार्गे नंदूरबारला रवाना झालो. नंदूरबारला पोचल्यावर माझे सामान पोस्टाच्या ओट्यावर ठेवून, आत जाऊन मी पोस्टमास्तरांना नमस्कार करून, माझ्या हुकुमाचे पाकीट त्यांच्यासमोर ठेवले. मास्तर फार भला माणूस होता, पाकीट उघडून पाहून ते लगेच म्हणाले , 'एम जी लो तूम्हारा और एक नया बासिंदा आगया, लो इसको संभालो'. ते ऐकताच पठाण सायेब मास्तरांजवळ आले, 'कौन, ये जनाब है क्या, अरे भई हमारे गुरू भंडारी नानासे मिलके आए क्या नही' त्यांनी मला विचारले. 'जी हा साहब, 'अरे भैया हमारे मुस्लीम भाई भी इतनी गहरी और मिठी हिंदीमे बात नही कर सकते' पठाण एकदम खुशीत म्हणाले. 'साब मैने हिंदी मे पंडित पास किया हूँ'. नंतर कारकुनाला न सांगता त्यांनीच माझा रुजू रिपोर्ट तयार केला. 'देख भइ, मै तूमपे पहलीही मूलाकातमे फिदा हो गया हूँ. पर एक आस तूमसे हमेशा रहेगी, मेरे इस कलम की इज्जत बढाते रहना, कदम दर कदम खाते मे तरक्की करते रहना, और उंचे पदोपर जाते रहना, क्योंकी जब मै सर्विससे रिटायर होउ फक्रसे लोगोसे कहूँगा के, मेरे कलमके शाहीसे ,जो खातेमे हाजीर हूवा था, आज वो अमूक पदपर विराजमान है'. 'दादा आपके

कलमसे लिखी शाई का रंग कभी भी फिका नही पडने दूंगा'मी पठाण साहेबांना शाश्वती दिली. नंतर मास्तरांनी दादांला, मला प्रत्येक खिडकीला नेऊन तिथे होणाऱ्या प्रत्येक कामांची जुजबी माहिती द्यायला सांगितले. मास्तरांना तिथेही नानाच म्हणायचे.'नाना मुलगा जरा कष्टाळू वाटतो, मला नाही वाटत, याला जास्त शिकवावे लागेल', दादा म्हणाले.' मलाही तसेच वाटते एम जी'. आरगडे नाना म्हणाले. 'हाँ, तो चलो मियाँ ,आजसे हम तूम्हारे नये जिवनकी शूरूवात किये देते है, दिल लगाकर काम करो, जो ना आए, या ना समझे मूझे आवाज देके बूला लेते जाना. तो आज इस खिडकी पर बैठकर यहा का काम करो'. पठाण साहेब म्हणाले. 'पहले मै तूम्हे हर खिडकीके पास लेके जाता हूँ, वहा के कूछ कामो की खूबीया बता देता हूं.'असे सांगून ते मला एक-एक खिडकी जवळ नेऊन त्यांच्या खालच्या किंवा थोड्या आजू बाजूला चिकटवलेल्या छोट्या कागदांच्या तुकड्यावर थोडी थोडी माहिती लिहिलेली होती ते दाखवत पठाण साहेब मला म्हणाले, 'ये जो कागजके तुकडे चिपकाये रखे है, जब तूम खूद वहा बैठोगे तब, उन कागदो पर उस कामको पढना, उसपे वो काम कैसा करना वह लिखा हूआ है. उनको छोडकर दुसरी कोई भी कठीनाइ हो तो किसीबी बाबू को पूछ लेना समझे?' 'हा दादा' मी म्हणालो. 'हाँ, जरा इनके पास रूको और उनसे मिलो, ये है मि.तायडे,ये भी तूम्हारे जैसेही एक माह पहले नये आए है, इनसे भी गप्पे हाक लिया करो'. दादा त्याच्याकडे पाहून म्हणाले. 'आज का दिन तू, हर खिडकी पर रूक कर, वहा चल रहे काम पर नजर मारते रहो, कलसे तूमको खूदको एक खिडकी संभालनी है समझे ना'? 'हा दादा चोकस',मी म्हणालो. 'कल का कल देखेंगे' असे सांगून ते त्यांच्या कामाला लागले. 'तूझे नाव काय आणि राहायची सोय?', तायडेने विचारले. 'गोविंद गढरी, मी आजच, आता तासा दोन तासापूर्वी आलो आहे. माझे सामान अजून ऑफिसच्या ओट्यावरच पडले आहे'. मी सांगितले. 'माझा रूम पार्टनर होशील'? त्याने विचारले, मी खूश होऊन हो म्हणालो. मी लगेच सामान त्याच्या खुर्ची जवळ आणून ठेवले. पूर्ण दिवस एका मागून एका खिडकी जवळ जाऊन, एकेका कामाचे निरीक्षण करत राहिलो. ऑफिसची वेळ संपली, मी माझी पेटी घेतली आणी

वळकटी पकडून तायडेच्या खोलीवर गेलो. 'अरे गोविंदा आता तुझा सामान काही काढू नको. आज आपण माझ्याकडच्या सामानानेच काही तरी बनवू', तायडे म्हणाले. मला मनासारखा सहकारी मिळाल्यामुळे मी मनातून खूश होतो. दुसऱ्या दिवसापासून आम्ही ऑफिसला बरोबर येऊ लागलो. 'नमस्कार नाना', ऑफिसात शिरल्याबरोबर मी मास्तरांना नमस्कार केला. मला परत नमस्कार म्हणत 'काय मिस्टर गढरी कालचा दिवस कसा गेला?' नानांनी मला विचारले. 'अगदी छान घरच्या लोकांबरोबर राहिल्यासारखा'. मी म्हणालो. 'काम कसे वाटले', 'बिलकूल सोपे', मी पूर्ण विश्वासाने म्हणालो. 'वा, अरे एम जी साब आपका शागीर्द तो सहीमे शागीर्द ही निकला, नानांनी पठाणदादाला सांगितले. 'हाना देखो तो सही, सिर्फ एक निगाहसे देखकेही कहता है,के काम बहुत आसान है', नाना पठाण साहेबांना परत म्हणाले. 'फिर आपका क्या खयाल है'? नानांनी त्यांना विचारले. 'आजसे इसका काम शूरू कर देंगे. कूछ कम जादा हूआ भी तो, हम देख लेंगे. आज इसको स्टँप बिक्री करने लगायेंगे दो दिनके लिये,फिर छटाई,फिर पार्सल, फिर रजिस्ट्री, फिर मनिआर्उर, फिर सबअकौंट कैसे रहेगा?', 'बिलकूल सही. देखेंगे कहातक संभाल पाता है, दादा बिलकूल जंत्रीच तयार करून म्हणाले. मास्तरांनी एकाकडे स्टँप सेलचे डबल काम दिले होते, ते काढून तिथे मला बसवले. मी खिडकी जवळ चिटकवलेली कार्ड पाकीट तिकिटाच्या किंमतीची यादी बारकाईने पाहून घेतली,आणि कामाला सुरुवात केली. सुरुवातीला थोडा अडथळलो,नंतर मात्र कुठेच थांबलो नाही. दिवसभर काम बिन तक्रार आणि बिनबोभाट झाले. खिडकीला गर्दी थांबलीच नाही. संध्याकाळी मास्तर हिशोब तपासायला आले. एक हजार रुपयांचा ॲडव्हांस होता, सारे स्टँप आणि रोकड मोजून मास्तरांनी बेरीज केली,तेव्हा हिशोबात पाच पैसे कमी आले. 'काय मास्तर, पाच पैशांवरच निभावले म्हणायचे,' असे सांगून त्यानी माझी पाठ थोपटली. मी त्यांच्या तोंडाकडे पहात राहिलो. 'अरे फक्त पाचच पैसे कमी आहेत. तुझ्या हिशोबात,अरे सिनीयर लोकांना, दिवस अखेरचा हिशोब एक तर जमत नाही,आणि जमलाच तर काही तरी फरक येतोच त्यांच्या हिशोबात कधी रुपया, तर कधी पाच रुपये. रोज कमीत कमी पाच-पन्नास पैसे तरी हमखास

कमी असतातच,जास्त यायचा तर नावच नाही. कारण,जनता फार हुशार झाली आहे, परतीचे कमी पैसे घेऊन, कधीच खिडकी सोडून जाणार नाही,' नाना म्हणाले. 'पण नाना पाचपैसे तरी का कमी यावे?' मी विचारले. 'अरे, मला तर वाटले होते, तुझा आजचा पगार, कमी भरलेले पैसे भरण्यातच जातो का काय' नानांनी, मग पठानला परत हिशोब करायला बोलावले,'अरे एमजी देखो तो इसका हिसाब ,शायद मेरे गिनतीमे कही कूछ गडबड तो नही हो गई', 'अरे गढरी गर्दीमे गडबड हो जाती है लेन-देनमे', दादा म्हणाले. 'नही दादा, मै, दावेके साथ कहता हूँ,ना तो मैने पब्लीक को खिडकीपर बेफिजूल रूकाया, न ही हिसाब और लेन देनमें धांदली की है'. मी छाती ठोकपणे दादाला सांगितले. 'बर-बर ठीक आहे, आपण परत मोजून पाहू, दादा म्हणाले'. मग त्यांनीही परत सारी मोजनी केली, आणि हीशोबाची बेरीज केली. मोजणी आणि नानांनी मोजल्या प्रमाणे हिशोबही अगदी बरोबर होता,'क्या मिया सबको दिनमे तारे दिखा रहे है क्या,चलो उठाओ ये सारा पसारा और पाच पैसे जादा है, वो सरकार जमा करो', दादा म्हणाले.' ऐसा तो होनाही नही चाहीए साहब, मूझे पुरा यकीन है', असे म्हणत मी पसरवलेली स्टँप सामग्री गोळा करून स्टँप बॉक्स मधे ठेवत म्हणालो. उचलता-उचलता पाकिटांचा बंडल खाली पडला, त्यातून पाच पैशाचे नाणे बदकन खाली पडले, सार्‍यांची नजर त्यावर पडली, पण माझ्या हिशोबात चूक सापडली, याची खंत मनात होती म्हणून, माझे तिकडे लक्ष नव्हते. दादाचे तिकडे लक्ष होते. त्यांनी ते पाच पैशाचे नाणे उचलून नानापुढे ठेवले व म्हटले, 'याला म्हणतात आत्मविश्वास. दोन वरिष्ठांनी मोजणी करूनही, स्वतःचा आत्मविश्वास मोठा होता, त्याच्याच जोरावर हा ते मान्य करत नव्हता, बकाब मि. गढरी, तुझा हिशोब आणि तूही शंभर टक्के बरोबर आहेत. 'व्हेरी गुड'. नाना खरोखर हा मुलगा खात्यात काहीतरी बनून दाखवेल' पठाण साहेब म्हणाले,'निश्चितच हा खूप मोठ्या जागेवर जाईल', नानांनी माझ्याकडे पाहून सांगितले. एवढे झाले तरी मी माझ्याच गिरस्तित गुरफटलेला होतो, कुठेही काही चूकलेलो नसतांना, हिशेबात पाच पैसे कमी कसे आले? ते मला आठवत नव्हते. 'अरे गोविंदा घाबरू नको, तुझा हिशोब अगदी बरोबर आहे'. माझ्या खांद्यावर हात

ठेवत दादा म्हणाले. त्यांच्या आवाजाने मी भानावर आलो. त्या आधी कोण काय बोलले, ते मी ऐकले नव्हते. 'काय झाले दादा? मी समजलो नाही'. 'अरे ज्या पाच पैशासाठी तू एवढा व्याकूळ होतो आहे, ते मिळालेत, तुझ्या पाकिटांच्या बंडलातच अडकलेले होते, हे घे. तू ज्या आत्मविश्वासाने हिशोब बरोबर असल्याचे सांगत होता, त्याचेच आम्ही कौतुक करत आहोत. पहिल्या दिवसापासूनच त्या पाच पैशांच्या निमित्ताने, संपूर्ण ऑफिसच्या कर्मचाऱ्यांचा माझ्यावर विश्वास बसला. दुसऱ्या दिवसा पासून मला छटाईचे काम देण्यात येणार होते. मी सकाळीच आफिसात लवकर आलो. पठाण साहेब माझ्याही आधी येऊन बसले होते. 'देख गोविंदा, तू बहुत गरीब घरका लडका है, मूझे बताया गया है की, तू मजुरी करते-करते आधा काम छोडके नंदूरबारको आया है. ये सच है ना'? 'हाँ साब ये सच है,लेकीन ये आपको कैसे पता चला'? मी विचारले. 'अरे तेरी हिंदी तो बहुत साफ है', माझे हिंदीतले भाषण ऐकून ते म्हणाले. 'जी सर मैने राष्ट्रभाषा सभा पुणे की पंडीतकी इम्तहान पास किया हूँ'. मी म्हणालो, 'लेकीन सर आपने बताया नही की, आपको मेरे बारेमे किसने बताया? आपको कैसे पता चला'? मी विचारले. 'अरे भाई रातको मै टेलीग्राफ कांउटरको लेट फी ड्यूटी का काम करने आता हूँ, तब कूसूंबासे भंडारी नानाका फोन आया था. उन्होने मूझे बताया, तू पैदाईसी कहा का है, कूसूंबा तूम कैसे आये, तेरी पढाई किस तरहसे हूई, पढाई करते-करते तू क्या-क्या काम करता था, कूसूंबे मे तेरी क्या हैसीयत है,ये सब उन्होने बताया, उन्होने तेरा फार्म कैसे भरा, तेरा नंबर कैसे लगा ये भी बताया, और ये तो ये, तेरी माँ भी मूझसे बोली, रोते-रोते बात कर रही थी, उनकी रूलाई मे उनकी बात ठिकसे समझमे नही आ रही थी। मै सब समझ गया, अब मैं बोलता हूँ, वे बाते ध्यानमे रख. तेरे भाईयोंने और माँ ने तो उनका काम किया है, अब तेरी जिम्मेदारी है, की उनकी तेरेसे जो आस लगी है, तू उनको आँच न आने दे, फिर उसके लीये तूझे कितनी भी तकलीफ क्यों ना उठानी पडे। मै तेरे साथ हूँ, मै हमेशा तेरे उपर नजर रखूंगा, चाहे तू कही भी हो। क्योंकी भंडारी नानाने ये जिम्मेदारी मूझपर छोडी है । वे मेरे गुरू है । और हाँ मै तेरेसे भी बहुत गया गुजरा था, मेरे तुलना मे, तू मूझसे कई गूना अच्छा लडका है।

चल अब आजके बारेमे बात करते है, ये सामने छटाई बाक्स रखी है, यहा ये लेबल चिपकाए हूये है, उनपर हर बाक्सपर गावोके नाम लिखे हूए है, हातमे टपाल लेकर उसपर जिस गावका नाम लिखा होता है, उस नामकी टपाल उसमे डालते जानेकी। सबसे उपर जो बडे-बडे खाने है, वे देशके सारे बडे-बडे शहरों के नामसे है, उनमे सिर्फ उनकेही टपाल डालना,उनके निचे उपरवाले खानेसे जरा छोटे खाने है,उनमे गावके नामके साथ-साथ तहसील और जिलेके नामकी टपाल डालनेकी, उनके भी निचे दो सबसे बडखाने है, जिनपर लिखा है भूसावल आर.एम.एस.तो इसमे पूर्वी और उत्तरी भारतके पूरे राज्यों की और दुसरे पे लिखा है मनमाड आर.एम.एस. इसमे पूरे पश्चिमी और दक्षिण भारतके पुरे राज्यों की टपाल डालने की. भूगोलका नक्षा आखोके सामने हमेशा रखनेका, फिर, सारे पूर्वी, पश्चिमी, उत्तरी और दक्षिनी भारतके राज्य ध्यान में आ जाते है. कूछ समजमे आया?' दादाने विचारले. 'हॉ दादा बिलकूल, कोई बडी बात नही है, सामने लेबल लगे हूए है फिर क्या तकलीफ है. अगर सावधानीसे टपालकी छटाई नही हूई तो जिधर-जिधर गलत टपाल जायेगी, वहासे अपने नंदूरबार शहरके नामके खिलाफ गलतीकी नोंद होगी, जिसमेपूरी गलत गई टपालका ब्योरा होगा, उसकी एक प्रत हमारे कार्यालय को आयेगी और दुसरी हमारे मंडल कार्यालय को जायेगी, फिर वहा उसका पूरा ब्योरा, वहा भी लिखा जायेगा। 'दादा आप बिलकूल फिक्र मत करो, ऐसा नही होगा'. मी त्यांना शाश्वती दिली. 'अरे तस नाही मागच्या प्रकरनांना उत्तर देता-देता अजून नाकी नऊ येत आहेरे बाबा', दादा रडकूंडीला येऊन बोलले. 'आणि त्याचे काय आहे, तुला माहीत नाही, तो रिपोर्ट येतो तो विभागीय आणि अधीक्षक कार्यालयाला त्याची प्रत जात असते. मग तिकडूनही आपल्याला जबाब मागतात त्यावरही रिपोर्ट पठवावा लागतो, असे परत-परत रिपोर्ट आले तर, त्या कर्मचाऱ्याच्या विरुद्ध कारवाई केली जाते. और हा सबसे खास बात ये है की उस गलतीके वजहसे जनताके टपालको देरी होती है'. आम्ही मग आमच्या-आमच्या कामाला लागलो. हळू-हळू टपाल खात्यातील, बाहेर किरकोळ वाटनारी सेवा जनजिवनात किती महत्त्वाची आहे, हे माझ्या लक्षात येऊ लागले. दिवसें-दिवस कामातील माहिती वाढू

लागली. ती आत्मसात करतांना कामातील रुची वाढत होती. हा-हा म्हणता अडीच महिने कसे निघून गेले ते कळालेच नाही. माझे सर्व प्रकारचे काम करून झाले होते. सर्व कर्मचारी माझ्यावर आणि माझ्या काम करण्याच्या धडाडीवर खूष होते. श्री तायडे माझ्या आधी एक महिना रुजू झाले होते. त्यांना अजून बरेच काम शिकायचे होते. त्यांना तीन महिने होऊन पंधरा दिवसांचा खंड देऊन, परत कामावर घेण्यात आले होते. आता पुढे मला कोणते काम द्यावे या बाबत मास्तर साहेब व पठाण साहेब यांच्यात, सबआकाउंट ब्रांच द्यावी की नाही. यावर त्यांचे एकमत होत नव्हते. कारण ती ब्रांच खूप जोखमीची आणि गुंतागुंतीची होती. नंदूरबार उपडाकघराला आजूबाजूचे सतरा मोठ-मोठ्या खेड्यावरील शाखा डाकघर जोडलेले होते.त्या साऱ्या डाकघरांना सर्व प्रकारचे व्यवहार करायची सरकाची परवानगी देण्यात आलेली होती. त्या सर्वांच्या सर्व आर्थिक व्यवहारांची, पंजीकृत आणि साधी टपाल या सर्वांची एकत्रित जंत्री करून आधी प्रत्येक शाखा डाकघराचा स्वतंत्र हिशोब जमवावा, सर्व शाखा डाकघरांचे हिशोब जमवून झाल्यावर त्याची प्रत्येकाची नोंद समरी बूकात नोंदवायची, नंतर समरी मधील प्रत्येक वेग-वेगळ्या व्यवहारांची जसे मनीआर्डर, सेवींग बँक, रिकरींग, हिशेबी कार्यालयाकडून आलेला स्टँप, आलेली रोकड, बेरींगची रकम, इत्यादी जमा बाजूची एकत्रित बेरीज तसेच दिवस भरातून निरनिराळया प्रकारच्या व्यवहारत अदा केलेली रकम इत्यादी खर्च बाजूची बेरीज करून कालच्या एकत्रित शिलकेत दिवस भराची सर्व निव्वळ जमा त्यात मिळवावी. त्या, एकत्रित जमेतून सर्वांची एकत्रित खर्च वजा करून राहिलेली शिल्लक त्यांनी त्यांच्या दैनिक हिशोबात दाखवलेली एकत्रित शिलकेशी जमवावी, ती जमलीच पाहिजे नाही तर कोणत्या तरी शाखा डाकघराच्या हिशोबात काही तरी घोळ आहे हे निश्चित. मग साऱ्या शाखा डाकघरांचे प्रत्येकाला पाठवलेली स्टँप, रोकड, त्यांनी त्यांच्या कार्यालयात केलेले प्रत्येक व्यवहार त्यांचे चलन इ. यांचे बारीक निरीक्षण करावे अशी जमा बाजू जमली की मग खर्च बाजू तशाचप्रकारे तपासून पहावे तपासणीत आढळलेल्या प्रमाणेच त्यांनी हिशोब करून तो जमला की नाही हे प्रत्येक शाखा डाकघरांचे जमा आणि खर्चाच्या बाजू तपासून पहावे आणि मग ताळमेळ

जमवावा लागे. नवीन कर्मचाऱ्याला हे सारे, काही वर्षांचे निरीक्षण आणि कामाचा अनुभव असला तरच तो ते करू शकतो, नाही तर तो हिशोब जमवण्यासाठी साराच्या सारा ऑफिसच्या कर्मचारींचा रात्रीच्या रात्री राबता राबवावा लागतो. तथापि अडीच महिन्यांच्या निरीक्षणातून त्या कामाचे स्वरूप आणि पद्धत माझ्या लक्षात आली होती, पण प्रत्यक्ष त्या ब्रांचला काम करण्याचा प्रसंग आला नव्हता आणि त्याच बाबतीत मास्तर साहेब आणि पठाण साहेबांचे एकमत होत नव्हते. मास्तर साहेबांचे म्हणणे होते,'हे काम त्याच्या लेव्हलचे नाही, त्याच्या कडून कामात गडबड झाली तर, आपणा सर्वांना त्याची कोठे चूक झाली ते शोधने आणि परत सर्व शाखा डाकघरांचेही हिशोब विनाकारण तपासत बसावे लागत जाईल, परिणामी आपल्याही ऑफिसचा दैनिक हिशोब प्रधान डाक घराला जाणार नाही आणि मग आपल्याला सर्वांकडून धडाधड तारा येतील, मग त्याला कसे निपटाल, त्यावर पठाण साहेब म्हणत होते,'मास्तर साहेब काही घाबरायचे कारण नाही, नाहीच झाले तर मी आहे ना!' हा ना करता-करता शेवटी मास्तर साहेब तयार झाले. ते ऐकून मला मनोमन खूप आनंद झाला. कारण आत्ताच माझी खरी कसोटी लागणार होती. दुसऱ्या दिवशी सकाळी आल्यावर पठाण साहेबांनी मला सबअकौंटला बसवले. मी ज्या वेळी या ब्रँाचच्या कामाचे निरीक्षण करायचो, त्याच वेळी मी मनातच कामाची आखणी करत रहायचो. सुरुवाती पासूनच मी कामाची आखणी करून घेतली. त्या प्रमाणे मी कच्चे टिपण ठेवण्यासाठी एक स्वतंत्र कागद घेतला,त्याच्यावर ब्रँाचनूसार रकाने पाडून त्या-त्या ब्रँाचच्या व्यवहारांच्या नोंदी त्या रकान्यात एका खाली एक करत गेलो. तसेच सर्व शाखाडाक घरांकडे असलेली एकत्रित शिल्लक एका कोपऱ्यावर लिहून ठेवली,तिच्या खाली आज पाठवलेला एकूण स्टँप, एकूण रोकड, अनपेडची नोंद त्या शिलकेच्या नोंदीखाली लिहून ठेवली. शाखा डाक घरांना पाठवलेल्या साऱ्या वस्तूंच्या नोंदी त्या डाक घराच्या स्लिपामधे ठळकपणे केल्या. सकाळच्या कामाचा सत्र त्या आफिसांना स्टेशनरी, वस्तू आणि रोकड पाठवायचा असतो. सारे काम लक्षात ठेवून केले. कामात घाई आणि गडबड होऊ दिली नाही. दुपारी त्या डाक घराकडून आलेल्या बॅगा उघडतांना तिच्यातून निघालेली

टपाल काळजी पूर्वक तपासून घेतली, त्यात एकही पंजीकृत वस्तू जाऊ दिली नाही, नंतर साऱ्या आर्थिक व्यवहारांचे व्हाउचर घेऊन त्यांच्या नोंदी आणि रकमा तपासून, नंतर या आफिस कडून पाठवलेली रक्कम आणि त्या डाक घराने स्वीकारलेली रकम यांची बेरीज करून घेतली त्यातून, त्या कार्यालयाने अदा केलेल्या रकमेच्या एकत्रित अदा केलेली रकमेची बेरीज करून ती बेरीज एकत्रित आरंभीच्या शिल्लक अधिक आजच्या जमेची बेरीजेची रकम मिळवून आलेल्या बेरजेतून ही एकत्रित अदा झालेल्या रकमेची बेरीज वजा केली, अशारीतीने आज अखेरच्या शिलकेची रकम आली. प्रत्येक शाखा डाकघराने त्यांच्या दैनिक अकाउंट फॉर्म मधे दाखवलेल्या शिलकांची एकत्रित बेरजेसी तुलना केल्यावर ती एकमेकांशी जमवली आणि नवल असे की ती एकदम जुळली. माझ्या आनंदाला मर्यादाच राहिली नाही. मी लगेच पठाण साहेबांकडे जाऊन, त्यांना मी केलेली सारी मोड-तोड दाखवली. त्यांनी नजरेने ते पाहिले आणि जोराने माझ्या पाठीवर थाप मारली. काहीच न बोलता दादा सरळ मास्तर साहेबाकडे गेले, आणि माझा गोळाबेरजेचा कागद त्यांच्या पुढे ठेवला. त्या कागदावरून नजर फिरवून झाल्यावर मास्तर साहेबांनी मला जवळ बोलावले, आणि हात पुढे करून हातात हात मिळवायला सांगून, माझे अभिनंदन केले. पठाण साहेबांनी मला प्रेमाने बगलेत घेतले. 'क्यूँ मिया, ये सब करते नानी याद आयी, या नानी मिल गयी' त्यांनी हसत विचारले,'साब आपको ये सब पूरा खूद बारीकीसे देखना है. मेरा काम करनेका तरीका बराबर है या गलत, ये बी मूझे समझाना है, अगर आजकी गलती काम जमने के खूशीमें नजरअंदाज होगई तो वह हमेशा के लीये मूझे चिपकी रह जायगी।' मी त्यांना म्हणालो. 'क्या बात करता है, सचमे तो नानी मिलही गयी है, अब क्या पडताल करना है। समझो, कोई इतनी उतनी-गलती होगी भी तो उसे पातालसे ढूंढके निकालेंगे. लेकींन भैया तूने तो मेरी इज्जतही बचाली,बहूत इतमिनानसे मैने नानाको पटाया था तेरे लिये. आज तूने जो किया है, छे-छे सालकी सर्वीसवाले भी नही कर सकते' त्यांनी सांगितले. 'मास्तरसाब आप एकबार फिरसे देखलो, फिर मै ट्रांजीट निकालके लाता हूँ' दादा म्हणाले. 'मेरे खयालसे ट्रांजीट तेरे समजमे नही आयेगा' पठाण साहेब मला म्हणाले. 'नही साब वो भी तयार

करके रखा हूँ, सिर्फ समरीमे लिखना बाकी है,ये देखो, ये आजकी भेजी स्लिप है, खजांचीके नोंदके अनूसार, सभी डाकघरोके नामके आगे मैने भेजी गयी रोकड और स्टँपकी नोंद करके रखी है, सिर्फ वे समरीमे लिखनी है. असे सांगत मी तो हिशोबाचा कच्चा कागद त्यांच्या पूढे ठेवला. त्यांनी तो कागद पाहील्यावर म्हणाले, 'अरे इतना सब कैसे कर लिया? काम करनेका इतना स्पीड है तेरे पास?' त्यांनी एकदम आश्चर्याने विचारले. नंतर ते मला मास्तर साहेबांच्या टेबलाजवळ घेऊन गेले. 'घ्या मास्तरसाहेब तुमची सबआकौंटची ब्रँाच'. ते त्यांना म्हणाले. 'मला वाटलेच होते तूम्हाला हे करावे लागेल, बघत बसा आता, माझे काम अजून आटपायचे आहे, हिशोब जमत नाहीय अजून' जरा चष्मा खाली करून मधल्या भेगेतून पठाण साहेबाकडे पहात आणि मान खाली करून गालातल्या-गालात हसत 'दाखवा बर' असे म्हणत मास्तर साहेबांनी समरी बुक हातात घेऊन पाहू लागले तर पहातच राहिले, नंतर दुसऱ्या कागदावरील रफ ट्रांन्झीट काढलेले पाहिले आणि पहातच राहिले. बऱ्याच वेळाने हे यानेच केले,स्वत: केले' असे पठाण साहेबांना विचारू लागले. 'अलबत,पठाण साहेब म्हणाले'. 'कमाल आहे, खरे ना पठाण' त्यांनी विचारले. 'नक्कीच' पठाण म्हणाले. 'अरे गढरी तुझ्या डोक्यात काय भरले आहे? अरे मी नोकरीला लागलो तेव्हा या, सबअकौंटंट ब्रांचकडे आम्हाला सहा महिने पाहू देत नव्हते, कारण  की, नवीन पोर हे गुंतागुंतीचे काम पाहूनच नोकरी सोडून पळून गेले आहेत. तू पुढे कुठे जाऊन थांबशील हे आत्ताच काही सांगता येत नाही, पण एवढे मात्र निश्चित की तू कमीत कमी अधीक्षक पदा पर्यंत तरी पक्का पोहोचशील. पण  फक्त तू इतर गोष्टी पासून दूर राहिला तरच हे शक्य आहे'. अगदी शांत आणि संथ सुरात मास्तर साहेब म्हणाले. नंतर त्यांनी माझी ती ब्रँच पक्की केली. माझे खात्यात रुजू होऊन ज्या दिवशी तीन महिने पूर्ण  होत होते, त्याच दिवशी मास्तरांना तार आली, मला सर्व्हिसमधून त्या दिवशी संध्याकाळी ब्रेक द्यायचा आणि त्याच वेळी परत कामावर अपरान्हचा रूजूचा रिर्पोट तयार करायचा. तार वाचून सगळ्यांनी टाळ्या वाजवून माझा सत्कार केला. असेच सात दिवस गेले. अचानक मास्तर साहेबांनी, मला व पठाण साहेबांना जवळ बोलवले. 'आपल्या

ऑफिसला दोन शिकाऊ उमेदवार आहेत, तायडे आणि हे गढरी, आज त्यांच्यातून एक जन आपल्यातून जाणार आहे'. एक म्हटल्यावर मला तर घामच फुटला, कारण  आज पर्यंत नोकरी वरून काही ना काही कारणाने घरी परत जाणारा मीच होतो. तोच पठाण साहेबांच्याही तोंडातून तोच शब्द बाहेर आला, ''जाणार म्हटल्यावर, जो जूनियर आहे तोच जाईल. आणि तो गोविंदाच आहे! हो जाणार तर गोविंदाच आहे, पण तुम्ही जो घरी जाण्याचा विचार करत आहात, तिथे नाही'. मास्तर मधेच म्हणाले.' म्हणजे? याला या ऑफिसातून, काढून दुसऱ्या ऑफिसला पाठविले होय?'' पठाण साहेब म्हणाले. 'आपल्याला परत सबआकौंउंटट ब्रँाचचा प्रश्न पडेलच ना' ते पुढे म्हणाले.'आपल्या एका माणसाचे काम तो बिनचूक आणि एकदम व्यवस्थित सांभाळत होता. एका माणसाला दोन ब्रँाचचे काम नाही पेलवत. सांगायला दोन ट्रेनी दिलेले आहेत, पण  हा जसा एका माणसाचे काम स्वतंत्रपणे सांभाळू शकत होता, तसे तावडे नाही सांभाळू शकत. पाच साडेपाच महिने त्याला होत आले. पण, त्याला असे वाटत नाही की, एखादा आठवडा तरी एखादी बऱ्याच स्वतंत्रपणे सांभाळून दाखवू'. पठाण साहेब आपले बोलतच होते,त्यांना मधेच थांबवून नाना म्हणाले. 'अहो, आपण  हीच अपेक्षा करा की,याची बडोदा ट्रेनिंग संपल्यावर याला परत आपल्याच ऑफिसला देण्यात यावे'. 'म्हणजे गोविंदाची बडोदा ट्रेनींगला निवड होऊन ट्रेनिंगची पण आर्डर लगेच आली, अवघ्या तीन महिन्यात?' पठाण साहेब स्वत:च टाळ्या वाजवत म्हणाले. त्यांच्या टाळ्यांचा आवाज ऐकून आफिसचे बाकी कर्मचारी ही गोळा झाले होते. बडोद्याचे नाव ऐकल्यावर तायडेही हातातले काम सोडून जवळ आला होता. 'काय रे, काय झाले?' त्याने विचारले. अहो तायडे महाराज तूमचे पार्टनर तूम्हाला सोडून चालले बडोदा ट्रेनिंगला'. धूडकू शिंदे म्हणाले. 'खरच,माझा नंबर न येता,याचा कसा इतक्या लवकर येऊन गेला'? तायडेने गोंधळून जात विचारले. 'अरे तुम्ही रोज जे काम करतात, त्याचा जो रोज रिपोर्ट पाठवला जातो, त्याचे निरीक्षण विभागीय कार्यालय आणि मंडल कार्यालयाला केले जाते. ज्याचे काम बिनचूक आणि जास्त असते, अशांची निवड होते, ज्याचे काम जो पर्यंत समाधान कारक लेव्हल पर्यंत येत नाही, तो

पर्यंत त्याला दर तीन महिन्यांनी ब्रेक देऊन,पुन्हा त्याच्या कामाचे तीन महिन्याचे काम पाहिले जाते, असे तीन वेळा जर त्याचे काम समाधान कारक आले नाही तर, त्याला खात्यातून कायमचे काढले जाते', पठाण साहेब म्हणाले. ते ऐकून सखारामला घामच फुटला. 'साहब मेरा तो एक चांस हो गया है. मेरा क्या होगा?' अरे वही होगा जैसा तायडे काम करेगा, वो सचमे काम अच्छा दिल लगाके करेगा, तो वो भी बडोदा जल्दी जायेगा', पठान साहेब म्हणाले. 'आपण पहातो आहोत ना, अवघ्या दोन अडीच महीन्याच्या काळातच नुसते पाहूनच सबआकाउंट ब्राँच कोणी स्वतंत्रपणे बिनचूक सांभाळून दाखवेल'? 'त्याची निवड रास्तच आहे'. शिंदेने त्याला उदाहरणासह पटवून दिले. तो खूब हिरमुसला झाला होता. त्याच्या मागून आलेला मुलगा खात्यात निवड होऊन अवघ्या तीन महिन्याच्या काळातच त्याची ट्रेनिंगला निवड होते आणि तो सरळ लगेच जातोही आहे. कारण माझ्याही अगोदरचे खात्यात रुजू झालेले अजून पडूनच आहेत, त्यांची पण अजून निवड झालेली नाही. मी त्याच दिवशी, ही खबर पत्र लिहून घरी आई आणि भावांना कळवली. पत्रात काय बोलावे हेच मला सुचले नाही. दुसऱ्या दिवशी, मी फक्त कपडे बरोबर घेऊन बाकीचे सामान खोलीवरच, नंदूरबारला ठेवून निघून गेलो. ट्रेनिंग तीन महिन्यांची होती. दुपार पर्यंत बडोद्याला पोहोचलो. योगा-योगाने त्याच रेल्वेने मध्य प्रदेशचे दोन मुलेही ट्रेनींगला आले होते. प्लॅट फार्मच्या बाहेर, रिक्षाचा तपास करतांना ओळख झाली, कारण तेही पोस्टल ट्रेनिंग सेंटरला जाण्यासाठी रिक्षाचा तपास करत होते. पूर्ण तीन सीट मिळाल्यामुळे रिक्षावाला लगेच तयार झाला. आम्ही तिघे सेंटरला एकाच वेळी पोहोचल्यामुळे आम्हाला तिघांना एक रूमही मिळाले. हळू-हळू तीन महिने निघून गेले. शेवटच्या परीक्षेत चांगले मार्क मिळाल्यामुळे आम्हा तीनही मुलांचा सत्कारही झाला. त्या कार्यक्रमात सगळ्यांना सांगण्यात आले, प्रत्येकाचा भारमूक्तीच्या रिपोर्टची प्रत घेतल्यानंतर, त्यांनी कार्यालयातून आपापले नेमणूक हुकूम घेऊन जावे. प्रत्येकाने आपापल्या नेमणुकीच्या गावाला जाऊन कामावर रुजू व्हावे. आम्ही तिघांनी आपले भारमूक्तीचा रिपोर्ट घेऊन रूमवर आलो व स्थावर निरीक्षकाला भेटून रूम दाखवून रूमची चावी देऊन, रूम त्यांच्या ताब्यात देऊन, रेल्वे

स्टेशनला तिन्ही जन बरोबर आलो. एकाच गाडीचे तिकीटही काढून, मी नंदूरबारला उतरलो. खोलीवर जाऊन सामान गुंडाळले, ऑफिसात आलो, आरगडे नाना, पठाण साहेब, तायडे आणि इतर स्टाफला भेटून संध्याकाळी साक्री मार्गे कूसूंब्याला आलो. आई, अप्पा आणि अण्णा बरोबर रात्र काढली. घरी सगळे आनंदात होते. 'तू पोटाला भुका राहून घरी पैसे का पाठवत होता'? आई ने प्रेमाने पण जरा रागातच म्हणाली. 'नाही आई मला जेवढे पोटाला लागले तेवढे बरोबर खाल्ले आणि बघ त्यातूनही जे पैसे वाचायचे, त्याच पैशात माझा बडोद्याचा पण खर्च भागला, 'मी तर म्हणतो आता इथून पुढे जास्तीचे पैसे पाठवत जाईन'. आईला धीर देत मी म्हणालो. 'नको तसे नको करू, आता तू धुळे शहरात राहशील, शहरात जास्त महागाई असते. जास्त खर्च होतो. तुझे सारेच विकतचे राहील'. आईने मला शहराची जाणीव करून दिली. अप्पा, अण्णाने शहरात जरा जपून राहायला सांगितले. मी सकाळीच धूळयाच्या ऑफिसात पोहोचलो, मला कामावर रुजू करून घेतले. मला धुळ्याला तीन-चार महिने ही झाले नसतील अचानक माझी धडगावला बदली झाली. धडगाव म्हणजे त्या काळी काळ्या पाण्याची शिक्षेचे ठिकाण होते. आईने तर धीरच सोडला. पण त्यावेळी तिथे कूसूंब्याचे तीन-चार पोर होते, त्यात एक समाजाचाही मुलगा आहे. असे कळाले. पण मी त्याला ओळखत नव्हतो. ते सारे शिक्षक होते, त्या मुळे मला हिम्मत आली. दिवस पावसाळ्याचे होते. तोडके-मोडके सामान घेऊन, मी शहाद्याला आलो. पुढे वहातूकीची कोणतीच सोय नव्हती. शहादा ते पाटीलवाडी पर्यंत गाड्या जायच्या, पुढे तीस ते पस्तीस किलोमीटरचा पूर्ण डोंगराचा रस्ता. पायीच डोंगर चढून जावे लागे. पावसाळ्याचे दिवस असल्यामुळे पूर्ण डोंगरभर, डोक्यापेक्षा उंच-उंच गवत, मधेच खळ-खळ वाहानारे नाले, दाट झाडीचे जंगल, एकट्या-दूकट्याने प्रवास करायचे कामच नव्हते. कारण जंगली जनावरांची फार भिती असायची. एकटा माणूस असला तर, कमीत-कमी, चार-पाच जाणारे सोबती जमे पर्यंत पाटीलवाडीतच पडून रहावे लागे. चार-पाच माणसे जमल्यावर, पाटीलवाडीतून एक मजूर रस्ता दाखवण्यासाठी सोबतीला घ्यावा लागे. तेथे त्या मजुरी साठी जंगलातले काही मजूर मुद्दाम मजुरी

कमवण्यासाठीच पाटीलवाडीत येऊन राहायचे. शहाद्याला पोहोचल्यावर विचारपूस करत मी, धडगाव फाट्यावर आलो, तेथे एक जण सोबतीची वाट पहात थांबला होता. तो फागन्याचा रहानारा होता. आम्ही दोघे एस.टी.ने पाटीलवाडी पर्यंत आलो. तेथे तपास करता तेथे अजून एक जन सोबतची वाट पहात थांबला होता. तो पळतच एस.टी. बस जवळ धडगावला जाणारा कोणी सोबती आला का ते पहायला आला होता. आमची त्याच्याशी गाठ पडल्यानंतर आम्ही तिघांनीच निघण्याची तयारी केली. मजूर लोकही असेच कामाची वाट पहात होते. एका तगड्या जवानाला आम्ही मजुरीवर घेतला. एका भल्या जाड-जूड काठीला एक भाला आणि तीन घुंगरू लावलेला दंडा त्याने हातात घेऊन तो तयारीतच होता. आम्ही तेथून निघालो. दादा दोहान पास काहे जानू पडहे तो मजूर म्हणाला पण तो काय म्हणाला. हे, कोणालाच काही कळाले नाही. तो पावला गनिक काठी आपटत होता, त्या बरोबर काठीचे घुंगरू खळखळून वाजत होते. जवळ-जवळ सात किलोमीटर चालल्यावर गोमुख लागले, तो म्हणाला प्याउ से, येथून पुढे पाणी मिळणार नाही, असे त्याने हातवारे करून सांगितले. आम्ही पोटभर पाणी पिऊन घेतले. पाणी अत्यंत मधुर होते. तो पर्यंत मजुराने चिलीम पेटवून तिचे झूरके मारून घेतले. तेथून पुढे मात्र, उंच गवत आणि लहान मोठी झाडवळ सुरू झाली. थोडपूढे गेल्यावर तर त्या अगदी दाट गवतात पाऊल वाटच गडप झाली. सूर्याची किरणे जमिनीवर येणे बंद झाले. समोर उंच टेकडी दिसू लागली. दिवसाचे तीन-साडे तीन वाजले असतील. जशी ती टेकडी जवळ येऊ लागली, तशी त्याची चालण्याची गती वाढत गेली. तो झपाझप पावले टाकू लागला, हातातली काठी जोर-जोराने आपटू लागला. 'बिगीन चालसे दादा'. तो मधेच म्हणायचा. आम्हाला चढ चढायची सवय नव्हती. आम्ही तिघेही घामाघूम झालो होतो. आम्हाला श्वास लागला होता. गवतात रस्ता दिसेना. मजरूने खुणेनेच गवताच्या शेंड्याकडे बोट दाखवून त्या शेड्यांना मारलेल्या गाठीला बघूनच चालायचे खुणवले. तो जस-जसा खुणवत होता, तसा तो तोंडानेही बोलत होताच पण त्याचे बोलणे आम्हाला समजतच नव्हते. डोक्यावरचे ओझे जीवघेणे ठरत होते, फेकून द्यावे इतके जिवावर येत होते. चालता-चालता तो एके ठिकाणी

थांबला, त्याने खाली वाकून पहाण्याची खून केली, आम्ही खाली वाकून पाहिले तो आमचे डोळेच गरगरू लागले होते. जिथून आम्ही सुरुवातीला डोंगर चढतीला सुरुवात केली होती, तीच जागा आमच्या बिलकूल खाली दिसत होती. आम्ही पूर्ण इंग्रजी एस. आकारात डोंगर चढून आलो होतो. 'ननन भावजयनू डोंगर से' मजुराने माहिती दिली. आता सूर्य मावळतीला आला होता, 'वजी-वजी चालसे' मजूर म्हणाला. सांभाळून आणि झपझप चला असे त्याला म्हणायचे असावे, कारण तो पुन्हा मोठ-मोठ्या फलांगा टाकत चालू लागला होता. आम्ही तसे तर खूप थकलो होतो. पाउलो गनिक धाप लागत होती. पण दाट झाडीचे डोंगर, जिकडे-तिकडे उंच लवलवणारे गवत, सूर्य मावळतीला आलेला, मनात एक भितीच घर करून बसली होती. म्हणून जसे होईल तसे पण त्याच्या पावलाला पाऊल मिळवून चालण्या शिवाय गत्यंतरच नव्हती. सूर्य मावळला, अंधार पडू लागला, जंगलातल्या जंगली किड्यांची कान बसवणारी किर-किराट सुरू झाली होती. त्यामुळे एका अजाण भीतीने काळीज कापायला लागले होते. आम्ही घाट उतरणीला लागून जवळ-जवळ एक तास झाला होता. लांब झाडीतून काही टिम-टिमनारे दिवे दिसू लागले. मजुराने तिकडे हात दाखवून म्हणाला 'मुक्काम'. अंधार बराच वाढला होता. त्यामुळे धक्के खात-खात आम्ही त्या खेड्यावर पोहोचलो. ३०ते ४० झोपड्यांचा तो पाडा होता. मजुराने आम्हाला मारुतीच्याच मंदिरात नेऊन पोहोचविले. आम्ही मंदिराच्या ओट्यावरच पथारी मांडली. ज्याने-त्याने आपापल्या शिदोऱ्या काढून खाल्या. मजुराने समोरच्या झोपडीतून मातीच्या मडकीत प्यायला पाणी घेऊन आला. चालून-चालून थकल्यामुळे, जो-तो आपापले पाय चोळत बसला. पाय चोळत-चोळत कोणाचे केव्हा डोळे लागले कोणालाच कळाले नाही.सकाळी मजूर कोंबड्याच्या बांगे बरोबर उठला, आम्हाला जागवले,एकाने मजुराला संडासला जायची खून केली, त्याने इशाऱ्यानेच सांगितले पुढे नदी आहे. सकाळची वेळ होती, थकल्यामुळे झोपही चांगली लागली. झोप चांगली झाल्याने थोडी तरतरी आली होती. सकाळच्या अंधूकशा उजेडात आम्ही, मजुराच्या मागे-मागे चालू लागलो. १०ते१५ मिनिटे चालून गेल्यावर बऱ्यापैकी खळ-खळ वाहानारा नाला लागला.

सुन्या जंगलात सर्वांनी प्रातर्विधी आटोपल्या. परत प्रवासाला सुरुवात झाली. मजल दर मजल चालत समोर एक उंच सपाट पठारा सारखा टेकडावर एक गाव दिसू लागला.' धडगाव आयला' मजूर म्हणाला. आम्ही गावाजवळ आलो. पूरा गाव झोपडीवजा घरांचे होते. काही सरकारी आणि दहा बारा खाजगी घरेच पक्की होती. ते धडगाव होते. गावाच्या मध्यभागी एक मोठे वडाचे झाड होते. मजूर त्या झाडाखाली आम्हाला घेऊन आला. त्याची वीस-वीस रूपये मजुरी चुकती केल्यावर तो निघून गेला. झाडा खालूनच चौफेर नजर मारली. समोरच उंच ओट्यावर पोस्ट ऑफिस दिसले. मी फागनेकर चौधरीला सांगतिले, 'चल बाबा मला तर माझे ऑफिस सापडले'. 'खरच, कुठे आहे'. त्याने विचारले. 'ते समोर' मी हाताने दाखवले. तिकडे ऑफिसच्या ओट्यावरून एक जन आमच्या कडेच पहात होता. त्याने माझ्या हाताचा इशारा कसा समजला देव जाने, पण तो ओट्यावरून खाली उतरून झपाझप आमच्याकडे येत होता. काही लक्षात येण्या आधीच त्याने विचारले 'गढरी भाऊसाहेब कोण आहे'? मी पुढे होऊन विचारले, तुम्ही कोण? 'भाऊसाहेब मी धानका, धडगावचा पोस्टमन, तुमचे सामान घ्यायला आलो'. तो म्हणाला. पण माझे सामान मी आणतो तू चल पुढे'. 'अहो नाही साहेब, मग तर माझी खैर नाही, कूसूंब्याहून कालच पठाण साहेबांचा फोन होता. गढरी भाऊ साहेबांची सोय चांगली लावा आणि तसे त्यांना फोनवर कळवा. धानका जरा मोकळे पणाने बोलला. 'बर मग माझे कामच करायचे तर या भाऊसाहेबांना, बी.डी.ओ. ऑफिसला पाहोचून द्या'. मी त्याला म्हणालो.'बर साहेब' असे सांगून तो चौधरीला त्याच्या ऑफिसात सोडून आला. इकडे मी माझे सामान घेऊन पोस्ट ऑफिसच्या ओट्यावर ठेवले आणि आत शिरू लागलो,'कोण पाहिजे तूम्हाला'? शिपायाने विचारले. 'मला मास्तर साहेबांना भेटायचे आहे'. मी म्हणालो. 'का काय काम आहे', त्याने परत विचारले. 'अरे काम काय आहे ते त्यांना सांगतो' मी म्हणालो. 'अरे धानका कोणासी बोलतो आहेस रे', मास्तरांनी खोलीतून विचारले. 'धानका बाहेर गेला आहे नाना, तुम्हाला कोणी तरी भेटायचे सांगत आहे', शिपाई म्हणाला. मास्तर लगेच बाहेर आले.'कोण तुम्ही, कोण पाहिजे'? त्यांनी विचारले. 'मी जी. बी. गढरी'.

‘अरे तुम्ही गढरी का, तूम्ही आलात होय’? खूष होत मास्तर म्हणाले. आत या!, तुम्ही पहिले सरकारी कर्मचारी आहेत, जे बदलीची आर्डर मिळताच लगेच दहा दिवसाच्या आत रुजू व्हायला आले. ज्याची धडगावला बदली होते तो कमीत-कमी महिनाभर तरी कामावर हजर व्हायला येत नाही. का येत नाही हे तूम्हाला रस्त्याने येतांना बऱ्याच अंशी लक्षात येऊन गेले असेलच’. न थांबता मास्तर बोलतच होते. अर्थात ते मी आल्यामुळे खूष होते. ‘किती सर्व्हिस झाली तुमची?’ त्यांनी विचारले. सव्वा वर्ष मी म्हणालो. ‘बस? तरी आले? धडगावच्या भीतीने किती तरी नवीन-नवीन नोकरीला लागलेल्या पोरांनी नोकरी सोडून दिली आहे’,ते म्हणाले. ‘एकदा नोकरी पत्करली म्हणजे, जिथे दिले तिथे जायला पाहिजे’. मी म्हणालो. ‘हे मात्र पटले’ मास्तर म्हणाले. ‘बर चला बसा, तुमचा रुजू रिपोर्ट करून घेऊ, अरे धानका यांना घरातून प्यायला पाणी आण बर’. असे म्हणत त्यांनी चार्ज रिपोर्ट बनवले. तुम्ही कुठले त्यांनी विचारले. ‘कुसूंब्याचे’ मी म्हणालो. ‘अरे वा इथे कूसूंब्याचे आणखी पोर आहेत. बर,धानका ते परदेशी गुरुजी आहेत ना त्यांना बोलावून आणशील’ ते म्हणाले. ‘हो नाना म्हणून तो लगेच निघून गेला’. ‘अरे गिरीश बेटा अंकलला जरा चहा ठेवा, बघा आता मदतीला नवीन मास्तर आले आहेत’, त्यांनी घरात जाऊन सांगितले. मला त्यांचा स्वभाव फार आवडला होता. दहा मिनिटांनी ते चहा घेऊन बाहेर आले. ‘बर का मी जुन्या धुळ्यात रहातो’ ते म्हणाले. ‘असं, मी ही जुन्या धुळ्यात मित्राकडे रहात होतो’, मी म्हणालो. ‘कुठे त्यांनी विचारले. ‘पाटावर, पाटगल्लीत’ मी उत्तर दिले. ‘बर’ ते म्हणाले. तेवढ्यात बाहेर धानका परदेशी गूरूजींना घेऊन आले. मला पाहिल्या बरोबर ते म्हणाले ‘अरे गोविंदा तू इथे?’, ‘हो इथे बदली झाली.’ ‘अरे पण तू तर ॲग्रो असिस्टंट झाला होता ना?’ ती पण नोकरी सोडली का? त्याने विचारले. ते मला चार वर्षे सिनीयर होते. पण त्या काळात कुसूंब्यातील, पहिली पासून ते अकरावी पर्यंतचे सारेच पोर मला नावानिशी ओळखत होते. कारण, मी पूर्ण शाळेत दर वर्षी पहिला येणारा विद्यार्थी होतो. ‘पण तुम्ही दोन्ही नोकऱ्या का सोडल्या’? मास्तरांनी विचारले. ‘त्याचे काय आहे. मास्तर साहेब मला काम सोडून कोणाची पुढे-पुढे करणे आणि विनाकारण

तोलंबाजी करणे अजिबात आवडत नाही. त्या दोन्ही नोकऱ्या मुंबई सरकारच्या होत्या. तेथे सरकारी ऑफिसर आणि खासगी पुढारी यांचाच जास्त बोलबाला होता. काम कमी करा, पण त्यांची तोलंबाजीच जास्त होती. मला ते पटले नाही. म्हणून, मी त्या नोकऱ्याच सोडून दिल्या. तशी नोकरी करण्यापेक्षा एकाच मालकाचे समाधान करून सालदारी केलेली बरी'. मी गुरुजी आणि मास्तर दोघांच्या प्रश्नाचे उत्तर देऊन टाकले.' हे कसे दिल्ली सरकार आहे. याच्यात कामाच्या पलीकडे कोणाला कोणाची काही पडलेली नाही. चोख काम करा आणि मानापानाने राहा. म्हणून, मी ही नोकरी धरली'. मी म्हणालो. 'नाना हे कुसूंब्यातील, अत्यंत गरीब कुटुंबातील, पण साऱ्या गावाची आवडती व्यक्ती', गुरुजी म्हणाले, 'बरं मग गोविंद सामान माझ्या खोलीवरच घेऊन येशील. मी खोलीवरच राहीन', गुरुजी म्हणाले आणि खोलीवर परत गेले. अगदी हिळी मिळीनेच आमचे त्या दिवसापासून काम सुरू झाले. अगदी दीड वर्षाचा काळ कसा निघून गेला पत्ताच लागला नाही. कधी नव्हे तो त्या वर्षी मामलेतदार साहेब आणि रेंजर साहेबांनी मिळून पंधरा ऑगष्टला कुस्त्यांची दंगल ठेवली. धडगाव हे तालुक्याचे गाव होते. पण गावात स्थानिक लोकांची वस्ती शे-दीडशे ही नव्हती, सारी वस्ती सरकारी नोकरांचीच होती. ते तेथे राहून खेड्या-पाड्याला जाऊन-येऊन नोकरी पार पाडत होते. म्हणून त्या कार्यक्रमाला सारा स्टाफ, खेड्यापाड्यावरचे आणि स्थानिक गावकरीही हजर होते. कारण तेथील रहिवाशांनी कुस्ती हा प्रकार कधी पाहिलाच नव्हता. सुरुवातीच्या लहान मोठ्या कुस्त्या झाल्या, पटांगणात एखाद दुसरीच कुस्ती लागत होती म्हणून कार्यक्रम संपवण्याचीच तयारी चालली होती, पांडुरंग तात्या म्हणजे परदेशी गुरुजी यांना, मी फार गाजलेला पहिलवान आहे, हे चांगले माहीत होते. ते शिक्षणाधिकारीकडे जाऊन त्यांच्या कानात काहीतरी सांगून, माझ्याशेजारी येऊन उभे राहिले. बराच वेळ फडात कुस्तीला कोणी पहिलवानच आला नाही म्हणून कार्यक्रमाचा शेवटच होणार असे सर्वांना वाटले, काहीतर उठून उभेही राहिले. तेवढ्यात शिक्षण अधिकारी साहेब खुर्चीवरून उठून माझ्याजवळ आले, माझा हात पकडून मला उभे करत म्हणाले, 'हे कूसूंबेकर साऱ्या कूसूंबा परिसरात कुस्ती खेळलेले नामांकित

मल्ल आहेत, शिक्षण खात्यातर्फे त्यांच्यावर दोनसे एक्कावन्न रुपयांचे बक्षीस ठेवतो. इच्छुक मल्लाने फडात यावे. दहा मिनिटात जर कोणी आले नाही तर त्यांना विजयी घोषित केले जाईल', असे सांगून ते माझ्या शेजारीच उभे राहिले. बघ्यांच्या एका कोपऱ्यातून गलका सुरू झाला, फागन्याचे चौधरी यांना, त्यांच्या कार्यालयातील स्टाफ पुढे रेटत होता. चौधरी तसा अंगा पिंडाने कसलेल्या शरीराचा होता. हो ना करता-करता ते तयार झाले. तयार होऊन आम्ही दोघे रिंगणात आलो. साऱ्या फडात एकच गलका आणि शिट्ट्या वाजवणे सुरू झाले. आम्ही दोघे सलामी घ्यायला झुकलो, सलामी फिरकीतच बगली मारून मी त्याच्या जांघेत हात घालून छाती इतके उंच उचलले, 'अरे भाऊसाहेब खाली आपटू नका, हात पाय मोडून टाकाल', आपटी खाण्याच्या भीतीने, 'तुम्हीच जिंकलात', मी अलगद पणे त्यांना जमिनीवर ठेवले. कारण मी कोणता पेच मारून त्याला उचलले, हे तो समजून गेला होता. आणि त्या पेचात तेच अपेक्षीत असते. ते दृश्य पाहून सारा फड भाऊसाहेबांचा विजय असो असे ओरडू लागला. चौधरीने वाकून हस्तांदोलन घेऊन, माझा हात उंच करून मला विजयी घोषित केले. तिकडे आमच्या पोस्टमास्तर साहेबांना, लोकांनी खांद्यावर घेऊन त्यांना साऱ्या फडात मिरवत होते. जोशी नानांनी त्यांच्या आयुष्यात एवढा सन्मान कुठे अनुभवला नव्हता. तो कार्यक्रम संपल्या नंतर दहा पंधरा लोकांचा चमू आमच्या बरोबर पोस्ट आफिसात आला. बक्षिसाच्या रकमेतून मी सगळ्यांना चहा पाणी केला. त्या दिवशी नाना एकदम खुशीतच होते. त्या नंतर मात्र जोशी नाना जास्त दिवस राहिले नाही, त्यांची तेथून बदली झाली. मी ही दहा पंधरा दिवसा नंतर मोर्सच्या म्हणजे तार मास्तरच्या कोर्ससाठीच्या डिक्टेशन टेस्टला धुळ्याला आलो. तिचा निकाल पंधरा दिवसातच आला. मी ती टेस्ट पास झालो आणि नऊ महिन्यांसाठी टेलीग्राफ ट्रेनिंग साठी पुण्याला आलो. त्या टेस्ट मधे मी एकटाच पास झालो होतो. कोर्स पुणे स्टेशनला मोलेदिना हॉलमधे होता. आमच्या क्लासचे बरेच पोर रास्ता पेठेतल्या समाधान इच्छा भोजनालय लॉजमधे राहात होते. मीही तेथेच राहिलो. रास्तापेठ ते मोलेदिना हॉल मी पायीच ये-जा करायचो.



# अपघात

एके दिवशी क्लास करून लॉजला जात असतांना नरपतगिर पोलीस चौकी जवळ चौफुलीचा एक मोठा चौक आहे. त्या चौकात स्टेशनकडे जाणाऱ्या सिटी बसेस वळण घ्यायच्या. मी त्या चौकातून जात असतांना एक बस वळण घेतांना तिचा ड्रायव्हरच्या हातातला ड्रायव्हिंग व्हील तुटला. एसटीची दिशा बदलली होती, ती सरळ रोडवर न जाता फुटपाथकडेच येत होती, ती पूर्ण वेगात होती. ती इतक्या झपाट्याने माझ्या अंगावर येत होती की मला मागे पुढे कोणत्याच दिशेला पळता आले नाही. तिच्या धडकेने मी जोराणे सरळ फुटबॉलसारखा मागे फेकला गेलो आणि बस सरळ पुढे फुटपाथला लागून असलेल्या दुकानांना चेंदून दहा-बारा फूट पुढे जाऊन तिची तिची थांबली. इकडे मी मात्र जसा उधळलो तो लांब जाऊन फुटपाथच्या किनाऱ्यावर आदळलो. माझे डोके त्या कनोऱ्यावर आदळल्यामुळे डोक्याची कवटी मध्येच दुभंगली होती. मला मार लागल्याची झाम होती. कानाखालून, खांद्यावरून, पाठीवरून आणि पोटावरून भळा-भळा रक्त वहात येऊन जमिनीवर येत होते. जशी गाडी फुटपाथला लागून असलेल्या कांक्रीटचे बांधकाम असलेल्या दुकानावर आदळली, त्याच्या आवाजाचा इतका मोठा स्फोट झाला की, आजूबाजूच्या लांब-लांबून बघे गोळा झाले. सारी गर्दी गाडीला पहात होते. पण माझ्याकडे कोणाचेच लक्ष नव्हते. अर्धवट शुद्धीत असून सुद्धा मी रिक्षावाल्याकडे हात उचलल्याचेच मला थोडे-थोडे भान होते. जेव्हा थोडी

शुद्ध आली तेव्हा मी आपरेशन थिएटरमधे होतो. डोके फुटल्याने वाहानारे रक्त केसातून वहात होते, त्यातले बरेचसे रक्त डोक्यातच गोठून कडक झाले होते. आपरेशन करावे लागणार असल्याने, डॉक्टर ते केस कापत असतांना खूप वेदना होत होत्या, त्यामुळे मी पूर्ण शूध्दीवर आलो होतो. आणि होणाऱ्या वेदनामूळे मी स्थिर राहू शकत नव्हतो, अरे बाबा बिलकूल हलू नको, डॉक्टर परत-परत मला बजावत होते. पण वेदना फारच असह्य होत्या, डोके इकडून-तिकडे चाळवणे चालूच होते. शेवटी डॉक्टरांनी मला बजावून सांगितले, 'हे पहा तुमच्या डोक्याची कवटी फुटली असून, फक्त एक दीड सेंटिमीटरचाच टच राहिला आहे. ते फुटलेले दोन्ही भाग आम्ही चिमट्यांनी अटकवून ठेवले आहेत. तोही जर तुटला तर मग देवच तुमचा वाली,आम्ही काहीच करू शकणार नाही, तुम्हाला त्रास होतो आहे, हे आम्हाला माहीत नाही असे तूम्हाला वाटते का? नाही ना, तर मग बिलकूल शांत राहून, आम्हाला मदत करा'. मी सारे समजलो. परत मला भूलच्या इंजेक्शनने भोवळ आली,आणि मी बेशुद्धच पडलो. रात्री जेव्हा मी शुद्धीवर आलो, तेव्हा माझ्याशेजारी क्लास टिचर परांजपे मॅडम बसल्या होत्या. मी त्यांना हात जोडून नमस्कार म्हणायचा प्रयत्न केला पण अशक्तपणामुळे तोंडातून आवाजच निघाला नाही. त्यांनी इशारा करून मला गप्पच रहायला सांगितले. पण लगेच मला परत ग्लानी आली. एकदम निर्जीवसारखा शांत पडलो. नंतर जेव्हा मला शुद्ध आली, तेव्हा दुसऱ्या दिवसाचे दहा वाजले असतील. तेव्हा माझ्याशेजारी नाशिक भागाचे श्री. फड बसले होते. त्याची आणि माझी पोस्ट खात्यात एकाच मेमोने नेमणूक झालेली होती. अर्थात त्याने ही ओळख सांगितली, तेव्हाच मलाही ते माहीत झाले. तसा तो ही माझ्या बरोबरच ट्रेनिंगला होता. 'घाबरू नकोस, आता मी तुला मदतीला आलो आहे. 'धन्यवाद मित्रा', 'आता हे सारे घरी कळवावे लागेल' तो मला म्हणाला. 'कोणी तरी आई म्हणा किंवा वडील म्हणा, तुझ्या जवळ एक जण तर लागेलच'. 'अरे, आता मी माझा सांभाळून घेईन, मी दोन महिन्याचा असतानाच वडील वारले आहेत, दोन भाऊ सालदारी करतात, तीनही जन अडाणी आहेत. आईही मोल मजुरीच करते. मी त्यांना पत्र पाठवून देईन, पण सध्या मला जरा बरा होऊ दे', मी

त्याला समजावून सांगितले. 'अरे पण किती भयंकर मार लागला आहे? डोक्याच्या कवटीचे सरळ दोन भाग झालेले आहेत, कसे काय झाले हे सगळे?' त्याने विचारले. मी त्याला घडलेला सारा प्रसंग सांगितला. 'म्हणजे तो रिक्षावाला तर देवच म्हणावा. कारण  बऱ्याचवेळा अशा भानगडीत कोणी पडत नाही. कारण मदत केल्याचे, चांगले काम केल्याचे श्रेय मिळणे तर दूरच पण, पोलीस खात्यात आणि पुढे कोर्टात फेऱ्या माराव्या लागतात ते वेगळेच आणि नको त्या चौकश्यांचा ससेमिरा मागे लागून जातो. बर जाऊ दे ते. तुझ्या जवळ खर्चायला पैसे आहेत का देऊ'? 'डॉक्टरांनी किती बिल सांगितले आहे? त्याने विचारले. 'अजून तर कोणीच काहीच सांगितले ही नाही आणि काही मागितले ही नाही', मी म्हणालो. 'पण ज्यावेळी तुला सोडतील, त्यावेळी तर बिल द्यावेच लागेल ना. तो म्हणाला. 'कारण तुझे खूप रक्त गेले आहे म्हणे, त्यामुळे तुला रक्ताची खूप गरज होती', पण नर्स म्हणाली, 'तीनचार दिवसापूर्वीच एका सामाजिक संस्थेने जवळ-जवळ पन्नास बाटल्या रक्त डोनेट करून गेली आहे. ते फक्त गरीब आणि असहाय गरजूंनाच मोफत पुरवण्यासाठी असते, तेच तुमच्या पेशंटच्या कामी आले. सध्या गोळ्या, औषधी, इंजेक्शन हा सारा खर्च दवाखाना करतो आहे, मी म्हणालो. 'बर चल आता जास्त बोलू नकोस. आता आराम कर', तो म्हणाला. थोडावेळ थांबून तो क्लासला निघून गेला. दुपारच्या राउंडला डॉक्टर आले, 'कसे आहात आता'? त्यांनी विचारले. 'नॉरमल' मी म्हणालो. डॉक्टरांनी जवळ येऊन डोक्याला हात लावला, डाव्या बाजूला बोटांनी हळू-हळू टिचक्या मारून पाहिल्या, आणि विचारले 'दूखतय'?' होय साहेब, मार लागलेला भाग दुखतोच आहे', मी उत्तर दिले. 'तुमचे कोणी नातेवाईक पुण्यात आहे',त्यांनी विचारले. 'नाही,पण माझा एक वर्गमित्र त्याच्या आई-वडिलांसह राहातो', मी म्हणालो. 'पत्ता माहीत आहे,' त्यांनी विचारले. 'रेंजहिल कॉलनी, गणेशखिंड, एवढेच माहीत आहे, मी पुण्यात एकदम नवीन आहे, पहिल्यांदाच आलो आहे. म्हणून त्यांच्याकडे कधी जायचाही प्रयत्न केला नाही', मी म्हणालो. 'ओ.के'. म्हणत डॉक्टर पुढे निघून गेले. तेवढ्यात फड परत आला. फड आल्याचे पाहून त्यांनी फडला जवळ बोलावून सांगितले, 'बघा

त्यांना इतका जबरदस्त मार लागला आहे, त्यांच्या डोक्याची कवटी फुटून आतला मेंदू दिसायचा, मेंदूची स्थिती व्यवस्थित आहे. दोन-चार दिवसानंतर त्यांना डिसचार्ज देऊन टाकू'. 'पण डॉक्टर साहेब दवाखान्याच्या बिलाचे काय'? फडने विचारले 'हा मूनिसीपालीटीचा दवाखाना आहे, याचा ॲक्सिडंट मूनिसीपालीटीच्या सिटी बसने केला आहे. म्हणून यांचा सारा खर्च मूनिसीपालीटीच करते आहे. आणि डिसचार्ज केल्या नंतरचाही दवाखान्याचा खर्च तीच करेल'. डॉक्टर म्हणाले. नंतर फड माझ्याजवळ आला आणि म्हणाला. 'अरे गोविंदा तुझा सारा खर्च तर मूनिसीपालटीच करते आहे,आणि डिसचार्ज दिल्यानंतरच्या उपचाराचाही खर्च तीच करणार आहे'. 'काय म्हणतो खरच'? मी विचारले. 'हो मला बोलावून डॉक्टरांनीच हे सारे सांगतले'. 'ही सूध्द्‌ा परमेश्वराचीच इच्छा म्हणावी नाही का'? मी म्हणालो. ट्रेनिंग संपले, मी आणि नासिकचे जोशी पंचेचाळीसच्या स्पिडसह पास झालो परत मला माझ्या मूळच्या ठिकाणी म्हणजे धडगावला रुजू व्हावे लागले.



# पदोन्नती

दरम्यान मे १९६८ मधे लग्न झाले. लग्ना नंतर परत धडगावला गेलो. पण आठवडा भरातच मला माझ्या गावी, म्हणजे कूसूंब्याला पोस्ट मास्तर म्हणून रुजू व्हायचा आदेश आला. तेथे मी साडे तीन वर्षे काम केले. तेथून माझी बदली धुळे प्रधान डाक घराला झाली. तेथे मी तीन ते चारच महिने काम केले. मग तेथून माझी बदली फागन्याला पोस्ट मास्तर म्हणून झाली. आता पर्यंत खात्यात माझी पाच वर्षे सेवा झाली होती. त्यामुळे मला खात्यातल्या निरनिराळ्या परीक्षांना बसायची परवानगी मिळू लागली होती. एका नंतर एक, मी अकाउटंची आणि रेडिओ लायसेंस इंस्पेक्टरच्या परीक्षा दिल्या. मी दोन्ही परीक्षा पास झालो. मला लगेच रेडिओ इंसपेक्टरची आर्डर मिळाली. मी रेडिओ लायसंस इंस्पेक्टर म्हणून काम करू लागलो. नंतर मी खात्यातील पोस्टल इंस्पेक्टरच्या परीक्षेला बसलो. दिवसभर दर-दर भटकायची रेडिओ लायसेंस इन्सपेक्टरची ड्युटी केल्या नंतर मी रात्रीच्या रात्री जागून अभ्यास करायचो. घरोघर जाऊन जेथे रेडीओ दिसेल, तेथे त्याचे लायसेंस तपासण्यासाठी मागायचे, जर लायसेंस नाही दाखवले तर त्याला दंड भरून लायसेंस काढायला लावायचे, जर तरी त्याने ते नाही काढले, तर त्याच्या विरुद्धच कोर्टात केस टाकायची. हे फार किचकिचीचे काम होते. जास्तीत जास्त मुजोर आणि टपोऱ्या लोकांशीच जास्त संबंध यायचा. महिन्यातून कमीत-कमी बिन लायसेंसचे तीस रेडिओ तरी शोधून काढायची मर्यादा होती. हीच जास्त कठीण गोष्ट

होती. ती अट पूर्ण करण्यासाठी खूप शोधा-शोध आणि फिर-फिर करावी लागायची. मी जितके दिवस ती ड्युटी केली, दर महिन्याला ठराविक कोटा पुराच केला. दिलेल्या कोट्यापेक्षा एकदोन केसेस तरी माझ्या जास्तच असायच्या. बऱ्याच वेळा, वाईट अनुभवही यायचे. कारण हे काम करतांना एकट्या-दुकट्याला फिरावे लागायचे. त्यातल्या-त्यात धुळे, साक्री, शिंदखेडा, शिरपूर तालुक्यातील प्रत्येक खेडे-पाडे आणि गावे वर्षातून एकदा तरी भेट दिलीच पाहिजे, जे लायसेंन्स एकदा तपासले गेले आहे. ते, त्याच वर्षात दुसऱ्यांदा तपासायला नको. अशा अत्यंत खडतर अटी पूर्ण करून ते काम सांभाळावे लागत होते. पूर्ण भाग खेड्या पाड्यांचाच होता. त्यामुळे, एकदम सकाळीच घराबाहेर पडावे लागे. कारण सकाळीच बहुतेक कामे होत असत, माझा सारा परिसर हा ग्रामीण भागाचा होता. ग्रामीण भागातली मंडळी सकाळीच कामावर निघून जातात, साधारण साडेदहा अकरा वाजे नंतर गावात कोणीच सापडत नसत. नंतर संध्याकाळच्या पाच वाजेनंतर थोडे लोक कामावरून घरी परत येतात, तेव्हा थोडफार काम व्हायचे,पण धावपळ करून मी ते दरमहा साध्य करूनच घ्यायचो. जसा वेळ मिळत गेला तसा मी पोष्टल इंन्सपेक्टरच्या परीक्षेचा अभ्यास करायचो. इकडे इंन्सपेक्टरच्या परीक्षेच्या तयारीसाठीही वेळ अपुरा पडायचा. दिवसभर भटकंती करून खूप थकणे होऊन जायचे. त्यामुळे अभ्यासात लक्ष लागत नसे. दिवसभर फिरून थकून आल्यावर दोन लहान मुले अवती-भवती अंगाखांद्यावर खेळायची. हातात अभ्यासाचे पुस्तक, एक मुलगा मांडीवर,दुसरा झोळीत अशा अवस्थेतही अभ्यास करावा लागत होता. माझे शिक्षण अकरावी पास, परीक्षेचा अभ्यास पुर्ण इंग्रजीत, आंतरराष्ट्रीय लेव्हलचे सामान्य ज्ञाना पासून इंडियन पिनल कोड, क्रिमिनल प्रोसीजर कोड, इंडियन इवीडंस ॲक्ट, हिंदू कायदा, खात्याचे सारे काम-काजावरचे कायदेशीर पुस्तके, सेवा व वर्तवणूकीचे कानुन कायदे अशा स्वरूपाचा इंन्सपेक्टरच्या परीक्षेचा अभ्याक्रम होता. परीक्षेला सर्व भारतातून पोर बसतात, त्यात कोणी बी.ए., कोणी बी.एस.सी., कोणी एम. अे., कोणी एल.एल.बी. पास असतात. मी पहिल्यांदाच परीक्षा दिली. मी पाचशे पैकी तीनशे चौपन्न मार्क मिळवून पास झालो. पण, अखिल भारतीय पातळीवरचे मेरीट तीनशे छप्पन्न वर बंद

झाले. माझ्याबरोबर परीक्षेला बसलेला मला सिनीयर उत्तम राखीव कोट्यातून पास झाला. एक आठवडा मन कशातच लागत नव्हते. कारण, आयुष्यात पहिल्यांदाच निराशा काय असते, ते अनुभवायला मिळाले होते. प्रयत्न केले पण थोड-अपुरे पडले. त्यामुळे एक मात्र झाले, मी कोण आहे हे जाणून किंवा ओळख करून घ्यायची साऱ्या डिव्हीजनमधे एक हलकीशी लहर आली, तो पर्यंत गढरी कोण हे जवळ-जवळ ऐंशी टक्के कर्मचाऱ्यांनाच माहीत नव्हते. मी घरात सांगितले इंन्सपेक्टरच्या परीक्षेत मी पास झालो. पण मेरीट मिळाले नाही. त्यांचा चेहरा एकदम उतरला. मी ऑफिसात जाऊन बघतो जरा असे सांगून मी घरा बाहेर पडलो. ऑफिसात शिरताच बरोबरीचे सर्व भोवती गोळा झाले. 'अरे वेड्या थोडक्यात गेलास, केवळ दोन मार्कांसाठी नाहीतर, मेरीटच होते. तू एकाहत्तर टक्के मार्क मिळवले, तुझे हार्दिक अभिनंदन. तुला इतके टक्के मार्क मिळालेत याच्यावर कोणाचाच भरोसा बसत नाही. अखिल भारतीय पातळीवरील मेरीट एकाहत्तर पॉइंट दोनवर क्लोज झाला आहे, तुला सत्तर मार्क पडले आहेत,तरी तुझा पहिलाच चान्स आहे.' एवढी चर्चा केल्या नंतर सारे जण आपापल्या कामाला लागून गेले. 'नमस्ते रावसाहेब' असे म्हणत मी पोस्ट मास्तरांच्या केबीनमधे गेलो. 'अरे, ये गढरी', सहायक पोस्टमास्टर निफाडकर अप्पा म्हणाले. आज त्यांच्या कडे पोस्टमास्तरांचा चार्ज होता. 'तुझे मना पासून अभिनंदन, अरे तू तर खूप मोठी झेप मारलीस, हेड ऑफिसवाले आणि विभागीय ऑफिसचे कर्मचारी सूध्दा चक्रावून गेले आहेत, जे तीन-चार वेळा परीक्षेला बसलेत ते, कशात काही नसतानाही जणू ते इंन्सपेक्टरच झालेत या रुबाबात वावरतात, पण हो, मी रिटायर होण्याआधी इंन्सपेक्टर झालास तर, मी अभिमानाने सांगेल, बघा माझे भाकीत खरे ठरले. थोडा जास्त अभ्यास करावा लागेल एव्हढे मात्र खरे' नाना मला प्रोत्साहनपर बोलले. 'नक्कीच नाना, हा मी माझा शब्द तूम्हाला दिला. तुमच्या सारख्यांच्या सदिच्छांची शिदोरी पाठीशी असली तर, काय अशक्य आहे? 'अरे ती तर आहेच आणि तसे म्हणशील तर, मागे एकदा घाडगे साहेब एस. पी. असतांना, मी त्यांच्या केबीनमधे गेलो होतो. त्यांच्या साऱ्या टेबलभर फायली पडलेल्या होत्या, पण ते फायली न काढता 'प्रसन्नप्रभा' हे मासिक वाचत बसले होते,

मला खूप आश्‍चर्य वाटले होते की, हे साहेब कामाच्यावेळी कधी कोणतेच पुस्तक वाचत नाहीत, कामाची पेंडंसी त्यांनी कधी खपवून घेतली नाही, तरी आज साऱ्या फायली सोडून ते पुस्तक वाचत कसे काय बसले'?. मला आलेला पाहून ते मला म्हणाले होते 'निफाडकर पाचच मिनिटे थांबा, कथेचा शेवट वाचतो आहे'. मी थांबलोच होतो. त्यांचे वाचून झाल्यावर, ते मासिक माझ्या हातात देत म्हणाले, 'या मासीकेत आपल्या एका कर्मचाऱ्याने लिहिलेली कथा आहे, ती तुम्हीही वाचा, तो आता धडगावला क्लार्क आहे, मी तेथे इंन्सपेक्शन साठी गेलो असतांना मुक्काम घडला. तेव्हा तेथला एस.पी.एम. म्हणाला होता, रावसाहेब रात्रीच्या टाइमपास साठी हा जो आपला क्लार्क गढरी आहेना याने लिहिलेली एक कथा यात आहे, ती वाचून बघा'. माझी इच्छा नसतांना मी ते घेतले होते, 'नाही तर त्या भयंकर पहाडी भागात रात्री झोप येईल याची खात्री नव्हती, म्हणून जेव्हा थकल्या सारखे वाटू लागले, तेव्हा मी ते हातात घेऊन वाचायला लागलो, पण एकदा जी ती कथा वाचायला सुरुवात केली, ती संपल्या शिवाय मी ते हाता वेगळे करूच शकलो नाही. आमची ऑफिस कामाबद्दल चर्चा संपल्या नंतर, मी माझ्या केबीन मधे परत आलो. मी परतत असतांना 'त्याच दिवशी मधल्या टिफिन खायच्यावेळी, सारे जन टिफिन खायला गेले, माझा उपवास होता. म्हणून, मी ती कथा वाचत बसलो. वाचता वाचताच माझ्या डोळ्यातून सारखे पाणी वहात होते. मी तुला कधी पाहिले नव्हते. कारण धडगावहून तू सरळ पुण्याला ट्रेनिंगला गेला. तिथून कूसूंबा, मधला चार-पाच वर्षांचा काळ निघून गेला. तशातच डोक्यातून साऱ्या गोष्टी निघून गेल्या. आता जरी तू हेड ऑफिसला आहे, तरी तू कधीच मला ऑफिसात भेटला नाही. सारखा भ्रमंतीवरच असतोस. आता तुझ्याशी गाठ पडली'. मी परत तिथून कागद पत्रांच्या फायली घेऊन कामावर बाहेर पडलो. संध्याकाळी घरी आल्यावर दिवस भरातल्या साऱ्या घडामोडी मिसेसला सांगितल्या. पुढच्या वर्षी परत इंन्सपेक्टरची परीक्षा निघाली. मी परत परीक्षेला बसलो. भाड्याचे घर खूप छोटे होते. अवती-भवती लहान मुले असायचे, म्हणून अभ्यासात लक्ष लागत नव्हते. मी कूसूंब्याला पोस्ट मास्तर असतांना, तिथे व्हीक्टर भाई म्हणून व्हेटरनरी डॉक्टर होते. ते नेहमी

पोष्टात यायचे म्हणून आमची चांगली मैत्री जमली होती. ते धुळ्याच्या देवपुर मधील सुवार्ता मेमोरियल चर्चच्या कंपौडमधे राहायचे. त्यांची आधी, नंतर माझी ही कूसूंब्याहून बदली झाली. अधून-मधून आमच्या भेटी होत राहायच्या. 'यावेळी अभ्यासात कसर राहू देऊ नका'. एके दिवशी मिसेस म्हणाली. घरी मुलांमुळे अभ्यास होत नाही. तुम्ही आता जवळपासच्या जंगलात एखादे झाड पाहून, त्याच्यावर बसून अभ्यास करायला काय हरकत आहे'?, मिसेस म्हणाली. तिने असे सांगताच मला एकदम भाई डॉक्टरांची आठवण झाली. त्याच दिवशी संध्याकाळी मी देवपूरमधे भाई डॉक्टरांच्या घरी गेलो.' भाई आहेत का'? मी अंगणातूनच विचारले. 'कोण'? घरातून बाहेर येत त्यांनी विचारले. 'अरे मास्तर साहेब तुम्ही आणि या वेळेला? इतक्या दिवसांनी? काही विशेष'? मला समोर पहाताच त्यांनी प्रश्न केले. 'होते थोड काम'आणि त्यांना माझी अडचण सांगितली. 'बघू म्हंटल झाली तर झाली थोडी मदत'. मी म्हणालो.' काम असेल तर हर प्रकारे होईल, एवढे तरी मित्रासाठी करीनच. पण आधी घरात तर या. जरा बसूनच बोलू ना'. त्यांनी हात पकडून मला घरात नेले. समोर त्यांची आई बसली होती. मी लगेच त्यांच्या पाया पडलो. 'आई मी कूसूंब्याला होतो, तेव्हा तिथे हेच पोष्ट मास्तर होते', भाईने आईला माझी ओळख करून दिली. 'वहिनी नमस्ते, ओळखले का'? मी भाईच्या मिसेसला विचारले. 'नाही बुवा मी तूम्हाला तर नाही ओळखत, पण कूसूंब्याच्या शांताताईंना मात्र चांगलीच ओळखते'. त्या हसून म्हणाल्या.'कशा आहेत आमच्या ताई'? त्यांनी विचारले.' दिवसभर दोन भूत सांभाळत बेजार होतात', मी म्हणालो. 'बर-बर मी विचारण्या आधीच प्रगती सांगून टाकली. पहिल्या भुताच्या वेळी घरीच बनवलेले पेढे मिळाले होते, दुसऱ्याची खबरही नाही मिळाली', वहिनी लटक्या रागात म्हणाल्या. 'बर झाल निमित्त काही का असेना पण आमची आठवण तर आली, नाही तर कधी यायला बसले आमच्या कडे, काय मणी मांजर आजारी, कुत्रा आजारी या शिवाय दुसरी काय मदत मागणार, गाई, म्हशी तर तुमच्या कडे नाहीतच ना' वहिनी म्हणाल्या. मधेच चर्चमधे गेलेले भाई परत आले. 'चर्च बंद करायचे होते.म्हणून, तुमची विचारपूस न करताच निघून गेलो होतो'. भाई दिलगिरीच्या सुरात म्हणाले.

'तसे काही नाही भाई,नाहीतरी साठ टक्के विचारपूसतर वहिनींनी करूनच घेतली आहे' मी म्हणालो. 'बोला मास्तर कामागरजेच येणे झाले म्हणायचे,मग सांगा काय काम आहे ते आणि त्यात मी तूम्हाला काय मदत करू शकतो'? भाईंनी विचारले. 'बोल बाबा,बोलून घे,इतका राग की त्रयस्था सारखा केव्हाचा नुसता मास्तर-मास्तर करतो आहे, वहिनींचे तर ठीक आहे. पण,तूही त्याच वाटेला,ठीक आहे. कामासाठीच आलो. ही माझी चूकच आहे',मी हारते घेत म्हणालो. मग मी त्याला माझ्या परीक्षेबद्दल सांगितले, ते ऐकून त्या दोघांना खूप वाईट वाटले. 'केवळ पॉइंट चार करता तुझे मेरीट हुकले, तुझे मोठे नुकसान झाले. बोल मग मी यात काय मदत करू'? भाईंनी विचारले. मग मी सांगितले 'अरे माझी खोली फार लहान आहे, एक स्वयंपाक घर आणि त्याला जोडून एक हाल बस, मला तिच्यात अभ्यासाला अडचण येते आहे. आता अभ्याससाठी मी एक महिन्याची रजा घेत आहे, पण अभ्यासाला एकांत अशी जागा भेटत नाही, म्हणून म्हटल या कंपाउंडमधे, हा जो मोठा वडाचा झाड आहे किंवा लांबच्या कोपऱ्यातल्या एखाद्या झाडाखाली बसून मी अभ्यास करू शकतो का याचा तपास करण्यासाठी मी आलो आहे',मी विनवणी वजा त्याला विचारले. 'चर्च जर परवानगी देईल तर मी उद्यापासूनच येतो. तस पाहिजेच अस काही नाही,मी नकाने तलावाचाही विचार करतो आहे,पण हे झाले तर जंगलात जाण्या ऐवजी, वस्तीत राहीन एवढेच'. मी भीत-भितच त्याला सांगितले. 'अरे बस एवढेसे काम,आणि त्याच्या साठीही एवढी विनंती आणि परकेपण, अरे हा अर्धा चर्च तुझ्यासाठी रिकामा करायला सांगतो. कोणाच्या जीवनात प्रगती होणार असेल तर, तेवढे पुण्याचे काम चर्च अवश्य करेल'. भाई माझा हात पकडून मला शास्वती देत होते.' चल आपण मॅनेजरकडे जाऊ,फार सज्जन माणूस आहे,आपल्या नात्यातलेच आहेत. काय म्हणतात ते पाहू' असे सांगून, हात पकडून ते मला मॅनेजरकडे घेऊन गेले. मॅनेजरने पाणी वगैरे देऊन, घरात बसवले. प्रस्तावक चर्चा झाल्या नंतर ते आम्हाला चर्चमधे घेऊन गेले. चर्च मधील वाचनालयाच्या हॉलच्या बाजूची एक खोली त्यांनी उघडली. खोलीत एक खूर्ची टेबल, एक मोठी खिडकी, तिचा येणारा भरपूर उजेड, झूळू-झूळू वाहानारी मोकळी हवा, अशी ती खोली

दाखवली, 'ही खोली चालेल त्यांनी विचारले. इथून प्रभूचे दर्शनही होईल आणि कंटाळाही येणार नाही' मॅनेजर पाटील म्हणाले. 'अरे बापू ईश्वर निश्चितच  तूम्हाला मदत करेल, तसाच हा योग आहे. तू फक्त पंधरा मिनिटेच आधी आला,नाही तर आम्ही निघालोच होतो. मनमाडला जायला'. नंतर मी एक महिन्याची रजा काढून चर्चमधे नियमित जाऊन अभ्यास केला. परीक्षा झाली. निकाल आला, अखिल भारतीय पातळीला चवथा आणि महाराष्ट्रात दुसऱ्या नंबरने मी परीक्षा पास झालो.

पदोन्नती वर मला पहिली नेमणूक अमरावतीला मिळाली. कूसूंब्याला जाऊन आई आणि भाऊंचे आशीर्वाद घेऊन मी अमरावतीला जाउन कामावर रूजू झालो. माननीय भालोदे जळगावकर अधीक्षक होते. नासिकचे आर. टी. कुलकर्णीनी तक्रार इंन्सपेक्टर असे दोन लोक आमच्या भागातलेच होते. त्यामुळे मला थोडा आधार मिळाला होता. नवीन कामास मी धाडसाने सुरुवात केली. साधारण दीड ते दोन महिने मला रुजू होऊन झाले असतील, एके दिवशी अधीक्षक साहेबांनी मला त्यांच्या केबीन मधे बोलावून घेतले. 'मिस्टर गढरी तूम्हीतर अनुभवी लोकांपेक्षा अधिक चांगले काम करत आहेत. तुमच्या डायरीवर एकही विपरीत शेरा अद्याप पडलेला नाही आणि तुमच्या एरीयातील एकाही ऑफीसची कोणतीही तक्रार आलेली नाही. जरा सावकाशीने आणि हुशारीने काम करा, तुमच्याच एरीयातील तुमचे अधीन असलेल्या कामगारांवर बारीक नजर ठेवा. सर्वा पासून सावध रहा. हे जे जुने लोक आहेत. फार बिलंदर आहेत, मी त्यांच्या चर्चेत,तूमच्याकामा बद्दल कूर-कूर करत असल्याचे ऐकले आहे'. ते मला सावध करत म्हणाले. 'सर मी नियमाच्या किंवा अधिकाराच्या बाहेर जाऊन कोणतेही काम करणार नाही. मला फक्त तुमचे आशीर्वाद व प्रसंगी मार्गदर्शन पाहिजे. मी कोणालाही आणि कोणत्याही सरकारी कामाला भीत नाही आणि कामात कसूर करत नाही'. 'ठीक आहे. तू जरा सांभाळूनच रहा, आम्ही आहोतच'. 'नक्कीच सर' मी म्हणालो. नवीन भाग, कामाचा कमी अनुभव म्हणून मी जास्तीत जास्त वेळ माझ्या विभागांची भौगोलिक आणि प्रत्येक ऑफिसचे बारकाईने निरीक्षण करत होतो. त्यामुळे मी ऑफिस बाहेरच्या कामाला पाहिजे तेवढ्या वेगाने सुरुवात केली नव्हती.

समोर येणारे प्रत्येक प्रकरण शांतपणे पाहूनच हाता वेगळे करत होतो. वेगवेगळ्या ठिकाणी हेडक्वार्टर असलेल्या ओव्हरसियर, मला त्यांच्या भागात असलेल्या ऑफिसांची, तिथल्या प्रत्येक कर्मचाऱ्याची बारीक-बारीक माहिती पुरवत होते. एक ओव्हरसियर माझ्या ऑफिसलाच होता. तो जास्तीत-जास्त माहिती पुरवत होता. तो एका युनियनचा पुढारीही होता. त्यामुळे माझ्या सबडिव्हीजनमधे नवीन साहेबांचा न सांगताच थोडा धाक पसरत होता.



# माझी पहिली केस

कामचुकार आणि फुकटची शेखी मिरवणारेही घाबरायला लागले होते. चार ते साडेचार महिने झाले असतील, अधीक्षक साहेबांनी मला केबीनमधे बोलावले. त्यावेळी ते एकटेच होते. त्यांच्या आर्डरलीलाही त्यांनी बाहेर पाठवून दिले होते. त्यांना नमस्कार करून मी आत शिरलो. ते एकदम थकल्या सारखे बसले होते. 'ये गढरी, बैस, हे पत्र वाच', माझ्याकडे एक पत्र देत ते बोलले. मी ते पत्र वाचून हळूच टेबलावर ठेवले आणि साहेबांकडे पहात बसलो. पत्र वाचून मला फार वाईट वाटत होते. साहेब खूप सिनियर होते. अशा ऑफिसरची इतकी निर्वाच्य शब्दात हेटाळनीप्रद भाषा मला फार क्लेश दायक वाटली. 'मी काय करावे साहेब ? तुम्ही सांगाल त्या प्रमाणे मी करायला तयार आहे.' मी माझ्यापरीने त्यांना वचन दिले.' आता पुढचे ऐक, मी दोन केसेस तुला चौकशी साठी देत आहे. त्या जुन्या आहेत, दोन्ही तुझ्याच भागातील आहेत, तू आता तुझ्या सबडिव्हीजनमधे बिलकूल नवीन आहेस, तुला अजून, तुझ्या भागातील लोकांनी पाहिलेले नाही. तिथला तुझा ओवरसियरही कधी इकडे आलेला नाही, त्यामुळे तोही तुला ओळखणार नाही, मी तुला तुझे आयडेंटीटी कार्ड तयार करून देतो. जेव्हा खूप हाता बाहेर परिस्थिती जाईल, तेव्हाच ते आयडेंटीटी कार्डाचा वापर करायचा. चौकशीला जातांना अगदी गुप्तपणे जायचे. खात्याची हँडबॅग बरोबर न्यायची नाही समजले'. त्यांनी मला सूचना दिल्या. 'एस सर माझ्या लक्षात सर्व येऊन गेले. मला

एकदम गुप्त चौकशी करायची आहे हेच ना'? मी आश्वस्त सुरात म्हणालो. 'अगदी बरोबर, साहेबांना खात्री वाटल्या नंतर ते म्हणाले. नंतर त्यांनी त्यांच्या पर्सनल कपाटातून दोन फायली मला दिल्या. आणि म्हणाले 'सांभाळून, कोणालाही कळू देऊ नकोस, की मी या केसेस तुला चौकशी साठी दिल्या आहेत. त्यांचा बारकाईने अभ्यास कर. आठवडा भरात मला रिपोर्ट दे. मला या पत्राला उत्तर द्यायचे आहे. सारे काम आपल्या खानदेशी पद्धतीने करायचे आहेत. पण ते कसे करायचे ते तुझ्यावर अवलंबून आहे. आधी कुलकर्णीने पैसे गहाळच्या केसमधे चौकशी केली आहे. त्याच्या चौकशीच्या आधारे मी पाठवलेल्या रिपोर्टवर हे पत्र आले आहे. दुसरी केस तुझ्या हिमतीवर अवलंबून आहे. 'बेस्ट लक'. साहेब हळूच म्हणाले. साहेबांनी दिलेल्या एका मोठ्या पाकिटात त्या केसेस ठेवून मी केबीनच्या बाहेर पडलो. मी घरी जाऊन रात्री त्या केसेसचा अभ्यास केला. हिशोबी कार्यालयाने एका शाखा डाक घराला पाठवलेली रोकड, त्या डाक घराला मिळाली नाही. ती मधेच वाटचालीत गहाळ झाली ही एक केस होती आणि एका गावाला शाखा डाकघर चालू केले तेव्हापासून ओव्हरसियरने त्या मूळ गावी जाऊन कधीच त्याची मासिक तपासणी केली नाही आणि त्या भागाच्या इंसपेक्टरनेही वार्षिक तपासणी त्या गावाला जाऊन केली नाही. रोडवरच्या दुसऱ्या खेड्याला त्या शाखा डाकघराचे सर्व दप्तर बोलावून परस्पर तपासण्या केल्या आहेत. ही दुसरी केस होती. तिसऱ्या दिवशी सकाळीच मी दोन दिवसांच्या डब्यात चटणी-पोळ्या घेऊन घरा बाहेर पडलो. शिपाई घरी आला तर मी कुठे गेलो आहे ते सांगू नका अशी सूचना देऊन गेलो. मी त्याभागात कधीच गेलो नव्हतो. बरोबर साडेनऊ वाजता मी वरूड गावी पोहोचलो. गाव नवीन होते. विचारत-विचारत पोष्टात गेलो. ऑफिस नऊ वाजताच उघडले होते. साऱ्या काउंटरला जनतेचे व्यवहार शांतपणे चालले होते. मी प्रत्येक खिडकीच्या जवळ जाऊन कामाची आणि कर्मचारी जनतेशी कसे व्यवहार करत आहेत, त्याचे निरीक्षण केले. कर्मचारी आपापल्या कामात व्यस्त होते. थोड्याशा आतमधे जेथून शाखा डाक घरांना टपाल, रोकड व विक्रीसाठी स्टँप पाठवण्याचे काम करणारी सबआकाउंट ब्रँच होती. मी जिथे उभा होतो तिथून त्या ब्रँचच्या कर्मचाऱ्यांच्या कामाच्या

पद्धतींचे निरीक्षण करत होतो. त्या ब्रँाचला लागून रोकड व स्टँप पुरवणारी ट्रेझरी ब्रँाच होती. मी उभा होतो तिथूनच ट्रेझरर व सब आकाउंट ब्रँाचचा बाबू शाखा डाकघरांना एकमेकांत इकडून पाठवायची आणि तिकडून आलेल्या कॅश स्टँपची हाताळणी कशी करतात यांचे बारीकीने निरीक्षण करत होतो. कारण हा चौकशीचा पहिला व महत्त्वाचा मुद्दा होता. तिथे नियमा प्रमाणे सारे काम चालू होते. सारे निरीक्षण काळजी पूर्वक केल्या नंतर आता पुढे जायचे होते. साऱ्या शाखा डाक घराच्या बॅगा बांधून झाल्यावर,एक शिपाई त्या बॅगा घेऊन स्टँडवर जायला निघाला, तेव्हा मी ही हळूच त्याच्या मागे-मागे स्टँडवर जाऊन पाहोचलो. शिपायाने ज्या त्या दिशेला जाणाऱ्या बॅगा कंडक्टरला बरोबर देऊन त्याच्या सह्या घेतल्या. मला पाथरी शाखा डाक घराला जायचे होते,जेव्हा शिपाई त्या बॅगा कंडक्टरला देत होता. त्याच वेळी मी त्या गाडीत चढलो आणि कंडक्टरच्या बिलकूल मागच्या सीटवर जाऊन बसलो. प्रत्येक थांब्याला त्या-त्या डाकघराचे कर्मचारी हजर राहून त्यांच्या बॅगा कंडक्टर कडून बरोबर पाहून घेत होते. 'पाथरी पोष्टवाले हजर आहे का', कंडक्टरने पाथरी स्टॉप आल्यावर आवाज दिला. कर्मचारी येऊन गाडीत चढून, त्याने कंडक्टर कडून बॅग घेतली. तो गाडीखाली उतरला तसा मी खाली उतरलो. मी ही त्याच्या मागे-मागे जाऊ लागलो. थोडेपूढे गेल्यावर कर्मचारीचे दोन मित्र येऊन त्याच्याबरोबर चालू लागले. मी त्यांच्या मागे होतोच,'किती वेळ लागेल रे आता तुला'? एका मित्राने त्याला विचारले. 'आज बॅग जरा जडच लागते आहे. कदाचित भरना आला असेल', कर्मचारी म्हणाला. 'मग जमेल का आज तरी'? त्या मित्राने त्याला विचारले. 'नाही रे घडी-घडी नाही चालणार, आता बस, जे झाले तेच निस्तरत नाही बाबा अजून. मास्तर आता बरोबर बॅग उघडायला स्वतः येतो'. कर्मचारी म्हणाला. 'अरे आज तर मास्तर बाहेर गावाला जाणार होते', मित्राने धिटाई करत म्हटले. 'पण आता नको, माझ्या नोकरीचा प्रश्न आहे. माझी पाच सालापेक्षा जास्ती नोकरी झाली आहे, आता मला परीक्षेला बसायचे आहे'. कर्मचारी म्हणाला. 'अरे जाऊ दे रे इतक्या लांब या कोपऱ्याच्या गावाला कोणी चौकशीला थोडीच येतात आणि आला तरी थातूर-मातूर चौकशी करून, आपण जसे सांगू तसेच ऐकून निघून

जातात,आपण खरे सांगितलेच नाही. तर, त्यांना काय माहीत पडते? मागचीच केस बघ. अशीच घशात घातली ना'? मित्र त्याला फूसलावत होता. 'नको बाबा नको. झाल तेच वाईट झाल',कर्मचारी म्हणाला. इतक्यात एक जण कुठे तरी जाऊन परत आला. 'अरे मास्तर शाळेतच नाहीत, नक्कीच गावाला गेले असतील'. तो, म्हणाला.'जाऊ दे गेलेत तर गेले', असे बोलत-बोलत ते मास्तरच्या खोली पर्यंत आले. कर्मचाऱ्याने खोलीचे कुलूप उघडले, मी बाजूला जरा अंतरावर असलेल्या झाडा आड उभा राहून त्यांची गंमत पहात राहिलो. ते तिघे खोलीत शिरले, ते खोलीत शिरताच, मी खोलीच्या बंद खिडकीच्या फटीतून आतले पहात उभा राहिलो. कर्मचाऱ्याने बॅग उघडली, त्यातली सील केलेली छोटी बॅग उघडली,तिच्यातून कार्ड पाकीट आणि अंतरदेशी पत्रांचा भरणा निघाला. 'अबे साल्या या कागदी तुकड्यांचा काय उपयोग. वाटले होते काहीतरी मोठी रक्कम असेल, हप्ते दोन हप्त्यांची तरी चांदी भागेल, काही दिवस तरी मौज मस्तीत जातील'. त्यांच्यातील एक मित्र म्हणाला.' जाऊ दे याच्याच मनात नव्हते' दुसरा म्हणाला. 'अबे रोकड निघाली असती तर','अबे साल्या हो, मी घातले का हे वरूडला जाऊन,साले हरामाचे खाऊ',कर्मचारी वैतागाने म्हणाला. 'अबे साल्या मागच्या सारखी रोकड निघाली असती तर, तुला इथेच लंबा पाडून सारीच्यासारी घेऊन गेलो असतो',एक म्हणाला. 'या साल्याचा नशीब चांगल आहे' दुसरा कर्मचाऱ्याला दम देत म्हणाला. दोघे वैतागाने खोलीतून निघून गेले. दोघे थोडलांब गेल्यावर मी दारात जाऊन उभा राहिलो. टाळ्या वाजवत म्हणालो.' वा! फार छान, तू खून केला नाही पण, खुनी म्हनवशील हे मात्र निश्चित'. 'तुम्ही कोण? काय पाहिजे तूम्हाला?, तो कर्मचारी नजर चुकवत म्हणाला. 'जास्तीचे बोलणे बंद कर आणि मागचे अडीशे रुपयांचे काय केले ते गुपचूप सांग, नाही तर तुला आताच पोलिसांच्या हवाली करीन' मी म्हणालो. 'अहो मिस्टर मला धाक दाखवून तूम्हाला काही मिळणार नाही. मीच आमच्या साहेबांना अमरावतीहून बोलवतो आणि तूम्हालाच पोलिसांच्या ताब्यात देतो' असे सांगून, त्याने अंगणात उभे राहून आवाज देऊन आजू-बाजूच्या लोकांना बोलावले. हा-हा म्हणता पाच-सहा लोक गोळा झाले, 'बघा हा माणूस कोण आहे, कोठून

आला माहीत नाही,आणि मला दम देतो आहे कि तुला पोलिसात देतो', तो त्या लोकांना म्हणाला. जमलेल्या लोकांमधून एक जो जरा सुशिक्षित वाटत होता. तो, म्हणाला, 'हे बघा तुम्ही आमच्या गावाचे नाहीत, 'आधी तुमची ओळख द्या आणि मग,तूम्हाला काय करायचे ते करा', तो थोडा पुढे येऊन म्हणाला. 'हे बघा', असे म्हणत मी माझे ओळखपत्र त्याला दाखवले. त्याने ते बारकाईने पाहिले आणि 'नमस्कार साहेब, याचा आणि आमचाही जरा गैरसमज झाला आहे. तुम्ही पहिल्यांदाच इकडे आलेत वाटत? अरे हे तुमचे अमरावतीचे आलेले इंन्सपेक्टर साहेब आहेत', तो म्हणाला. कर्मचारी घाबरून त, त, प, प करू लागला. मग, मी त्या सगळ्यांना खोलीत बोलावून बसवले. त्यांना कर्मचारी आणि त्याच्या मित्रात झालेल्या वार्तालापाच्या गोष्टी सांगितल्या. ते ऐकून ते सर्व जन थक्कच झाले. 'काय रे, इतक्या दिवसापासून तुमचे साहेब लोक गरागरा चकरा मारून त्या बिचाऱ्या गूरूजींवर दोष ठेवून, चौकश्या करत होते, त्यावेळी तुला हे सारे बोंबलता नाही आले का? वरून बोंबा मारत होता', तोच सुशिक्षित माणूस म्हणाला. 'बघा,मी ऐकलेल्या संभाषणातून, मला हा ही दोषी वाटत नाही,याच्या मित्रांनी याला फसवले आहे. पण  आता जे झाले ते सत्यपणे याने तुमच्या समोर कबूल करून यांनी त्या पैशांचे काय केले, ते पैसे ज्या थैलीतून आले होते. तिचे काय केले, हे सारे खरे सांगून, कबूल केले तर याला वाचवण्याचा प्रयत्न करता येईल'. मी त्या सर्वां समक्ष त्याला ग्वाही दिली. 'साहेब हा फार गरीब घरचा मुलगा आहे, त्याच्या बाबत सारा गाव तूम्हाला साक्षी देईल. अतिशय भित्रा पण आहे हा', तोच सुशिक्षित माणूस म्हणाला. 'आपण नोकरी करता का?' मी त्याचे बोलण्यातले चातुर्य आणि लाधवी भाषण ऐकून त्याला विचारले. 'नाही साहेब, मी इथला पोलीस पाटील आहे'. तो म्हणाला. 'नमस्कार पाटील साहेब, बघा आता हा काय म्हणतो ते. बर झाले तुम्ही आयतेच हजर आहात. तूम्हीच आता साक्षी रहा या बाबतीत' मी म्हणालो. 'आता अस कर ज्या दिवसाची ती रक्कम न मिळाल्याची घटना आहे, त्या दिवशी कंडक्टर कडून बॅग घेतल्या पासून तू काय काय केले,कुठे-कुठे गेला, कोणाला भेटला, तुला कोण-कोण भेटले, ती सारी घटना, जशी घडत गेली,

ती तशीच्या-तशी क्रमाने खरे-खरे सांग', मी त्याला म्हणालो. 'पाटील काका त्या दिवशी मी टपाल घ्यायला स्टँडवर गेलो, गाडी यायला उशीर झाला होता, म्हणून मधल्या वेळात मी पान टपरीवर सहज उभा होतो, पाच एक मिनिटांनी शेजारच्या खेड्यावरचे ते दोन्ही रिकामटेकडे तिथे आले, ते मागच्या चार-पाच महीन्या पासून घडी-घडी पोस्टात त्यांच्या टपालाची चौकशी करायला, टपालाच्या वेळी येत होते. अजूनही ते येतात. त्यामुळे त्यांच्याशी माझी नुसती तोंड ओळख आहे. ते शहरात जाऊन बरेच शिकले आहेत म्हणे. माझ्याजवळ येऊन त्यांनी विचारले काय मित्रा अजून टपाल आली नाही वाटते? मी नाहीचे उत्तर देऊन बाजूला जाऊन उभा राहून गेलो. पाच मिनिटांनी त्यांनी टपरी वाल्याला दोन पान बनवायला सांगितले. 'मित्रा तू पान खाणार? एकाने विचारले, मी हो नाही म्हणतो ना म्हणतो, त्याच्या आधीच माझ्या साठीही पान सांगितले. पान खाल्ल्यावर, पाणी पिता येणार नाही. म्हणून, मी पाणी प्यायला गेलो. मी परत आलो तो पर्यंत त्यांनी त्यांचे पान खाल्ले होते व माझा पान हातात घेऊन उभे होते. टपाल गाडी येऊन उभी राहिली, तशात त्यांनी पान माझ्या हातात दिला. मी पटकन ते तोंडात टाकून थैली घेतली आणि ऑफिसकडे यायला लागलो. त्यावेळी ते माझ्या बरोबर नव्हते. मी दहा-वीसच पाऊले गेलो असेन, मला एकदम घाम यायला लागला, मला त्यावेळी काही वाटले नाही. कारण, मी बऱ्याच वेळे पासून उन्हातच उभा होतो. असे वाटले उन्हात उभे राहिल्यानेच घाम येतो आहे. नंतर मन चलबिचल होऊ लागले, उनबिन लागले की काय असे त्यावेळी वाटले, मी कशी-बशी ऑफिसची खोली उघडली, तो पर्यंत माझे हात-पाय कापायला लागले. मी बॅग उघडून आलेली टपाल छापायला लागतो, तो पर्यंत गूरूजी नेहमी येऊन हजर असतात. मी बॅग उघडून तिच्यातली टपाल उचलण्यासाठी जसा खाली वाकलो, बस मला तेवढेच आठवते. त्यानंतर काय झाले, कसे झाले मला काहीच आठवत नाही. गूरूजी केव्हा आले, काय झाले, काय नाही. जेव्हा गूरूजी आले. त्यांनी मला गदागदा हलवले, तेव्हा मला थोडी शुद्धी येऊ लागली होती. अरे बॅग उघडी आणि टपाल तशीच पडली आहे. कॅश बॅग कुठे दिसत नाही, कुठे ठेवली आहे? त्यांनी मला विचारले. मला तर

एकदम धक्काच बसला. मग मी गूरूजींना सारी हकिकत सांगितली. मला यायला आज दहा-पंधराच मिनिटे उशीर झाला. पण, मी आलो तेव्हा आजूबाजूला किंवा जवळपासही कोणीच दिसला नाही, इतक्या कमी वेळात कोणी ऑफिसात हिमतीने घुसून, नेमकी कॅश बॅगच कसा नेईल? ती कॅश बॅगच आहे. हे, त्याला तरी कसे कळाले. मग गूरूजी शेजारी-पाजारी आजू बाजूवाले साऱ्यांना विचारून आले. की, त्यानी एवढ्या अर्ध्या तासात कोणाला पोष्टात येतांना किंवा जातांना तरी पाहिले का? पण काही उपयोग झाला नाही. एक जण म्हणाला होता. त्यांनी दोन पोर ज्यांना बऱ्याच वेळे पूर्वी स्टँडवर पाहिले होते, ते गल्लीने जातांना पाहिले. पण, ते पोष्टातून निघाले नाहीत. तेव्हा गूरूजींनी त्याला विचारले, त्यांच्या हातात चामड्याची बॅग-बिग होती का? तो म्हणाला 'बॅग तर नव्हती. पण, पांढऱ्या कापडाचे लहान गाठोडे होते. गूरूजी सारा तपास करून परत आल्यावर, आम्ही परत सगळे ऑफिस शोधून काढले. पण काही उपयोग झाला नाही. गूरूजी लगेच वरूडला गेले आणि सारी माहिती सांगून आले. तिथेच कॅश बॅग मिळाली नसल्याचा रिपोर्ट ही देऊन आले'. एवढे बोलून कर्मचारी बोलायचा थांबला.' बर मग या घटनेला इतके दिवस झाले तेव्हा ही घटना गावातही पसरली असेल नाही का'? मी त्याला विचारले. 'हो रावसाहेब, बरेच लोक विचारतात, का रे पोष्टाच्या इतिहासात या गावात असे कधी झाले नाही, मग हे कसे झाले? मी काय उत्तर देऊ? मी एवढेच सांगतो झाले ते झाले बाबा,मी काय सांगू?' 'बर ते दोन जण नंतर तुला कधी भेटायचे का,आजचा प्रसंग सोडून सांग'. 'हो साहेब आठवड्यातून एखाद्या वेळेस', तो म्हणाला. 'तू कधी त्यांना या घटणे ब्द्दल बोललास,कधी काही सांगितलेस?' मी प्रश्न केला. 'हो साहेब नेहमी विचारतो, हे ही विचारतो की मला असे चक्कर कधी येत नाहीत, त्या दिवशी पान खाल्यानंतरच चक्कर आले, असेही म्हणतो'. 'काय म्हणतात मग ते'? मी विचारले. 'अरे तुला पान खायची सवय नाही, म्हणून अशा माणसांना कधी कधी पान लागून जाते. 'बर त्या घटनेविषयी दुसरी काही चर्चा लोकांत ऐकली कधी'? मी विचारले. 'नाही साहेब पण एक गोष्ट स्टँडवर ऐकली होती की या वर्धा नदीच्या डोहात कोणाची तरी बॅग पडली आहे, पण त्याला

पोहता येत नाही. म्हणून, त्याला ती आज पर्यंत काढता आली नाही'. 'त्या पोरांनी जेव्हा तुला पान खायला सांगितले तेव्हा त्यांच्या हातात गाठोडे तू पाहिले होते का'? मी विचारले. 'नाही साहेब, पण मलाही ती शंका आल्यामुळे मी त्यांना विचारले होते, का रे आपण पान खाल्ले तेव्हा तुमच्या हातात तर मला काही दिसले नव्हते. पण जेव्हा तुम्ही पोष्टाच्या गल्लीतून गेले, तेव्हा तुमच्या हातात पांढऱ्या कपड्याचे एक गाठोडे गल्लीतल्या लोकांनी पाहिले होते. काय होते त्याच्यात'? 'तेव्हा ते म्हणाले होते लहान पोरांना खाऊ घेऊन चाललो होतो. येतांना पिशवी आणली नव्हती म्हणून हात रुमालात ते गुंडाळून घेऊन चाललो होतो',तो म्हणाला. 'त्या डोहात पडलेल्या बॅगेबद्दल तुला काही शंका वाटते का'? मी विचारले. 'ज्याची असेल त्याने ती काढून न्यायला पाहिजे' तो म्हणाला.' पण, त्याला पोहता येत नाही असे मी स्टँडवर लोकांच्या तोंडून ऐकले आहे', तो म्हणाला. 'त्या बॅगेत असे काय असेल की जिची चर्चा सर्वत्र होत होती'? मी विचारले. 'काही तरी कपडेलत्ते किंवा एखादी महाग वस्तू असेल' तो म्हणाला. 'पण जास्त महत्त्वाची राहिली असती तर त्या माणसाने एखादा पोहणारा पाहून त्याच्या कडून काढून घेतली असती असे तुला नाही वाटत'. मी विचारले,'पण साहेब तो डोह खूप खोल आहे. म्हणून, ऐरागैरा पोहणारा कधी तयार होत नाही रावसाहेब' तो म्हणाला. 'पण ती कोणाची आहे, तिचा मालक कोण आहे. या बाबत चर्चा का झाली नसावी? तुला या बाबत काय वाटते'? मी विचारले.' हो साहेब हे जो-तो विचारायचा पण सांगणारे सांगायचे ते बाहेर गावचे होते, पण ही चर्चा एक दोन दिवसच ऐकायला मिळाली' तो म्हणाला. 'पण बॅग पडली आहे हे तरी खरे आहे का?' मी शंका काढली. 'काही सांगता येत नाही साहेब' तो म्हणाला. तेवढ्यात पोष्ट मास्तर आत आले. 'ही काय गर्दी आहे पाटील साहेब? ही व्यक्ती कोण आहे? ही ओळखीची वाटत नाही? तुमची होती का साहेब ती बॅग? जी तुमच्या ओढातानीत सुटून उधळली आणि डोहात जाऊन पडली? मास्तर खोलीत शिरतांना प्रश्नावर प्रश्न विचारत होते'. 'गूरूजी हे अमरावतीहून आलेले पोस्ट खात्याचे इंन्सपेक्टर साहेब आहेत, ते तुमच्या गहाळ झालेल्या रकमेच्या चौकशीसाठी आलेले आहेत'. पाटील म्हणाले.

इंन्सपेक्टरचे नाव काढताच मास्तर एकदम नरम पडले. 'हा तर मास्तर पुढे सांगा, ती बॅग हातातून उधळून डोहातच कशी काय गेली असेल?' मी त्यांना विचारले 'नाही रावसाहेब अचानक नाही उधळली, त्या दोघांपैकी एक दूसऱ्याच्या हातातून ती हिसकावण्याचा प्रयत्न करत असतांना त्या झटपटीत दुसऱ्याने तिला जोराचा झटका देऊन स्वताकडे ओढण्याचा प्रयत्न करत असतांना त्याच्याही हातातून ती सुटली आणि झटक्या सरसी ती डोहात जाऊन पडली. नंतर त्या दोघांनी झाडाच्या लांब-लांब फांद्यांच्या मदतीने तिला काढण्याचा भरपूर प्रयत्न केला, पण त्यांना यश आले नाही. जो पर्यंत शाळा चालू होती तो पर्यंत आम्ही अधून-मधून त्यांची गंमत पहात होतो, नंतर काय झाले माहीत नाही', मास्तरने खुलासा करत सांगितले. 'ती बॅग कापडी होती का?' मी विचारले. 'नाही रावसाहेब तपकिरी रंगाची, साधारण दीड-एक फूट लांबीची होती ती कापडी होती का काय ते लांबून दिसले नाही'. गूरूजी म्हणाले. 'तूम्ही त्या लोकांना कधी पाहिल्याचे आठवते का, मी विचारले 'नाही रावसाहेब पोरसवजा पण धोतरातले नव्हते, आधुनिक पोषाखातले होते'. का कोण जाणे माझ्या मनात शंका आली की बघावे तर खरी, जर खरी ठरली तर उत्तमच आण खोटी ठरली तर माझे पैसे वाया जातील एवढेच होईल, म्हणून मी पोलीस पाटलांना म्हणालो. 'पाटील साहेब एखादा पट्टीचा पोहणारा मिळेल का? जो कोणी डोहाच्या तळाला जाऊ शकेल'? 'हो साहेब आहेत ना, डोहात पोहून मजा लुटणारे पहिलवान पोर गावात आहेत ना. 'आता एक दोन भेटू शकतील? आपण त्यांना विनंती करू, केली त्यांनी मदत तर बरेच, व्यायाम करणारेच आहेत म्हंटल्यावर, एखादेवेळेस होतीलही तयार, नाही तर आपण त्यांना चहा पाणी देऊ' मी विनंतीवजा पाटलांना बोललो. 'अरे नाही हो साहेब हे काय सांगणे झाले? आपल्याच गावची मुले आहेत', पाटील म्हणाले आणि त्यांनी कर्मचाऱ्याला त्या पोरांचे नावे सांगून त्यांना 'पाटील साहेबांनी बोलावले आहे' असे सांगून बोलवून आणायला सांगितले. कर्मचारी लगेच लगबगीने बोलवायला पळाला. काही मिनिटातच तो दोन-तीन तगडे पोर घेऊन आला. त्यांना पाटीलसाहेबांनी सारे समजावून सांगितल्यावर ती सर्व मंडळी डोहाकाठी गेली. पोरांनी फटाफट

डोहात उड्या टाकल्या. जवळ-जवळ एक तास तो खेळ चालला होता, प्रत्येक वेळी डुबक्या घेऊन डोहाच्या तळाला जाणारे रिकाम्या हाताने वर येऊन दम घेत होते. जवळ जवळ डोहाचे पूर्ण तळ चाफलून झाल्याचे पोर सांगत होते. आता हे इथेच थांबवावे असे पाटील सांगत असतानाच एक जण हातात एक तपकिरी रंगाचे गाठोडे घेऊन वर काठावर आला, त्याने ती पाटलांजवळ दिली, मी आणि गूरूजीही जवळ जाऊन पाहू लागलो, एकदम आश्चर्याने तोंड वासून गुरुजी म्हणाले, 'सारेच अविश्वसनीय'. माझी शंका वास्तवात आल्याने मला मनोमन आनंद झाला.ती गहाळ झालेली पोष्ट खात्याचीच बॅग होती. तिचे कुलूपही बंद होते. कुलुपाच्या चावीच्या व इतर छिद्रात गाळ घुसल्याने ते एकदम जाम झाले होते. साऱ्या पोहणाऱ्यांना पाटलांनी आणि मी पाठ थोपटून शाबासकी दिली. बॅगेला असलेल्या आढ्या-गूढ्यातून चिकट गाळ रुतून बसल्याने ते खूप जाम झाले होते. गूरूजींच्या आणि कर्मचाऱ्याच्या तोंडातून शब्द बाहेर पडत नव्हते. मी पोहणाऱ्या पोरांना चहापाण्यासाठी पैसे देऊ केले. पण, गूरूजी आणि पोलीस पाटलांनी 'रावसाहेब हा आमच्या गावाचा मामला आहे, आम्ही बघून घेऊ', नंतर सर्व जण परत पोष्टात आलो. मी पोष्टाचा कर्मचारी आणि पोष्ट मास्तरांचा सविस्तर जबाब घेतला. त्यावर पोलीस पाटील व एका ग्रामस्थाची साक्षीदार म्हणून सह्या घेतल्या. मागील रेकार्ड मधून त्या दिवसाची शाखा डाकघर स्लिप, डोहातून काढलेली ती कॅश बॅग घेतली, पोलीस पाटील व जमलेल्या सर्वांना नमस्कार करून, तडक वरूड उपडाक घराला आलो. माझ्याबरोबर पाथरी शाखा डाकघरचा कर्मचारी व पोष्ट मास्तर होते, आलेली गर्दीपाहून सबपोस्ट मास्तर म्हणाले. 'काय गर्दी आहे तिकडे, काय पाहिजे त्यांना? त्यांना म्हणा बाहेरून बोला काय बोलायचे ते' 'मास्तर साहेब नमस्कार, अमरावतीहून इंन्सपेक्टर रावसाहेब आले आहेत'. ते ऐकताच पोष्ट मास्तर एकदम खुर्चीतून उठून उभे राहिले, 'कुठे आहेत? त्यांना ताबडतोब आत बोलवा', असे म्हणून ते लगबगीने दाराकडे आले. ते माझ्या जवळून पुढे जाऊ लागले तोच पाथरीचे पोष्ट मास्तर म्हणाले, 'रावसाहेब हे इथेच तुमच्या समोर उभे आहेत', लगेच मास्तर एका झटक्यात मागे वळले, 'नमस्कार रावसाहेब कधी पाहिले नाही

म्हणून ओळखले नाही क्षमा करा'. 'ओके मास्तर साहेब, काही हरकत नाही. होते असे कधी कधी म्हणत त्यांचे हातात हात घेतले. ते पाहून मास्तर मनोमन एकदम खूश झाले. 'रावसाहेब मी आजच तूम्हाला सकाळी आमच्या ऑफिसात पाहिल्या सारखे वाटते आहे. हो मास्तर मी सकाळीच तुमच्या ऑफिसचे व कर्मचाऱ्यांच्या काम करण्याच्या पध्द्तींचे निरीक्षण करून गेलो आहे आणि खरे सांगतो तुमचे कर्मचारी अगदी पध्द्तशीर आणि इमानदारीने कामात गर्क होते. 'थँक यू रावसाहेब, इतकी परखड स्तुती आम्ही आमच्या आयुष्यात एकाही अधिकाऱ्याच्या तोंडून ऐकली नाही', मास्तर गदगद होऊन बोलले. 'खरे हे समक्ष बोललेलेच अबाधित असते मास्तर साहेब'. 'थँक यू रावसाहेब. पण रावसाहेब आपण आतमधे येऊन थोडथांबले असते, ओळख परिचय झाला असता, तुम्ही इकडे प्रथमच आले, भाग नवीन आहे, पाथरीला जातांना एखादा कर्मचारी बरोबर दिला असता'. 'नाही मास्तर साहेब नवीन ठिकाणी शोधण्यात जास्त समाधान असते, मला तर विचारायचीही गरज पडली नाही, शाखा डाकघरांची टपाल जाणार होती, बॅगा नेणाराच्या मागे-मागे गेलो, बरोबर ठिकाणावर जाऊन पोहोचलो' मी म्हणालो, 'तसे रावसाहेब तुमच्या बद्दल सबडिवीजन मधे बरेच बोलले जात आहे, भागातले जवळ जवळ सर्वच ऑफिस तूम्हाला बघायला उत्सुक आहेत'. सबपोष्ट मास्तर म्हणाले. मी पाथरीच्या पोस्ट मास्तरला आम्ही पाथरीहून आणलेली बॅग काढायला सांगितले. त्यांनी बॅग उघडून त्यातली कॅश बॅग काढून आमच्या समोर टेबलावर ठेवली,'मास्तर साहेब एखाद्या शिपायाला ही बॅग नीट काळजी पूर्वक साफ करायला सांगा. तिचा जो कुलूप आहे त्याच्यात सगळी कडून गाळ भरला आहे तो थोडावेळ पाण्यात भिजत ठेवून चांगला साफ करायला सांगा, काळजी घ्यायला सांगा नाही तर कुलुपाचा लिव्हर खराब होईल आणि कुलूपच उघडणार नाही'. सर्व कर्मचारी आता पर्यंत लांबून-लांबूनच आमच्याकडे पाहून सारे संभाषण ऐकत व पहात होते, परंतु एकंदरीत खेळीमेळीचे चाललेले वातावरण पाहून तेही हळू जवळ येऊन आजूबाजूला गोळा होऊन गेले होते. एका नंतर एक नमस्कार करत होते. त्यांच्यात आपसात मी सकाळी ऑफिसात फेरी मारून गेल्याची चर्चा चालू होती. 'गूरूजी रावसाहेबांच्या जेवणाचे काय

झाले' पोस्टमास्तरांनी पाथरीच्या पोस्टमास्तरांना विचारले. 'नाही रावसाहेब जिथे चहा नाही, पाणी नाही तिथे जेवण कसले. मी ऑफिसात पोहचण्या आधीच आमच्या इथे रावसाहेब, ग्रामस्थ आणि पोलीस पाटील जमले होते आणि इ.डी.ची चौकशी चालू होती. चौकशी असी चालू होती की कोणाला जेवणाची काय पण चहा पाण्यालाही उसंत मिळाली नाही आणि चौकशी अशी झाली की त्याची कोणी कल्पनाच करू शकत नाही. आता पर्यंत जेवढे साहेब म्हणून व मेलओव्हरसियर आले होते, नुसते येऊन जाऊनच चकरा मारून, याला त्याला विचारूनच गेले पण कोणाला कॅश बॅगेचा थांगच लागला नाही. तीन वर्षाची चौकशी तीन तासात वर्धा नदीच्या डोहातून मुद्देमालासह हस्तगत करून तुमच्या पर्यंतही पोहोचून गेलो'. मास्तरसह सारा कर्मचारी वर्ग ऐकत होता. पोष्ट मास्तर कधी कॅश बॅगेकडे, कधी पाथरीच्या मास्तरकडे, कधी माझ्याकडे पहात होते. काय बोलावे आणि काय करावे हेच त्यांना सुचत नव्हते. त्यांना अंदाज येत नव्हता की काय करावे. काही केले तरी फसतो की सहानुभूती मिळवण्यासाठी करतो आहे,नाही केले तर साधे तोंडानेही विचारले नाही या पेचात ते होते. 'मास्तर आपले सारे सोपस्कार संपले की, मी तुमच्या बरोबरच जेवण करणार, पण तुमच्याकडचे नाही तर माझे स्वत:चे घरून आणलेले मी खाईन','रावसाहेब माझे अवघे दीड वर्षच सेवा राहिली आहे. सारे आयुष्य खात्याची सेवा करण्यातच चालले आहे, पण एवढा ओलावा ना पूर्ण सेवा काळात, ना खाजगी जीवनात कधी मिळाला', पाथरीच्या इ.डी. च्याही डोळ्यात पाणी आले होते. 'बर मास्तर सावरा आता आणि ही कॅशबॅग ज्या तारखेची आहे त्या दिवशी सबअकाउंट ब्रॅँचला आणि ट्रेझरी ब्रॅँचला जे कर्मचारी काम करत होते त्यांना बोलवा. शिपायाला त्या तारखेची बी.ओ.स्लीप आणि ब्रॅँच ऑफिसचा डेलि अकाउंटफार्म ही काढून आणायला सांगा'. ते दोन्ही बाबू येउन समोर उभे होते. त्यांच्या कडून त्या स्लीपामधील नोंदी तपासून साक्षांकीत करून घेऊन तसे त्या दोघांचे व पोष्टमास्तरांचे लेखी जबाब नोंदवून घेतले. कारण स्लीपामधील वरच्या व कार्बन प्रतीवरील नोंदी एकमेकांशी जुळल्या होत्या. तो पर्यंत शिपायाने कॅशबॅग व तिचे कुलूप व्यवस्थित साफ करून आणले होते. नंतर ती बॅग सर्वा समक्ष

उघडत असतांना घाई-घाईत ओव्हरसियर ऑफिसात शिरला, ऑफिसात चालू असलेली कारवाई पाहून तो लांबच थांबून तिथूनच त्याने नमस्कार केला. समोर पडलेली कॅशबॅग व पाथरीचे कर्मचारी पाहून त्याला अंदाज येऊन गेला की गहाळ झालेली बॅग साहेबांनी सापडवली. त्या बरोबर त्याने दोन्ही हात जोडून वर आकाशाकडे पाहून ते कपाळाला लावले. बॅग उघडल्यावर आतली रोकड काढून खजिनदाराने ती मोजली आणि बरोबर असल्याचे सांगितले. तेव्हा सर्व कर्मचाऱ्यांनी टाळ्या वाजवल्या. हे सारे प्रकरण संपले. नंतर मी आणि पोस्ट मास्तर बरोबर जेवायला बसलो. माझी चटणी पोळी त्यांना आणि त्यांची भाजी पोळी मी घेऊन आम्ही जेवायला बसलो. जेवना नंतर ओव्हरसियर जवळ आला आणि म्हणाला 'रावसाहेब तुम्ही जलालाखेडा गाडीतच होते ना'?' हो' मी म्हणालो,'मी ही त्याच गाडीत मागच्या सीटवर बसलो होतो'. 'बर, मग बीट सोडून मधेच कसे परत आलेत'? मी विचारले. 'रावसाहेब मीही पाथरी स्टेजलाच उतरलो, तिथून दुसऱ्या खेड्याला जायला गाडी नसते. तिथला इ.डी. सायकल घेऊन बॅग घ्यायला त्याच स्टॉपवर येतो पण त्याची सायकल पंचर झाली. म्हणून, तो पायी आला, कंडक्टर गावतलाच होता. त्याने त्या खेड्याची बॅग मला दिली, इ.डी.एका तासानंतर आला,मग मी त्याच्या बरोबर त्या बी.ओ.ला जाऊन परत आलो, तर तिथे स्टँडवर आपल्या गहाळ कॅशबॅगेच्या झालेल्या चौकसी बाबत आाणी आलेल्या साहेबा बाबत खूप तारीफ होत होती. मला राहावले गेले नाही, म्हणून पुढेच कूठे न जाता परत आलो'. 'फार छान, बरे झाले आलात' मी म्हणालो. 'पण रावसाहेब मी तूम्हाला कधी पाहिले नव्हते. म्हणून, ओळखले नाही, क्षमा करावी'. ओव्हरसियर काकुळतीला येऊन म्हणाला. 'अहो जमादार अज्ञानातलाच आनंद सर्वात गोड असतो नाही का'? मी म्हणालो. माझे वाक्य ऐकून सारा स्टाफ एकदम मनमोकळेपणाने खळखळून हसला. 'रावसाहेब, मी ही माझ्या पूर्ण सर्वीसमधे एकाही साहेबांची अशा खेळीमेळीच्या वातावरणात एकही व्हिजीट झालेली पाहिली नाही'. 'बर आता येथून पुढे सर्वच व्हिजीट अशाच खेळी मेळीच्या वातावरणात होत जातील, पण त्याला एक अट आहे, सर्वांनी आपापले काम सचोटीने, शिस्तीने आणि जनतेच्या सोईंचे भान ठेवून

केले पाहिजे, बर मी आता निघतो. मला आता संध्याकाळ पर्यंत अमरावतीला पोहोचले पाहिजे. ते मला नवीन शहर आहे. एखाद्यावेळी चुकून जाईन', मी म्हणालो. मी जमा केलेले सर्व कागदपत्र आणि कॅशबॅग हातात घेत म्हणालो. 'चला रावसाहेब' असे म्हणत पोस्ट मास्तर माझ्या हातातली बॅग घेत आणि त्या सिनीयर कर्मचाऱ्याला ऑफिसकडे लक्ष द्यायचे सांगत उभे राहिले. 'मास्तर तुम्ही थांबा आणि ऑफिस बघा, जमादार आहे. बरोबर. मी म्हणालो. 'बर रावसाहेब' म्हणत त्याने बॅग माझ्या हातात दिली. 'रावसाहेब मी तूम्हाला अमरावती पर्यंत सोडतो, तुम्ही नवीन आहात म्हणून',जमादार म्हणाला. 'अहो जमादार येतांना मी एकटाच आलो की नाही'? मी म्हणालो. त्याने गाडीत जागा सांभाळत मला गाडीत बसवले. दुसऱ्या दिवशी मी विभागीय कार्यालय उघडण्या आधीच ऑफिसला पाहोचलो. पाथरी केसचा पूर्ण विस्ताराने माझ्या अभिप्रायासह अहवाल तयार करून मुद्देमालासह प्रकरण तयार केले. विभागीय कार्यालय उघडले, भालोदे साहेब मुद्दाम माझ्या कक्षा समोरून जात असतांना कक्ष उघडे असल्याचे पाहून सरळ आतमधे येऊन माझ्यासमोर उभे राहिले, मला कामात व्यस्त पाहून,'काय गढरी अजून मी दिलेल्या कामाला हात लावलेले दिसत नाही. जरा नाराजीच्या स्वरात म्हणाले. 'सर मी आपले काम फत्ते करून आलो आहे,'मी म्हणालो. 'म्हणजे काय? अरे फ्रॉड शोधने इतके सोपे नसते,माझी सारी सर्वीस चालली आहे. अशा केसेस हाताळत-हाताळत,इतक्या सहजा-सहजी साधी मूलगा हरवल्याची केस नोंदली जात नाही आणि जी केस अनेक वेळा चौकशा अंती ही उलगडत नाही. म्हणून, गहाळ रक्कम राईट ऑफ करण्याची सिफारस करावी लागली तू म्हणतो ती केस फत्ते करून आलो! त्यांनी मला समज दिली. 'सर मी तुमच्याकडे सर्व प्रकरण घेऊनच येणार होतो, तेवढ्यात तुम्हीच समोर येऊन उभे राहिलेत' मी म्हणालो. 'अरे मी पहायला आलो होतो की, मी कालही तुझ्या रूम समोरून आलो होतो. पण तू दिसला नाही. तुझी रूम बंद होती, म्हणून आज परत इकडूनच आलो. का? तर मला वाटत होते की तू काही बहानेबाजी करून आठ-पंधरा दिवसांची मुदत-बिदत मागून घेतो की काय आणि तेवढे करूनही शेवटी रिकामे हातीच परत येऊन मला सांगशील सर हाती काही लागले

नाही', एकादमात सारे बोलून साहेब थांबले. 'नाही सर, मी फत्ते करूनच आलो आहे, मी विश्वास पूर्वक शब्दात सांगितले. 'मग मी इकडून आलो हेच बरे झाले'. साहेब खुर्चीवर बसताच मी माझी फाईल त्यांच्यापुढे ठेवली. जशी मी कुलूपबंद गहाळ कॅशबॅग टेबलावर ठेवली, साहेब डोळे फाडून-फाडून त्या बॅगकडे पाहू लागले. ती हातात धरत ते म्हणाले. 'अरे ही काय आहे'? 'सर ही गहाळ झालेली कॅशबॅग आहे', मी म्हणालो. साहेब सारखे ती बॅग उलट-सुलट करून पहात होते. बॅग चामड्याची असल्याने व ती बरेच दिवस पाण्यात राहिल्याने तिचा कुजका वास येत होता. तिचे निरीक्षण करत साहेब एक हात कपाळावर तर कधी ओठावर फिरवत होते. बऱ्याचवेळाने ते म्हणाले,'अरे गोविंदा तू तर मुळा सकट पुरा झाडच उपटून आणला बघ,कोणाचीही खात्री पटवण्यासाठी'. नंतर त्यांनी माझा रिपोर्ट, मी घेऊन आणलेले शाखा डाकपाल व इ.डी. पाथरीचे पोलीस पाटील व ग्रामस्थांच्या साक्षी निशीचे जबाब, उपडाक घराच्या सबआकौंट व खजिनदार कर्मचाऱ्यांचे जबाब आणि त्या संबंधीचे सारे कागदपत्र साहेबांनी काळजी पूर्वक पाहिले, त्यांनी ते पाहून खूश होऊन टाळी वाजवली. 'तू खरा इंन्सपेक्टर होशील आणि खूप वर जाशील. ही तुझ्या करिअर मधली पहिलीच पण अत्यंत क्लीस्ट केस तू इतक्या सहजतेने आणि खुबीने व काटेकोरपणे हाताळली याचे जेवढे मला नवल वाटते तेवढाच अभिमानही वाटतो. कारण तू या डिवीजनवर लागणारा निष्क्रियतेचा डाग लागण्या आधीच पुसला आहे. साहेब म्हणाले आणि खुर्चीवरून उठले, 'चल आता तुझा अहवाल, मुद्देमाल आणि सारे कागदपत्र घेऊन ये',असे म्हणत ते रूमच्या बाहेर पडले. आता साहेबांनी सोपवलेल्या कामा पैकी एक काम मागे राहिले होते.



# नोकरीतील मार्गक्रमण

आता साहेबांनी सोपवलेल्या कामापैकी एक काम मागे राहिले होते. त्या कामासाठी मी आधी साहेबांना भेटलो. 'सर मी लिंगा पूसलाला इन्सपेक्शन साठी जायचे ठरवतो आहे. मी या भागात नवा आहे, इकडचा भाग माहीत नाही,मी आणि तिकडचे कर्मचारी आम्ही एकमेकांना ओळखत नाही,तिकडची भाषा मला लवकर समजणार नाही. एक साथीदार म्हणून मी इथूनच माझा जमादार नेऊ इच्छितो', मी त्यांना सांगितले. 'हरकत नाही, ही मंडल लेव्हलची जुनी पेंडींग केस आहे. त्या नंतर त्या बी. ओ. च्या दोन तपासण्या झाल्या. पण, त्या दोन्ही वेळी इंन्सपेक्टर प्रत्यक्ष त्या ऑफिसला गेलचे नाहीत, उलट सुलट सबबी सांगून त्यांनी ते टाळले असल्याने, आता मंडल कार्यालयाने ती उचलून धरली आहे. ते पत्र तू वाचलेच आहेस, म्हणून ती स्पेशल केस म्हणून तुला परवानगी दिली आहे, तुला जशी करायची तसी चौकशी कर. तुला मी परवानगी देतो' साहेब म्हणाले. दुसऱ्या दिवशी मी जमादारला घेऊन लिंगाला जायला निघालो. गाडी वरूड गावावरूनच जाणार होती. जमादाराने अमरावतीहून टपाल नेणाऱ्या गाडीनेच बसवले. आम्ही कंडक्टर जवळच्या बेंचवरच बसलो होतो. जमादार पोष्टातला जुना कर्मचारी होता. ज्या-ज्या ठिकाणी गाडी टपाल द्यायला थांबायची, तेथे टपाल घ्यायला येणारा प्रत्येक कर्मचारी त्याला नमस्कार करत विचारत होता 'इकडे कुठे'? तेव्हा तो माझ्याकडे इशारा करून

सांगायचा 'साहेबांसोबत आहे'. तेव्हा कर्मचारी मलाही नमस्कार करायचे. वरूडला गाडी टपाल द्यायला आणि घ्यायलाही थांबली. टपाल घेणाऱ्याने मला गाडीत पहाताच, वर येऊन नमस्कार करत म्हणाला 'रावसाहेब जमादार स्टँडवरच आहेत, त्यांना बोलवू का'? 'बोलव मी म्हणालो', तेवढ्यात तोच धावत आला 'नमस्कार रावसाहेब' म्हणत वाकला. 'तुम्ही येणार असे कळवले असते तर शेंदूरजन्याची कॅश नेने बंद केली असती'. तो म्हणाला. 'अरे असे सूचना देऊन ऑफिसर कधी येतो का?' मी विचारले. ते ऐकताच जमादार माझ्या तोंडाकडे पाहतच राहिला. 'तुम्ही सूचना देऊनच जातात का?' मी विचारले. मी असे विचारताच त्याने दाताखाली जीभ चावली. 'रावसाहेब हा सातपुडा पहाड आहे, याच्या आगोशात जायचे म्हटले की आपले अनेक शाखा डाकघरे याच डोंगरात आहेत, तेथे पायीच जावे लागते, कोणतीच वाहने येथे चालत नाहीत, या पहाडात अस्वलांचा फार वावर आहे, सोबतच बिबट्यांचाही वावर तेवढाच आहे, एकटा दुकटा माणूस तो कितीही हिम्मतवान असला तरी, भर दिवसा जाऊ शकत नाही', जमादार एका नंतर एक धोक्यांचा पाढा वाचत होता. 'ही वस्तुस्थिती आहे रावसाहेब,पण फक्त इकडच्या भागाची, सारीकडे नाही', जमादार म्हणाले. 'मग ठीक आहे' मी म्हणालो. 'साहेब कुठे चाललात?' वरूडच्या जमादाराने विचारले, 'जमादारांना विचारा, आपल्यालाही आज सातपुड्याची सफर होणार आहे की काय'? मी जमादारला विचारले 'हो रावसाहेब, लिंगातर अस्वलांचे कुरणच आहे', जमादार म्हणाले. लिंगाचे नाव ऐकताच समोरचा जमादार समजून गेला. 'बाप रे! तो म्हणाला, हो सर हे खरेच आहे', 'चला मग मी ही लिंगाबद्दल बरेच ऐकले आहे, आज प्रत्यक्ष पाहूनच घेऊ' जमादारही म्हणाले. दुपारचे तीन वाजत आले होते. 'रावसाहेब मी उद्या पुसल्याला येणार आहे. माझी या महिन्याची विझीट आहे', वरूडचा जमादार म्हणाला. 'ठीक आहे' मी म्हणालो. 'तसे नाही रावसाहेब आपण पुसल्यालाच जेवण करू' तो म्हणाला. 'अरे मी, जमादार आणि माझाही आज आणि उद्याचे दोन्ही वेळचा डबा घेऊनच आलो आहे, तुम्ही तुमचे काम करून निघून जा' मी म्हणालो. बेनोडा गावाजवळ गाडीच्या इंजनमधे काहीतरी बिघाड झाला होता म्हणून गाडी हळू वेगात चालवली जात

होती. त्यामुळे पुढे उशीर होत होता. वरूडच्या पुढे डोंगरी भागातून गाडीचा प्रवास सुरू झाला होता. कशी-बशी गाडी पुसला गावाला पोहोचली तेव्हा संध्याकाळचे सहा वाजत आले होते. पुसला गावचा इ. डी. टपाल घ्यायला थांबलाच होता. तो टपाल घेत असतानाच जमादारांनी त्याला थांबवून घेतले. 'मी चांदूर भागाचा मेल ओवरसीयर आहे. मी इंन्सपेक्टर साहेबांबरोबर आलो आहे. आम्हाला लिंगा शाखा डाक घराचे इंन्सपेक्शन घ्यायला जायचे आहे', इंन्सपेक्टरचे नाव ऐकताच तो कावरा-बावरा झाला, कारण त्याच्या सर्व्हिसमधे आज पर्यंत लिंगा बी. ओ. ला जाणारा एकही अधिकारी आलेला त्याने पाहिला नव्हता. ते ही, काही सूचना न देता अकस्मातपणे येणारा तर नाहीच नाही. तो झटकन पुढे येऊन जवळची टपाल बाजूला ठेवून वाकून नमस्कार करत म्हणाला, 'रावसाहेब अकस्मात येणे केले'. 'जास्त बोलू नको, पुढे चल' जमादाराने त्याला दटवत बोलन्या पासून मधेच थांबवले, त्यामुळे तो एकदम घाबरला,कारण त्याला अशा कडक वागणुकीची अपेक्षा नव्हती, तो झपा-झप पावले टाकत चालू लागला. टेकडीवजा उंचवट्याच्या वस्तीत शाखाडाक घर होते. डाकवाहक टपाल खाली ठेवून चटकन बाजूला झाला, त्याच्या अचानक अशा वागण्याने शाखा डाक पालने त्याला रागवत विचारले 'का रे? घाबरा का झालास'? काही न बोलता डाकवाहकाने मागे वळून दाराकडे पाहिले, त्यामुळे शाखाडाकपालनेही दाराकडे पाहिले, आम्ही दारातच उभे होतो. आम्हाला पाहून त्याने विचारले 'कोण आपण, आपल्याला काय पाहिजे'? तेव्हा जमादारापुढे होऊन म्हणाले, 'मी चांदूरबाजार बिटचा मेलओवरसीयर, हे अमरावतीचे इंन्सपेक्टर आपले रावसाहेब'. 'आपले रावसाहेब? असे अचानक'? 'मास्तर आम्हाला लिंगा शाखाडाक घरच्या इंन्सपेक्शन साठी जायचे आहे, रस्ता दाखवण्यासाठी तुमचा डाक वाहक गावाबाहेर पर्यंत पाठवा', जमादार त्याला मधेच थांबवत म्हणाले. 'पण रावसाहेब संध्याकाळचे सहा वाजले आहेत, अजून जास्तीत जास्त अर्ध्या तासात अंधार पडायला लागेल, जंगलात बिबटे वाघ, अस्वलासह इतर रानटी जनावरेही आहेत, त्यातच टपाल गाडी आज अडीच तास उशिरा आली आहे, लिंगा डाक घराच्या टपालाची येथूनच देवाण-घेवाण होते, लिंगाचा डाकवाहक

आताच एकातासा पूर्वी गाडी न आल्यामूळे निघून गेला आहे, आपण येथेच मुक्काम करून सकाळी जावे'. शाखा डाकपाल बोलला. 'मास्तर साहेब लिंगावाला दुकानदाराकडे गेला होता', डाकवाहक म्हणाला. 'त्याने दूकानवाल्याला वरूडहून औषधी आणायला सांगितले होते. त्याने त्या आणल्या की नाही याचा तपास करायला गेला होता परत आलाच नाही. दुकानदारही आताच गाडीतून उतरला आहे. तो ही कदाचित रात्रीचा इथेच मुक्काम करेल' पुसल्याचा इ. डी. म्हणाला. 'जाऊन त्याला पाहून ये पळ', डाकपालाने त्याला दुकानाकडे पाठविले,तो लगेच गेला. 'मास्तर आमचा मुक्काम लिंग्यालाच होईल, येथून किती लांब आहे लिंगा?' जमादाराने विचारले. 'सहा ते सात किलोमीटर असेल रावसाहेब' मास्तर म्हणाला. 'पण साहेब रोड नाही, पाऊल वाटच आहे आणि रस्ता एकदम खडकाळ आहे. सपाटी अशी नाहीच आणि नदी नाले आहेत, जंगल तर खूपच दाट, सरळ चालता येत नाही, सकाळचे दीड ते दोन वाजतीलच, त्या पेक्षा माझ्याकडेच मुक्काम करून घ्या ना, रावसाहेब', डाकपाल म्हणाला. 'मी दहा वर्षापासून डाकपालचे काम करतो आहे, ही पहिलीच वेळ आहे कोणी ऑफिसर लिंग्याला जायला निघाला आहे. दहा वर्षापासून मी येणाऱ्या प्रत्येक साहेबांची व्यवस्था करतो आहे'. शाखा डाकपाल आग्रह करत होता. 'बघा मास्तर, लिंग्याचा माणूस रोज येतो जातो ना? तो माणूस आहे,आम्ही माणूस नाहीत का? त्याला जीव नाही का, त्याला जिवाची भिती नाही का? तो तर रोजच येतो जातो ना, आम्ही तर वर्षातून एक दिवस जानार येणार आहो ना?' जमादार म्हणाले. शाखा डाकपाल आमच्याकडे आश्चर्याने पहात राहिला. एवढ्यात दोन्ही डाक वाहक समोरून येतांना दिसले. 'अरे लिंगावाले, रावसाहेब लिंग्याला जायचे म्हणत आहेत,काय करायचे?', शाखा डाकपालाने विचारले. 'रावसाहेब मी आता लिंग्याला जातो, सकाळीच मी डाकपालला अगदी लवकरच घेऊन येतो', डाकवाहक म्हणाला. 'अरे बाबा तू एकटा तर जाणारंच आहेस ना? मग आम्हीही तुझ्याच बरोबर आलो तर काय बिघडेल सांग बर, जो त्रास तुला होईल तोच आम्हांलाही होईल एवढेच ना'? जमादार म्हणाले. थोडा जास्तीचा वेळ लागेल', नाइलाज झाल्यासारखे करत डाकवाहक म्हणाला. 'बस एवढेच ना? चल निघ' जमादार

म्हणाले. 'हो रावसाहेब करतो मी तयारी, तो पर्यंत थोड थांबा'. तो गावात निघून गेला. 'जमादार, तो पर्यंत आपण डबा खाऊन घेऊ', मी म्हणालो. 'रावसाहेब मी घरात तयार करायला सांगतो', डाकपाल म्हणाला. 'अरे नको-नको, रावसाहेब स्वत: आमचा डबा घेऊन आले आहेत. दहा मिनिटात आमचे जेवण होईल, फक्त पाणी आणा', मारोतराव म्हणाला. शाखा डाकपाल अक्षरश: थरथरू लागला होता. काही साहेब असेही भेटतील याची त्याने कल्पना केली नसेल. आम्ही लगेच जेवायला बसलो. पुऱ्या आणि बटाटाच्या भाजीवर सणकून ताव मारणे चालू होते. डाक वाहक परत यायला अजून वेळ होता. दोन्ही डाकवाहक टेंभे आणि रॉकेलचा डबा घेऊन आले. 'अरे बाबा तू पाणी-बिणी पिऊन घे, थोडा बस. मग आपण निघू' जमादार म्हणाला. नाही म्हणता पुसल्याचे डाकपाल आणि डाकवाहकही बरोबर निघाले. अर्धा पाऊण किलोमीटर रस्ता चालून गेल्यावर डोंगरी भागाला सुरुवात झाली. पुढे लिंग्याचा डाकवाहक, मधे मी आणि जमादार आणि शेवटी पुसल्याचे डाक पाल आणि वाहक असा आमचा पाच जनांच्या ताफ्याचा प्रवास सुरू झाला होता. अंधार पडू लागला, हळू-हळू तो वाढू लागला, टेंभे पेटले, पुढे एक, मागे दोन टेंभे. खडकाळ रस्त्याला सुरुवात झाली, चढ उताराचा, वाकड्या-तिकड्या वळनांचा, कधी दाट तर कधी विरळ जंगलाचा, अधून-मधून आडवे येणारे नाले ओहोळ. 'रावसाहेब आता पुढे दाट जंगल आणि चढावाचा रस्ता लागेल, एक ते दीड किलोमीटरचा प्रवास आहे, तेवढे अंतर संपले की मग पुढे जास्त भिती नाही' डाक वाहक म्हणाला. साधारण सात वाजेची वेळ होती, पुढे खोल दरी होती, पुढच्या डाकवाहकाने मागच्याला सांगितले 'टेंभ्यात रॉकेल टाकून ते खांद्यावर धर, म्हणजे त्याची ज्योत मागे जाते, त्यामुळे मागून जंगली जनावरे अंगावर चाल करून येत नाहीत'. त्याने तसेच केले,पुढे रस्त्याच्या आजू-बाजूला दाट करवंद्यांच्या व इतर काटेरी जाळ्यांचे मोठे झूडूपे होते, टेंभ्याच्या उजेडात पुढच्या झूडूपात पुढच्या डाकवाहकाला थोडी हालचाल होत असल्याचे दिसले, 'रावसाहेब एकदम घाबरू नका बर का, बहुतेक समोरच्या झूडूपातून अस्वले हमला करतील. ते एकटे नसतात. तीनच्यावरच,कधी-कधी पाच ते दहाही असू शकतात, ते सरळ अंगावर

चाल करतात, तोंडातून विषारी थुंकी आपल्या अंगा तोंडावर थुंकतात, मोठ-मोठ्या नखांनी गुदगुल्याही करतात, त्यावेळी तोंडावर एखादे रुमाल किंवा फडके किंवा हातातली बॅग आडवी पकडावी, म्हणजे त्यांची थुंकी अंगा तोंडावर येणार नाही, मास्तर साहेब, आपण टेंभ्याचा जाळ सारखा त्यांच्या तोंडावर आणि छाती किंवा पोटावर लावायचा प्रयत्न करावा, कारण त्यांच्या अंगावर खूप केस असतात. त्यांना विस्तव लागू नये म्हणून ते लांब पळतात, जरका विस्तव अंगाला लागला, तर एका मिनिटात केस विस्तव पकडतात आणि जळायला लागतात त्यामुळे अस्वल जाळाला फार भितात आणि लांब राहतात, तिन्ही टेंभे वाल्यांनी शक्यतोवर एकाच अस्वलावर मारा करण्याचा प्रयत्न करू नये, कारण तो एकटा एकदम हल्ला करत नाही, सारे मिळून एकदम हल्ला करतात, समजा बिबट्या असेल तर टेंभा सारखा अंगा भोवती वर्तुळात गरगरा फिरवायचा, म्हणजे वर्तूळ छेदून त्याला आत हल्ला करता येत नाही', अशा सूचना लिंग्याचा डाक वाहक देतच होता तेवढ्यात समोरच्या जाळ्यातून एक अस्वल किंचाळत पुढे येऊ लागला? त्याच्या मागेच दुसरेही बाहेर आले ते जरा अंतरानेच किंचाळत आमच्या आजू-बाजूने मागच्या बाजूला जाऊ लागले होते, 'हुशार रहा, घाबरू नका, रुमाल कापड एकाहाताने तोंडाला लावा, अस्वलाच्या तोंडा समोरून टेंभे हटवू नका, अस्वले संखेने जास्त असू शकतात', लिंगावाला वाहक म्हणाला. खरोखरच ते संखेने सहा होते आणि सारखे किंचाळत होते,'त्यांच्या किंचाळण्याला घाबरू नका, टेंभे हातात पक्के पकडा, नजर चुकवून ते हातातून टेभे हिसकावतात. टेंभे त्यांच्या समोर धरून त्यांच्या तोंडा पोटा समोर तिथल्या तिथे गरगरा फिरवत रहा, म्हणजे ते आपल्यावर चाल करून येणार नाहीत', आम्ही जस-जसे वर्तूळ आकारात फिरत होतो. ते तसेच वर्तूळाकारात आमच्या भोवती सारखे मागे पुढे होत-होते, त्यांच्या हाताचे आणि पायांचेही बोटे लांब तर होतेच पण त्यांचे नखेही बोटा एवढालेच लांब होते. हातापायांचे पंजे एखाद्या पंख्याच्या पात्या सारखे होते. आमच्या समोरून जेव्हा ते हात किंवा पाय फिरवायचे, एखाद्या लहान पंख्यासारखी त्यांची हवा लागायची. जवळ जवळ अर्धा तास हा खेळ चालू होता.जेव्हा त्यांना आमच्यावर हल्ला करणे जमत नव्हते, तेव्हा

त्यांची खिज वाढत होती, त्यांच्या वाकड्या-तिकड्या उड्या मारने, हात पाय झटकणे, आणि तोंडातून विषारी थुंकी फेकणे वाढत चालले होते. आमचे रक्षक, टेंभे फिरवत थकू लागले होते, पुसल्याच्या वाहकाला जास्त अनुभव नव्हता, म्हणून तिकडून थोडी कमी चाल होत असल्याचे अस्वलांना समजले, म्हणून त्यांचा हल्ला करण्याचा मोर्चा त्याच्या कडून सुरू झाला. त्यात त्यांना यशही आले,एका अस्वलाने त्या वाहकाने केलेला टेंभ्याचा हल्ला चुकवून टेंभ्या खालून हात घालून त्या वाहकाच्या शर्टमध्ये हात घातला, लांब बोटांचे, लांब नखांनी व बोटांनी, शर्ट मूठीत पक्के पकडून जोराचा झटका मारून त्याला ओढण्याचा प्रयत्न केला, पण शर्ट थोडा जुनाट होता. म्हणून,जेवढा मुठीत होता तेवढा फाटून अस्वलाच्या हातात गेला आणि डाकवाहक जमिनीवर पडला,'अरे मेलो' तो ओरडला', लिंगावाला चौकस होताच, हातात आलेल्या शर्टच्या तुकड्याकडे पहान्यात गुंतलेल्या अस्वलाच्या पाठीला त्याने पाच सेकंदांच्या आत, टेंभा लावला, टेंभ्याचा जाळ अस्वलाच्या पाठीला लागताच, त्याच्या पाठीवरच्या केसांनी एकदम आग पकडताच मोठा भडका झाला, एकदम झालेल्या या हल्याने चवताळलेल्या अस्वलाने एका क्षणात जमिनीवर पडलेल्या पूसल्यावाल्याला लाकडाच्या तुकड्यासारखा उचलून आमच्या अंगावर फेकला आणि आगीच्या दाहाने किंकाळ्या मारत सैरावैरा पळत सुटला ते पाहून बाकीचे अस्वलेही घाबरून धूम पळून गेले. या साऱ्या खेळात, जवळ जवळ एक तास गेला. नंतर आम्ही सरळ लिंग्यालाच पोहोचलो. रात्रीचे नऊ वाजत आले होते. डाकवाहका सोबत आलेल्या भलत्या रात्रीच्या गर्दीला पाहान्यासाठी घरातून लोक बाहेर येत होते. काही तरी भयंकर घडणार असावे, म्हणूनच एवढ्या रात्री एवढी गर्दी गावात आली असावी असे लोकांना वाटत होते. आम्ही शाखा डाकपालाच्या घरासमोर थांबताच, डाकपाल घाबरतच घरा बाहेर आला, डाकवाहकाबरोबर पुसल्याचे दोन्ही कर्मचारी आणि अजून दोन नवीन लोक आणि तेही एवढ्या रात्री, ते पाहूनच तो एकदम घामाघूम झाला. आणि एवढ्या रात्री कोण येऊ शकतो? त्याला काही सुचत नव्हते, काही तरी गंभीर आणि भयंकर भानगड असल्याशिवाय, कोणी गैर व्यक्ती आपल्याकडे येऊच शकत नाही ! तो विचारातच होता. त्याच्या परिस्थितीचे

पूसलाच्या मास्तरला अंदाज येऊन गेला, म्हणून तोच पूढे झाला आणि म्हणाला 'मास्तर एवढे घाबरू नका. हे आपल्या भागाचे नवीन इंन्सपेक्टर साहेब आहेत, त्यांच्या बरोबर चांदूरबाजार भागाचे ओव्हरसीयर आहेत,तुमच्या शाखा डाक घराची वार्षिक तपासणी करायला ते आले आहेत'. 'पण सालाबादा प्रमाणे तर तपासणी पुसला शाखा डाक घराला घेतली जाते, मला निरोप दिला असता, धावत पळत सारे दप्तर घेऊन आलो असतो ना रावसाहेब', तो निकराने म्हणाला. 'आता त्या बाबत जास्त बोलू नका मास्तर', पुसल्याचे मास्तर म्हणाले 'बर' असे म्हणत लिंग्याचे मास्तर ताबडतोब घरात गेले. त्यांनी पिण्यासाठी पाणी आणले, तेवढ्या वेळात डाक वाहकांनी, एकाने खाट दुसऱ्याने गादी दुलई, शाली घेऊन आले. खाट टाकल्यावर मी खाटेवर बसलो, जमादार आणि पुसल्याच्या मास्तरलाही खाटेवरच बसायला लावले,पण त्यांनी त्यांच्या जवळच्या बॅगांचे ओझे टेबलावर ठेवून खाली बसायला लागले, मी लगेच उठून उभा राहिलो,आणि मास्तर व जमादारांना म्हणालो चला खाटेवर बसा, मी आता सरकारी काम करतो आहे का? नाही ना? मग आपल्यात साहेब आणि नोकराचा फरक कोठून आला? आता मी तुमच्या सारखाच साधारण व्यक्तीच आहे चला लवकर खाटेवर बसा. सर्व जण एकमेकाकडे टकमक पाहू लागले. लिंग्याच्या मास्तरांच्या तोंडून अचानक शब्द निघाला 'जय श्रीराम'. सगळ्यांच्याच तोंडातून तोच शब्द आपोआप निघाला 'जय श्रीराम'. सगळयांच्या मनावरचा भार क्षणात उतरला, 'रावसाहेब ,एवढ्या मोठ्या मनाचा अधिकारी मी माझ्या आयुष्यात नाही पाहिला. मी युनियनचा विभागीय आणि मंडलस्तरीय अधिकारीही राहिलो तेव्हाही नाही', मारोतराव म्हणाले. 'बर आता सारे जन थकले असतील झोपायची तयारी करूया मी म्हणालो. 'आणि बर का जमादार शिखरावर कधी पाणी साचत का?', मी विचारले,'नाही रावसाहेब ते वाहून जाते', लिंगाचे मास्तर म्हणाले,'मग जिथे पाणीच साचत नाही, तिथे कधी माणुसकीचा ओलावा कसा मिळेल? म्हणून नेहमी जमिनीवरच रहावे, कारण ओलावा जमिनीवरच असतो', मी म्हणालो. जिवावर उदार होऊन रात्रीच्या अवेळी का असेना एवढा त्रास घेऊन रावसाहेब इथपर्यंत पायी चालून आले आणि लिंग्याच्या

पोस्ट ऑफिसला, साहेब कसा असावा याचे दर्शन देऊन, नेहमी साहेब मला न भेटता गेले, वाटणारी ही खंत दूर केली', असे म्हणत लिंग्याच्या मास्तरने सर्वासमोर मला हात जोडून नमस्कार केला. 'हं आता आठवले बघा घरातून काय सांगायला मी बाहेर आलो होतो, तर मी जेवणाचे सांगायला आलो आहे, भात शिजायला घातला आहे, पोळ्या टाकणे सुरू आहेत, आधी कोंबडी मागवू का काही ? कारण पायी चालून आला आहात, थकले तर आहेतच'? मास्तरने जमादारांना बाजूला नेऊन विचारले. 'मास्तर जरा आत चला, सांगतो तूम्हाला', असे म्हणत दोन्ही मास्तर घरात गेले. 'मास्तर खूद रावसाहेबांनीच ओव्हरसीयर आणि त्यांचा डबा घरूनच करून आणला आहे. आजचा आणि उद्याचाही. आम्हीही पुसल्याला त्यांना जेवणाचा आग्रह केला होता. पण इकडे निघण्याआधीच त्यांनी पुसल्याला जेवण करून घेतले आहे. पुसल्याला प्यायच्या पाणी शिवाय काही घेतले नाही,तुम्ही काही करायच्या भानगडीत पडू नका'. पुसल्याच्या मास्तरांनी त्यांना समजावून सांगितले. 'आमच्यासाठी साधी भाजी पोळीच करा'. लिंग्याच्या मास्तरने डोक्याला हात मारून घेतला. एक तर अशा आडवळणाच्या गावांना कोणी अधिकारी सहसा येत नाही, जो येतो तो मजा मारायलाच इतकी तसदी घेऊन येतो. थोड्या वेळाने दोन्ही मास्तर घरा बाहेर आले, 'रावसाहेब जेवणाची तयारी झाली आहे, बसायला काही हरकत नाही, रात्रीचे दहा वाजत आहेत. पुसल्याचे मास्तर म्हणाले, काही हरकत नाही, आम्ही तर तुमच्या समोरच जेवलो आहोत, आता मला तरी जेवावे असे अजिबात वाटत नाही, पण चला करा तयारी' मी म्हणालो. माझे बोलने ऐकून सारे जण दिलखुलास हसले. डाकवाहकाने हातपाय धुवायला बाहेर पाणी ठेवले, पुसल्याच्या डाकवाहकाने बसायला चटाया अंथरल्या आणि एक बसकर वेगळे टाकले. हातपाय धुऊन सारे जण चटईवर बसले आणि मला बसकरवर बसायला सांगितले, पण मी त्यांच्यात जाऊन चटईवरच बसलो.' या मारोतराव तुम्ही आणि मास्तर तुम्हीही बसा. डाकवाहकांनो तुम्हीही या. ही सूदामा घरची पंगत आहे सारे जण एकत्रच बसू, चला लवकर. आपले काय आहे आपण हात धुतले की बाजूला जाऊन आरामशीर बसू पण ताईंचे काय? आपले आटोपल्यावर आपले उष्टे

काढणे, भांडे घासून ते धुणे, नंतर त्यांचे जेवण, मग त्यांचेच भांडे हे सारे आवरत त्यांना रात्रीचे दोन वाजतील,परत उद्याच्या तयारीसाठी लगेच कामाला लागावे लागेल, त्यांनी झोपावे कधी'? फटाफट ताट वाढले गेले. मग मी जमादारांना म्हणालो 'जमादार आपला डबाही काढा. रावसाहेब आपला डबा पुढेच कुठे खा, आता इथलेच जेवण घ्यावे. 'अरे बाबा तुला कोणी सांगितले मी हे खाणार नाही पण याच्याबरोबर हे ही सगळ्यांना खावे लागेल' मी म्हणालो, 'हं मारोतराव काढा डबा आणि त्यातली एक-एक पुरी आणि भाजी सगळ्यांना वाढा'. जमादारने उठून वाढले. आम्ही सारे बसलो जेवणानंतर झोपण्याची तयारी झाली. सगळ्यांचे अंथरून एकत्रच घरात टाकायला सांगितले. मी गादीला नकार दिल्यामुळे संगळयांना सतरंज्या टाकण्यात आल्या. मास्तरांनी सहज प्रश्न केला, 'रावसाहेब तुम्ही नेहमी तुमचा डबा बरोबर नेता'? 'हो मी म्हणालो. 'रावसाहेब मी पोष्टमन व चर्तूथश्रेणी कर्मचारी युनियनचा प्रेसिडेंट आहे, मला आज तुमच्याकडून अनुभवायला मिळालेला हा प्रसंग, तो पहिलाच अधिकारी आहे ज्याच्या प्रत्यक्ष सानिध्यात राहून मी अनुभवला आहे. आज मी दिवसभर तुमच्याच बरोबर राहून, मी जे पाहातो आहे, प्रत्येक क्षण तुम्ही माझ्या मनावर अधिकार गाजवत आहात. मारोतराव छातीवर हात ठेवून म्हणत होते. आम्ही गेलो तसे लिंगा शाखा डाक घराची तपासणीच करून परत अमरावतीला आलो. तपासणी अहवाल आणि पोलीस पाटील लिंगाचा व ग्रामस्थांचा लेखी अभिप्राय मी अधीक्षक साहेबांच्या पुढे ठेवला. मारोतराव बरोबर होताच. त्याने पुसला ते लिंगा प्रवासच दरम्यान घडलेला प्रसंग त्यांना सांगितला. 'अरे माझ्या अंगाला शहारे येत आहेत ती भयंकर घटना ऐकून'. असे सांगत साहेबांनी माझी पाठ थोपटली. नंतर त्यांनी दोन्ही केसेसचा सविस्तर अहवाल उपमंडल कार्यालयाला पाठवून दिला. 'मिस्टर गढरी, तुझ्या हुशारीने आणि सर्वांना सहानूभूतीपूर्ण वागणूक दिल्यामुळेच ही प्रकरणे मी हाता वेगळी करून, माझी आणि या डिव्हीजनचीही प्रतिष्ठा वाचवू शकलो, शाबास', साहेब म्हणाले.



# षडयंत्रातुन सुटका

इन्सपेक्टर श्रेणीतून बढती मिळाली आणि मला दुसऱ्या डिव्हीजन मधे सहायक अधीक्षक फिरस्तीची नेमणूक मिळाली. शैक्षणिक वर्षाच्या आधी-मधीच बदली झाल्यामुळे मुलांच्या शिक्षणासाठी कुटुंब सटाण्यालाच ठेवावे लागले. माझे फक्त काम एक काम एवढेच सूत्र असल्यामुळे खात्यात माझा नगण्य परिचय व वावर होता म्हणून मला तिथे डांबन्यात आले होते. मी लगेच जाऊन रुजू झालो. सुरुवातीचे दीड दोन महिने सारे कर्मचारी माझ्याशी असहकार भावनेनेच वागले. पूर्ण अधिक्षक कार्यालयात शुक-शूकाट असायचा. कर्मचारी आणि साहेब यांचातला संवाद बंद होता, कमीत-कमी वार्तालापात काम होत होते. हळू-हळू मला परिस्थितीची कल्पना येत होती. माझा कोणाशी परिचय नव्हता. जशी वेळ आली तसा मी कर्मचाऱ्यातच मिसळून वागू लागलो. माझ्यावर तशी इतर ऑफिसर लोकांची नजर होतीच. तेथे चार युनियन होत्या. प्रत्येकीच आपली वैचारिक घटना वेगवेगळी होती. बरेच मुद्दे एकच असले तरी फक्त ती आमचीच मागणी, आमच्याच अजेंड्यावर बोला व त्यावरच निर्णय द्या, परत ती दुसऱ्या अजेंड्यावर असेल तर तिच्यावर परत चर्चा नको असा काहीसा प्रकार चालू होता. काही मुद्दे कर्मचाऱ्यांचे आपापसातील भांडणांचे होते. एके दिवशी मी कोणा ऑफिसरची पर्वा न करता साऱ्या युनियनचे सचिव व अध्यक्षांना ऑफिसच्या बाहेर एकत्र बोलवले. त्यांना बोलवण्याचा उद्‌देश सांगितला. ‘मी परक्या जिल्ह्याचा आहे, नवीन

आहे, हा भागही मला नवीन आहे, तुमच्या स्थानिक मुद्यांशी मला काही घेणे नाही, तथापि तुमच्या रास्त मागण्यांसाठी मी तूम्हाला मदत करेल या साठी मी तूम्हाला बोलावले आहे' मी त्यांना म्हणालो. ते ऐकून यूनियनवाले तसेच शांत बसून राहिले. मी माझ्याकडून त्यांना चहापाणी केला, त्यामुळे सारे जन नरम झाले. मी रुजू झाल्यापासून, माझ्या शिपायांकडून नकळत मागील साहेबांना मारण्याच्या घटनेत कोण-कोण कर्मचारी होते हे मी हेरून ठेवले होते. त्यांच्या पैकी तीन-चार लोक माझ्या बरोबरच्या बैठकीला हजर होते. चहा पाण्याचा कार्यक्रम आटोपल्या नंतर मी मुख्य मुद्याला हात घातला. पण त्या अगोदरच एक जण म्हणाला 'रावसाहेब आम्ही आज पर्यंत अनेक अधिकारी पाहिले, पण कोणीच आम्हाला एकत्र घेऊन बसवले नाही, उलट आम्हाला एकमेकां विरूध्द लढवले गेले, अजूनही लढवत आहेत, वास्तविक जेवढा काही एका शाखे विषयी दुसऱ्या शाखेला भडकावले जाते आहे. त्याचा परिणाम असा होतो आहे. की लावीदूवी मुळे कर्मचारी म्हणजे आमचेच मेंबर कार्यालयीन वेळेतच नाही तर वैयक्तिक जीवनातही एकमेकांशी भांडत आहेत,त्या कूरबूरींचे वर्णन अधिकारी वर्गात आमचेच काही लोक करतात. आणि त्या वादात, नवनवीन भरघालून आपापसातील दरी वाढवत आहेत. खरे तर या कार्यालयात यामुळेच एका अधिकाऱ्यास राजेरोसपणे झोडपले गेले आहे. ते प्रकरण शांत करण्यासाठी, त्यांना येथून बदलण्यातही आले आहे, अशा अधिकाऱ्यांच्या वागणुकीत बदल होईल याची खात्री देता येणार नाही. कारण अशा वातावरणात, अधिकारी वर्गातला मिजाज अजून वाढत असतो. त्यात सरकारी कामे कमी आणि इतर उचापतीच जास्त वाढतात. कर्मचाऱ्यांचे मूळ प्रश्न बाजूलाच राहतात. पण एवढे मात्र खरे आहे रावसाहेब, की जेव्हा पासून तुम्ही आले आहेत तेव्हा पासून तुम्ही प्रत्येक कर्मचारी आणि शिपायांशी होऊन आपुलकीने बोलत असतात, कोणतीही अडचण विचारली की ती प्रेमाने समजावतात, भले ती तुमच्याशी संबंधित का असेना. एवढी जवळीक इथे एकाही अधिकाऱ्याकडून मिळत नाही, उलट झिडकारणी, दटावणी, हेटाळणी मिळते, पुरते समजून न घेता हातोहात वाटेला लावणे हेच, अनुभवायला मिळत आहे. आम्ही अपेक्षा करतो की तुम्हीही केवळ तुमची वेळ काढण्या पुरते आम्हाला

जवळ करून शेवटी लाथाडणार तर नाही ना'. एवढे बोलून तो मेंबर थांबला. 'सर यांनी जे सांगितले ते अगदी खरे आहे, आम्ही आमच्या-आमच्यातच भांडून एकमेकांच्या विरूध्द उभे आहोत, आमचे भरपूर मूळ प्रश्न, वर्षानुवर्ष तसेच रेंगाळत पडले आहेत, त्याने व्यक्त केलेल्या शंके प्रमाणे न वागता, तुम्ही आमचे आणि पर्यायाने प्रशासनाचे दूत व्हा आणि साऱ्या महाराष्ट्रात आमच्या डिव्हीजनची जी बदनामी झाली आहे, ती धुऊन काढण्यात आम्हाला मदत करा आणि तुम्ही करणार याची आम्हाला खात्री वाटू लागली आहे, नाहीतर इतक्या कडवट वातावरणात कुणाच्या नाराजीची पर्वा न करता सर्व युनियन पुढाऱ्यांना एकत्र बोलवून, एकत्र बसवून स्वखर्चाने हे वातावरण इतके गोड केले नसते आणि हो आपण सारे जण एक लक्षात ठेवा आपण आपल्या पोष्टखात्याव्दारे समाजाच्या गरिबातल्या-गरिबापासून तर देशातील सर्वात श्रीमंतांपर्यंत कोणत्या ना कोणत्या स्वरूपात सेवा करत आहोत. नुसता आपल्याला पगार मिळतो या भावनेने कोणतेही काम करू नका. परमेश्वर कृपेनेच आपल्याला समाजाची सेवा करायची संधी मिळाली आहे. तिचा पुरे-पूर फायदा करून घेऊ. आपण आपली सारी कामे स्वच्छ मनाने आणि सद्भावनेने करत जाऊ. आपल्या कडून शक्य तेवढ्या कमीत-कमी चुका होतील याची काळजी घेऊ आणि एखादी चूक झालीच तर ती हेतुपूर्वक केली नसल्याने, त्यातून ईश्वराच्या न्यायानेच त्याचे पण न्याय मिळेल, यावर भरोसा ठेवू हे सूत्र आपण आपले सारे कर्मचारी मेंबर यांना समजवू. म्हणजे आपल्याला कुठेच अडचण येणार नाही. तसेच याच्या पुढे कर्मचाऱ्यांनीही, हा त्या युनियनचा तो त्या यूनियनचा हा भेद ठेऊ नका, कारण युनियनचा मोटो तो नसतो, कोणत्याही प्लॅटफार्म वरून कर्मचाऱ्याला योग्य न्याय मिळवून देण्याचा असतो. राहिले तुमचे मूळ अडचणींचे मुद्दे त्यावर सल्ला द्यायला मी इथे बसलो आहे, समजा इथे नसलो तरी, असेल तिथून तूम्हाला मार्गदर्शन करीन. तुमच्या इतर कोणत्याही अडचणी असू द्या, त्या घेऊन तुम्ही केव्हाही माझ्याकडे या तुमच्यासाठी मी हजर आहे'. सर्वांनी टाळ्या वाजवून त्याचे स्वागत केले. हा-हा म्हणता ही घटना साऱ्या ऑफिसर वर्गात पसरली. तेव्हा पासून जो तो ऑफिसर माझ्यापासून लांबून आणि मोजक्याच शब्दात बोलू लागले. पुढच्या

मासिक युनियनच्या मिटींगच्या अजेंड्यातून कर्मचाऱ्यांचे एकमेकांविरुद्धचे सारे मुद्दे वगळले गेले. केवळ खात्यातील अडचणी संदर्भातलेच मुद्दे अजेंड्यामधे घेतलेले होते. त्यावर युनियनला समाधानकारक उत्तरे मिळाली नाहीत. त्यामुळे युनियन कर्मचारी आणि अधीक्षक साहेबात बरीच खडाजंगी झाली. हा मुद्दाही साऱ्या अधिकारी वर्गात बराच चिवडला गेला. त्यामुळे अधिकारी वर्ग बराच अस्थिर मनाने माझ्यावर तापला. त्यांचा माझ्या विरुद्धचा आकस वाढत गेला. एकदोन दिवसानंतर युनियन प्रतिनिधी माझ्याकडे आले. 'साहेब तुम्ही आम्हाला फार चांगले मार्गदर्शन केले. आता पर्यंतच्या मिटींगांमधे एकमेकांच्या आरोप प्रत्यारोपातच मिटींगची वेळ निघून जायची आणि आमचे मूळ मुद्दे कधी चर्चेला आले नाहीत. पण आज जेव्हा ते मुद्दे समोर आले, अधीक्षक साहेब तर एकदम गडबडूनच गेले आणि एकाही मुद्यावर ते रीतसर चर्चा करू शकले नाहीत. आज आमच्या भांडणांचे मुद्दे नसल्याने, त्यांना आम्हाला उलट-सुलट बोलायची संधीच मिळाली नाही. उलट त्यांचीच बोलती बंद झाली. आमच्यावर, कर्मचाऱ्यावर योग्य ताबा ठेवायच्या सूचनाही त्यांना देता आल्या नाहीत'. त्यांच्यातील एकजण खुशीत सांगत होता. 'तुम्ही एक गोष्ट लक्षात ठेवा, ज्याला प्रश्न पडतो त्याचे उत्तर त्यालाच माहीत असते, फक्त त्याने त्यावर साधक-बाधक विचार, चर्चा केली पाहिजे, म्हणजे मला असे सांगायचे आहे, की अडचणी तुमच्या आहेत, त्यांचे स्वरूप आणि व्याप्तीही तूम्हाला माहीत आहे, म्हणून त्याचे उत्तर तूम्हालाच शोधावे लागेल आणि तेच उत्तर मिटींगच्या चर्चेत त्या मुद्याचे समाधान कसे करायचे ते साहेबांना पटवून द्यायचे आहे, ते त्यांनी मान्य करून घेतले की तुमची अडचण तिथल्या-तिथेच दूर होते, कारण सर्वच गोष्टी आणि त्याचे स्वरूप त्यांना माहीत असतेच असे नाही'. मी त्यांना ही खुबी सांगितली. पुढच्या महिन्याच्या मिटींगपासून ती पद्धत सुरू झाली. आणि मिटींग दर मिटींग मुद्दे कमी होऊ लागले. आणि मिटींगा शांततेत पार पडू लागल्या. त्याचे परिणाम असे झाले की डिव्हीजनचे काम सुरळीत चालू झाले. हे अधीक्षक साहेबांच्याही लक्षात आले, पण त्यांचा माझ्याबद्दल आकस कमी झाला नाही. कारण, त्याचे श्रेय त्यांच्याकडे येत नव्हते. ते कर्मचाऱ्यांकडेच जात होते. पण त्याच्यामुळे झाले

उलटेच, त्याच्याने दुधात विरजण घातल्याचेच काम झाले असल्याचे माझ्या फार उशिरा लक्षात आले. तो आकस साऱ्या विभागात पसरला. डिव्हीजन सुरळीत चालू झाले हीच खटकणारी बाब ठरली. मग एका अधिकाऱ्याने मला, खात्यातूनच संपवायचा निर्धार केला. त्याचे नाव स्पष्ट सांगणे उचित होणार नाही. कारण ज्याला मारले तो ऑफिसर, ऑफिसर असोसियशनचा पदाधिकारी होता आणि तो याच भागातील रहिवासी होता. त्या लेव्हलने तशी हवा पसरवली जात होती. तसे पाहिले तर मी कधीही हाणामारीच्या संदर्भात कर्मचारी किंवा प्रशासनात चौकशी केली नाही किंवा बऱ्या वाईटच विश्लेषण केले नव्हते. कारण माझा त्या मुद्याशी काही घेणे-देणे नव्हते. पण मी कर्मचाऱ्याशी सलोख्याने वागतो, त्यांनी अडचणी विचारल्या तर मी सहकार्य करतो हा त्या मागचा रोष होता. ही आकसाची आग पसरायचा दुसरा एक मुद्दा असा होता की, रिजनल डायरेक्टरचे ऑफिस याच विभागात होते आणि तेथे काम करणारे वर्ग तीनचे सारे, वर्ग दोनचे जवळ जवळ ऐंशी ते नव्वद टक्के ते सिनीयर वर्ग एकचे जवळपास पन्नास ते साठ टक्के कर्मचारी हे याच विभागातले होते. त्यामुळे माझ्या विरूध्दच्या विष पेरणीचे कारस्थान बेमालूपणे तेथूनच सुरू झाले.

दरम्यान उच्चश्रेणी पोष्ट मास्तर या पदावर बढती मिळून, माझी परत नांदेड मूख्यडाक घरला नेमणूक करण्यात आली आणि तेथूनच माझी डाक अधीक्षक या पदावर बढती झाली आणि मला आधी भूसावळ आणि नंतर मालेगाव डिव्हीजनला अधीक्षक म्हणून नेमणूक मिळाली. हाणामारीच्या प्रकरना नंतर प्रशासन आणि कर्मचारी यांच्यातील बेबनावामूळे बिघडलेली आमच्या डिव्हिजनची प्रतिमा सुधारण्यासाठी मी सहाय्यक अधीक्षक म्हणून तिथला पदभार सांभाळल्यानंतर कर्मचाऱ्यांना वेठीस धरण्याऐवजी, मी त्यांचे मत परिवर्तन करून प्रशासनिक व कर्मचारी यातील दरी कमी करून परिस्थिती सामान्य केल्यामुळे, वरिष्ठ मंडळीला ते आधीच जिव्हारी लागले होते, त्याचा वचपा काढण्यासाठी आता त्यांना आयती संधी मिळाली होती. कारण डायरेक्टर ऑफिसमधे त्यांचा एकहाती वावर होता. त्यामुळे मी पाठवलेल्या प्रत्येक अहवाल आणि रिपोर्टवर त्यांची बारीक नजर होती. त्यावर ते मुद्दामच

खोडसाळपणा करून नकारात्मक टिपण्या करून ते डायरेक्टर साहेबापुढे स्वत: नेऊन ठेवायचे आणि त्या नकारात्मक टिपणींच्या समानार्थ चर्चा करायचे. पण जो पर्यंत त्या पदावर आधीचे साहेब होते तो पर्यंत विशेष असे काही घडले नाही. कारण ते माझ्या कामावर खूश होते. त्यांच्या अखत्यारीत असलेली सर्व डिव्हीजन्समधे माझे अहवाल प्रगतीपर असायचे आणि डिव्हीजनचे व्यवस्थापन नियमांच्या चौकटीत आणि मुद्देसूद पाहून ते नेहमी इतरांना माझे उदाहरण देत असायचे. ते बरेच सिनीयर होते आणि कामचुकारपणा आणि लबाडी त्यांना आवडत नव्हती. म्हणून, त्यांना कुणाच्या सल्ल्याची गरज पडत नसे. पण ते साहेब गेले आणि तेथूनच मला पणोती लागायला सुरुवात झाली. अगदी मुद्देसूद आणि सविस्तर अशा अहवालावरही उलट-सुलट विचारणा व्हायला सुरुवात झाली. खातेबाह्य कर्मचाऱ्यांच्या बढती वरील नेमणुका, वार्षिक बदल्या, कर्मचाऱ्यांचे डेप्यूटेशन, रजा मंजुरी, घेतलेल्या वार्षिक तपासणी अहवाल, वेळोवेळी येणाऱ्या नवीन योजना आणि त्यांची अंमलबजावणीची प्रगती, काही आर्थिक स्कीममधे घालून दिलेल्या कोट्यावरची मासिक प्रगती, मंजूर केलेला प्रवासभत्ता या आणि अशा अनेक किरकोळ बाबीवर जाब-जबाब मागविणे सुरू झाले. त्या अनुषंगाने माझ्या कामाच्या चौकशी, तपासणी, निगराणी असे निर-निराळे प्रयोग सुरू झालेत. अशा चौकशीचे काम अर्थातच मूदद्‌ाम हीच ऑफिसर मंडळीच करू लागली. त्यामूळे साहेबांना सांगून सवरून, तेथूनच माझ्याविरुद्ध विष पेरणीला खतपाणी मिळायला सुरूवात झाली आणि मी त्यांचा टारगेट झालो. वरिष्ठांना माझी कोणतीही चांगली बाजू कधीच सांगितली गेली नाही. एखादा अल्पसा जरी मुद्दा हाती आला, की तो अधिक विकृत करून विशाल करून सांगावा आणि अशा मुद्यांची जंत्रीच तयार करून ठेवायची आणि सापडलेल्या कमकुवत मुद्यांबरोबर ती पूर्ण जंत्रीच मांडत राहायची. म्हणजे, तो मुद्दा एकदम विशाल होऊन जायचा. सहसा सिनिअर वर्ग एक आणि त्यावरचे जास्तीत जास्त अधिकारी आय.पी.एस.ची अर्हता धारण करणारेच असतात. ते सरळ सेवेत येत असतात, त्यांना खात्यातील बारीक खुब्या आणि कार्यपद्धती बाबत पुरी माहिती नसते, अशावेळी खालचे ऑफिसर जशी केस फिरवतील तशी त्यांची त्याबाबत धारणा होऊन जाते.

खालचे ऑफिसर अशावेळी बरोबर त्याचा फायदा सरळ जमले तर ठीक, नाहीतर साम, दाम अशा मार्गाने त्याचा फायदा उठवतात. मी अशाच कारस्थानाचा बकरा बनवला गेलो, जेवढे वाढवता येतील, तेव्हढे मुद्दे माझ्या विरुद्ध गोळा करण्याची, एक मोहीमच मग, त्यांनी उभारली. मुद्दाम माझ्या भागात त्यांच्या अकस्मात भेटी, ग्रामीण भागातील शाखाडाकघरांना वारंवार परस्पर जाऊन भेटी देणे, त्या कर्मचाऱ्यांना,आम्ही डायरेक्टरच्या ऑफिसचे आहोत, तूमच्या साहेबांपेक्षा आम्हाला खात्याच्या कायद्यांची जास्त माहिती असते, म्हणून त्यांच्या तपासणीतल्या राहिलेल्या चुका आम्ही शोधायला येतो, असा अवाजवी दबाव टाकून, मी किती वाजेला आलो? किती वाजेला गेलो? इतक्या कमी वेळात त्यांनी तपासणी कशी संपवली? तुम्ही त्यांना काय दिले. म्हणून, त्यांनी तुमची तपासणी कसून घेतली नाही? तुम्ही खोटे बोलतात, म्हणून तुमच्याच विरुद्ध केस करतो. असे जबरदस्तीचे तंत्र वापरून, काहीच काही लिहून नेणे, टपाल वाटप करणाऱ्यांना तुम्ही तुमच्या खेड्यांना रोज टपाल वाटप करत नाहीत, त्या खेड्यांचे लोक त्यांच्या खाजगी कामाला तुमच्या गावाला येतात, तेव्हा तुम्ही त्यांच्या खेड्यांना भेटी दिल्याचे दाखवण्या करता, चार-पाच दिवसांच्या सह्या एकाच वेळी तुमच्या व्हिजीट बुकात घेतात, अशा आमच्या ऑफिसकडे तिथल्या लोकांच्या तक्रारी आहेत, तुमच्या साहेबाकडेही त्यांच्या तक्रारी गेल्या आहेत. पण, तुम्ही साहेबांना पैसे देऊन त्या तक्रारी मिटवून टाकल्या, आता तुमचा जबाब द्या, नाकबूल झालात तर तूम्हाला नोकरी गमवावी लागेल. खाते बाह्य कर्मचाऱ्यातून, बढतीवर भरती न केलेल्या दहावी पास पोरांना भेटून, साहेबांनी भरती केलेल्या पोरांकडून खूप मोठी रकम घेऊन तुम्हाला डावलून त्याला भरती केले, पण तरी तुमचा नंबर लागून जाईल, पण त्यासाठी तूम्हाला तसे लिहून द्यावे लागेल, असे प्रलोभन देत जबाब लिहून घेणे, डिव्हीजन ऑफिसला भेटी देतांना माझ्यावर नाराज असलेल्या युनियन सेक्रेटरीकडून, कर्मचाऱ्याने बदली मागितली, पण पाहिजे त्याठिकाणी बदली न झालेल्या कर्मचाऱ्याकडून त्याने साहेबांना पैसे दिले नाहीत. म्हणून, त्याची गैरसोयीची बदली केली अशी तक्रार मागवून घेऊन, मग त्यांच्या कडून स्वत: जाऊन तसा जबाब लिहून घ्यायचा. अशा, निरनिराळ्या

तक्रारी गोळा करायच्या खटपटी सुरू झाल्या. जवळ-जवळ पंच्यान्नव टक्के असे कर्मचारी, ज्यांच्या कडून जबरदस्तीने जबाब लिहून घेऊन गेले, ते लोक साहेब परत गेल्याच्या दुसऱ्या-तिसऱ्या दिवशीच माझ्या ऑफिसात येऊन घरूनच त्यांचा लिखित अर्ज आणायचे, मी अशा सर्व तक्रारी माझ्याजवळ जमा करून ठेवल्या. ही पिचडलेली बाब आहे, हे माझ्या लगेच लक्षात आले होते. वेळ येईल तेव्हाच ते बाहेर काढावे, तो पर्यंत हे कूठ पर्यंत जाते ते पहात राहायचे असे मी ठरवून घेतले होते. त्या निमित्ताने त्यांचा अवास्तव वावर माझ्या भागात जो सुरू झाला तो शेवटपर्यंत चालू होता. त्या चौकशांवर माझे जबाब घेणे सुरू झाले. माझा काही दोष नसतांना मला वॉर्निंग मिळू लागल्या. सुरुवातीला मला फार वाईट वाटायचे, नंतर सवय लावून घेतली. अशा उलट-सुलट वॉर्निंगच्या आधारे, सहा वर्षात माझ्या तीन ठिकाणी बदल्या करण्यात आल्या. वास्तविक चार वर्षांचा कार्यकाळ पूर्ण झाल्यावर बदली करावी. असा नियम होता. १९९८, ९९ मध्ये माझी मालेगावहून अकस्मात आंतरदेशीय एअरपोर्ट सार्टिंग ऑफिसला बदली करण्यात आली. ते मुंबई सांताक्रूझला आहे. मुंबई म्हटली की तिथे मुंबईच्या बाहेरून येणाऱ्या ऑफिसरला सहसा अंतरर्गत सहकार्य मिळत नाही. त्या मागे एक सर्व साधारण असे कारण सांगितले जाते की, बाहेरून आलेल्या ऑफिसरला मुंबईतल्या कर्मचाऱ्यांच्या रोजच्या शेकडो अडचणींची कल्पना नसते, ते आपल्याच तोऱ्यात ऑफिसरकी गाजवत असतात आणि कर्मचाऱ्यांना वेठीस धरतात. भारतीय डाक खात्यात इतर सर्वसाधारण पोष्ट ऑफिस आणि रेल्वेमेल सेवा असे दोन भाग आहेत, त्यातही देशी आणि विदेशी असे दोन भाग आहेत. माझी सारी सेवा सर्वसाधारण पोष्ट खात्यात झाली होती आणि बदली रेल्वे डाक सेवेत झाली होती. सुरुवातीचे दहा-बारा दिवस माझे नवीन काम समजून घेण्यात गेले. नंतर मी माझ्या पद्धतीने प्रशासन आणि कर्मचाऱ्यांची सोय अशा दुहेरी चौकटीत राहून कामाला सुरुवात केली. काम फार कठीण होते. युनिटला शेकडो लोक होते. वेगळे काम वेगळया यूनिटमधे व्हायचे. युनिट वेग वेगळया इमारतीत होते. एके ठिकाणी बसून प्रत्येक युनिटवर नजर ठेवता येत नव्हती. कर्मचारी मुंबई सारख्या फॉरवर्ड शहरातले, साऱ्या मुंबईतली कर्मचाऱ्यांची संख्या निदान

साऱ्या महाराष्ट्रातल्या कर्मचाऱ्यांच्या संख्येच्या वीस टक्के एवढी तरी असेलच. त्यामुळे इथली यूनियनबाजी चरण सीमेवरची. एखाद्या ऑफिसर कडून ग्रामीण भागात धकते तशी साहेबगिरी दाखवली गेली आणि कर्मचाऱ्यांच्या थोडे जरी विरुद्ध ती साहेबगिरी असली, तर तासाभरात संपूर्ण मुंबईचे पोष्टाचे संपूर्ण काम बंद होऊन जाते. अर्थात जे अधिकारी नोकरीच्या सुरुवातीपासून मूंबईतच असतात. त्यांना, कर्मचाऱ्यांचे बहुतेक गुण-अवगुण आणि अडचणीही माहीत असतात, शहरातील कानाकोपऱ्यातल्या प्रत्येक ऑफिसची कार्यप्रणाली त्यांना माहीत असते. शहर इतके मोठे आहे की तिथे अनेक श्रेणींची कार्यालये, अनेक श्रेणींची पदे, उपविभाग, विभाग आहेत. राज्यातील सर्वात वरच्या श्रेणीचे मंडल कार्यालय येथेच आहे. त्यामुळे प्रत्येक स्थानिक अधिकाऱ्यांचे तेथे जाणे-येणे असून एकमेकांशी सलोखा असतो. त्यामुळे त्यांची सहजा-सहजी बदली होऊन शहराबाहेर जायचे प्रसंग कमीच येतात. एखादा नाकापेक्षा जड झालाच तर त्यालाही तेवढ्या पुरते शहराच्या आस-पासच्या भागात पाठवले जाते. आणि समजा एखादा बाहेरचा बदली होऊन आलाच तर तो खपवला जात नाही. कारण, त्याने बळकावलेल्या जागेवर, त्यांच्या पैकी एखाद्याची होणारी सोय अडवली जाते. अशा सर्वसाधारण कल्पना एका मित्राने मला दिली होती. असो जे काय असेल ते, पण मला मात्र मुंबईत यावे लागले. मी कामात रुळू लागलो. कार्यालयाच्या प्रत्येक क्षेत्राला जाऊन स्वत: कामाची पहाणी करू लागलो. साऱ्या सेक्शनचे काम, त्यातल्या अडचणी, कर्मचाऱ्यांच्या समस्या, या आणि अशा साऱ्या बाबींचा जवळून अभ्यास केला. आणि मग मी माझ्या पद्धतीने कामाला लागलो. माझ्या निरीक्षणात पुढील गोष्टी प्रकर्षाने आल्या, कार्यालयातील कामांच्या वेळा, काहीही असल्या तरी सर्वच कर्मचारी वेळेवरच हजर होतील हे फारच क्वचित घडते. ही समस्या लेडिज वर्गाची जास्त होती. कामाची पेंडींग टक्केवारी जवळ जवळ १० ते ११ टक्यांच्या दरम्यान होती, माझ्या काळातील मागील रिव्हिवच्या वेळी ती साडेनऊ टक्के आली होती. माझ्या हाताखाली लिखापढीच्या कामासाठी असलेले तीन-चार कर्मचारी खूप अनुभवी, कामात कुशल आणि युनियनचे वरिष्ठ कार्यकर्ते होते. एकदा त्यांना त्यांच्या सुटीच्या दिवशी मी केबीनमधे

बोलावले. 'तुमचा आजचा सुटीचा दिवस मी खराब केला. आठवड्यातून एकच दिवस तुमच्या नितांत व आवश्यक कामासाठी मिळतो, एवढे असूनही तुम्ही माझ्या एका शब्दावर त्या साऱ्या सबबी बाजूला सारून, न चुकता हजर झालात यातच मला खूप बरे वाटले. मी तीन चार महिन्यात आपल्या कामाचे निरीक्षण करत आहे, खरच मला तुमच्यात राहून काम करायला खूप आवडत आहे. मी पहातो आहे माझा प्रत्येक कर्मचारी, त्याच्या कामात गुंतलेला असतो. पण एक थोडेसे मनाला लागते, ते लेडिज कर्मचाऱ्या बद्दल. मला असे निदर्शनास आले आहे की, काही महिला कधी बिना टिफिनच्या येतात. काही पुरुषही आहेत. असे का होते याची मला जाणीव आहे. आपल्या कामावर कोणी जवळून येतात तर कोणी फार लांबून, जवळच्यांना थोडे कमी प्रॉब्लेम असतात. पण लांबच्यांना तासन-तास लटकून जिवाचा आटा-पिटा करून आपल्या कामावर वेळेवर पोहोचण्याचा प्रयत्न करावा लागतो. पण येथून पुढे तुम्ही लक्षात ठेवा. कोणाला येण्यात थोडे इकडे-तिकडे झाले तरी काळजी करायची नाही, पण अट एकच, प्रत्येकाने आपापला कोटा पूर्ण करावा. उशिरा येऊनही तो त्याचा कोटा पूर्ण करत असेल तर त्याला माझी काहीही हरकत नाही. एखाद्याने त्याचा कोटा वेळे आधी पूर्ण केला तर तो त्याच वेळी घरीही जाऊ शकतो. एखाद्या कर्मचाऱ्याला काही खाजगी अडचणीमुळे लवकर जाणे अनिवार्य असले, पण तो त्याचा कोटा पुरा करू शकत नसेल तर, दुसरा कर्मचारी माणुसकी म्हणून मदत करून त्याचा कोटा पूरा करण्यात मदत करत असेल तर त्यालाही माझी परवानगी आहे. अर्थात मदत करणाऱ्या कर्मचाऱ्याने त्याचाही कोटा मात्र पुरा करणे गरजेचे आहे. कामाच्या टर्न वाटपात महिलावर्गाला शक्यतोवर खूप सकाळची किंवा रात्री खूप उशिरा सुटणारी टर्न देण्याचे टाळावे. मला म्हणजे शासनाला कामाचा कोटा पूर्ण केलेला पाहिजे. आपले काम लवकर संपल्यावर, उरलेल्या वेळेचा दुसऱ्याच्या कामात त्रास किंवा अडथळा येणार नाही अशा पद्धतीने विनियोग करा, एखाद्याला इमर्जंसी आली आणि त्याला बाहेर जावेच लागणार असेल तर, तुमच्या सूपरवायझरला किंवा मला प्रत्यक्ष भेटून दोन ओळींचे पत्र लिहून देऊन परवानगी घेऊन जा. जर त्याने त्या दिवसाचा कोटा पूर्ण केला तर,

त्याची त्या दिवसाची रजा धरली जाणार नाही. या सर्वसाधारण सवलती मी तुम्हाला देतो आहे, लेखी नाही तोंडी. एकदा मी परवानगी दिल्यावर तुम्ही कोणत्याही साहेबांचा किंवा व्यक्तीचा धाक बाळगायचा नाही. हे सांगण्यासाठी आज मी तुम्हाला बोलावले आहे'. एवढे बोलून मी त्यांना विचारले 'यावर तुम्हाला काही सांगायचे किंवा सुचवायचे आहे का'? हे ऐकून ते सारेच जण एकमेकांच्या तोंडाकडे पहात होते. त्यांचा विश्वासच बसत नव्हता, 'साहेब हे सगळे तुम्ही स्वतःच सांगितले, यावर आमचा विश्वासच बसत नाही. बघा, आम्हीच काय पण मुंबईतल्या कोणत्याही कर्मचाऱ्याचा विश्वास बसणार नाही, साहेब जेवढ्या मोकळेपणाने तुम्ही खैरातींचे गाजर देऊ पहात आहात, त्यात तुमचा निश्चितच काही तरी स्वार्थ आहे, आम्हाला माहीत आहे मुंबईच्या बाहेरून येणारे ऑफिसर, मुंबईतल्या पिडलेल्या असहाय कर्मचाऱ्यांचा असाच गैर फायदा उठवतात. म्हणूनच ते मुंबईत जास्त दिवस टिकत नाहीत. उलट आम्हीच तुम्हाला एक ऑफर देतो, तुम्हाला मुंबईतून बाहेर पडायचे असेल तर सांगा, आम्ही तुमच्या बदलीची मागणी करतो. बघा तुम्ही, घ्या प्रचिती, महिनाभरात तुम्ही मुंबईच्या बाहेर जाता की नाही. आम्ही तीन महीन्यापासून बारकाईने पाहात आहोत, तुमच्या एकेक गोष्टींची दखल घेतो आहोत, कोणी देऊ केला तर आणि स्वत:ही कधी चहा न पिणे, आम्ही लोक तुमच्या सारखेच सकाळी सात वाजेपासून घर सोडून कामावर येतो, दिवसभरातून कँटीनमधे कोणी चहा पितो, कोणी वडापाव खातो, कोणी जेवण घेतो, पण तुम्ही आपले, मी दिवसातून एकदाच जेवतो असा टेप वाजवत असतात. दाराला आठ तास शिपाई बसतो, पण कधी त्याच्याकडून मागून न घेता स्वत: उठून प्यायला पाणी घेतात, या बिलकूल न पटणाऱ्या गोष्टी आहेत. पण याची दुसरी बाजूही आम्ही पाहतो आहोत, एखादा उशिरा येणारा कर्मचारी तुमच्या जवळून जातो. पण, तुम्ही त्याला कधी रागावलेले आम्ही पाहिले नाही, उलट आलात? चला कामाला लागा, अशी सौम्य भाषाच ऐकली आहे, अशा उलट-सुलट घटना पाहून आम्ही यूनियनवालेच बूचकळ्यात पडलो आहोत की, नेमका हा साहेब आहे तरी कसा? हे ठरवण्यात'. असे एका नंतर एक त्यांनी पाहिलेल्या आणि अनुभवलेल्या घटना सांगू लागले.

'आता मनातून तो सारा कचरा काढून फेका आणि मी जे काही सांगितले तेच लक्षात ठेवा'. मी म्हणालो. 'आता पर्यंत आम्ही कोणत्याही आणि कितीही मोठ्या अधिकाऱ्याला, साहेबच संबोधले आहे, पण आजपासून आम्ही तूम्हाला रावसाहेब संबोधणार. मुंबईतल्या कर्मचाऱ्यासाठी मूलूंड ते पार्ले स्वत:चे पैसे खर्च करून लोकलमधे धक्के खात येऊन, स्वत:च्या सवलती गरजू कर्मचाऱ्यांना बहाल करणाऱ्या साऱ्या मुंबई यूनिटमधे एकही अधिकारी पाहिला नाही. पण रावसाहेब येथून पुढे कोणीही तुमच्याकडे वाकड्या नजरेने पहाण्याची हिम्मत करणार नाही आणि शाश्वतीने सांगतो पहाणार ही नाही. इतकेच काय पण, तुमची निवृत्तीही मुंबईच्या बाहेर आम्ही होऊ देणार नाही'. एवढे बोलून ते थांबले.' बाकीचे जे होईल ते, पण तुम्ही मला आपला म्हणा बस', मी म्हणालो. 'रावसाहेब हे इतके स्वस्त नाही'. ते म्हणाले. 'रावसाहेब चला आता तरी आपण बाहेर जेवण घेऊ' ते आग्रह करू लागले. 'नाही खोलीवर मी सात वाजेलाच स्वयंपाक करून आलो आहे. येथून परत गेल्यावर खोलीवरच जेवू. मी दिवसातून एकदाच तेही रात्रीच जेवण घेतो. तुम्ही जेवा' मी म्हणालो. 'पण  रावसाहेब चहा नाही टाळू शकत, चला चहा तरी घेऊ', त्यांच्यातला एक जन म्हणाला,'अरे बाबा माहीत असून परत चहा मधे आलाच का? घ्या तुम्ही चहा', मी म्हणालो. 'नाही रावसाहेब हे इतके सहज नाही, काही तरी घ्यावेच लागेल' तो परत म्हणाला. 'बर आपण सगळ्यांना जे चालेल ते घेऊ', मी म्हणालो. 'ठरवा सगळ्यांना काय चालते ते.' 'तोच परत म्हणाला. 'थंड चालेल संगळ्यांना' मी विचारले, 'हो', ते म्हणाले, मी लगेच शिपायाला आत बोलावून सगळ्यांना कोकाकोला आणायला सांगितले. पिऊन झाल्यावर एक जन पैसे द्यायला लागला. पण, मी म्हंटले 'तुम्ही आज कामावर नाहीत, मी बोलवलेले पाहुणे आहात, पैसे तुम्ही कसे देणार'? ते ऐकून सगळे जन हसले आणि हसत केबीनच्या बाहेर पडले. ते दारातच थांबले आणि बोलू लागले,'रावसाहेब सगळे सारखे नसतात, व्यक्ती तितक्या प्रकृती असतात, आमच्यातही आहेतच. पण, तुम्ही आता काळजी करू नका, तशी मंडळी समोरून आपल्याकडे नजर ठेवून होती, आम्ही त्यांना पाहून घेऊ'. 'काही पाहू नका, तुम्ही हे सारे झाकून ठेवू नका, इतरांनीही हे पहावे म्हणून तर मी

मुद्दामच तूम्हाला ऑफिसातच बोलवले,आणि बघा वादळ आलीच तर ती नुसती धूळच घेऊन येत नाही. तिच्या, बरोबर कचराही असतोच आणि अशा कचऱ्याला भिऊन चालेल का मी म्हणालो'. 'बर रावसाहेब आमच्या मनातली मरगळ बाहेर फेकली गेली, आपली मिटींग खूप चांगली झाली, नकळत एकमेकांच्या मनातली खळ-खळ शांत झाली. आम्ही तूम्हाला आता विश्वासाचा शब्द देऊन जात आहोत. तो, आमच्या कडून हर प्रकाराने पाळला जाईल'. 'तुम्हीही माझ्याकडून निश्चित रहा'. मी म्हणालो. नंतर हातात-हात मिळवून सारी मंडळली पांगली. दुसऱ्या दिवसापासून कामाचे आणि कर्मचाऱ्यांचे वागणे यात जमीन आसमानाचा फरक आढळून आला. ज्याला जे काम दिसेल. तो ते करत होता, त्या दिवसापासून हे तुझे, ते माझे असे सांगणेही बंद झाले होते. तो आला नाही, तर त्याचे काम मी का करावे? असेही कोणी कोणाला सांगत नव्हता, ना कोणाला सूनवत होता. कार्यालयातील काम बिनबोभाट होत होते. एरवी कार्यालयात होणारा कान फाडून टाकणारा गोंगाट जणू कुठे हरवूनच गेला होता. भिंतीला-भिंत असलेल्या, दुसऱ्या कार्यालयात या बाबत आश्चर्य वाटू लागले. त्या कार्यालयांचे ऑफिसर माझ्या कॅबिनमधे येऊन या बाबत खात्री करून जायचा. पण मी कॅबिनमधे असलो, तरी यूनिटमधे बिलकूल शांतता पाहून, ते निमूटपणे निघून जायचे. पण तरी त्यांच्या डोक्यातले या वातावरणातील बदलाचे हे कोडे, मी तेथे असे पर्यंत तरी कोणालाच उलगडले नाही. हीच वार्ता हळू-हळू मंडल कार्यालया पर्यंत जाऊन धडकली. रोज दिवस अखेर पूर्ण सॉर्टींग कामाचे रिपोर्ट मंडल कार्यालयाला जायचा, तेथे त्यांचे छान-बीन आणि तुलनात्मक विश्लेषण व्हायचे, त्यात माझ्या कार्यालयाचे परफॉर्मन्स दिवसें-दिवस सुधारत चाललेले त्यांच्या लक्षात येऊ लागले होते, चुकीच्या छटाईच्या तक्रारी, दिवस भरात छटाईसाठी आलेली आणि त्यातून दिवस भरात कार्यालयाने छटाई केलेली वजा करून उरणारी टपाल, युनिट ते युनिट हस्तांतरातली दिरंगाई यात, महिना दर महिना घट होऊ लागली, या सर्व कामावर मंडल कार्यालयाची बारीक नजर असते, प्रगतीत लक्षणीय सुधारणा दिसू लागल्या. मागील वर्षाच्या तुलनेत ही सुधारणा पन्नास टक्क्यांपेक्षा जास्त दिसू लागली. त्यातही एक फार

मोठा मुद्दा एकदम नव्वद पंच्यान्नव टक्क्याने घटला होता, तो म्हणजे कर्मचाऱ्यांच्या तक्रारी. कार्यालयीन कामकाजाच्या निरीक्षणात आक्षेप घेण्याजोगेही काही आढळत नव्हते. म्हणजे या कार्यालयात नेमके असे काय चालले आहे की, ना कामात खोड, ना कर्मचाऱ्यात खोड, ना अधिकाऱ्यात खोड. साऱ्या मुंबईत, निदान या कार्यालयात तरी मंडल कार्यालयाला हे आढळून आले होते. उलट पक्षी, डाक विभागापेक्षा, एरव्ही या छटाई विभागाचीच जास्त डोकेदुखी नेहमीचीच असते, त्यातल्या-त्यात माझ्या विभागाची जास्त असायची. मंडलकार्यालयातील अधिकाऱ्यांनी याची शहानिशा करण्यासाठी त्यांच्यातील प्रत्येकाने अकस्मात भेटी देऊन माझ्या कार्यालयाचे कामकाज कसे चालले आहे. ते, स्वत: येऊन तपासायचे ठरवले. मग माझ्या कार्यालयीन सेट्समधे त्यांच्या अकस्मात भेटी देणे सुरू झाले. पण कोणालाही काही अनुचित आढळत नव्हते. मी मुंबईत नवीन असल्याने, मंडल कार्यालयातील एकाही अधिकाऱ्याला ओळखत नव्हतो. पण  ते अधिकारी माझ्या केबिन समोरून सेटस्मधे सरळ परस्पर जायचे. त्यांची व्हिजीट पूर्ण झाल्यावर, ते माझ्या केबिनमधे येऊन मग ओळख द्यायचे. त्यांना जातांना मी ही नुसता पाहून घ्यायचो, पण  कोणाच्याही बरोबर सोडायला जात नव्हतो. कारण त्यांना असे वाटायला नको की मी त्यांच्या बरोबर होतो. म्हणून सेटस् मधील कर्मचारी, माझ्या धाकाने कामात मग्न असल्याचे नाटक करत आहेत किंवा त्यांच्या कामाचा वेग, तेव्हढा पूरता वाढवतात किंवा शिस्तीत काम करतात. तेच माझ्या केबिनमधे आल्यावर कर्मचाऱ्यांच्या कामातील सफाई, शिस्त आणि पद्धतशीरपणाचे कौतुक करायचे. त्यांना आलेल्या आणि झालेल्या कामाच्या तुलनेत शिलकेची तफावत अजिबात सापडली नाही, उलट ती कौतूकास्पद आहे या किंवा हे छटाई कार्यालयाच्या कामाचे सोडून, दुसऱ्या कामाशी संबंधित चर्चा करायचे. मी त्यांचे बोलणे शांतपणे ऐकून घ्यायचो. आणि या सगळ्या चांगुलपणाच श्रेय माझ्या कर्मचाऱ्यांना देऊन मोकळा व्हायचो. या मुद्याचा गवगवा मंडल कार्यालयात होऊ लागला. आधी मंडल कार्यालयातील ऑफिसर लोक आमच्या विभागाकडे आकर्षित झाले होते, आता मंडल कार्यालयातील कर्मचारी तिकडे आकर्षित होऊ लागले. ते या

विभागातल्या कर्मचारी युनियनच्या पुढाऱ्यांना भेटू लागले. आपल्या विभागाची वाढत चाललेले कौतुक पाहून सारे कर्मचारीच खूष होऊ लागले. एका वर्षात अंतरक्षेत्रीय छटाईविभागाचे पूर्ण चित्रच बदलून गेले होते. कारण मंडल कार्यालयातले काम करणारे ऑफिसर वर्गाच्या भेटीही कमी झाल्या होत्या. एका प्रामाणिक, प्रयत्नशील ऑफिसर म्हणून त्या कार्यालयात आंतरक्षेत्रीय टपाल छटाई कार्यालयाच्या नावाची चर्चा चालू होती.

सारे काही व्यवस्थित चालले होते. आणि एक दिवस अचानकच वातावरण बदलले, डायरेक्टर जनरल पोष्ट दिल्लीच्या, व्हिजीलंन्स विभागाकडून माझ्या नावे, सेवा आणि वर्तणूक नियमावलीच्या कलम नंबर १४ अन्वये माझ्या विरुद्ध आरोप पत्र आले. साऱ्या मंडल कार्यालयात दबक्या आवाजात ही चर्चा सुरू झाली. आरोप पत्रासोबत, जवळ-जवळ एक ते दीड छोट्या गोणी भरून साक्षी पुराव्याचे आणि जाब-जबाबाचे पेपर आले. ते सारे पाहून मामला फार गंभीर समजून, मंडल कार्यालयाने चौकशी सुरू करण्याची तयारी केली. मला तसा आरोप पत्र, जो व्हिजीलंस डायरेक्टर ऑसिकडून आला, तो पाठवण्यात आला. मला माझा कायदेशीर मदतनीस देण्याबाबत कळवण्यात आले. माझ्या तो पर्यंतच्या सेवा काळात काही मित्र झाले होते. माझ्याबरोबरचे, काही माझ्यापेक्षा सेवाजेष्ठ, काही सेवाकनिष्ठ ही होते. मी त्या साऱ्यांना माझा कायदेशीर सल्लागार होण्याची विनंती केली. पण कोणीही तयार झाला नाही. कारण मंडल कार्यालय प्रमुख पोष्ट मास्तर जनरल हे त्यांचे सर्वेसर्वा कंट्रोलींग हेड असतात. त्या भीतीने खात्याच्या विरुद्ध सल्ला द्यायला ते घाबरले होते. अर्थात माझा त्याबद्दल त्यांच्याविषयी रोष नव्हता, गोष्ट सरळ होती, पाण्यात राहून मगराशी कोणी वैर करून घेत नाही. माझे आरोप पत्रच पोष्ट मास्तर जनरलच्या सहीने आलेले होते. त्यांना जरी माझी सहानुभूती वाटत होती, पण ते काही करू शकले नाहीत. त्यात दुसरी अशी अडचण होती की माझ्यावरचे आरोप हे पोष्टा कडील कामावर आधारीत होते. रेल्वे टपाल सेवा आणि पोष्टल टपालसेवा यातील कार्य पद्धतीत जमीन आसमानाचा फरक आहे. त्यामुळे रेल्वे मेल कडील ऑफिसरला घेऊन मला माझी केस चालवण्याची आवशक्यता वाटत नव्हती. पण प्रसंगी एखाद्या मुद्यावर वेळेची सवलत

मागण्याची गरज पडली तर सबब म्हणून मला तो हवा होता. मला तसा कोणीही सल्लागार म्हणून चालणार होता. पण, मांजराच्या गळयात घंटी बांधायची हिम्मत कोणीच करत नव्हता. ही कानकून आमच्या युनिटच्या युनियनच्या कर्मचाऱ्यांच्या कानी पडली. शेवटी त्यांनी त्यांच्या युनियनचा सेवानिवृत्त कार्यकर्ता मदतनीस म्हणून दिला. मी, त्याचे सम्मतिपत्र घेऊन मंडल कार्यालयाला रवाना करून दिले. मंडल कार्यालयानेही खात्यातर्फे चौकशी ऑफिसर नेमून दिला. हे आरोप ज्या विभागाशी संबंधित होते, म्हणून त्याच विभागीय कार्यालयातील त्यावेळचे सहायक डाक अधीक्षकांची सरकारी वकील म्हणजे प्रेझेंटींग ऑफिसर म्हणून, नेमणूक करण्यात आली. विशेष म्हणजे त्याच साहेबांनी बरीचशी चौकशी आणि अनेक कर्मचाऱ्यांचे जाब-जबाब त्यावेळी घेतलेले होते. त्यांच्या सरकारी वकील म्हणून केलेल्या नेमणुकीलाच, मी पूर्वग्रहदूषित ऑफिसर असल्याचा आक्षेप घेऊ शकलो असतो, पण मी कोणतीही चूक केलेली नव्हती, माझी कामातील सचोटी आणि इमानदारपणा, याची मला पूर्ण खात्री होती. नंतर मुंबईच्या मंडल कार्यालयात माझी चौकशी सुरू झाली. चौकशी अधिकारी, सरकारी वकील, आरोपी व त्यांचा बचाव करणारा वकील यांच्या एकत्र बैठकीत ती सुरू झाली. चौकशी अधिकाऱ्याने मला आरोप पत्र वाचून दाखवून त्यातील आरोप मान्य आहेत का विचारल्यावर मी ते पूर्णपणे फेटाळल्यावर, सरकारी वकिलाने त्यावर प्रत्येक आरोपानुसार कैफियत मांडली, त्यात मी माझ्या शासन काळात खातेबाह्य कर्मचाऱ्यांतून बढतीवर केलेल्या निवडी कशा गैरईराद्याने हेतूपूरक्सरपणे योग्य उमेदवार सोडून दुसऱ्याच्याच निवडी केल्या, शासन नियमाप्रमाणे कार्यकाल पूर्ण झाल्यावरही कर्मचाऱ्यांच्या बदल्या गैरईराद्याने उशिरा व काहींच्या गैरयोयीच्या ठिकाणी कशा केल्या, हे विषद करून मी तो गुन्हा हेतूपूरस्करपणे गैर इराद्याने केल्याचा गुन्हा केला आहे व हे त्याचे दोषी आहेत असे निवेदन दिले. या चौकशी आधीच मी माझ्या वकिलाला प्रत्येक आरोप, त्यातील बारकावे व त्यातील चुकीचे मुद्दे आणि त्यानुसार जे आरोप लावलेले आहेत. ते कसे खोटे व चुकीचे आहेत ते समजावून ते त्याला लिखित करून दिले होते. त्याचा, काळजीपूर्वक अभ्यास करायला सांगून ठेवलेच होते. त्यामुळे त्याला सुनावणी

दरम्यान फारशी अडचण येणार नव्हती, प्रसंगी मी होतोच. सरकारी वकिलाची कैफियत संपल्यावर त्याने माझी बाजू मांडयला सुरुवात केली. महत्त्वाचा आरोप होता, खातेबाह्य कर्मचाऱ्यांच्या बढतीसाठी केलेल्या निवडी व नेमणुका गैरईराद्याने, कायद्याचे उल्लंघन करून केलेल्या आहेत. यातही पोष्टमनच्या जागेवर बढतीसाठी परीक्षा दिलेल्या पण निवड न झालेल्या पाच खातेबाह्य कर्मचाऱ्याशी नावे होती, त्यांच्या तक्रारी प्रित्यर्थ, त्यांच्याकडून लिहून घेतलेल्या जबाबासह चौकशी अधिकाऱ्यासमोर ठेवण्यात आले. त्या सोबत मी निवड प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर रिजनल कार्यालयाला, त्या प्रकीयेत हजर झालेले कर्मचाऱ्यांचे नाव, शाखा डाकघराचे नाव, जन्म तारीख, वय, शिक्षण, मिळवलेली टक्केवारी, एकूण सेवाकाल, कामाचे निरीक्षणच मत हे दाखवणारे जे तक्ते पाठवलेले होते. ते जोडलेले होते, ते निर-निराळ्या वर्षांचे पाठविलेले होते, ते सारे तक्ते त्या जबाबा सोबत हजर केले. त्या तक्त्यांवरूनच त्यांनी आरोप पत्रात निवड न झालेल्या पोरांची नावे घेतली होती. निवडीसाठी शिक्षण मर्यादा दहावी पास होती, पण निवड केलेले उमेदवार दहावी पेक्षा जास्त शिकलेले आणि दहावी पास झालेले होते. म्हणून,त्यांना नियुक्त केलेले होते. माझ्यावर ठेवण्यात आलेला आरोप, 'नियमात निवडीसाठीची मर्यादा दहावी पासच असतांना त्याच्यापेक्षा जास्त शिकलेल्या उमेदवारांची निवड गैर इराद्याने केलेली आहे. जास्त शिकलेला उमेदवार इतर दुसरीकडे उच्चपदाच्या नोकरीत जाऊ शकतो. या, उद्देशानेच शासनाने दहावी पासची मर्यादा घातली. असतांना, त्या नियमाचे गैरईराद्यानेच उल्लंघन केले आहे'. सरकारी वकिलांची बाजू मांडून झाल्यावर, माझ्या सूचने प्रमाणेच माझ्या वकिलाने बाजू मांडायला सुरुवात केली. 'दहावी पासची मर्यादा ही सरकारने पोष्टमन पदासाठी घालून दिलेली आहे. हे खरे आहे, पण मेहेरबान साहेबांनी त्या नियमाचे परत अध्ययन करावे, त्या कायद्यात असे कुठेच नमूद केलेले नाही की, दहावीपेक्षा जास्त शिकलेल्या उमेदवारांची दखल न घेता त्यांची निवड करूच नये, कारण त्यांना इतर नोकऱ्यात वाव असतो. सर ही झाली कायद्याच्या चाकोरीतील आरोपाची बाजू, दुसरी गोष्ट अशी की, कारकून पदासाठीची भरती दोन प्रकारे केली जाते, एक सरळ भरती प्रक्रिया आणि दुसरी पोष्टमन मधून परीक्षेत पास

होऊन प्रमोशनवर निवड, याच्या साठी शैक्षणिक कसौटी, कारकून पदाच्या भरतीसाठी कमीत कमी एस.एस.सी. अकरावी पास आहे. जाहीर एकूण जागांमधून काही टक्के पोष्टमन मधून परीक्षेव्दारे भरायच्या असतात. पण, पोष्टमन पदाच्या भरतीसाठीची जर दहावी पासचीच मर्यादा आहे, तर त्यांच्यात अकरावीपास उमेदवार कोठून मिळणार'? त्यावर सरकारी वकील म्हणाले. 'पोष्टमन लोक घरी अभ्यास करून एस.एस.सी. ची परीक्षा पास करून प्रमोशन साठी अर्ज करू शकतात'. माझ्या वकिलाऐवजी मीच आक्षेप घेत म्हणालो. माननीय साहेब आपण वकिलांना विचारा वरिष्ठ अधीक्षक पदासाठी आयपीएस पासची मर्यादा आहे. तेव्हा त्या पदाच्या प्रमोशन साठी ती परीक्षा पास होण्यासाठी त्यांनी घरीच अभ्यास केला का? त्या ऐवजी हे सिनीऑरिटीचीच वाट का पहात बसले'? त्यावर सरकारी वकिलांनी आक्षेप घेतला. 'सर हा वैयक्तिक पणे माझ्यावर केलेला आरोप आहे'. 'तसे नाही वकील साहेब त्यांचा उद्‌देश तो नव्हता, जर तर अशी भविष्यवाणीची भाषा चौकशीत चालत नाही, त्यांनी मांडलेला मुद्दा आहे. जर दहावी पासच उमेदवार पोष्टमन पदाच्या भरती साठी पात्र आहे. तर सरकारने त्या पदाच्या कर्मचाऱ्यांना कारकून पदावर बढतीसाठी राखीव जागा ठेवून परीक्षाच का ठेवली? सरकारला माहीत नाही का पोष्टमन पदासाठी दहावी पासचीच मर्यादा आहे. अकरावी नाही आणि त्याही पलीकडे त्यांच्यासाठी ठरावीक प्रमाणात जागाही राखीव ठेवून? तसे असते तर सरकारने तो राखीव कोठा ठेवलाच नसता'. यावर सरकारी वकील निरुत्तर झाले. 'नंतर मी पुढे सांगितले, सर ज्या वेळी कर्मचाऱ्यांकडून माझ्या विरुद्धच्या तक्रारी जबाब हे लोक त्यांच्याकडे जाऊन घेऊन आले, त्यांच्या विरुद्ध त्या लोकांनी दुसऱ्याच दिवशी एकेक जबाबदार साक्षीदार बरोबर आणून त्यांच्या समक्ष माझ्या ऑफिसात येऊन लिखित तक्रारी देऊन गेले आहेत. त्यांनी स्पष्ट म्हटले आहे की कोणी साहेबांनी त्यांच्याकडे येऊन ते साहेब असून ते तुमची चौकशी करायला आले आहेत, इकडे काहीतरी फार मोठा घोटाळा चालला आहे, कर्मचारी लोक साहेबांना मोठ्या रकमा देऊन त्यांचे कामे करून घेत आहेत, कोणी साहेब चौकशीला आले तर खोटे सांगून त्यांना परतावून लावतात, आमच्या जवळ तसे चालणार

नाही, आम्हाला तसे कोण-कोण ते कर्मचारी आहेत त्यांची नावे माहिती आहेत. त्यापैकी, तुम्ही एक आहेत, तेव्हा खोटे बोलून नाही म्हणू नका, तसे कराल तर इथेच तूम्हाला कामावरून कमी करायचा आम्हाला अधिकार आहे, तेव्हा आम्ही सांगतो तसे जबाब लिहून द्या. असे सांगून जे दहावी पास आहेत. पण, त्यांची कारकूनच्या बढतीसाठी निवड झाली नाही,तसेच ज्यांनी ठरावीक गावासाठी बदली मागितली पण झाली नाही. त्यांच्याकडून, ''मी साहेबांना मोठी रकम न दिल्यामुळे माझ्या ऐवजी त्या गावाला त्याची बदली केली असे लिहून घेतले आहे'', तसे ज्यांचे जबाब माझ्या विरुद्धचे पुरावे म्हणून, तुमच्याकडे जमा केले आहेत,त्यांच्या लेखी तक्रारी माझ्याकडेही आहेत, त्यांची प्रोसीडींगमधे नोंद करून घ्यावी'. असे सांगून माझ्याकडे फार आधी येऊन ज्या तक्रारी ते कर्मचारी देऊन गेलेत. पण, मी त्यावेळी त्या माझ्याकडे सांभाळून ठेवल्या होत्या, मी त्या चौकशी अधिकाऱ्याकडे दिल्या. अशा प्रकारे १९९८ पासून ज्या चौकशीचे बीज रोपले गेले होते. ती २००३ मधे संपली. त्यावेळी माझी सर्वीस दीड वर्षे बाकी राहिली होती. या चौकशीचा खूप वरच्या आणि खूप खालच्या लेव्हलच्या स्तरा पर्यंत गाजा-वाजा झाला होता. चौकशी संपल्या नंतर त्याचा रीपोर्ट तयार झाल्यावर माझ्या विरुद्धच्या चौकशीचे सर्वोच्च पातळी वरील वरच्या पातळीवर बरीच उलथा-पालथ झाली असेही म्हणतात. चौकशी संपल्यानंतर माझी वरिष्ठ पोष्ट मास्तर म्हणून, धुळ्याला बदली झाली. साधारण एक महिना नोकरी राहिली असतांना मी, मिसेस आणि मुलीला बरोबर घेऊन श्री डाकोरजी, सोरटी सोमनाथ, प्रभास पट्टनम, व्दारका, मातृगया आणि माता अंबाजींच्या दर्शनासाठी सेवेतली शेवटची अर्जित रजा प्रवास सवलत. (एल.टी.सी.) घेऊन गेलो होतो. सर्व क्षेत्रे पाहून झाल्यावर शेवटचे दर्शन अंबाजींचे घेऊन त्या रात्री तिथल्या लॉजमधे आमचा मुक्काम झाला. तेव्हा माझ्या निवृत्ती साठीचे पाचच दिवस बाकी होते. त्या रात्री माझ्या स्वप्नात एक अनाहूत येऊन सांगत होता,'अरे उठ गड्या आता, तुझ्या केसचा निकाल लागला आहे, त्यात तू निर्दोष सुटला आहे'. ते ऐकून माझे एकदम डोळे उघडले, समोर कोणी नव्हता. मी लॉजच्या व्हरांड्यात जाऊन समोर पाहिले. तर लॉज समोरच्या झाडावर पक्षांचा किल-

किलाट चालू होता. घरट्यातले लहान पिल्ले, चिमुकले-चिमुकले पंख फडफडवत पक्षिणीने उघडलेल्या चोचेत-चोच घालत होते ,ते जणू पक्षिणींना सुचवत होते,तू दाने वेचायला जायाच्या तयारीत आहेस, जाऊन लवकर परत ये,मला फार भूक लागली आहे,परत येऊन मला भरव. मी अंबाजी मातेच्या मंदिरावरील कळसाकडे तोंड करून प्रसन्न मनाने हात जोडून सांगत होतो. 'आई जगदंबे हाच तूझाखरा प्रसाद मिळाला'. सकाळी माझी लाडकी मुलगी उज्वला झोपेतून उठली, १९८६ पासून जो भार मी एकटा वाहात होतो. तो तिला सारा सांगितला. ती माझा गळा पकडून रडत म्हणत होती, 'बापू तुमच्या भोवती, रात्रं दिवस माझी आई, दोन भाऊ आणि मी वावरत होतो, इतर साऱ्या सुख-दू:खात आपण सामील होत होतो, तरी तुम्ही एका शब्दाने आम्हाला कोणाला याची चाहूल लागू दिली नाही, एवढा मोठा दू:खाचा डोंगर, तुम्ही एकट्याने पेलला. आम्हाला काय मिळाले'? 'बेटा हा जो आनंदाचा क्षण आहे. तोच खरा तुमच्या वाट्याचा होता'. आम्ही घरी आलो. दुसऱ्या दिवशी मी सकाळीच कामावर रुजू झालो. तो माझा कामाचा शेवटचा दिवस होता. त्याच्या दुसऱ्या दिवशी मी नोकरीतून निवृत्त होणार होतो. सकाळचे जवळ जवळ दहा वाजेची वेळ होती. मिस्टर वानखेडे आमच्या धुळे डिव्हीजनचे सिनियर सूपरीटेंडेंट, एका हातात फुलांची माळा व दुसऱ्या हातात पेढ्यांचा डबा घेऊन, घाई-घाईने माझ्या केबिनमधे आले, आल्या-आल्या गळ्यात माळा घालून तोंडात पेढा कोंबून, मला कड-कडून मिठी मारत म्हणाले 'हार्दिक अभिनंदन गढरी साहेब'. 'अहो वानखेडसाहेब अजून मी कामावर आहे, माझ्या निवृत्तीचा दिवस उद्या आहे, मला एक दिवस आधीच बाहेर घालवता का?' 'अहो, रावसाहेब निवृत्ती गेली खड्यात, तुम्ही तुमच्या केसमधे जिंकलात, आहात कुठे', एका दमात पोष्ट मास्तर जनरल आणि डायरेक्टर जनरल दिल्ली यांना धोबी पछाड मारून चारी खाणे चित्त करून सन्मानाने तूम्हाला साऱ्या दोषातून मुक्त केले आहे'. 'साहेब ही तर माझी, परिस्थितीशी चालू असलेली झुंज होती', मी म्हणालो. त्यांनी नंतर तो निकाल पत्र माझ्या हातात ठेवला. निवृत्ती नंतरचे माझे आयुष्य शांत आणि संथपणे हळू-हळू पार पडत आहे.



## लेखकाविषयी –

मुलतः डोक्यावर सारा संसार घेऊन जंगलो-जंगल, दऱ्या-खोऱ्यातून या गावाहून त्या गावाला फिरणाऱ्या कुटुंबात, जानेवारी १९४५ मध्ये माझा जन्म झाला. मी तीन महिन्याचा असतानाच वडील वारले. घरात अठराविश्वे दारिद्र्य होते. शेती नव्हती. एक मोडके घर, रोज उठल्यापासून मजूरीची चिंता खेडे गावातील वस्ती. दगडी घट्यावर दळण दळणे, कपडे धुणे, भांडी घासणे, पाणी भरणे. स्वयंपाक करणे, गाई चारणे, शेण गोळा करून त्याचे खत करणे, जंगलातून लाकडे आणणे त्याच बरोबर शाळेतही जाणे, ही वाट्याला आलेली दैनंदिन कामे. अंगावर फक्त एकच कपड्यांचा जोड. तोच रात्री धुवून दिवसा वापरायचा.

मुळचे गाव आखतवाडे, तालुका पाचोरे. चौथीपर्यंतचे शिक्षण तिथे झालेनंतर पोट भरण्यासाठी कुसुंबा तालुका धुळे येथे कुटुंबाचे स्थलांतर झाले. आधी ठरलेली दैनंदिन कामे येथेही सुरुच राहीली. ती कामे करता-करता पुढचे शिक्षण सुरू झाले. शिक्षण संपले आणि नोकरीचा शोध सुरू झाला. आधी शिक्षकाची नोकरी नंतर सॉईल कंझरव्हेशन खात्यात, नंतर पोष्ट खात्यात कारकूनाची नोकरी लागली. खात्याअंतर्गत परीक्षा देत-देत रेडिओ लायसेंस इन्स्पेक्टर, पोष्टल इन्स्पेक्टर नंतर सहाय्यक डाक अधिक्षक आणि शेवटी डाक अधिक्षक वरिष्ठ पोष्ट मास्तर (सिनिअर सुप्रिंटेंडेन्ट) या पदावरून सेवा निवृत्त झालो.

## प्रस्तुत लिखाणाविषयी –

मन हे निसर्गतः चंचल आहे. वयाच्या कोणत्याही अवस्थेत ते कधीच स्थिर नसते. विचार हे त्याचे वाहन आहे. भावना ह्या त्याला दिशा देत असतात. आयुष्यातील घटना ह्या भावनांना प्रेरीत करतात. त्यानुसार भावनांच्या हिंदोळ्यावर मन सतत झुलत असते. त्यात आयुष्यातील निरनिराळ्या अनुभवांचे बंध त्यांना बांधून आठवणींच्या कप्प्यात साचवत जातात. अशाप्रकारे ही संचीत शिदोरी मानवाला ज्यावेळी त्याची गात्रे थकलेली असतात, जवळपास कोणी नसतो अशा वेळी हे कप्पे एक-एक करून उघडले जातात आणि त्यात विरंगुळा शोधतात.

माझ्या मनातली अवस्था सध्या एकाकीपणातील आहे. आयुष्य उतरणीला लागले आहे. संसाराच्या बंधनीतच सर्वकाळ गेला आहे. बालपण ते म्हातारपणा दरम्यान अनेक अनुभव, संकट आलेत. त्या संकटांना आता पावतो मी सहसा कोणात वाटण्याचा प्रयत्न केला नाही. कारण जे जवळचे होते त्यांना सांगून चिंता किंवा क्लेश द्यावे असे कधी वाटलेच नाही. पण आता असे वाटते की आपण ती एक पोकळी निर्माण केली आहे, जी भरून काढायला हरकत नाही. त्या संकटांना एकाकीपणे मी कशी झुंज दिली आणि जीवनात अशा संकटांना न घाबरता धाडसाने आणि चातुर्याने कसे सामोरे जावे हेच सांगण्याचा यात उद्देश आहे. ज्या घटना आणि अनुभव मी कथन केल्या आहेत त्यातून वाचकाने काही घेतलं तर लाभच होणार आहे. याच उदात्त भावनेने मला हे लिखाण करायला प्रवृत्त केले आहे. याचे वाचन करताना वाचक वर्गाला पूर्ण वाचन केल्याविना पुस्तक हातावेगळे करावे असे कधी वाटणार नाही. याची मला खात्री आहे. तरी वाचून आपणास झालेला आनंद आणि अनुभवाचे दोन शब्दातील अभिप्रायाची अपेक्षा प्रार्थनीय आहे.

– गोविंद गढरी